म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २३८

Presented to the ...

236

236

चैतन्योत्पादक ग्रंथमाला–पुस्तक २ रे.

# ब्राह्मण-अब्राह्मण-बोध.

दा. क्र. २४५६

संपादक
वासुदेव दामोदर मुडले

प्रथमावृत्ति–१९२४

REFBK-0002456

चैतन्योत्पादक ग्रंथमाला--इसलामपूर.

किंमत दोन रुपये.

प्रकाशक
[वा]सुदेव दामोदर मुंडले,
मु० इसलामपूर-जि० सातारा.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणे

# ब्राह्मण-अब्राह्मणबोध

उर्फ

## ब्राह्मण-पत्रिकेच्या पहिल्या वर्षांतील निवडक लेख.

भाग पहिला

## आत्मनिरीक्षणपर लेख

# ब्राह्मणांनीं नित्य मनन करण्याजोग्या गोष्टी.

१ ब्राह्मणवर्गांतील सर्व पोटजातींनीं आपसांतील भेदभाव विसरून एकरूप झाल्याशिवाय भावी कालांत ब्राह्मणसमाज आपलें महत्त्व संभाळून जगणार नाहीं.

२ एकरूपतेबरोबर कालमानास अनुसरून परंतु परंपरा संभाळून धार्मिक व सामाजिक आचार–विचारांत योग्य ते फेरफार करून समाजाची पुनर्घटना व संघटन केल्याखेरीज धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारी पुरुषार्थ साधण्यास ब्राह्मण-समाज समर्थ होणार नाहीं.

३ ब्राह्मण्य व ब्राह्मण यांच्या अस्तित्वावर आणि उत्कर्षावर हिंदु राष्ट्र आणि हिंदु संस्कृति यांचा उत्कर्ष अवलंबून आहे.

४ ब्राह्मण्य आणि ब्राह्मण नष्ट झाल्यास हिंदु संस्कृतीचा नाश होऊन हिंदु राष्ट्र कायमचें गुलाम होऊन बसेल.

५ ही आपत्ति टाळण्याची जबाबदारी परंपरेनें ब्राह्मणवर्गा-वर येते. ती पार पाडण्याकरितां ब्राह्मणांनीं आपलें तेज व प्रतिभा ( बौद्धिक सामर्थ्य ) कायम राखण्याची किंबहुना त्यांचा विकास करण्याची शिकस्त करणें जरूर आहे.

६ तसें त्यांनीं केल्यास साऱ्या जगतांत वैदिक ऊर्फ सनातन आर्य–धर्माचा व संस्कृतीचा प्रसार ते करूं शकतील व त्या करतांच आपला जन्म आहे असें त्यांनीं मानलें पाहिजे.

७ मानवजातीचें खरें कल्याण करण्याचें सामर्थ्य आर्य-धर्मांत व आर्य संस्कृतींतच आहे; याची अखिल मानवसमाजास जाणीव करून देणें हें ब्राह्मणांचें अंतिम ध्येय असून तें सिद्ध करण्याकरितां ब्राह्मणसमाज जगाच्या अंतापर्यंत आपल्या अनेक उन्नत गुणांसह जगला पाहिजे.

इति शम्.

नं. ........
ता. ........

# १. संपादकाचें हृदयाविष्करण.

कोणाही लेखनव्यवसायप्रेमी अथवा सार्वजनिक हितबुद्धीच्या गृहस्थानें एखादें पुस्तक, वर्तमानपत्र अथवा मासिक काढलें तर त्याचा पहिला अंक प्रसिद्ध करतांना त्याला एखाद्या संसारी मनुष्यास अपत्यजन्माचे वेळीं जितका आनंद होतो, तितका किंबहुना त्याहूनही जास्त आनंद होत असतो; असा साधारण नियम आहे. प्रस्तुत लेखकानेंही अशा प्रकारच्या आनंदाचा आस्वाद यापूर्वीं अनेक वेळां घेतलेला आहे. परंतु आजचा प्रसंग त्याहून निराळा आहे. 'ब्राह्मण' मासिकपत्रिकेस जन्म देतांना आमच्या मनोवृत्ति नितांत आनंदमय नसून आनंद व खेद यांनीं सम्मिश्र अशा बनल्या आहेत. याचीं कारणें अनेक आहेत. पैकीं कांहींचें येथें दिग्दर्शन करतों. पहिली गोष्ट अशी कीं, ज्या ब्राह्मणवर्गाचें ध्येय व कर्तव्य इतर सर्व वर्णांचें अभीष्ट चिंतून त्यांच्या कल्याणास्तव झटणें हें असावयाचें व ज्यांनीं जनतारूप जनार्दनाची सेवा करून राष्ट्रोत्कर्ष साधावयाचा त्यांना आपल्या स्वतःच्या समाजाच्या हिताहिताची काळजी वाहण्याचा प्रसंग यावा, हें पाहून कोणाही विचारी माणसास परम खेद वाटून त्याचें मन क्षणभर विषण्ण झाल्यावांचून राहणार नाहीं. आतां आज असा प्रसंग कां उद्भवला, त्याची जबाबदारी ब्राह्मणवर्गावर किती आहे व इतरांकडे किती येते; तसेंच त्याला दुसरीं अनुषंगिक, अगांतुक व अपरिहार्य अशीं काय कारणें आहेत, यांचें उद्घाटन प्रस्तुतसारख्या एका लेखांत करणें शक्य नाहीं व तो आजचा विषयही नाहीं. तथापि अशा तऱ्हेचा विपरीत प्रसंग आज उद्भवला आहे—मग त्याचीं कारणें कांहींही असोत—याबद्दल सुज्ञ व विचारवान् ब्राह्मण लोकांत दुमत होईलसें वाटत नाहीं. दुसरी व विशेष खेदाची गोष्ट ही कीं, वयाच्या एकोणिसाव्या वर्षांपासून ज्याच्या मनांत कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंध-

मालेनें व्यापक देशाभिमानाची स्फूर्ति उत्पन्न केली व त्यास अनुसरून गेल्या चोवीस वर्षांत ज्यानें विवक्षित जाति किंवा पंथ यांचा विचार न करतां हिंदुस्थानांतील सर्व प्रकारचे लोक एकाच नावेंत आहेत अशा भावनेनें अनेक प्रकारचे सार्वजनिक व सामुदायिक हिताचे उद्योग आपल्या शक्त्यनुसार परंतु परम उत्कटतेनें व खडतर प्रसंग सहन करूनही केले, त्याला आपल्या उतारवयांत एका विशिष्ट जातीपुरता उद्योग करण्याचा प्रसंग आलेला पाहून त्याच्या मनाला किती तळमळ व खिन्नता वाटत असेल याची कल्पना "जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे" या म्हणीनुसार आस्थापूर्वक सार्वजनिक कामें करणाऱ्यावांचून इतरांस फारशी येणार नाहीं. तथापि आमच्या वाचकांना आम्हीं अत्यंत खुल्या दिलानें कळवितों कीं, प्रस्तुत काम हातीं घेतांना आमच्या आंतड्यांना अत्यंत पीळ पडत आहे व मनाला उद्वेग वाटत आहे. परंतु अशाही स्थितींत हें काम आम्हीं जें पत्करीत आहों तें केवळ कर्तव्यबुद्धीनें व राष्ट्रहिताच्या उच्च ध्येयास तें विघातक नाहीं अशी विचारांतीं आमच्या मनाची खात्री झाल्यामुळेंच होय. प्रस्तुत लेखकाच्या पूर्वपरंपरेचा म्हणजे आजपर्यंत त्यानें केलेल्या सार्वजनिक कामाचा इतिहास पाहिला तर प्रस्तुतचें काम सकृतदर्शनीं त्याच्या पूर्वचारित्र्याशीं अमळ विसंगत दिसतें व त्याकरितां दुसरा एखादा योग्य मनुष्य जर हें काम अंगावर घेण्यास पुढें आला असता तर त्यास बरें वाटलें असतें व अशा तऱ्हेचा थोडासा प्रयत्नही त्यानें केला; पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. तेव्हां सदसद्विवेकबुद्धीनें विचारपूर्वक कर्तव्य म्हणून ठरविलेली गोष्ट स्वतः करावयाची कीं लौकिक-मोठेपणा संभाळून प्रवाहांत वाहून जावयाचें व कर्तव्यपराङ्मुख झाल्याबद्दल मनाची टोंचणी सहन करावयाची, हें द्वंद्व गेल्या कित्येक महिन्यांत त्याच्या मनांत सुरू झालें व त्याचा निर्णय अखेर लौकिकाच्या बाजूनें न होतां कर्तव्याच्या बाजूनें झाला; आणि त्यामुळें प्रस्तुत मासिकाचें संपादकत्व त्यास स्वतःच्या शिरावर घेणें भाग पडलें.

वरील विवेचनावरून हें लक्षांत येईल कीं प्रस्तुत मासिकेचें कार्य हें केवळ आपद्धर्म म्हणून आम्हीं स्वीकारलें आहे. अर्थात् त्याची जरुरी नष्ट होऊन तें बंद करण्याचा समय आल्यास आम्हांस अत्यंत

आनंद वाटेल हें सांगावयास नकोच. आतां आज ज्या कारणांमुळें प्रस्तुत मासिक पत्रिकेस जन्म देणें भाग पडलें त्यांचा निर्देश करून नंतर ह्या पत्रिकेच्या धोरणाविषयीं खुलासा करूं.

गेल्या दहाबारा वर्षांपासून मद्रास व महाराष्ट्र या प्रांतांतून ब्राह्मणेतर समाजाची चळवळ बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सुरू आहे. महाराष्ट्रांत हिचें बीजारोपण होऊन वीसपंचवीस वर्षें झालीं, परंतु कै० शाहू छत्रपति व इंग्रजसरकार यांचें राजकीयदृष्ट्या परस्पर सहाय्यक धोरण ठरेपर्यंत तिला फारसें महत्त्व आलें नव्हतें. कै० शाहूमहाराज यांना इंग्रजांशीं वरीलप्रमाणें सलगीचा संबंध उत्पन्न करणें कांहीं ब्राह्मणांच्या दुराग्रहामुळें भाग पडलें; असा लोकापवाद आहे, आणि तो जर खरा असेल तर ती गोष्ट अत्यंत शोचनीय आहे असें म्हटलें पाहिजे. परंतु त्यासंबंधानें विशेष चर्चा करून सध्यां कांहीं तादृश उपयोग नाहीं म्हणून आम्हीं ती बाब तशीच सोडून देतों. मुद्याची गोष्ट ही कीं, ब्रिटिश सरकार व कै० शाहूमहाराज यांची गट्टी जमल्यामुळें कोल्हापूर संस्थानांत व ब्रिटिश हद्दींत ब्राह्मणेतर चळवळीस बरेंच तीव्र स्वरूप आलें व मुळांतच तिची उत्पत्ति विकारवश पायावर उभारली गेल्यामुळें स्वतःच्या उन्नतीपेक्षां ब्राह्मणांचा द्वेष करणें व त्यांना खालीं ओढणें हेंच सदर चळवळीचें प्रमुख अंग बनलें. पुढें या चळवळींत सत्यशोधक जलशांची भर पडली. ह्या जलशांनीं खेडेगांवांतील ब्राह्मणेतरांत एक प्रकारची जागृति उत्पन्न केली; परंतु त्यांत आत्मोन्नतीपेक्षां ब्रह्मद्वेषाचा डोसच फाजील दिला गेल्यामुळें सामान्यतः अज्ञान व गुन्हेगारीकडे सहज प्रवृत्ति असणाऱ्या खेड्यांतील लोकांकडून ब्राह्मणांविरुद्ध अत्याचार होऊन त्यांचें जीवित व वित्त हीं धोक्यांत येऊं लागलीं व ज्या खेड्यांत अत्यल्प ब्राह्मणवस्ती होती, अशा कांहीं खेड्यांतून ब्राह्मणांना पळून जावें लागलें! यासंबंधाची हकीकत वरचेवर वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालीच आहे व त्या बाबतींत कित्येक खटले होऊन गुन्हेगारांस शासनही झालेलें आहे. तात्पर्य काय कीं, ब्राह्मणांचें महत्त्व कमी करण्याच्या हेतूनें शिक्षणादि मार्गानें आपली उन्नति करून घेऊन त्यांच्याशीं योग्य रीतीनें स्पर्धा करण्याच्या शाब्दिक व अंशतः कृतिजन्य प्रयत्नांपासून तों अत्याचारापर्यंत महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर चळ-

वळीची मजल येऊन पोंचल्यामुळें ब्राह्मणवर्ग खडबडून जागा होणें व इतक्या निकराचा हल्ला ब्राह्मणेतरांनीं आपणांवर कां करावा याचा विचार करूं लागणें अपरिहार्य होतें. तसें जर न होतें तर ब्राह्मणसमाजाच्या सामुदायिक मृत्यूची ती खूण मानली गेली असती; परंतु सुदैवानें तसें झालें नाहीं हें आमच्या राष्ट्राचें भाग्य होय असें आम्हीं समजतों. कारण आमच्या राष्ट्राचा पूर्वेतिहास व आमची संस्कृति आम्हांस असें शिकविते कीं, **भारतीय ब्राह्मणांची बुद्धि व भारतीय क्षत्रियांची शक्ति यांचा मिलाफ झाला म्हणजे भारतवर्षाचा** उत्कर्ष होतो; आणि ह्या दोहोंत विक्षेप उत्पन्न झाल्यास अपकर्षास सुरवात होते व अशा प्रसंगीं ब्राह्मणांची बुद्धि जर थाऱ्यावर असली तर प्रसंगविशेषीं ती क्षात्रतेज धारण करून शक्तियुक्तींची जोड संपादून राष्ट्रोद्धार करूं शकते. याचा अर्थ असा कीं, भारतीय राष्ट्र व भारतीय संस्कृति यांच्या संरक्षणाची अखेरची जबाबदारी इतिहासानें ब्राह्मणवर्गावर टाकलेली आहे व ती त्यांनीं प्रसंगोपात्त कमजास्त प्रमाणानें पारही पाडलेली आहे, असें आजपर्यंतचा इतिहास सांगतो. जगांतील व त्याच्या अनुषंगानें भारतवर्षांतील मानवसमाजाच्या विचारांत व आचारांत विलक्षण क्रांति होऊन ह्या मागील इतिहासास नवीन वळण भावी कालांत लागणार असेल तर तें खुशाल लागो; परंतु तें लागल्याची स्पष्ट साक्ष पटेपर्यंत तरी राष्ट्रोत्कर्षाची अंतिम जबाबदारी ब्राह्मणांवरच पडणार आहे; या गोष्टीची जाणीव ब्राह्मणांत असणें सध्यां अतिशय जरूरीचें आहे. अलीकडे कित्येक वर्षांपासून ब्राह्मणांच्या ठिकाणची जबाबदारीची ही जाणीव बुजत चालली होती व त्यामुळें ते सुखासीन बनून पूर्वजांच्या कीर्ति—पराक्रमरूपी सुखशय्येवर खुशाल निद्रावश होऊन घोरत पडले होते. त्यांना खडबडून जागें करण्यास व त्यांचा व्यामोह दूर करून त्यांस कर्तव्यतत्पर करण्यास ब्राह्मणेतरांच्या व विशेषतः सत्यशोधकांसारख्या जालीम चळवळीची मात्रा हवीच होती, आणि या दृष्टीनें विचार केल्यास आजपर्यंतच्या ब्राह्मणविरोधी चळवळींचे व तिच्या पुरस्कर्त्यांचे ब्राह्मणवर्गावर एक प्रकारचे उपकार आहेत व त्याबद्दल त्यांचें सकौतुक अभिनंदन करून आभार मानल्यास तें कांहीं वावगें होणार नाहीं. आमच्या मासिकपत्रिकेची जाहिरात प्रसिद्ध झाल्या-

पासून कित्येकांचा असा समज झालेला दिसतो कीं, आह्मी हें पत्र सत्यशोधकांच्या किंवा ब्राह्मणेतरांच्या चळवळीचा निर्गम किंवा विरोध करण्याकरितां काढीत आहों; परंतु वस्तुस्थिति तशी बिल्कुल नाहीं. सत्यशोधकांची अत्याचारप्रवणता आम्हांस मान्य नाहीं; पण आमच्याप्रमाणेंच ती समंजस ब्राह्मणेतरांसही मान्य नाहीं. तिचा विरोध, अविष्करण किंवा प्रतिकार करणें कोणीही गैर समजणार नाहीं; परंतु अत्याचाराची बाब वगळली तर ब्राह्मणेतर किंवा सत्यशोधक **स्वतःच्या उन्नतीकरितां प्रामाणिकपणें** जे जे प्रयत्न करीत आहेत, किंवा करतील त्याबद्दल आम्हांस केव्हांही वैषम्य वाटणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे, तर अशा प्रयत्नास आम्ही आमचेकडून होईल तितकी मदत करण्यासही तयार होऊं. मात्र त्यांत जातिद्वेषाचें बीज असतां कामा नये. **त्रैवर्णिकांची उन्नति करण्याकरितां झटणें हा ब्राह्मणाचा परंपरागत धर्म आहे व हल्लींच्या आपत्कालांतही त्याचें शक्य तितकें परिपालन केलें जावें अशीच आमची इच्छा आहे.** परंतु कांहीं खऱ्या खोट्या कारणांनीं आज ब्राह्मणेतर समाजाचा ब्राह्मणांवरील विश्वास उडालेला आहे व त्यांच्यातील एक प्रमुख पक्ष भल्याबुऱ्या उपायांनीं ब्राह्मणसमाजाचें उच्चाटन करण्याच्या मार्गास लागला आहे. ब्राह्मण म्हटला कीं—मग तो चांगला कीं वाईट हें पहावयाचें नाहीं—त्याचा तिरस्कार करून त्याला खालीं ओढण्याचा प्रयत्न करावयाचा हें या पक्षाचें ब्रीद आहे व महाराष्ट्राच्या मध्य व दक्षिण भागांत ह्या पक्षाचेंच प्राबल्य विशेष आहे. अशा स्थितींत ब्राह्मणांपैकीं कांहीं लोक कितीही चांगले असले व त्यांची कितीही सदिच्छा असली तरी ती व्यर्थ जात आहे. हें आम्ही अनेक ठिकाणच्या अनुभवावरून लिहीत आहों. या परिस्थितीमुळें तूर्त तरी कांहीं काळ ब्राह्मणांना आपलें त्रैवर्णिकांसंबंधाचें कर्तव्य करतां येणें दुरापास्त होणार आहे. या त्रैवर्णिकांनीं स्वतःच्या पायावर उभें राहून आपलें हित साधावयाचें असा आतां विडा उचललेला आहे व ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे; परंतु तसें करतांना वेळीं अवेळीं ब्राह्मणांना शिव्या दिल्याच पाहिजेत किंवा त्यांची निंदा केलीच पाहिजे असें नाहीं. पण ही गोष्ट नित्य घडून येत असलेली आम्हांस दिसत आहे. ब्राह्मणेतरांच्या पत्रांचें जर थोडा काल एकसारखें वाचन चालू ठेवलें तर ब्राह्मणांचें चित्र

वस्तुस्थितीहून इतकें विपरीत व भेसूर दिसून येतें कीं, असला दुष्ट व अपमतलबी मानवसमाज पृथ्वीच्या पाठीवर दुसरीकडे कोठेंही आढळून येणार नाहीं ! भारतवर्षांतील ब्राह्मणसमाज—ज्याच्या कर्तबगारीचे गोडवे मोठमोठ्या पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनीं गाइले—तो आज जरी कांहींसा हीनावस्थेंत असला तरी इतक्या नीचकोटीप्रत खास जाऊन पोंचलेला नाहीं. हें जरी खरें तरी ज्याअर्थीं ब्राह्मणेतरांचा बहुजनसमाज आज त्यांच्याविरुद्ध बंड पुकारण्यास तयार झालेला आहे, त्याअर्थीं या समाजांत कित्येक बलवत्तर दोष उत्पन्न झाले आहेत असें मानल्यावाचून गत्यंतर नाहीं. या दोषांचा आश्रय करून ब्राह्मणसमाजाविषयीं नसते गैरसमज उत्पन्न करण्याचाही प्रयत्न अनेक वेळ झालेला आढळून येतो; आणि त्यामुळें ह्या समाजाच्या उन्नतीस व हितसंबंधास धक्का पोंचण्याचा बराच संभव आहे. यास्तव ब्राह्मणांविषयीं सहज होणारे व मुद्दाम केले जाणारे गैरसमज दूर करण्याची व त्यांच्या अंगीं जडलेल्या दोषांची छाननी करून त्यांचे आचारविचार अधिक शुद्ध करून त्यांस कर्तव्यदक्ष बनविण्याची आवश्यकता सांप्रत विशेष उत्पन्न झाली आहे. तसेंच पाश्चात्य संस्कृति व त्यांचें भौतिकशास्त्रीय ज्ञान यांच्या संसर्गानें आमच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय व्यवहारांतही बरेंच स्थित्यंतर होत चाललें आहे. लोकसत्तावाद, समाजसत्तावाद, मजूरसत्तावाद, वगैरे अनेक नवीन कल्पनांचा येथील समाजस्थितीवर आघात होऊन समाजाची पुनर्घटना होऊं पहात आहे. राज्यपद्धतीचीं ऊर्फ समाजशासनाचीं नवीन तत्त्वें अमलांत येऊन स्थीर होऊं पहात आहेत व आर्थिकदृष्ट्या अनेक मोठमोठ्या घडामोडी होऊन जीवनार्थकलह तीव्रतर होत चालला आहे. धार्मिक कल्पना व आचार यांचेंही रूपांतर होऊं लागलें आहे. ही स्थिति गेलीं कित्येक वर्षें मुग्धपणानें अथवा स्तिमितबुद्धीनें आपण पहांत राहिलों आहों; परंतु ह्या नवीन स्थित्यंतराचा जुन्या आर्य संस्कृतीशीं मेळ घालून आपल्या संस्कृतीचें व राष्ट्राचें वैशिष्टय कायम ठेवण्याचा जर आपण प्रयत्न केला नाहीं तर पाश्चात्य संस्कृति वरचढ होऊन हळुहळू आर्य संस्कृति नामशेष होण्याचा संभव आहे. हा प्रसंग टाळणें हें आर्यसंस्कृतीचे प्रतिनिधी व अभिमानी असणाऱ्या आजच्या ब्राह्मण-क्षत्रियादिकांचें व विशेषतः ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य

बजावण्याकरितां सनातन धर्माभिमानी ब्राह्मण-क्षत्रियांनीं एकविचारानें व एकतंत्रानें वागणें जरूर आहे. ही गोष्ट साध्य होण्याकरितां प्रथम ब्राह्मणवर्ग जागृत व संघटित झाला पाहिजे. ब्राह्मणांखेरीज इतर सर्व जाति संघटित व कार्यक्षम होऊं लागल्या आहेत. राष्ट्रीकरणाच्या दृष्टीनें ती गोष्ट पहिली पायरी या नात्यानें इष्ट आहे. परंतु राष्ट्ररक्षणाची इतिहासपरंपरेनें ज्यांचेवर विशेष जबाबदारी त्या ब्राह्मणांनीं अत्यंत विस्कळित व सामुदायिक हिता- विषयीं अत्यंत बेफिकीर आणि उदासीन असावें हें गर्हणीय नाहीं काय ! ब्राह्मणांच्या ह्या वृत्तीमुळें व त्यांच्यांत अर्धवट सुशिक्षितांचा विशेष भरणा असल्यामुळें जो तो शहाणा व चौघांचीं चार निरनिराळीं मतें (!) अशी स्थिति आजकाल उत्पन्न झाली आहे ! त्यामुळें ब्राह्मणांची संघटना करूं जाणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखें आहे, असें पुष्कळ विद्वान् व विचारी लोकांसही वाटूं लागलें आहे व हें कार्य कसें आणि कितपत यशस्वी होईल याबद्दल पुष्कळांनीं शंकाही प्रदर्शित केली; परंतु अशा स्थितींतही तें काम हातीं घेणें जरूरीचें आहे. कारण यापुढें हिंदुस्थानांत जी परिस्थिति उत्पन्न होणार आहे त्यांत ब्राह्मणांचें महत्त्व ते अल्पसंख्याक असल्यामुळें—अनायासें नष्ट होऊन आज ब्राह्मणेतरांपैकीं मागसलेल्या जातींना जो आक्रोश करावा लागत आहे तो ब्राह्मणांना करण्याची पाळी येणार आहे. त्याचें थोडेंसें दिग्दर्शन राऊंड टेबल त्रैमासिकाच्या गेल्या जूनच्या अंकांतील पुढील उताऱ्यावरून होण्यासारखें आहे:—

"It needed but the touch of a democratic franchise under the reform scheme for the "Depressed classes" to come by their own. ××× By sheer virtue of numbers their political power must increase with each extention of the present limited franchise. The cry to-day is not "Justice for the untouchables" but justice for the brahaman."

प्रस्तुतच्या राजकीय सुधारणांच्या कायद्याचे जनक कर्टिससाहेब यांचें

वरील लिखाण असून तें मद्रास इलाख्यांतील आदिद्रविडादि अस्पृश्य लोकांस अनुलक्षून आहे. महाराष्ट्रांत ब्राह्मण व मराठे यांच्या संख्येंत जें अंतर आहे तेंच जवळ जवळ मद्रासकडील ब्राह्मण व उपरोक्त अस्पृश्य-वर्गांत आहे. आज तिकडील कौन्सिलांतून ह्या लोकांचें बरेंच बहुमत आहे. थोड्याच कालांत मुंबई इलाख्यांतील स्थिति अशीच होणार आहे. तेव्हां अशा वेळीं ब्राह्मणांना आपलें समाजांतील योग्य स्थान कायम राखण्यास्तव काय केलें पाहिजे याचाही विचार करणें जरूर आहे. ह्या व अशाच प्रकारच्या बाबींची चर्चा करून आपापल्या वर्गाचे हितरक्षणाकरितां ब्राह्मणेतरांनीं अनेक पत्रें व मासिकें चालविलीं असून फक्त ब्राह्मणांच्या हित-संबंधाची काळजी वाहणारें एकही मासिक अगर पत्र सध्यां अस्तित्वांत नाहीं; त्यामुळें ब्राह्मणसमाजाची मोठी कुचंबणा होऊन राहिली आहे. जातिवाचक हितसंबंधाची किंवा सुधारणेची व्यापक व विस्तृत चर्चा व इतर जातींनीं निष्कारण केलेल्या हल्ल्यांस प्रत्युत्तर किंवा गैरसमजाचें खंडन अथवा खुलासा करण्यास ब्राह्मणापाशीं आज स्वतंत्र साधन नाहीं. ही उणीव दूर करणें सध्यां अगदीं जरूरीचें झालें आहे.

वरील सर्व व अशाच प्रकारचीं इतर सर्व लहानसहान कारणें लक्षांत घेऊन ब्राह्मणसमाजास जागृत करून प्रगमनशील बनविण्याच्या हेतूनें प्रस्तुत मासिकपत्रिकेस आम्हीं जन्म दिला आहे. ब्राह्मणसमाजाच्या उन्नतीकरितां व त्याच्या हितसंबंधाच्या रक्षणाकरितां जरी या पत्रिकेचा जन्म असला तरी इतर जातींच्या संघाशीं अथवा त्यांच्या हितसंबंधाशीं निष्कारण विरोध प्रगट करून वाद माजविण्याची आमची इच्छा नाहीं. प्रसंगविशेषीं आमच्या ब्राह्मणेतरबंधूंनीं जरी आमचेवर सकारण अथवा निष्कारण कटु शब्दांचा भडिमार केला तरी 'जशास तसें' या न्यायाचा अवलंब न करितां शांतपणें त्यांचा भडिमार सहन करून बचावाच्या धोरणाच्या दृष्टीनें (Defensive) व समंजसपणानेंच वाटल्यास जरूर तेवढें आमची बाजू कळण्याकरितां लिहीत जाऊं याबद्दल त्यांनीं खात्री बाळगावी. ब्राह्मणांची सुधारणा करून त्यांना राष्ट्रकार्यदक्ष बनविणें हेंच या पत्रिकेचें मुख्य ध्येय आहे व हें ध्येय सिद्धीस नेणें असेल तर ब्राह्मण-समाजाला इतर वर्गांशीं फटकून अथवा तुसडेपणानें वागून चालणार

नाहीं, हें उघड आहे; परंतु आज जो तो ब्राह्मणेतरांचा वर्ग ब्राह्मणांची टवाळी करून त्यांची पायमल्ली करण्यास तयार झाला आहे, ही स्थिति ब्राह्मणांस खास भूषणावह नाहीं व ही स्थिति पालटल्यावांचून म्हणजे ब्राह्मणांविषयीं इतर जातींच्या लोकांत खराखुरा आदरभाव उत्पन्न झाल्यावांचून त्यांचे व ब्राह्मणांचें ऐक्य होणें दुरापास्त आहे. ही दुरापास्त असलेली गोष्ट सुलभ कशी होईल याकडेच या पत्रिकेचें विशेष लक्ष राहील व त्याकरितां ब्राह्मणसमाजांत जी सुधारणा करणें जरूर व इष्ट दिसेल तिची सदैव घोषणा करण्यांत येईल. एकंदरींत ब्राह्मणांना सावध, शुद्धाचरणी, संघटित व कर्तव्यदक्ष बनविणें व त्यांच्याविषयीं इतर जातींच्या मनांत आदर उत्पन्न करून त्यांच्याशीं ऐक्यभाव जोडणें हेंच मुख्यतः आमचें धोरण राहील. शेवटीं आमच्या ब्राह्मणबंधूंस आम्हांस इतकेंच कळवावयाचें आहे कीं, त्यांच्या कल्याणाकरितां व हितरक्षणाकरितां जरी ही पत्रिका आहे तरी त्यांत कालास अनुसरून प्रगतीपर अशीच चर्चा येईल. जेणेंकरून समाजांत वितुष्ट व बखेडा माजेल असलीं दुराग्रहाचीं व एककल्लीपणाचीं मतें या पत्रिकेंतून प्रसिद्ध केलीं जाणार नाहींत. 'वेदाविषयीं पूज्यभाव व चातुर्वर्ण्याभिमान' ही मर्यादा संभाळून ब्राह्मणसमाजाच्या सुधारणेकरितां हवीं तीं मतें प्रतिपादन करणाऱ्या ब्राह्मण लेखकास ह्या पत्रिकेंत स्थळ मिळेल, मात्र त्यानें आपल्या लेखांत शिष्टाचार व गांभीर्य हीं राखिलीं पाहिजेत. इतकें सांगून व आम्हीं हातीं घेतलेलें हें कार्य यशस्वी करण्याबद्दल त्या सच्चिदानंदरूप परमेश्वराची करुणा भाकून लेखणीस तात्पुरती विश्रांति देतों.

# २ ब्राह्मण जगणार कीं मरणार ?

[ लेखकः—दामोदर विश्वनाथ गोखले, बी.ए., एल् एल. बी., पुणें.]

जातिभेद हें हिंदुसमाजाचें विशिष्ट लक्षण आहे व त्यामुळेंच हिंदुसमाजांत चार वर्णांतर्गत अनेक समाज उत्पन्न झाले आहेत व त्यांतच ब्राह्मण-समाजाचाही अंतर्भाव होतो. तथापि हिंदुसमाजाची केवळ ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा तऱ्हेची तर्कशून्य, अनर्थकारी व अन्यायप्रेरित विभागणी करून आज ब्राह्मणसमाजावर जी आग पाखडली जात आहे ती लक्षांत घेऊन ब्राह्मणसमाजाच्या परिस्थितीचा निरनिराळ्या दृष्टीने विचार करण्याचें योजलें आहे.

ब्राह्मणसमाजाला त्या समाजांतील घटकावयवांच्या स्वतःसिद्ध सामर्थ्या-शिवाय आजकाल दुसरा कोणीही त्राता नाहीं. इंग्रजांनीं महाराष्ट्राच्या साम्राज्याची मुख्य गादी पेशव्यांकडून जिंकून घेतल्यामुळें साहजिकच पेशव्यांच्या जातभाईवर त्यांचा अत्यन्त कटाक्ष आहे. इंग्रजी राज्याच्या अव्वल अमदानींत स्वतःच्या राज्याचीं पाळेंमुळें खोल जावींत व राज्य-कारभाराचा गाडा सुव्यवस्थित चालावा म्हणून इंग्रजांनीं पुष्कळ अशः ब्राह्मणांना हातीं घेऊन आपला कार्यभाग साधला; व ब्राह्मणवर्गापैकीं कांहीं लोकांनीं मूर्खपणामुळें व स्वार्थबुद्धीनें त्यांना मदत केली; पण या व्यक्ति-विषयक गोष्टी बाजूस ठेवल्या तर स्थूलमानानें असें खात्रीपूर्वक म्हणतां येईल कीं, इंग्रजांना ब्राह्मणजात सहसा प्रिय नाहीं. ब्राह्मण म्हटला कीं, सरकारच्या कपाळाला आठ्या चढतात व केवळ नाइलाज म्हणून कांहीं वेळां सरकार त्यांचा उपयोग करून घेतें. या कारणानें सरकारच्या रोषास वेळो-वेळीं ब्राह्मण जातीस बळी पडावें लागतें, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच पूर्वापार चालत आलेल्या जातिभेदांतील अन्यायी विषमतेमुळें हिंदु समाजांतील इतर जाति ब्राह्मणांवर सामाजिक हक्काकरितां तुटून पडत आहेत. अशा राजकीय व सामाजिक कात्रींत सांपडलेल्या ब्राह्मणसमाजानें

जागृत होऊन स्वसंरक्षणापुरते तरी उपाय योजण्याच्या कामास ताबडतोब लागणें किती जरूरीचें आहे हें सांगावयास नको.

प्रथमतः आपण संख्येच्या मानानें ब्राह्मणसमाज किती लहान आहे हें पाहूं. पुष्कळांना ब्राह्मणसमाजाच्या संख्येसंबंधानेंही अत्यंत गाढ अज्ञान आहे. १९२१ सालीं केलेल्या खानेसुमारीचे आंकडे पाहिले असतां दिसून येईल कीं, मुंबई इलाख्यांतील देशी संस्थानें व खालसा भाग यांची लोकसंख्या एकंदर २,६७,५७,६४८ इतकी आहे. त्यापैकीं देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या प्रमुख ब्राह्मण जातींची लोकसंख्या पुढीलप्रमाणें आहे. सगळ्या मुंबई इलाख्यांत कोंकणस्थ अथवा चित्तपावन यांची लोकसंख्या फक्त ५६७९० पुरुष व ५२३१७ बायका एवढीच आहे. याप्रमाणेंच देशस्थ ब्राह्मणांची संख्या १५२९३९ पुरुष व १३८३०८ बायका इतकीच आहे. कऱ्हाडे ब्राह्मणांची संख्या तर अत्यंत अल्प म्हणजे सगळ्या मुंबई इलाख्यांत फक्त १५४०१ पुरुष व १४९७८ बायका इतकी आहे.

तात्पर्य, मुंबई इलाख्याच्या लोकसंख्येच्या मानानें वरील तीन वर्गांपैकीं ब्राह्मणवर्ग किती अल्प आहे याची कल्पना येईल. ब्राह्मण या संज्ञेंत इतरांचाही समावेश होतो; पण केवळ सोयीकरितां वरील तीन पोटजातींचा उल्लेख केला इतकेंच. केवळ संख्येचाच विचार केला व हिंदुसमाजांतील इतर वर्गांचा या जातीबद्दलचा द्वेष लक्षांत घेतला व त्यांत सरकारच्या इतराजीची भर घातली म्हणजे एवढासा हा चिमुकला समाज लोकसंख्येच्या दडपणाखालीं चिरडून जाईल अशी भीति वाटणें साहाजिक आहे ! केवळ जन्मानें ब्राह्मण म्हणून अत्यंत सात्विकवृत्तीचा प्रकर्ष प्रत्यक्ष दृष्टीस पडत असतांना सुद्धां एकाद्या व्यक्तीचा जर अमानुष छळ होऊं लागला तर यांत अन्याय होत नाहीं असें कोण म्हणेल ? राष्ट्राकरितां कोणत्याही तऱ्हेचा जातिभेद अगर सामाजिक विषमता मनांत न आणितां एखाद्या व्यक्तीनें आपला देह झिजविला तरी केवळ जन्मानें ब्राह्मण म्हणून जर ती व्यक्ति द्वेष्य मानली जाऊं लागली तर अन्याय होत नाहीं असें कोण म्हणेल ? आज जरी सर्वत्र ही परिस्थिति दिसत नसली तरी हल्लीं जें द्वेषाचें बीज पेरलें जात आहे त्या बीजास लौकरच वरील परिस्थितीचीं फळें आल्याशिवाय

# २ ब्राह्मण जगणार कीं मरणार ?

[ लेखकः—दामोदर विश्वनाथ गोखले, बी.ए., एल् एल. बी., पुणें.]

जातिभेद हें हिंदुसमाजाचें विशिष्ट लक्षण आहे व त्यामुळेंच हिंदुसमाजांत चार वर्णांतर्गत अनेक समाज उत्पन्न झाले आहेत व त्यांतच ब्राह्मण-समाजाचाही अंतर्भाव होतो. तथापि हिंदुसमाजाची केवळ ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा तऱ्हेची तर्कशून्य, अनर्थकारी व अन्यायप्रेरित विभागणी करून आज ब्राह्मणसमाजावर जी आग पाखडली जात आहे ती लक्षांत घेऊन ब्राह्मणसमाजाच्या परिस्थितीचा निरनिराळ्या दृष्टीने विचार करण्याचें योजलें आहे.

ब्राह्मणसमाजाला त्या समाजांतील घटकावयवांच्या स्वतःसिद्ध सामर्थ्या-शिवाय आजकाल दुसरा कोणीही त्राता नाहीं. इंग्रजांनीं महाराष्ट्राच्या साम्राज्याची मुख्य गादी पेशव्यांकडून जिंकून घेतल्यामुळें साहजिकच पेशव्यांच्या जातभाईवर त्यांचा अत्यन्त कटाक्ष आहे. इंग्रजी राज्याच्या अव्वल अमदानींत स्वतःच्या राज्याचीं पाळेंमुळें खोल जावींत व राज्य-कारभाराचा गाडा सुव्यवस्थित चालावा म्हणून इंग्रजांनीं पुष्कळ अशः ब्राह्मणांना हातीं घेऊन आपला कार्यभाग साधला; व ब्राह्मणवर्गापैकीं कांहीं लोकांनीं मूर्खपणामुळें व स्वार्थबुद्धीनें त्यांना मदत केली; पण या व्यक्ति-विषयक गोष्टी बाजूस ठेवल्या तर स्थूलमानानें असें खात्रीपूर्वक म्हणतां येईल कीं, इंग्रजांना ब्राह्मणजात सहसा प्रिय नाहीं. ब्राह्मण म्हटला कीं, सरकारच्या कपाळाला आठ्या चढतात व केवळ नाइलाज म्हणून कांहीं वेळां सरकार त्यांचा उपयोग करून घेतें. या कारणानें सरकारच्या रोषास वेळो-वेळीं ब्राह्मण जातीस बळी पडावें लागतें, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. तसेंच पूर्वापार चालत आलेल्या जातिभेदांतील अन्यायी विषमतेमुळें हिंदु समाजांतील इतर जाति ब्राह्मणांवर सामाजिक हक्काकरितां तुटून पडत आहेत. अशा राजकीय व सामाजिक कात्रींत सांपडलेल्या ब्राह्मणसमाजानें

जागृत होऊन स्वसंरक्षणापुरते तरी उपाय योजण्याच्या कामास तावडतोब लागणें किती जरूरीचें आहे हें सांगावयास नको.

प्रथमतः आपण संख्येच्या मानानें ब्राह्मणसमाज किती लहान आहे हें पाहूं. पुष्कळांना ब्राह्मणसमाजाच्या संख्येसंबंधानेंही अत्यंत गाढ अज्ञान आहे. १९२१ सालीं केलेल्या खानेसुमारीचे आंकडे पाहिले असतां दिसून येईल कीं, मुंबई इलाख्यांतील देशी संस्थानें व खालसा भाग यांची लोकसंख्या एकंदर २,६७,५७,६४८ इतकी आहे. त्यापैकीं देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे या प्रमुख ब्राह्मण जातींची लोकसंख्या पुढीलप्रमाणें आहे. सगळ्या मुंबई इलाख्यांत कोंकणस्थ अथवा चित्तपावन यांची लोकसंख्या फक्त ५६७९० पुरुष व ५२३१७ बायका एवढीच आहे. याप्रमाणेंच देशस्थ ब्राह्मणांची संख्या १५२९३९ पुरुष व १३८३०८ बायका इतकीच आहे. कऱ्हाडे ब्राह्मणांची संख्या तर अत्यंत अल्प म्हणजे सगळ्या मुंबई इलाख्यांत फक्त १५४०१ पुरुष व १४९७८ बायका इतकी आहे.

तात्पर्य, मुंबई इलाख्याच्या लोकसंख्येच्या मानानें वरील तीन वर्गांपैकीं ब्राह्मणवर्ग किती अल्प आहे याची कल्पना येईल. ब्राह्मण या संज्ञेंत इतरांचाही समावेश होतो; पण केवळ सोयीकरितां वरील तीन पोटजातींचा उल्लेख केला इतकेंच. केवळ संख्येचाच विचार केला व हिंदुसमाजांतील इतर वर्गांचा या जातीबद्दलचा द्वेष लक्षांत घेतला व त्यांत सरकारच्या खतराजीची भर घातली म्हणजे एवढासा हा चिमुकला समाज लोकसंख्येच्या दडपणाखालीं चिरडून जाईल अशी भीति वाटणें साहाजिक आहे ! केवळ जन्मानें ब्राह्मण म्हणून अत्यंत सात्विकवृत्तीचा प्रकर्ष प्रत्यक्ष दृष्टीस पडत असतांना सुद्धां एकाद्या व्यक्तीचा जर अमानुष छळ होऊं लागला तर यांत अन्याय होत नाहीं असें कोण म्हणेल ? राष्ट्राकरितां कोणत्याही तऱ्हेचा जातिभेद अगर सामाजिक विषमता मनांत न आणितां एखाद्या व्यक्तीनें आपला देह झिजविला तरी केवळ जन्मानें ब्राह्मण म्हणून जर ती व्यक्ति द्वेष्य मानली जाऊं लागली तर अन्याय होत नाहीं असें कोण म्हणेल ? आज जरी सर्वत्र ही परिस्थिति दिसत नसली तरी हल्लीं जें द्वेषाचें बीज पेरलें जात आहे त्या बीजास लौकरच वरील परिस्थितीचीं फळें आल्याशिवाय

राहणार नाहींत ! यास्तव ब्राह्मण समाजानें वेळींच सावध होऊन स्वसंरक्षणाच्या तजविजीस लागणें जरूर आहे, असें वाटतें.

हें स्वसंरक्षण कसें करावें त्याचा विचार सर्व परिस्थितीचा विचार करून ब्राह्मणसमाजांतील पुढाऱ्यांनीं केला पाहिजे. प्रथमतः हें सांगून ठेविलें पाहिजे कीं, सामाजिक विषमतेच्या मुळाशीं असलेला उच्चनीच भाव ब्राह्मण-समाजानें आपण होऊन अजिबात टाकून दिला पाहिजे. जन्मानें ब्राह्मण म्हणून द्वेष्य गणलें जावयाचें नसेल, तर जन्माबरोबरच उत्पन्न होणारा श्रेष्ठपणा हा त्यानें टाकिला पाहिजे. विशेषतः धर्माच्या बाबतींत स्वतंत्र असे हक्क आपल्याकडे कांहीं न ठेवतां हिंदुसमाजांतील इतर वर्गाच्या बरोबरीचा एक घटकावयव म्हणूनच त्यांनीं राहिलें पाहिजे.

केवळ संख्याबलाच्या बलावरच कोणताही समाज जगूं शकतो असें नाहीं. तथापि जगण्या–मरण्याच्या प्रश्नाचा विचार करतांना संख्याबल हा घटक उपेक्षणीय नाहीं खास. मूलतः प्राणशक्तीच जर कमकुवत झाली तर धिप्पाड शरीर असूनही उपयोग नाहीं; ही गोष्ट खरी. तरी प्राणज्योति जोरकस असूनही ती ज्योति प्रकाशमान करण्यास लागणारी जरूरीचीं तैलादि साधनें मुबलक पुरविण्याचें सामर्थ्य जर शरीरांत नसेल तर ती ज्योतही मालविली गेल्याशिवाय राहत नाहीं, हाही व्यवहारांतील अनुभव आहे. संख्याबलाचाच प्रश्न घेतला तर ब्राह्मणसमाज किती चिमुकला आहे हें दाखविण्याचा प्रयत्न वर केला तो याच दृष्टीनें. संख्याबलाच्या मागोमाग कोणताही समाज जिवंत राहण्यास सत्ता, संपत्ति व विद्वत्ता या तिन्ही गोष्टींची जरूरी असते. विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळें व आजपर्यंतच्या परंपरेमुळें ब्राह्मण-समाज सत्ता व संपत्तीस पारखा झाला आहे. महाराष्ट्रांत ब्राह्मणसमाजानें थोडी विद्वत्ता जागृत ठेवली आहे; पण पाश्चिमात्य देशांतील विद्वानांशीं तुलना करितां किंवा ब्राह्मणांच्याच पूर्वजांच्या विद्येशीं तुलना करितां हल्लींच्या विद्वत्तेला विद्वत्ता म्हणतां येईल कीं नाहीं, याची शंका वाटते. ब्राह्मणवर्ग हल्लीं कमावीत असलेली विद्या पोटभरू विद्या आहे. यापेक्षां त्या विद्येची किंमत अधिक नाहीं बुद्धीचा प्रकर्ष त्यांत दिसत नाहीं. ब्राह्मण-वृत्तीला साजेल असा त्यांत करारी निस्पृहपणाही नाहीं. क्षात्र स्वभावाला निसर्गतः सुलभ असा कठोर पराक्रमही नाहीं अगर वैश्यगुणांना वाव

देणारी संग्राहकी चिकाटीही त्यांत नाहीं. शूद्रवृत्तीस पटेल ती सेवाचाकरी करण्यास योग्य अशाच मनोवृत्तीची वाढ प्रचलित विद्येनें होत आहे. संख्याबल, सत्ता, संपत्ति व विद्वत्ता यांपैकीं कोणताच गुण आज ठळकपणानें अंगीं नसल्यामुळें ब्राह्मणसमाज कमकुवत झाल्याचीं चिन्हें दिसत आहेत. व हा कमकुवतपणा ब्राह्मणसमाजाला जडलेल्या रोगाच्या भक्ष्यस्थानीं ब्राह्मणसमाजास पाडल्यावांचून राहणार नाहीं. ब्राह्मणसमाजानें नीट जागें होऊन आपण कोणत्या उतरणीस लागून कोणत्या खड्ड्याकडे धांवत चाललों आहों हें पाहिलें पाहिजे व या सर्व नाशापासून बचावण्याची खटपट केली पाहिजे. व या खटपटीस साहाय्यही केलें पाहिजे. स्थूलमानानें विचार करितां वरील विचारसरणी कोणासही मान्य होण्यासारखी आहे. पण खरा वादाचा प्रश्न हा नसून तो अगदीं स्वतंत्र आहे. ब्राह्मणसमाज जगणार कीं मरणार, हा विचार करतांना ब्राह्मणसमाजानें जगावयाचें म्हणजे तरी काय ? हा प्रश्न साहजिकच उभा राहतो. ब्राह्मणसमाजांत जन्म पावलेल्या व्यक्तींची ऐहिक सुखाच्या दृष्टीनें उन्नति होण्यास ब्राह्मणसमाज जगणार आहे कीं ब्राह्मणांचें जीवनतत्त्व जें ब्राह्मण्य तें राखण्यानें ब्राह्मणसमाज जगणार आहे. असा हा प्रश्न आहे. व या प्रश्नाचें जें उत्तर ब्राह्मणसमाज देण्यास तयार होईल त्या उत्तरांत पुढील प्रयत्नांचा पाया आहे असेंच मानलें पाहिजे. ब्राह्मण जातींत जन्मलेल्या व्यक्तींचा ऐहिक अभ्युदय करण्यापलीकडे आजच्या परिस्थितींत ब्राह्मणसमाजानें पडूं नये असें म्हणणारा एक पक्ष आहे, किंबहुना आज ब्राह्मणसमाज जगणार कीं मरणार ? या प्रश्नास उत्तर देतांना ब्राह्मणसमाज जगलाच पाहिजे असें उत्तर दिलें जातें, त्या उत्तरांत हीच विचारसरणी गर्भित आहे. ब्राह्मण्य जगविलें पाहिजे किंवा ब्राह्मण्य गाजविलें पाहिजे असें म्हणणारा दुसरा पक्ष आहे. या पक्षास अर्थातच आज आहे या स्थितींत ब्राह्मणसमाजांत जन्मलेलीं माणसें जगलीं काय किंवा मेलीं काय याची पर्वा नाहीं. ब्राह्मण्य हें गुणाधिष्ठित आहे व ब्राह्मण्य या नांवाखालीं येणाऱ्या सर्व सत्वगुणप्रधान वृत्तींचा प्रकर्ष ज्यांच्यामध्यें आहे अशा अनेक व्यक्ति इतर समाजांतही आहेत. कोठें तरी या वृत्ति जागृत असल्या, जिवंत असल्या म्हणजे या मंडळींचें समाधान आहे. परंपरागत गुण सुलभप्राप्त व आनुवंशिक होतात. या दृष्टीनें ब्राह्मणांना सदर

ब्राह्मण्य सुखसाध्य आहे म्हणून त्यांनींच तें साध्य करण्याचा प्रयत्न अधिक नेटानें करावा हें म्हणणें वेगळें व ब्राह्मणसमाज सर्व दृष्टींनीं जगला पाहिजे व त्याकरितां खटपट केली पाहिजे हें म्हणणें वेगळें. ब्राह्मण जगणार कीं मरणार याचें उत्तर अर्थात् ब्राह्मण्य जगणार किंवा मरणार या प्रश्नाहून निराळें येईल.

या प्रश्नांचीं उत्तरें देण्यापूर्वीं ब्राह्मण्य म्हणजे तरी काय याचा स्थूलमानानें थोडक्यांत विचार करूं. शमदमादि गुणसंपत्ति श्रीमत्भगवद्गीतेंत वर्णन केली आहे. त्याप्रमाणेंच सत्त्वगुणप्रधानवृत्तीचें यथामापन पृथक्करण करून दिलें आहे. 'ब्रह्मकर्म स्वभावजम्' म्हणून स्वभाव अगर ब्राह्मण्यवृत्तीबरोबरच वरील गुण उत्पन्न झाल्याचेंही सांगितलें आहे. अर्थात् या सर्व गुणसमुच्चयाच्या योगानें उद्भूत झालेली वृत्ति हीच ब्राह्मवृत्ति समजली पाहिजे व यासच ब्राह्मण्य म्हणावें लागेल. ब्राह्मण्याची मोठी खूण थोडक्यांत पण चटकदारपणानें पुढील श्लोकांत समाविष्ट झाली आहे. 'ब्राह्मणस्यहि देहोयं क्षुद्रकामाय नेष्यते। कृच्छ्राय तपसे चेह प्रेत्यानंतसुखाय च ॥' हा तो श्लोक आहे. इहलोकांत खूप तपश्चर्या करून परलोकीं अनंत सुख भोगावयाचें ही ब्राह्मणांची मुख्य दीक्षा आहे. इहलोकच्या तपश्चर्येचा डंका सर्वत्र गाजला पाहिजे. ब्राह्मणाचा देह इतर सटरफटर क्षुद्र कामांत खर्चीं घालण्याइतका व क्षुद्र ऐहिक इच्छांच्या मागें लागून झिजविण्याइतका कमी किंमतीचा खास नाहीं असा या श्लोकाचा भावार्थ आहे. या देशांत जन्मलेल्या ब्राह्मणांपासून इतर सर्व जगानें धड घेऊन जावें अशी जी अभिमानाची वाणी पूर्वीं निघत असे; याचें तात्पर्य वरील ब्राह्मण्याच्या संरक्षणांत आहे. ब्राह्मण्यवृत्तींत अंतर्भूत होणाऱ्या वरील सद्गुणांची कांस धरून त्यांची जोपासना करावी व त्या वृत्तीचा विजयध्वज चोहोंकडे फडकवावा व सर्व जगतास धडा घालून द्यावा हेंच ब्राह्मणाचें मुख्य काम असें म्हणण्याचा या पक्षाचा कटाक्ष आहे. ब्राह्मण्य गाजविण्याचा वरील उद्देश कोणास मान्य होणार नाहीं ? प्रश्न हा आहे कीं, सर्व ब्राह्मणसमाज सध्यांच्या परिस्थितींत ही गोष्ट करावयास तयार व समर्थ आहे कीं काय ? या प्रश्नाचें उत्तर 'नाहीं' असेंच द्यावें लागेल. ब्राह्मणसमाजांतील व्यक्तींचा आजचा व्यवसाय, उद्योग व मनोवृत्ति पाहिली तर आज कुटुंबाचें पालन-

पोषण कसें करतां येईल याच विवंचनेंत त्या व्यक्ति आहेत असें स्पष्ट दिसतें. त्याला अपवाद आहेत व ह्या अपवादभूत व्यक्तींच्याच थोरपणावर आज ब्राह्मणसमाज जगत आहे. ब्राह्मणसमाजांतील व्यक्तींचे ऐहिक व्यवहार उत्तम चालून त्याबरोबरच त्या समाजांत ब्राह्मणवृत्तीचा फैलाव अधिकाधिक करण्यानेंच आजचा प्रश्न तरी सुटेल असें वाटतें. कारण या फैलावांतून ऐहिक सुखावर लाथ मारून प्राचीन ऋषींप्रमाणें सर्व समाजाच्या व राष्ट्राच्या कल्याणाकरितां सर्व शरीर झिजविणारीं माणसें उत्पन्न होण्याचा संभव आहे. ब्राह्मणवर्गच ऐहिक सुखाच्या मागें लागलेला असल्यानें इतर वर्गांना साहजिकच त्यांच्यांत श्रेष्ठपणा वाटेनासा झाला. धार्मिक क्षेत्रांतहि जेव्हां ऐहिक व्यवहारांत असणारीं माणसें आपलें श्रेष्ठत्व गाजवूं लागलीं त्यावेळीं इतरांना मत्सर वाटूं लागला व ब्राह्मणवर्ग द्वेष्य बनला. केवळ अध्ययन–अध्यापन करून जरूर तेवढें पोटापुरतें मिळवून सर्व आयुष्य जर ब्राह्मणसमाज राष्ट्रसेवेंत घालवील तर निदान या द्वेषबुद्धीचें बीज तरी नाहींसें होईल असा कयास करण्यास हरकत नाहीं. परंतु हल्लींच्या परिस्थितींत सर्व समाज ही गोष्ट पत्करील असें वाटत नाहीं. अर्थात् मोबदला म्हणून ब्राह्मणसमाजानेंही जन्मानेंच उत्पन्न झालेलें धार्मिक श्रेष्ठत्व गाजविण्याचें सोडून देऊन सामान्य हिंदुसमाजाच्या इतर घटकावयवासारखेंच राहिलें पाहिजे, त्याशिवाय गत्यंतर नाहीं. धार्मिक श्रेष्ठपणा गाजवावयाचा कोणीं ? श्रेष्ठ असतील त्यांनीं. तो हक्क इतरांना नाहीं व ज्यांचा नाहीं त्यांनीं ती गोष्ट प्रांजलपणें कबूल करून आपला व्यवहार ठरविला पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे कीं, ब्राह्मणांनीं इतर समाजाच्या चालीरीती व अन्नव्यवहाराची पद्धति स्वीकारावी. पूर्वजांच्या पुण्याईमुळें आजपर्यंत अप्रतिहत चालत आलेला सुविचाराचा व सुवर्तनाचा प्रवाह असाच स्वतःच्या आचरणांत चालू ठेवला पाहिजे. दुसऱ्याचा व आपला संबंध येईल त्यावेळीं विषमता गुणैकनिष्ठ आहे कीं केवळ जन्मनिष्ठ आहे हें पाहून तरतमभावानें वागलें पाहिजे इतकेंच.

ब्राह्मण जगणार कीं मरणार या प्रश्नाचें उत्तर ठरवितांना जगणार असेंच उत्तर देऊन त्या जगण्याचाच उपाय म्हणून वरील दोन्ही पक्षांच्या विचारसरणीचा सांधा जोडला पाहिजे. संख्याबल ब्राह्मणांजवळ नाहीं.

सत्ता, सामर्थ्य, संपत्ति व विद्वत्ता हेही गुण नाहींत. अशा परिस्थितींत कांहीं देवाणघेवाण करून जगण्याच्या मार्गास लागलें पाहिजे. दरिद्री बनलेला खानदानीचा मनुष्य ज्याप्रमाणें खानदानीपणाचे गुण कायम ठेवून त्या-बरोबर जुनें श्रेष्ठत्व सोडून देऊन केवळ गुणांच्याच जोरावर पुनः प्रतिष्ठा पावतो, तद्वत् ब्राह्मणसमाजानें केलें पाहिजे. गुणांची जोपासना दीर्घप्रयत्नानें, उद्योगानें व चिकाटीनें केली पाहिजे. व त्याबरोबर ब्राह्मण्यवृत्तीचा विसर पडूं देतां कामा नये. राष्ट्राची सेवा, जनताजनार्दनाची सेवा ही या काळची तपश्चर्या होय. ब्राह्मणसमाजाची सुसंघटना करून जिवंत राह-ण्याची व्यवस्था करण्याच्या मार्गास ताबडतोब लागलें पाहिजे. त्यांतच त्यांचा व राष्ट्राचा तरणोपाय आहे. ब्राह्मणसमाजानें ही गोष्ट करून इतर हिंदुसमाजास धडा घालून द्यावा व त्यायोगानें सर्व हिंदुसमाजांत एक नवें चैतन्य आणून हिंदुसमाजाचा उद्धार करावा हेंच योग्य होय. यांतच त्यांचें श्रेष्ठत्व राहील. निरनिराळ्या समाजांत जर अहमहमिका लागावयाची असेल तर ती राष्ट्रसेवेंत लागली पाहिजे. व शक्य तोंवर ब्राह्मणसमाजानें त्यांत पहिला नंबर मिळविला पाहिजे. त्यांतच त्यांचें श्रेष्ठत्व आहे. ब्राह्मण-समाजाची परंपराही तीच आहे. " सर्वेऽत्र सुखिनः संतु सर्वे संतु निरा-मयाः " अशी रोज प्रार्थना करणाऱ्या ब्राह्मणसमाजाचें दुसरें ध्येय कोणतें असणार ? यांत कोणावरही वरचढ नाहीं, कोणाचाही द्वेष नाहीं, कोणाचाही मत्सर नाहीं हें थोर ध्येय डोळ्यापुढें ठेवून ब्राह्मणसमाजानें कार्य केल्यास अद्याप या युगांतही त्यांचें पूर्वीचें ब्रह्मतेज पुनः झळकल्याशिवाय खास राहणार नाहीं.

---

# ३ ब्राह्मण-संघाच्या कल्पनेसंबंधीं कांहीं विचार.

[ लेखकः—शंकर दत्तात्रेय जावडेकर, बी. ए.]

## [ लेखांक १ ला.]

सध्यां आपल्या समाजांत कांहींतरी मोठी क्रांति होणार आहे, ही गोष्ट आतां बहुतेक सर्व लोकांना पटूं लागलेली आहे. अशा प्रकारची सामाजिक क्रांति होणार याची कल्पना पुढारी लोकांना येऊन बरींच वर्षे झालीं व त्याचमुळें सामाजिक परिषद् स्थापून या क्रांतीला कांहींतरी व्यवस्थित स्वरूप देण्याचा प्रयत्न कै० रानडे वगैरे लोकांकडून करण्यांत आला. सामाजिक परिषदेकडून जें कार्य घडलें त्याचें क्षेत्र फारच मर्यादित ठरलें व त्या चळवळीचे परिणाम वरिष्ठ वर्गांतील एक दोन जातींच्या बाहेर फारसे झाले नाहींत असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढें ही सामाजिक उन्नतीची चळवळ ज्ञातिपरिषदांच्या रूपानें प्रगट होऊं लागली व तिचें जातिनिरक्षेप व्यापक स्वरूप नष्ट झालें. या ज्ञातिपरिषदा भरविल्या जाव्या किंवा नाहीं, यासंबंधीं प्रथम प्रथम पुढारी लोकांत बरीच साशंकवृत्ति दिसून येत होती, तरी त्या परिषदांनीं बरेंच कार्य केलेलें आहे, हें आज बहुतेक विचारी लोकांस मान्य करावें लागेल. ब्राह्मणेतर चळवळ ही सुद्धां प्रथमतः जातिनिरक्षेपबुद्धीनें चालविण्याचा हेतु जाहीर करण्यांत आला होता. तथापि तिचेंही जातिविशिष्ट स्वरूप आज व्यक्त झालेलें आहे. या सर्व गोष्टींचा विचार केला असतां सामाजिक उन्नतीच्या चळवळी जातिनिरक्षेप चालण्यास सध्यांची हिंदुधर्मीयांची सामाजिक परिस्थिति अनुकूल नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त आहे. याचीं मुख्य दोन कारणें देतां येतील. पहिलें म्हणजे प्रत्येक जातीच्या सामाजिक अडचणी सारख्याच नाहींत. उदाहरणार्थ, सामाजिक परिषदेंत व वरिष्ठ जातींत बराच काळ वादग्रस्त होऊन बसलेला स्त्री-स्वातंत्र्याचा प्रश्न इतर जातींना विशेष महत्त्वाचा नाहीं; तसेंच मागासलेल्या वर्गांत स्त्रियांइतकीच पुरुषांच्या शिक्षणाच्या विरुद्ध दुराग्रहबुद्धि पुष्कळ ठिकाणीं दिसून येते. दुसरें कारण म्हणजे कांहीं विशिष्ट

व्यक्ति सोडून दिल्या तर कोणत्याही वर्गांतील सामान्य लोकांची सामाजिक उन्नतीची कळकळ आपल्या जातीच्या मर्यादांचें उल्लंघन करीत नाहीं. ज्ञातिविशिष्ट चळवळींच्या परिणामानें निरनिराळ्या जातींतील लोकांची आहे त्याहून थोडीतरी जास्त सुधारणा झाल्याखेरीज ही परिस्थिति सुधारेल असें वाटत नाहीं.

आपल्या समाजाची पूर्वपरंपरा आणि सामान्य लोकांची वृत्ति यांचा विचार करितां सध्यां कांहीं काळ तरी, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व अस्पृश्य किंवा बहिष्कृत असे चार संघ होणें अपरिहार्य व आवश्यक दिसतें. क्षत्रिय, वैश्य व बहिष्कृत हे लोक मागासलेले आहेत, म्हणून त्यांच्या संघाची जरुरी पुष्कळांना पटते; परंतु ब्राह्मणसंघाची मात्र आवश्यकता तितकीशी अद्यापि सर्वांना पटत नाहीं. परंतु सूक्ष्म विचारांतीं ती सर्वांना पटेल असेंच मला वाटतें. समाजांतील इतर वर्ण संघटित होऊं लागले आहेत एवढें एक कारण सुद्धां ब्राह्मणसंघ स्थापन करण्याला पुरेसें आहे. कोणत्याही वर्गाच्या संघटनेचा त्या वर्गाच्या उन्नतीला जसा उपयोग होतो, तसा त्याच संघटनेचा दुसऱ्या असंघटित समाजाला निष्कारण विरोध करण्याकडेहि दुरुपयोग होण्याचा संभव असतो. तेव्हां ब्राह्मणसंघाच्या अस्तित्वाला इतर कोणतेंही कारण नसलें तरी वरील एक कारणही पुरेसें आहे. परंतु यापेक्षां इतरही कांहीं कारणांमुळें माझें या कल्पनेविषयीं अनुकूल मत बनलें आहे. तीं कारणें सर्वांना आजच पटलीं नाहींत तरी कांहीं काळानें तीं खास पटतील अशी खात्री वाटते. त्या कारणांचा विचार करण्यापूर्वी एका आक्षेपाचें निरसन करणें अवश्य आहे.

तो आक्षेप म्हणजे ब्राह्मणसमाज संघटित झाला असतां तो इतर समाजांवर जुलूम करील ही भीति होय. मला या भीतीचें मुळींच कारण दिसत नाहीं. कोणत्याही वर्गाचा इतर वर्गावर धार्मिक, आर्थिक किंवा राजकीय वर्चस्वामुळें जुलूम होणें संभवनीय असतें. राजकीय वर्चस्वाचा प्रतिकार करण्यास शस्त्रबल, आर्थिक जुलुमाचा प्रतिकार करण्यास संघशक्ति व द्रव्यबल आणि धार्मिक जुलुमाचा प्रतिकार करण्यास ज्ञानबल अगदीं पुरेसें होतें असें माझें मत आहे. ब्राह्मणांचें सध्यांचें वर्चस्व केवळ धार्मिक आहे व इतर जातींतील ज्ञानबलाच्या वृद्धीला ब्राह्मणसंघाकडून कोणत्याही प्रकारचा

अडथळा होण्याचा संभव दिसत नसल्यामुळें ब्राह्मणसंघामुळें कोणत्याही जातीवर जुलूम होईल ही भीति अत्यंत निराधार आहे, असें मला वाटतें. अशी भीति धरण्यास यत्किंचित् जरी जागा असती तरी मीं या संघाच्या कल्पनेविषयीं अनुकूल मत प्रदर्शित केलें नसतें.

आतां ब्राह्मणसंघाच्या स्थापनेपासून कोणकोणते फायदे करून घेतां येण्याजोगे आहेत, यासंबंधीं माझे विचार प्रदर्शित करण्यास हरकत नाहीं. "ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्याद्वैदिको धर्मः" असें श्रीशंकराचार्यांनीं भगवद्गीतेवरील भाष्याच्या प्रारंभीं म्हटलें आहे. यावरून ब्राह्मणांच्या प्रतिपालनाचें इतकें महत्त्व कां गणलें जातें याची कल्पना येईल. वैदिकधर्म किंवा भारतीय संस्कृति रक्षण करणें व तिचा प्रसार करणें हें ब्राह्मणांचें कर्तव्य असल्यामुळें, त्यांचें रक्षण करणें स्वतःच्या हिताच्या दृष्टीनेंच केवळ अवश्य नसून सर्व भारतीय संस्कृतीच्या दृष्टीनेंही तें अवश्य आहे, अशी कल्पना वरील उक्तींत आहे. यावरूनच ब्राह्मणसंघाच्या कर्तव्यासंबंधीं किंवा ध्येयासंबंधीं माझे विचार काय आहेत, याची कल्पना वाचकांस होऊं शकेल. **भारतीय संस्कृतीचें संरक्षण आणि संवर्धन करणें हेंच** ब्राह्मणसंघाचें परमोच्च ध्येय असावें असें माझें मत आहे. हें ध्येयही सर्वांस पटण्यासारखें आहे. परंतु तें कसें साध्य होईल याविषयींचे मात्र माझे विचार किंवा भारतीय संस्कृतीच्या ध्येयासंबंधीं माझीं मतें सर्वांनाच आज पटतील असें माझें मलाच वाटत नाहीं; तथापि कर्तव्यबुद्धीनें तीं स्पष्टपणें पुढें मांडणें भाग आहे.

पाश्चात्य संस्कृतीचा परिचय झाल्यानंतर सामाजिक सुधारणेची व धार्मिक सुधारणेची जी लाट हिंदुसमाजांत उत्पन्न झाली ती ब्राह्मणसमाजांतून आज अगदींच नष्ट झालेली दिसत आहे व त्यासारख्याच लाटा इतर जातींत मात्र आज जोराजोरानें उसळत असलेल्या दिसत आहेत. यावरून ब्राह्मणवर्ग समाजसुधारणेला प्रतिकूल आहे अशी बऱ्याच लोकांची कांहीं अंशीं सकारण पण बऱ्याच अंशीं निष्कारण समजूत झालेली आहे. परंतु खरी वस्तुस्थिति अगदीं निराळी आहे. एका दृष्टीनें सुधारणेचा गाडा पुढें ढकलण्यास आज ब्राह्मणसमाजाइतका अनुकूल व उपयोगी समाज दुसरा नाहीं असें मला वाटतें. पाश्चात्य संस्कृतीच्या धर्तीवर आपल्या समाजाची

सुधारणा होऊं शकत नाहीं व होणें इष्ट नाहीं एवढेंच अनुमान सध्यांच्या ब्राह्मणसमाजाच्या वृत्तीवरून काढतां येईल. पहिल्या पिढींतील सुधारकांना भारतीय संस्कृतीची ओळख झालेली नसून त्यांचें पाश्चात्य संस्कृतीवर अतो-नात प्रेम होतें. या त्यांच्या परकीय संस्कृतीवरील प्रेमामुळें ब्राह्मणसमाजां-तील कांहीं पुढाऱ्यांनीं त्यांना कसून विरोध केला आणि प्रथम आपल्या संस्कृतीचें श्रेष्ठत्व पटवून घ्या, आपल्या पूर्वजांचे हेतु ध्यानांत आणा, त्यांच्या ध्येयाचा अभ्यास करा; आणि मग सुधारणेचें कार्य हातीं घ्या व आपल्या समाजाला परकीय ध्येयांच्या पाठीमागें न लावतां आपल्या पूर्वजांच्या उच्च ध्येयाच्या दिशेनेंच समाजोन्नतीचा मार्ग आंखून द्या, असा सदर पुढाऱ्यांनीं आग्रह धरिला. भारतीय संस्कृति त्यागप्रधान असून तिचें स्वरूप आध्यात्मिक आहे आणि पाश्चात्य संस्कृति भोगप्रधान असून तिचें स्वरूप आधिभौतिक आहे, तेव्हां आपल्या पूर्वजांचें जगत्कल्याणकारक उच्च ध्येय सोडून, पाश्चात्य संस्कृतीच्या पाठीमागें लागूं नका असा आग्रह कांहीं पुढाऱ्यांनीं धरिला व तो सर्व समाजास पटून कांहीं काळ समाजसुधारणेच्या चळवळीला स्तिमितता आली. तरी सुद्धां बालविवाह–प्रतिबंध, स्त्री-शिक्षण आणि स्त्री-स्वातंत्र्य या गोष्टी बऱ्याचशा रूढ झाल्यावरच ती स्तिमितता आली आहे. यावरून ब्राह्मणसमाज सामाजिक उन्नतीला प्रतिकूल बनलेला आहे असा निष्कर्ष काढणें युक्त नाहीं. भारतीय संस्कृतीच्या ध्येयाला अनुसरून समाजोन्नतीचें कार्य चालविण्यास आज तोच समाज तयार होणें शक्य आहे. इतर जातींतील लोक अद्यापि पाश्चात्य संस्कृतीच्या मोहांतच गुरफटलेले आहेत. तो त्यांचा मोह निरस्त करून भारतीय संस्कृतीविषयींचें प्रेम त्यांच्या अंतः-करणांत उत्पन्न करणें आणि आपल्या पूर्वजांनीं आरंभिलेलें जगदुद्धाराचें आणि भूतदयेचें कार्य फार मोठ्या प्रमाणावर पुनः सुरू करणें हें ब्राह्मण-समाजाचें आजचें कर्तव्य आहे. तसें करतांना आपल्या समाजांतील लोकांना पाश्चात्य संस्कृति प्रिय होण्याला काय कारणें आहेत, त्यांचा शांत चित्तानें विचार केला पाहिजे आणि आपल्या पूर्वजांचें ध्येय काय होतें, याविषयींही सूक्ष्म शोध केला पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं आरंभिलेलें कार्य पूर्णपणें तडीला गेलें नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याची पिछेहाट झालेली आहे, हें कोणासही दिसून येण्यासारखें आहे. वैदिक संस्कृतीचा बहुतेक लोप झाला

म्हणूनच आपला अधःपात झाला व पुनः त्या संस्कृतीचा उत्कर्ष होऊन तिचा सर्वत्र प्रसार झाल्याखेरीज आमचें ध्येय आम्हांस प्राप्त होणार नाहीं, ही प्रत्येकानें मनाशीं खूणगांठ बांधून ठेविली पाहिजे. आपल्याच समाजांतील जे समाज आज पाश्चात्य संस्कृतीच्या मागें लागून भारतीय संस्कृतीची अवहेलना करीत आहेत, त्यांना आपल्या कक्षेत ठेवण्याला त्यांच्यांत वैदिक संस्कृतीचा प्रवेश करणें हा एकच उपाय आहे व तो योजण्याची आणि अशा तऱ्हेनें भारतीय संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करण्याची विशिष्ट जबाबदारी अंगावर घेऊन ती पार पाडण्याकरितां ब्राह्मणवर्गानें संघशक्तीनें प्रयत्न करण्यास व त्याप्रीत्यर्थ लागेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार होणें जरूर आहे असें मला वाटतें.

एक काळ असा होता कीं, वैदिक संस्कृतीचा प्रसार त्रैवर्णिकांत म्हणजे सर्व द्विजलोकांत होता. आज पहावें तर एकाही वर्णांत ती दिसत नाहीं. स्त्रीशूद्रांना वेदांच्या संस्कृतीचा वारा लागूं नये, याबद्दल कांहीं कोत्या बुद्धीच्या लोकांनीं प्रयत्न केले हें न आवडून, स्त्रीशूद्रांचा उद्धार करण्याचें म्हणजे त्यांना सुसंस्कृत करण्याचे प्रयत्न आजपर्यंत पुष्कळांनीं केले.

“ वेदें आप्त केले तीन वर्ण । दुरावले स्त्रीशूद्र जन ॥
न शिव त्याचें कान । हें वेदासी न्यून पै आलें ॥
तें वेदाचें फेडावया उणें । गीता प्रगटली श्रीकृष्णें ॥
गीतेचें श्रवणें पठणें । उद्धरणें समस्तां ॥

असें एकनाथी भागवत सांगतें. गौतमबुद्धांनींही शूद्रांच्या उद्धारार्थच प्रयत्न केले. महाराष्ट्रीय संतांनींही हेंच कार्य थेट अस्पृश्यवर्गापर्यंत नेऊन भिडविलें आणि ‘वेदाचा तो अर्थ आम्हांसचि ठावा । इतरांनीं वहावा भार माथीं ॥’ असें म्हणून कोत्या बुद्धीच्या वेदाभिमान्यांचा उपहास केला. वर्णाभिमानानें कोणाचेंही कल्याण होत नाहीं ही गोष्ट आजपर्यंतच्या सर्व साधुसंतांनीं व श्रेष्ठ अवतारी पुरुषांनीं सांगितलेली आहे. श्रीकृष्ण म्हणतातः—

“ विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ॥
शुनिचैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ॥ १ ॥ ”

तुकाराम महाराज म्हणतातः—

" वर्णे अभिमानें कोण झाले तीर्ण ।
ऐसें द्या सांगून मजलागीं ॥
अंत्यजादि योनी तरल्या हरिभजनें।
तयांचीं पुराणें भाट झालीं ॥१॥ "

एकनाथ महाराज म्हणतातः—

" जया म्हणती नीचवर्ण । स्त्रीशूद्रादि हीन जन ।
सर्वांभूतीं देव वसे । नीचाठायीं काय नसे ? ॥ "

तात्पर्य, वर्णाभिमान बाजूला ठेवून वैदिक संस्कृतीचा प्रसार केवळ त्रैवर्णिकांतच नव्हे, तर अस्पृश्यवर्गांत सुद्धां करणें हा एकच मार्ग भारतीय संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन करण्यास उरलेला आहे. तसें करण्याची इच्छा किंवा ताकद ब्राह्मणसमाजास नसेल तर " ब्राह्मणत्वस्य हि रक्षणेन रक्षितः स्याद्वैदिको धर्मः" हें वाक्य खोटें ठरेल. अमेरिकेंत किंवा युरोपांत जाऊन आपल्या संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचीं शिफारसपत्रें आणण्याचा हा काळ नाहीं. प्रत्येक भूतमात्राच्या अंतःकरणांत परमेश्वर आहे, हें अति उच्च तत्त्व आमच्या धर्मांत आहे असा नुसता जप करण्याचा किंवा जगदुद्धाराचें पवित्र ध्येय पुढें ठेवून आमचे पूर्वज वसुधैवकुटुंबकवृत्ति बनले होते असा नुसता घोष करण्याचा हा काळ नाहीं. त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरण करून आपल्याच धर्मांतील लोकांना सुसंस्कृत करण्याचा आणि त्यांची आध्यात्मिक व आधिभौतिक उन्नति करण्याचा हा काळ आहे. तसें केलें नाहीं तर बहुतेक ब्राह्मणेतर समाज पाश्चात्य संस्कृतीच्या घेऱ्यांत सांपडल्याशिवाय रहात नाहीं. कोणत्या ना कोणत्या मार्गानें त्यांची उन्नति होणार हें अगदीं निश्चित आहे. फक्त ती पाश्चात्य संस्कृतीप्रमाणें होऊं देऊन त्यांच्याकडून वैदिक संस्कृतीचा अनादर करून घ्यावयाचा किंवा त्यांना आर्यसंस्कृतीच्या कक्षेंत कायम ठेवावयाचें एवढाच काय तो प्रश्न आहे, आणि तो प्रश्न आर्य-संस्कृति–रक्षणाच्या दृष्टीनें सोडविण्याचें कौशल्य आजकालचे विचारी ब्राह्मण ज्या मानानें प्रगट करतील त्या मानानें त्यांचें पूर्वापार कर्तव्य पार पडणार आहे.

---

## [ लेखांक २ रा. ]

"The ideal at one end is the Brahmin and the ideal at the other end is the Chandal, and the whole work is to raise the Chandal up to the Brahmin." SWAMI VIVEKANAND.

[ "एका टोंकाला ब्राह्मण आहेत व दुसऱ्या टोंकाला चांडाळ आहेत व चांडाळांना ब्राह्मणांच्या पदवीला चढविणें हेंच काय तें कार्य आहे."]

स्वामी विवेकानंद.

वरील लेखांत ब्राह्मणसंघाचें ध्येय वैदिक संस्कृतीचें संरक्षण व संवर्धन हेंच असावें आणि सर्व जातींत वैदिक संस्कृतीचा प्रसार करावा, असें सुचविलें आहे. या लेखांत वैदिक संस्कृतीचा प्रसार म्हणजे काय आणि तो कसा करावा यासंबंधीं कांहीं विचार वाचकांपुढें मांडावयाचे आहेत.

व्यवसायभेदानुसार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार सामाजिक वर्ग नेहमींच कोणत्याही समाजांत राहणारच; परंतु त्यांच्या संस्कृतींत जें आज विलक्षण अंतर दिसत आहे, हें मात्र कायमचें राहणारें नाहीं. आज आपल्या समाजांतील संस्कृतीकडे पाहिलें असतां जातीच्या पायऱ्या उतरून खालीं खालीं जाऊं लागल्यास या समाजाला कांहीं संस्कृति आहे किंवा नाहीं याची शंका वाटूं लागते. उच्च धार्मिक कल्पना, शुद्ध आचरण, शुचिर्भूत राहणी, व्यसननिवृत्ति, सुसंस्कृतवाणी वगैरे वैदिक संस्कृतीचीं चिन्हें समाजांत फारच क्वचित् दृग्गोचर होतात. एके काळीं द्विज म्हणविणाऱ्या तिन्ही वर्णांत ही उच्च संस्कृति नांदत होती, पण आज ब्राह्मणवर्गांतही ती नामशेष होत चालली आहे. अति प्राचीन काळीं निरनिराळ्या वर्गांतील लोकांत संस्कृतीची भिन्नता मुळींच नसून त्यावेळीं चातुर्वर्ण्याच्या ऐवजीं केवळ एकच 'हंस' या नांवाचा वर्ण होता, असें भागवत-भारतग्रंथांत लिहिलेलें आहे. यानंतर समाजांत चार वर्ण उत्पन्न झाले तरी बराच काळ त्रैवर्णिकांच्या संस्कृतींत पुष्कळच साम्यता होती. पण पुढें तीही नष्ट होऊन चार वर्णांच्या हजारों जाति झाल्या व प्राचीन वैदिक संस्कृति कोणत्याच जातींत उरली नाहीं. सर्व जातींना ब्राह्मणांच्या पदवीला चढ-

विण्याचे ध्येय लुप्त होऊन सर्वच जाति चांडाळाच्या पदवीला जाऊं लागल्या असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. हा संस्कृति-लोप कां झाला व तो कोणीं केला याबद्दल वाद करण्यांत अर्थ नाहीं. आज तिचा पुनरुद्धार केला पाहिजे हा मुख्य प्रश्न असून त्याबद्दल मतभेद होण्याचें कारण नाहीं. हें कार्य करण्यास पूर्वपरंपरा आणि सद्यःस्थिति या दोन्ही दृष्टींनीं ब्राह्मणसमाजच आज पात्र आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. वैदिक संस्कृतीचे अवशेष, तिच्यावरचें प्रेम हीं जर आज कोणत्या वर्गांत अधिक असतील तर तीं ब्राह्मणसमाजांत आहेत. या दृष्टीनें व समाजांतील अग्रेसर वर्ग या नात्यानें हिंदु समाजांतील सर्व जातींत समबुद्धीनें वैदिक संस्कृतीचा प्रसार करण्याचें कार्य ब्राह्मणसंघानें अंगावर घ्यावें. हें करावयाचें म्हणजे अमुक जातीला वेदाध्ययनाचा अधिकार आहे व अमुक जातीला तो नाहीं, असला दुराग्रह सोडून दिला पाहिजे. विवेकानंद यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, वेदाचें अध्ययन अमुक लोकांनीं करावें व अमुक लोकांनीं करूं नये असें वेदांत कोठेंही सांगितलेलें नाहीं. फक्त अशीं वाक्यें स्मृति व पुराणें यांत आहेत. स्मृति व पुराणें यांची असली अरेरावी श्रुतींवर म्हणजे वेदांवर चालूं द्यावी हें धन्यावर चाकराची अरेरावी चालूं देण्यासारखेंच हास्यास्पद आहे असें स्वामीजी म्हणतात. खरें पाहिलें असतां एखाद्या मॅक्समुल्लरनें वेदाध्ययन केल्याबद्दल आपणांस जसा अभिमान वाटतो, त्याहून अधिक एकाद्या अस्पृश्यानें वेदाध्ययन केल्यास आपणांस वाटूं लागला पाहिजे. **निदान त्यांनीं बायबल वाचून आपल्या संस्कृतीपासून पराङ्मुख होऊं नये** याकरितां तरी आपली ही संकुचित वृत्ति सोडून दिली पाहिजे. पण एवढ्यानेंच आपलें कर्तव्य संपत नाहीं. तें यथायोग्य रीतीनें पार पाडण्यास पुढील तीन कार्यें ब्राह्मण-संघानें ताबडतोब हातीं घ्यावींत असें माझें मत आहे.

१ हिंदु तत्त्वज्ञान व हिंदु धर्म यांचें शुद्ध स्वरूप सामान्य जनतेपुढें येण्याकरितां जाहीर पत्रकें, छोटीं पुस्तकें, व्याख्यानें वगैरेंच्या द्वारें ज्ञानप्रसार फार मोठ्या प्रमाणावर करण्यास सुरवात केली पाहिजे. सकाम कर्मकाण्डाचें महत्त्व माजवून व्रतेंवैकल्यें व नवससायास यांच्या रूपानें धर्माचा व पुण्याईचा बाजार करणें हा आपला खरा धर्म नसून निष्काम बुद्धीनें सर्व

भूतमात्रांचें हित करण्यांत सदैव रत असणें हें आपल्या धर्माचें खरें रहस्य आहे हें लोकांना पटवून दिलें पाहिजे. लोकांचें लक्ष बाह्यविधि व सकाम कर्मे यांवरून काढून आत्मशुद्धि व नैतिक उन्नति यांकडे लावलें पाहिजे. "भूतीं भगवंत पाहीं" "भक्ति म्हणजे सर्व भूतीं सप्रेम भजन युक्ति" किंवा "देवांची पूजा हें भूतांचें पालन" वगैरे बहुमोल सतवचनांच्या आधारें हें धार्मिक लोकजागृतीचें कार्य फार सुलभ होऊं शकतें. वेदांतील बहुमोल सिद्धान्त अगदीं सोप्या भाषेंत व्यक्त करण्याचें दुर्घट कार्य महाराष्ट्रीय संतमंडळींनीं अगदीं उत्तमप्रकारें करून ठेविलें आहे. त्यांच्या साहाय्यानें निष्काम कर्मयोगाच्या व भूतदयेच्या धर्माचा प्रसार करणें व लोकांची आध्यात्मिक व नैतिक उन्नति करणें फार अगत्याचें झालें आहे. सध्यां सत्यशोधक लोक किंवा ख्रिस्ती मिशनरी यांच्याकडून हिंदु धर्मावर व संस्कृतीवर जे हल्ले चढविले जात आहेत त्यांचा प्रतिकार करण्यास हा एकच मार्ग आहे. स्वामी रामतीर्थ, स्वामी विवेकानंद, राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती किंवा महाराष्ट्रांत कै० रानडे, विष्णुशास्त्री व लो० टिळक इत्यादिकांच्या ग्रंथांनीं व व्याख्यानांनीं भारतीय संस्कृतीचें निर्विकल्प शुद्ध स्वरूप पुढें आल्यामुळें ज्याप्रमाणें आज समाजांतील विद्वान् लोकांत भारतीय संस्कृतीबद्दल आदर उत्पन्न झाला आहे, तसाच आदरभाव मागासलेल्या वर्गांत उत्पन्न करण्यास वरील लोकांचेंच कार्य अधिक विस्तृत प्रमाणावर व अधिक सोप्या भाषेंत आज करणें अवश्य झालें आहे. आपल्या संस्कृतीचें उज्ज्वल स्वरूप ज्या मानानें लोकांपुढें येत जाईल त्या मानानें सामान्य लोकांचें तिच्यावरचें प्रेम दृढ होत जाईल. याच कार्यांत पतितपरावर्तनाचा समावेश व्हावा.

२ समाजांतील प्रौढ लोकांत जागृति करण्यासाठीं चालविलेल्या या कार्याबरोबर लहान मुलांना वैदिक संस्कृतीप्रमाणें सुसंस्कृत करण्याचा उपक्रम केला पाहिजे. या कार्याकरितां ज्यांत कोणत्याही जातीच्या मुलांचा प्रवेश होऊं शकेल व जेथें कोणत्याही प्रकारचा भेदभाव मानला जाणार नाहीं असा एक आश्रम महाराष्ट्रांत काढला पाहिजे. सर्व जातींच्या मुलांना ब्रह्मचर्य पाळून आध्यात्मिक वातावरणांत विद्याभ्यास करण्यास व आपली आत्मिक उन्नति करण्यास या आश्रमांत संधि मिळावी. रवींद्रनाथ टागोर यांचें

शांतिनिकेतन, स्वामी श्रद्धानंद यांचें गुरुकुल किंवा म० गांधी यांचा सत्याग्रहाश्रम या संस्था अशाच प्रकारच्या आहेत. अशाच प्रकारची एक संस्था महाराष्ट्रांत काढून ब्राह्मण-संघानें आपलें नांव भारतीय इतिहासांत अमर करून ठेवावें अशी माझी दुसरी सूचना आहे.

३ तिसरी सूचना आपल्या अस्पृश्यबंधूसंबंधीं करावयाची आहे. अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करणें हें आज फारच अगत्याचें झालेलें आहे. भारतीय संस्कृतीचा अगदींच अल्प भाग जर कोणत्या समाजाच्या वांट्यास आला असेल तर तो अस्पृश्यसमाजाच्या होय. आपल्या संकृतीविषयीं, आपल्या धर्माविषयीं किंवा आपल्या राष्ट्राविषयीं त्यांना अभिमान वाटावा असें आमचें त्यांच्याशीं वर्तन नाहीं. पाश्चात्य संस्कृतीला अत्यंत दुवा देणारा तोच समाज आहे. खिस्ती मिशनऱ्यांचें खरें सुपीक क्षेत्र तेंच आहे. आणि परकीय सरकारचा अखेरचा आधार तोच आहे. यामुळेंच सामाजिक, धार्मिक व राजकीय दृष्टीनें आज अस्पृश्योद्धाराचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा झाला आहे. तो सोडविण्याचा निश्चय ब्राह्मणसंघानें अवश्य केला पाहिजे. असो.

ब्राह्मणसमाजावर आज जे निरनिराळे हल्ले होत आहेत त्यांचा प्रतिकार करण्याचा वरील एकच मार्ग असून त्या मार्गानें गेलें असतां ब्राह्मण्याचें संरक्षण होईल, वैदिक संस्कृतीचें संरक्षण होईल, हिंदुसमाजाची उन्नति होईल, व हिंदी राष्ट्राचें खरें कल्याण होईल, अशी खात्री वाटत असल्यामुळेंच वरील विचार लोकांपुढें मांडले आहेत. आपली पूर्वापार व्यापकदृष्टि सोडून देऊन संकुचित दृष्टि स्वीकारल्यानें ब्राह्मणवर्गाचें संरक्षण होणें अशक्य आहे, याबद्दल त्यांच्या हितचिंतकांनीं खात्री बाळगावी. गेल्या पांचपन्नास वर्षांत जे जे ब्राह्मण पुढारी झाले त्यांनीं कोणतीही संकुचित वृत्ति न धरतां राष्ट्रोद्धाराचें कार्य केलेलें आहे, तरीही ब्राह्मणसमाजावर स्वार्थीपणाचा आरोप करण्यांत येत आहे, त्याचा प्रतिकार करण्यास ब्राह्मणांनीं संघरूपानें आपलें उदार धोरण व्यक्त करावें, हा एकच मार्ग आहे. आजपर्यंतच्या ब्राह्मण पुढाऱ्यांच्या व्यापक प्रयत्नांचें त्यांना श्रेय मिळत नाहीं म्हणून ब्राह्मण-संघानें संकुचित धोरण स्वीकारल्यास त्या संघाच्या हातून ब्राह्मणवर्गाचें किंवा वैदिक संस्कृतीचें संरक्षण होणें अशक्य आहे. समाजसेवा हाच ब्राह्मणांचा धर्म आहे. इतर वर्गांना

सुसंस्कृत करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. आजपर्यंत हें कार्य ब्राह्मण पुढाऱ्यांनीं वैयक्तिक प्रयत्नांनीं केलें आहे. आज तेंच कार्य संघस्वरूपानें केल्यास त्याचें क्षेत्र विस्तृत होईल व त्याचें श्रेय सर्व ब्राह्मणवर्गाला मिळून त्या वर्गावर होणाऱ्या हल्ल्यांतून त्याचा बचाव होईल.

---

## ४ एक विलक्षण गैरसमज.

(संपादकीय)

कांहीं दिवसांपूर्वीं मुंबईच्या ब्राह्मणसभेचें वार्षिक संमेलन मुंबईस भरलें त्यावेळीं, 'ब्राह्मण' मासिकाची माहिती व प्रचार करून देण्याकरितां आम्हीं एक स्वयंसेवक मुद्दाम पाठविला होता. त्यानें तेथील कित्येक पेशवाई थाटाच्या व परिस्थितीविषयीं अगदीं बेगुमान व उदासीन असणाऱ्या ब्राह्मणांच्या वर्तनाचे जे थोडे मासले आम्हांस सांगितले ते मजेदार आहेत. ते प्रसिद्ध केल्यास वाचकांची घटकाभर चांगली करमणूक होईल; पण आम्ही तसें करीत नाहीं. तथापि एका विलक्षण गैरसमज उत्पन्न करणाऱ्या गोष्टीबद्दल मात्र दोन शब्द लिहिणें जरूर आहे. आमच्या स्वयंसेवकास एक दोन ब्राह्मण शिष्ट असें म्हणाले कीं, "रा० मुंडले हे आपल्या संघांत पळशे ब्राह्मणांना घेऊन सबगोलंकार करूं पहातात. सबब आमच्या येथील ब्राह्मणसमाजाची त्यांचेविषयीं सहानुभूति नाहीं. पळशांना आपण संघांत घेणार नाहीं असें जर ते जाहीर करतील तर आम्ही त्यास मदत करूं." अशाच प्रकारच्या आणखी कांहीं शंका व क्षुद्र आक्षेप इतरांनींही प्रदर्शित केले. यावरून आम्हीं हातीं घेतलेलें ब्राह्मणसंघटनेचें काम किती दुस्तर आहे याची वाचकांस कल्पना येईल. अशाच प्रकारच्या अनेक अडचणींमुळें संघाची योजना तूर्त आम्हीं तहकूब केल्याचें जाहीर केलें आहे. असें असतां अमुकच लोकांना आम्ही संघांत घेणार किंवा न घेणार याची कल्पना मनांत आणून आपला व दुसऱ्याचा वृथा गैरसमज करणें हें उतावीळपणाचें व असमंजसपणाचें लक्षण नाहीं काय ? 'संघ' काय

मुंडल्यांच्या घरचा आहे म्हणून त्यांत कोणास घ्यावें हें ठरविण्याचा सर्व अखत्यार त्यांना असूं शकेल ? आपली इच्छा, मत, कल्पना, साधकबाधक प्रमाणांसहं ब्राह्मणसमाजापुढें मांडणें व त्यांचें अनुकूल मत बनविण्याचा यत्न करणें एवढेंच मुंडल्यांच्या हातीं आहे. अखेर निर्णय ब्राह्मणसमाजाच्या बहुमतावर अवलंबून आहे हें वरील आक्षेपकांच्या ध्यानांत येऊं नये काय ? मुंडल्यांचें मत चुकीचें असल्यास त्याचें खंडण करा, खुद्द आमच्या पत्रांतही विवक्षित मर्यादेंत अशा खंडणास आम्हीं जागा ठेविली आहे हें पहिल्या अंकांतील आमच्या 'हृदयाविष्करणा' वरून कोणासही कळून येण्याजोगें आहे. असें असतां विनाकारण नसते गैरसमज उत्पन्न करून सत्कार्याला विघ्न आणण्याचें पातक करून स्वसमाजाच्या अधोगतीस व नाशास कारण कां होतां ? असा आमचा सदर आक्षेपकांस सवाल आहे. ब्राह्मणसमाजावर आज केवढें मोठें संकट येऊं पहात आहे व त्यांतून निभावून जाण्यास आवश्यक अशा उपायांचा अवलंब न केल्यास ब्राह्मणांच्या पुढील पिढीची कोण दुर्दशा होणार आहे याची कल्पना आपणांसारख्या सुखासीन व बकाल वस्तीच्या शहरांत असणाऱ्या लोकांस जरी आज पुरती आली नसली तरी महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं पसरलेल्या ब्राह्मण लोकांस ती येत चालली आहे. व त्याकरितां त्यांना आमच्या प्रयत्नासारखा प्रयत्न करणें जरूर वाटत आहे. मुंबईकरही जर जास्त विचार करूं लागतील तर त्यांनाही त्याची आवश्यकता पटूं लागेल. मुंबईच्या कांहीं विचारी ब्राह्मण लोकांस ती पटली आहे हें दुसरीकडे दिलेल्या कांहीं अभिप्रायांवरून दिसून येईल. ज्यांना ती अद्याप पटली नसेल त्यांनीं आमच्या लेखांचें व विचारांचें मनन करावें, त्यांतील हेतु जाणावा आणि मग त्याविषयीं काय तें बोलावें. पूर्वग्रहानें दूषित होऊन उगाच उतावीळपणानें भलताच अभिप्राय प्रगट करून आमच्या कार्या-संबंधानें त्यांनीं नुसता गैरसमज उत्पन्न करण्याचें पातक करूं नये एवढीच आमची अशा लोकांस प्रार्थना आहे ! ब्राह्मणसमाजांतील निरनिराळ्या जातींनीं मनौदार्य दाखविल्याशिवाय त्या समाजांत ऐक्यभाव उत्पन्न होणें शक्य नाहीं. व ती गोष्ट तर आपणांस अवश्य साधावयाची आहे यास्तव पूर्वींच्या उखाळ्या-पाखाळ्यांची आठवण जागृत करण्याचा प्रयत्न सर्वांनींच

दक्षतेनें टाळावा अशी आमची सर्व ब्राह्मण जातीस विनंति आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, आम्हीं जें ऐक्य साधूं पहातों त्यांत प्रत्येक जातीनें दुसऱ्या जातीशीं आपल्या इच्छेविरुद्ध रोटीबेटीव्यवहार करण्यास तयार होण्याचा प्रश्न उद्भवतो असें नाहीं. सामुदायिक ऐहिक हितसंबंध सर्व ब्राह्मणजातींचे आज एकच आहेत असें आम्हांस वाटतें. ब्राह्मणेतरांत ज्यांचा समावेश होऊं शकत नाहीं अशा सर्व ब्राह्मणजातींनीं रोटीबेटीव्यवहाराचा प्रश्न कालावर सोंपवून कोणी कोणास हलके न मानतां आज आपल्या आर्थिक हितसंबंधाच्या रक्षणाकरितां व ऐहिक सुखाकरितां एका निशाणाखालीं जमा होणें शक्य व आवश्यक आहे. अर्थात् परस्परांनीं मागील गोष्टींची आठवण काढून आपसांतील द्वेष व मत्सर यास तिलांजली देणें जरूर आहे व तसें करण्याचा अभ्यास त्यांनीं चालू ठेवला पाहिजे.

---

# ५ ब्राह्मण्य परिषद कीं ब्राह्मण परिषद.

[ लेखकः—महादेव राजाराम बोडस, मुंबई. ]

इसलामपुरास "ब्राह्मण" नांवाचें ब्राह्मण ज्ञातीचें मुखपत्र निघाल्यापासून त्याच्या उद्देशाला परिपोषक असा एकादा लेख लिहिण्याविषयीं संपादकांनीं फार आग्रह केला. तेव्हां ब्राह्मण ज्ञातीविषयीं लिहावें तरी काय हा विचार मनांत येऊं लागला. ग्रंथोक्त ब्राह्मणाचें वर्णन करावें तर हल्लींच्या वस्तुस्थितीला लागू पडणें कठीण; व प्रस्तुतकाळच्या सर्व ब्राह्मणांना लागू पडेल अशी व्याख्या शोधून काढणें दुरापास्तच आहे. बुद्धिमत्तेनें आपल्याशीं बरोबरी करणाऱ्या ब्राह्मणांविषयीं राज्यकर्त्या इंग्रजांची तेढ पाहून ब्राह्मणेतर अन्य जातीही ब्राह्मणांचा उघड द्वेष करूं लागल्या आहेत; व खुद्द ब्राह्मणांपैकीं पुष्कळांना ब्राह्मण म्हणवून घेण्याची लाज वाटते. जात विचारली तर हिंदु किंवा आर्य म्हणवितात, व साहेबाकडे नोकरी मागावयास गेल्यास होईल तितकें करून जात लपवितात; जणूं काय ब्राह्मण जातींत जन्म झाला हें मागल्या सात जन्मांचें

पातक उभें राहिलें! ब्राह्मणत्वाचा अभिमान दाखविणें हा मोठा देशद्रोह आणि वर्णव्यवस्था व विशेषेंकरून ब्राह्मण ज्ञाति नष्ट करणें हा एक राष्ट्रोन्नतीचा उपाय अशीच गेलीं पन्नास साठ वर्षें पुष्कळ आंग्ल–शिक्षित व कुशिक्षित लोकांची समजूत झालेली दिसते. निदान तशी बढाई मारणें ही एक संभावितपणाची आणि प्रगल्भमताची खूण मानण्यांत येऊं लागली आहे. सनातन धर्माची व ब्राह्मणांची टवाळी करणारा इसम फार शहाणा, मोठा प्रागतिक समजला जातो, साहेबांना प्रिय होतो, मिशनरींचा लाडका बनतो व पदवीला योग्य होतो व हायकोर्ट जज्जही होऊं शकतो. ब्राह्मण हे साहेबांचे शत्रू, खिस्ती पाद्र्यांचे शत्रू, तसेंच सत्यशोधकी ब्राह्मणेतरांचेही शत्रू. महारमांगांचें अस्पृश्यत्व जाऊन ब्राह्मण ही एक नवी अस्पृश्यजात होऊं पाहत आहे. अशा परिस्थितींत ब्राह्मण ज्ञातीविषयीं दोन अनुकूल शब्द लिहिणें हें अब्रह्मण्यच होय. इतर ज्ञातींनीं आपापल्या ज्ञातीचा पुरस्कार केला किंवा उन्नतीचे प्रयत्न केले तरी चालतात; पण ब्राह्मणांनीं मात्र तसें करतां कामा नये, असें म्हणण्यास खुद्द ब्राह्मणांपैकींच कांहीं शहाणे पुढें सरसावतात; कारण काय तर इतर ज्ञातींना वाईट वाटेल किंवा धार्मिक, सामाजिक सुधारणा बंद पडेल. जणू काय ब्राह्मण ज्ञातीचा नाश झाल्यानेंच सर्व सुधारणा होणार आहे! सर्वांच्या लग्नमुंजी लावून दोन चार आणे मिळविणाऱ्या भटभिक्षुकांचें वर्चस्व ज्यांना खपत नाहीं, त्यांनींच ब्राह्मण कारकुनाच्या मदतीनें मोठमोठ्या इस्टेटी मिळवाव्या; अडी अडचणीचे वेळीं मदतीकरितां ब्राह्मणांकडे धांव घ्यावी, व स्वपक्षाचे समर्थनार्थ एकाद्या लोभी ब्राह्मणाची लेखणीही उपयोगांत आणावी; पण खुद्द ब्राह्मणांनीं हूं कीं चूं करतां कामा नये, असा विपरीत काल आला आहे. कै० शाहू छत्रपतींनीं ब्राह्मणांचीं वतनें, जमिनी जप्त केल्याः पण तंजावरच्या कोर्टांत स्वतःला क्षत्रिय ठरवून घेण्याकरितां ब्राह्मण वकील आणि मुखत्यारच पाठविले. तेथें एकादा लठ्ठे, जाधवराव किंवा शिंदे त्यांच्या उपयोगी पडला नाहीं. "खानेकू हम और लढनेकू मेरा भाई" अशीच बहुधा कोल्हापुरी ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांविषयीं आजपर्यंत वृत्ति आढळून आली आहे व कांहीं पोटार्थी ब्राह्मणही श्ववृत्ति करण्यास मिळतात ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

जोंपर्यंत खुद्द ब्राह्मणांना ब्राह्मणत्वाचा व ब्राह्मण ज्ञातीचा अभिमान वाटूं लागला नाहीं, तोंपर्यंत असें आत्मघातकी लोक समाजांत निपजावयाचेच. हा अभिमान जागृत करून कालानुरूप ब्राह्मण ज्ञातीचें संरक्षण व उन्नति करणें ब्राह्मणपुढाऱ्यांचें आद्य कर्तव्य आहे गांधीसारखा महात्मा चातुर्वर्ण्यांचा पुरस्कार करतो, आणि कित्येक ब्राह्मणकुलोत्पन्न समाजसुधारक गांधीला वेडा ठरवून वर्णसंकर करूं पाहतात. हा विपर्यास नाहींसा करणें आज महत्त्वाचें कार्य झालें आहे.

पण जें कार्य स्वयंस्फूर्तीनें होईना तें आज प्रखर विरोधानें होऊं पहात आहे. कोल्हापुरी पैशाच्या मदतीनें सत्यशोधकांनीं सातारा जिल्ह्यांत धुमाकूळ मांडला, त्यामुळें इसलामपुरास 'ब्राह्मण' पत्र निघालें. सोलापूर जिल्ह्यांत ही वावटळ गेली तेव्हां पंढरपुरास "ब्राह्मण्यसंरक्षक" परिषद भरली, व तेथून ती पुन्हा सातारा जिल्ह्यांतील कराडास आली. पुणें तर छत्रपतींच्या स्मारकाच्या निमित्तानें ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचें आगरच बनलें आहे. महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांतही हा वाद निरनिराळ्या स्वरूपानें उद्भवत आहे. रत्नागिरींत खोत आणि कुळें, पेणेस जमिनदार आणि रयत बेळगांव–धारवाडांत लिंगायत–वैष्णव, इतरत्र सावकार–रिणको वगैरे अनेक स्वरूपानें ही ब्राह्मण ब्राह्मणेतरांची तेढ उघड दिसूं लागल्यामुळें व त्याला इंग्रजी अधिकाऱ्यांचें कमीअधिक प्रोत्साहन मिळत असल्यानें ब्राह्मणांनाही स्वसंरक्षणाचे मार्ग शोधून काढणें आवश्यक वाटूं लागलें आहे. आघातानें प्रत्याघात उत्पन्न होणें हा नैसर्गिक नियमच आहे. स्वतःचीं घरें, शेतें जळतांना पाहून किंवा बीभत्स जलसे ऐकून कोणाला क्षणभर संताप होणार नाहीं ? इंग्रजी शिक्षणानें गारठलेला ब्राह्मणांचा अभिमान सत्यशोधक पुन्हा जागृत करीत आहेत. खरोखरच त्यांचे मोठे उपकार समजले पाहिजेत. या दृष्टीनें पाहतां कै० शाहू छत्रपतीमहाराज ब्राह्मणांचें प्रोत्साहकच मानले पाहिजेत. बैलांना पराणीनें टोंचणारा किंवा मुलांना छड्या मारणारा खरोखरच त्यांचा हितकर्ताच असतो. बाहेरून तडाखे बसत असतांनाही जे लोक आत्मसंरक्षण करणार नाहींत ते जगांत राहण्यास नालायकच समजले पाहिजेत. ब्राह्मणज्ञातीपुढें 'जगावयाचें कीं, नाहींसें व्हावयाचें' हा मोठा प्रश्न हल्लीं उभा आहे.

भारतवर्षाच्या इतिहासांत अशी वेळ पहिल्यानदांच आली आहे, असें नाहीं. इतिहासपुराणांतून ब्राह्मण ब्राह्मणेतरांचीं भांडणें आजच्यापेक्षांही अधिक जोराचीं झालेलीं आढळतात. वसिष्ठविश्वामित्रांची स्पर्धा आणि परशुरामकार्तवीर्याची लढाई या दोन कथा प्रसिद्धच आहेत. जैन व बौद्ध धर्मांचा उगमही ब्राह्मणांचें वर्चस्व नाहींसें करण्याच्या इच्छेनेंच झाला. बुद्धघोषानें ब्राह्मणांना जितक्या शिव्या दिल्या आहेत किंवा कित्येक जातक-कथांत ब्राह्मणांची जशी टवाळी केली आहे, तशी हल्लींच्या एकाही जलशांत किंवा ब्राह्मणेतर संपादकांच्या लेखांत आढळणार नाहीं. तथापि ब्राह्मणांनीं बुद्धधर्माला हिंदुस्थानाबाहेर घालवून पुन्हा आपलें साम्राज्य स्थापलें व खुद्द बुद्धाला आपल्या दशावतारांत गोंवून टाकलें. हा प्रभाव बुद्धीचा होय! तसेंच नित्यनेमानें पार्थिव पूजा करणारे शाहू छत्रपति पुढें मागें ब्राह्मणांच्या सतमालिकेंत असणार नाहींत कशावरून? तात्पर्य, आर्यचाणक्यानें म्हटल्याप्रमाणें जोंपर्यंत ब्राह्मणांची बुद्धि शाबूत आहे तोंपर्यंत मतलबी ब्राह्मणेतरांनीं किंवा विलायती नोकरशाहीनें ब्राह्मण-ज्ञातीवर कितीही हल्ले केले तरी घाबरण्याचें कारण नाहीं. निंदकांचा विरोध ही अनेक वर्षांच्या आळसानें सांचविलेला गंज काढून टाकण्याची सहाण होय, असें आपण समजलें पाहिजे. विरोध दिसल्याबरोबर हातपाय गाळून आपलेपणा टाकून देण्याऐवजीं ज्या कारणांमुळें विरोध उत्पन्न होतो तीं कारणें दूर करण्याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. आजवर दुसऱ्या नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या अनेक जाति आतां आपणास क्षत्रिय म्हणवूं लागल्या आहेत, मग ब्राह्मणांनींच आपलें ब्राह्मण्य विसरून वर्णसंकर कर-ण्यास कां प्रवृत्त व्हावें? प्राश्चात्य विद्येनें दिपून गेलेल्या सुशिक्षितांच्या बुद्धीला कांहीं वर्षे भ्रम झाला होता त्याचें हें फल. हा भ्रम कमी होऊन प्रत्यक्ष वस्तुस्थिति जसजशी अनुभवास येईल तसा इतरांप्रमाणें ब्राह्मण-वर्गही स्वोन्नतीच्या मार्गाचा विचार करूं लागेल यांत शंका नाहीं.

नुकतीच पुण्यास तिसरी ब्राह्मण्यसंरक्षक परिषद भरली होती ती या जागृतीचेंच मूळ म्हणण्यास हरकत नाहीं. पहिल्या दोन परिषादांपेक्षां या तिसऱ्या परिषदेंत अधिक विचार झालेला दिसतो, परंतु वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळें या परिषदेंतील खासगी व जाहीर चर्चा आंधळ्या कोशिंबिरी-

च्या खेळासारखीच झाली, म्हटलें तरी चालेल. आज प्रसंग कोण आहे, वाटेंत अडचणी कोणत्या, जग व समाज कोणीकडे जात आहेत, आजच्या कालानुरूप ब्राह्मणांचें कर्तव्य कोणतें व नियामकशक्ति कोठें आहे, इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचें अध्यक्षापासून वक्त्यापर्यंत एकालाही ज्ञान नव्हतें म्हटलें तरी चालेल, व त्यामुळें दोन दिवस इकडल्या तिकडल्या दोन तीन संस्कृत वाक्यांचा खल करण्यांत गेले. महाभारतांतील किंवा पातंजल भाष्यांतील एखाद्या तुरळक वाक्यानें आजच्या ब्राह्मणज्ञातीची व्याख्या करूं पाहणें म्हणजे लहानपणच्या आंगड्यावरून मोठ्या पुरुषाचे कपडे बेतण्यासारखेंच आहे, हें ब्राह्मण्याची व्याख्या प्राचीन ग्रंथांत हुडकीत बसणाऱ्या शास्त्रीबुवांचे लक्षांत आलें नाहीं. कोणतीही नवी चळवळ प्रस्तुत स्थितीला धरून चालवावी लागते व त्याकरितां व्यवहारज्ञ पुढारी लागतात. केवळ जुन्या पोथ्या चाळल्यानें प्रत्यक्ष अडचणींचें निराकरण होत नाहीं.

ब्राह्मण्यसंरक्षक परिषदेचे हेतु स्तुत्य आहेत, पण दिशा चुकली. ब्राह्मणाचा धर्म किंवा कर्म तें ब्राह्मण्य हा सरळ अर्थ; पण ब्राह्मण कोण व त्याचें कर्म काय, हें ठरविणें आज कठीण झालें आहे. तेव्हां ब्राह्मण्य ही स्वतंत्र वस्तु कल्पून त्याच्या अर्थाकरितां जुनीं वचनें निघूं लागलीं. "कुलं शीलंच विद्याच ब्राह्मण्यमिदमुच्यते" हें एक अनुक्त वाक्य पुढें आलें व त्यांतील कुल म्हणजे ब्राह्मणजाति असाही अर्थ करण्यांत आला. आणि परिषदेच्या ठरावांत संस्कार हें चवथें लक्षण स्वकपोलकल्पित घुसडण्यांत आलें. दुसरें एक पातंजल महाभाष्यांतील वाक्य आठवलें; पण त्यांत विद्यातपोविहीन ब्राह्मणांना केवळ जातिब्राह्मण म्हटल्यानें व हेंच वर्णन हल्लींच्या बहुतेक ब्राह्मणज्ञातीला जुळत असल्यानें ब्राह्मण शब्द निराधार होतो. गीतेंतील "शमो दमः तपः शौचं" हें ब्रह्मकर्माचें द्योतक वाक्य परिषदेच्या चर्चेंत कां निघालें, कांहीं समजत नाहीं. तात्पर्य, ग्रंथोक्त ब्राह्मण्याची व्याख्या कल्पून त्याच्या संरक्षणाकरितां सभा स्थापणें हें शशशृंगाचा शोध करण्याकरितां स्वारी काढण्यासारखेंच आहे. हा द्राविडी प्राणायाम टाकून सरळ "ब्राह्मण संरक्षक परिषद्" काढणें माझ्या मतें अधिक इष्ट आहे.

"ब्राह्मणपरिषदे"त कोणत्या पोटजातींचा अंतर्भाव करावा, हा प्रश्न

प्रारंभीं थोडा घोटाळ्याचा वाटेल खरा; पण थोड्या तारतम्यानें व युक्तीनें तो सुटण्यासारखा आहे. प्राचीन काळापासून दशविध ब्राह्मण मानण्यांत येतात; त्या सर्वांना बोलवावें कीं प्रथम पंचद्राविडांपुरतीच परिषद् भरवावी हें प्रथम ठरवावें लागेल. प्रथम पंचद्राविडांपुरताच उपक्रम करणें अधिक इष्ट होईल, कारण मांसाहारी आणि शाकाहारी ब्राह्मणांचें साहचर्य होणें प्रारंभीं कठीण जाईल. पंचद्राविडांमध्यें ब्राह्मण नांवाची व्याख्या जितकी व्यापक करवेल तितकी केली पाहिजे. जी जाति आपणास ब्राह्मण म्हणवितें त्यांना आंत घेतलें पाहिजे. रोटीबेटीव्यवहार, संस्कार, अध्ययन, अध्यापन, बहिष्कार वगैरे वादग्रस्त प्रश्न बाजूला ठेवून सर्वांचा अंतर्भाव या परिषदेंत करणें हेंच प्रारंभीं श्रेयस्कर आहे. सर्व ब्राह्मणज्ञातीच्या संरक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला असतां अवांतर भेद आणि अंतस्थवाद क्षणभर विसरून सर्वव्यापी परिषद करणें हेंच आजच्या परिस्थितीला इष्ट आहे. राष्ट्रीय सभेंत सर्व हिंदुस्थानवासीयांचा अंतर्भाव झाल्यानें जसें निरनिराळ्या समूहांचें व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट होत नाहीं; त्याचप्रमाणें ब्राह्मणपरिषदेंत सर्व पोटभेदांचा अंतर्भाव केल्यानें त्यांच्या विशिष्ट आचारविचारांना बाध येणार नाहीं. उलट अधिक साहचर्यानें परस्पर अज्ञान आणि गैरसमज कमी होऊन अंतर्गत कलह नाहींसे होण्याचा संभव आहे.

सन १९०६ सालीं कलकत्ता कॉंग्रेसचे वेळीं अशी एक परिषद भरविण्याची कल्पना निघाली होती, व मुंबईच्या ब्राह्मणसभेंतही या प्रश्नाची एकदोन वेळां वाटाघाट झाली. पण आंगचुकार आणि भोजनभाऊ लोकांचे हातून हें कार्य होण्यासारखें नाहीं. मठाधिपतींनीं हें कार्य करावें पण त्यांचें बूड ठिकाणावर नाहीं. पाद्यपूजा आणि कोर्टांतले दावे यांत लक्ष गुंतल्यानें बिचाऱ्या ब्राह्मणांकडे कोण पहातो? ब्राह्मणांपैकीं सुशिक्षित लोक विधवाविवाह आणि प्रीतिभोजनें करीत आहेत, व कोणी फंड गोळा करून स्वराज्याचा डांगोरा पिटीत आहेत, थोडेबहुत वैदिकशास्त्री आहेत ते संसारयात्रेंत निमग्न आहेत.

ब्राह्मण परिषद केवळ एका ज्ञातीकरितां नसून प्राचीन सनातन धर्माचे संरक्षणाकरितां पाहिजे आहे. कारण धर्माचें संरक्षण हेंच ब्राह्मणांचें

मुख्य कार्य आहे. आज सनातनधर्मावर, चोहोंकडून हल्ले होत असतां त्याचें निशाण संभाळण्याची सर्व जबाबदारी ब्राह्मणांवर आहे. जैन–बौद्धांच्या हल्ल्यांतून समातनधर्माला ब्राह्मणांनींच वाचविलें व पुढें हूण–शकांच्या स्वाऱ्या गुप्त राजांकडून अश्वमेध यज्ञ करवून ब्राह्मणांनींच परतविल्या. शिवाजीला स्वराज्य स्थापण्याचे कामीं दादोजी, रामदास व गागाभट्ट या ब्राह्मणांनींच तयार केलें व पुढें पेशव्यांनीं मराठ्यांचा झेंडा अटकेपर्यंत नेला. सांप्रतकाळींही स्वधर्म आणि स्वराज्य यांचे रक्षणाची जोखीम ब्राह्मणांनींच पत्करली पाहिजे व त्याकरितां स्वज्ञातीचें संघटन करणें अत्यंत आवश्यक आहे.

---

# ६ आजच्या विचारी ब्राह्मणांचें कर्तव्य

[ संपादकीय ]

आर्यसंस्कृतीचे प्रवर्तक व नेते या नात्यानें चातुर्वर्णांकित हिंदुसमाजाचें नियंत्रण व संवर्धन करण्याची जबाबदारी, हिंदु धर्मशास्त्र व समाजशास्त्र यांनीं ब्राह्मणवर्गावर टाकलेली असून, ती परिस्थित्यनुरूप पार पाडण्याचें कार्य त्यांनीं वेळोवेळीं केलेलें आहे; आणि त्यामुळेंच हिंदुसमाजाचें धुरीणत्व अद्यापपर्यंत त्यांच्याकडे राहूं शकलें. चातुर्वर्ण्यात्मक हिंदु–ऊर्फ आर्य संस्कृतीचा उच्छेद करण्याचे आजपर्यंत अनेक मोठमोठे प्रयत्न झाले. परंतु त्यांशीं टक्कर देऊन ब्राह्मणांनीं ते प्रयत्न निष्फळ केले व आपल्या संस्कृतीचें रक्षण केलें. हें कार्य त्यांनीं कोणत्या तत्त्वाच्या आधारावर केलें याचा जर आपण शोध केला, तर आपणास असें आढळून येईल कीं, ज्या ज्या नवीन संस्कृति अथवा पाखंडें ऊर्फ स्वसंस्कृतींतील विकृत रूपें यांच्याशीं स्पर्धाक्षेत्रांत त्यांना सामना करावा लागला, त्यांतील इष्ट–म्हणजे स्वसंस्कृतीस बाध न आणणारा–भाग आपल्या संस्कृतींत समाविष्ट करून घेऊन उरलेल्या अनिष्ट अथवा दुर्बल अंगावर आपल्या प्रबोधनशक्तीचा मारा करून त्याचा त्यांनीं पाडाव केला; म्हणजे अशा प्रत्येक झगड्यामध्यें त्यांनीं आपली

## प्रगतिप्रवणता व विकासोन्मुखता

प्रगट केली. आणि म्हणूनच त्यांना मुसलमानी संस्कृतीसारख्या बलाढ्य व क्रूर परकीय संस्कृतीशीं आणि बुद्धासारख्या हिंदु संस्कृतीच्या बलिष्ठ व राजमान्य विकृत स्वरूपाशीं यशस्वी रीतीनें झगडतां आलें. या दोन संकटांच्या मानानें आजचें संकट बरेंच सौम्य आहे. पण वेळींच सावध न होतां उपेक्षा केल्यास तें अधिक तीव्र होण्याचा संभव आहे; कारण पाश्चात्य ऊर्फ खिस्ति संस्कृति, हा एकच बलाढ्य प्रतिस्पर्धी तूर्त आहे; पण कालांतरानें इस्लामी संस्कृति व बुद्धाप्रमाणेंच समतेच्या नांवावर एकंकार ऊर्फ सबगोलंकार करूं पाहणारें सत्यशोधकपंथाच्या द्वारें व्यक्त होणारें हिंदू संस्कृतीचें विकृत स्वरूप ह्या त्रिपुटीचा निरनिराळ्या हेतूनें पण एकसमयावच्छेदेंकरून आर्य संस्कृतीवर जोराचा आघात होण्याचा संभव आहे. ह्या तीन प्रतिस्पर्ध्यांचे हितसंबंध एकच नाहींत, किंबहुना ते कांहींसे परस्परविरुद्धही आहेत; पण सनातनधर्मीय आर्य संस्कृतीचा उच्छेद करणें हें तिघांनाही सारखेंच इष्ट असल्यामुळें तेवढ्या कार्यापुरतें त्यांचें ऐक्य होणें संभवनीय आहे. खिस्ति ऊर्फ पाश्चात्य संस्कृतीची स्पर्धा अथवा विरोध संघटित स्वरूपाचा बनलेला असून त्यास राजसत्तेचाही आधार लाभला आहे. यामुळें आर्यसंस्कृतीचा हा प्रतिस्पर्धी अत्यंत बलाढ्य होऊन बसला आहे. भौतिकशास्त्रसंपन्नतेची जोड त्यास असल्यामुळें आर्यसंस्कृतीचा दुर्भेद्य किल्ला हळुहळू पण परिणामकारक रीतीनें पोखरून टाकण्याचें कार्य तो बेमालुम रीतीनें करीत आहे; व त्या कामीं उपरीनिर्दिष्ट दुसऱ्या दोन प्रतिस्पर्ध्यांचें साहाय्य तो मिळेल तितकें घेत आहे. हे दोन प्रतिस्पर्धी अद्याप सुसंघटित व बलवान झालेले नाहींत व ते तसे व्हावेत अशीही पहिल्याची फारशी इच्छा नाहीं. कारण त्याच्याही डोक्यावर मिरें वाटणें त्यास–स्वोन्नतीच्या दृष्टीनें–भाग पडणार आहे. हे दोन प्रतिस्पर्धी, युरोपियन लोक ज्यांना एशियाटिक म्हणतात त्यांपैकीं असल्यामुळें खिस्ती संस्कृतीशीं त्यांचा मिलाफ होणें शक्य नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या दरम्यान कायमचा स्नेहभावही उत्पन्न होणें शक्य नाहीं. तसेंच ह्या दोहोंपैकीं इस्लामी संस्कृतीपेक्षां सत्यशोधक पंथ

## आपल्या संस्कृतीस अधिक जवळचा

आहे. इस्लामी संस्कृतीचा व आर्य संस्कृतीचा मिलाफ होणें शक्य नाहीं, पण विवक्षित मर्यादेत त्यांचें सख्य होणें शक्य आहे; आणि सत्यशोधकांशीं केवळ सख्यच नव्हे, तर त्यांना आत्मसात् करणेंही आर्य संस्कृतीस शक्य आहे. खिस्ती किंवा इस्लामी संस्कृति त्यांना आर्य संस्कृतीइतकी आपलेपणाच्या दृष्टीनें जवळची नाहीं व भिक्षुकशाहीचें अथवा ब्राह्मणशाहीचें व तत्प्रणित सनातनधर्माचें कंबरडें मोडण्याची जरी त्यांची मोठी महत्त्वाकांक्षा असली, तरी त्याकरतां ते वरील दोन्ही परकीय संस्कृतीच्या गळ्यांत गळा घालून त्यांशीं तादात्म्य होण्याची त्यांस केव्हांही इच्छा होणार नाहीं. ब्राह्मणशाहीशीं करावयाचा झगडा ते हिंदु राहूनच करतील यांत शंका नाहीं. हा आपसांतील झगडा

## शक्य त्या उपायांनीं टाळणें

अथवा तो झालाच तर शक्य तितका अल्पजीवी करणें हें आजच्या विचारी ब्राह्मणांचें, आर्य संस्कृतीचे जबाबदार पुरस्कर्ते या नात्यानें, मुख्य व महत्त्वाचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य नीटपणें ओळखून तें बजावण्याचे जर सद्यःकालीन ब्राह्मणसमाजानें पद्धतशीर प्रयत्न केले नाहींत तर अज्ञ, अविवेकी व अदूरदर्शी असा हिंदु संस्कृतिनिविष्ट बहुजनसमाज कळत वा नकळत इस्लामी अथवा खिस्ती संस्कृतीच्या हातचे बाहुलें बनून हिंदु ऊर्फ आर्य संस्कृतीच्या नाशास प्रवृत्त होणार हें उघड आहे. हा अंतःकलहाचा विंचू काखेंत मारून वरील दोन परकीय संस्कृतींशीं झगडणें केवळ अशक्य नसलें, तरी अत्यंत दुस्तर आहे यांत शंका नाहीं. परंतु या गोष्टीची जाणीव व तत्संबधीं विचक्षणा करण्याची प्रवृत्ति व लायकी सध्यां फारच थोड्या ब्राह्मणलोकांचे ठायीं असल्याचें दिसून येतें. आणि त्यामुळेंच हिंदुसमाजांत आज एक प्रकारचा विस्कळितपणा व बखेडा माजून राहिला आहे. हिंदुसमाजाचें शीर ब्राह्मणसमाज आहे. तें विवेकभ्रष्ट व विचारभ्रष्ट अथवा स्तिमित बनलें म्हणजे बाकीच्या सर्व समाजाची अव्यवस्था होते. ब्राह्मणांच्या पूर्वजांनीं ही अखिल हिंदुसमाजाच्या सुव्यवस्थेची व संस्कृतिरक्षणाची सर्व जबाबदारी आपल्यावर घेण्यांत चूक केली, कीं त्यामुळेंच ही

संस्कृति जगांतल्या इतर सर्व संस्कृतींपेक्षां दीर्घ काळ टिकून अनेक बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांशीं ती चिवटपणें झगडूं शकली याचा योग्य निर्णय समाजशास्त्राचा तौलनिक अभ्यास केल्यावांचून करतां येणार नाहीं. तथापि एवढी गोष्ट खरी कीं, ही जबाबदारी म्हणजे सुळावरची पोळी असून ती पार पाडण्यास खडतर

## तपाचरण, मनोनिग्रह, शिस्त, त्यागबुद्धि, ज्ञान

इत्यादि ( येथें तपाचरण याचा अर्थ ऋषिकालीन उग्र हटयोगादि तपश्चर्या असा नसून, 'सत्क्रियासातत्य' असा आहे.) परमोच्च गुणांची जरुरी लागते व हे गुण अत्यंत कष्टसाध्य असल्यामुळें ते प्राप्त करून घेण्याचा बोजा समाजांतील सर्व किंवा बहुतेक लोकांवर लादण्यापेक्षां कांहीं थोड्या निवडक व बुद्धिमान् व्यक्तिसमूहावर लादणें यशःसिद्धीच्या दृष्टीनें अधिक सुकर व श्रेयस्कर वाटलें; म्हणूनच ब्राह्मणांनीं ही जबाबदारी पत्करली व उपरोक्त गुणांची परंपरा राखून आजवर ती जबाबदारी कमजास्त प्रमाणानें त्यांनीं पार पाडली आहे. आणि आजच्या सर्वतोपरी निराशामय व खिन्न परिस्थितींतही त्यांचा हा मागील उज्ज्वल इतिहास त्यांस धीर देऊन मार्गदर्शक होण्यासारखा आहे. मात्र त्यांनीं आपलें औदासिन्य व बेफिकीरपणा टाकून देऊन परिस्थितीचें निरीक्षण व उपायचिंतन करण्याच्या मार्गास लागलें पाहिजे. ब्राह्मणसमाज

## जागृत होऊन कर्तव्यतत्पर

बनला, तर आजच्या संकटास तोंड देऊन आर्य संस्कृतीच्या रक्षणास तो समर्थ होणार नाहीं असें नाहीं; पण तो जागृत व कार्यतत्पर कसा व केव्हां होईल, हींच काय ती विचाराची बाब आहे. ह्या समाजाच्या आजच्या स्थितीकडे पाहिलें तर जसा एखादा अचेतन मासाचा लिबलिबित व स्तिमित असा गोळा एखाद्या जगलांत पडावा व त्यांस शेंकडों कावळ्यांनीं चंचुघात केला अगर रानांत जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरांनीं काठीनें ढोंसलें तरी स्तब्ध पडून रहावा, तशी या समाजाची स्थिति झाली आहे. वाटेल त्यानें त्यांची निंदा करावी, त्यांतील व्यक्तींची विटंबना करावी, उपमर्द करावा, त्यास भीति घालावी, छळ करावा, तरी हा समाज आत्मनिरीक्षण करण्याच्या दृष्टीनें काडीइतकीही हालचाल करीत नाहीं! नाहीं म्हणाव-

यास भाणूबाईसारखें रडगाणें गाण्यास व जबरदस्तांच्या लाथा खाऊन गरीबांना नाडण्यास व आपसांत कलह माजवून आत्मघात व समाजघात करण्यास मात्र अनेक ब्राह्मणवीर तयार असतात !" वर सांगितलेल्या ज्या थोर गुणांच्या आधारावर यांच्या पूर्वजांनीं आपलें थोरपण राखून संस्कृति-रक्षणाचें कार्य केलें त्या गुणांस हे पारखे होत गेल्यामुळेंच मुख्यतः त्यांची अशी दैन्यावस्था झाली आहे व होत आहे. पूर्वीं क्षत्रिय मानल्या जाणाऱ्या कित्येक जनसमूहांत संस्कारलोप व तज्जन्य गुणांचा अभाव झाल्या-मुळें जर त्याची गणना शूद्रांत होऊं शकते, तर तोच नियम संस्कारहीन व गुणविहीन ब्राह्मणांस लागू करण्यांत आल्यास त्यांत आश्चर्य कसलें! या स्थितींतून आपली सुटका करून घेण्याची जर ब्राह्मणांची इच्छा असेल— आणि ती तशी असली पाहिजे—तर त्यांना तपाचरणादि उपरोक्त गुण संपादन केले पाहिजेत व आपलें पूर्वापार चालत आलेलें बौद्धिक-श्रेष्ठत्व, शुचित्व व त्यागक्षमता यांचें रक्षण व संवर्धन करून निरपेक्ष पणानें समाजसेवा, राष्ट्रसेवा व त्या योगानेंच साधणारें संस्कृतिरक्षण करण्यास उद्युक्त झालें पाहिजे. याचा अर्थ सर्व ब्राह्मणांनीं केवळ

## संन्यस्तवृत्तीनें रहावें असा नाहीं.

संन्यस्तवृत्ति हा ब्राह्मण समाजाचा व आर्य संस्कृतीचा एक महत्त्वाचा विशेष आहे व त्यांतच तिचें खरें सामर्थ्य आहे. किंबहुना त्यामुळेंच ती अनेक प्रकारच्या सुलतानी—अस्मानीस तोंड देऊं शकते व पुरून उरते हें खरें आहे; परंतु ही वृत्ति निर्भेळपणें बहुतांच्या ठायीं बाणणें दुरापास्त आहे व इतक्या मोठ्या प्रमाणांत ती तशी असण्याची फारशी जरुरीही नाहीं. कांहीं थोड्या व्यक्तींच्या अंगीं ती उपरिनिर्दिष्ट गुणांसह असली म्हणजे संस्कृतीच्या तंतूचें बीजरूपानें रक्षण होऊं शकतें व अनुकूल समय येतांच त्या तंतूचा पट अथवा बीजाचा वृक्ष तयार होऊं शकतो. पण हे थोडे लोक तरी निपजून त्यांचें धारण व परिपोषण होण्यास अनुकूल वातवरण असावें लागतें व त्याकरितां तत्सदृश अथवा तदानुकूल असा एखादा व्यक्ति-समूह अथवा संघ असावा लागतो. व तो 'आधिं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थसुखा।' या समर्थोक्तीप्रमाणें प्रपंचनिपुण व परमार्थप्रवण

असा असावा लागतो. आणि ब्राह्मणांचा बहुजनसमाज हेंच कार्य पूर्वीपासून करीत आला आहे व पुढेंही त्यानें तसें करीत राहण्यास हरकत नाहीं. आजकाल जगांतील बहुतेक मानवसमाजाचा कल भौतिक सुखाकडे म्हणजे भोगलालसेकडे एकसारखा अधिकाधिक झुकत चालला आहे. पाश्चात्य संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांनीं भौतिकशास्त्रांची विलक्षण प्रगति करून त्याच्या जोरावर मांडलेल्या मायेच्या बाजारानें इतरांना दिपवून व थक्क करून टाकल्यामुळें भौतिक सुखाचा मोह सर्वत्र अनावर होत चालला आहे. आणि त्यांचीच राजसत्ता भरतखंडांत सध्यां नांदत असल्यामुळें येथील ब्राह्मण व इतर समाजही त्या मोहास साहजिकच बळी पडत आहेत. आपद्धर्म म्हणून अनेक बाबींचा आपणांस स्वीकार व पुरस्कार करावा लागत आहे; व कालगतीनें त्यांपैकीं कांहीं आपल्या नित्य संवयीच्या व जरुरीच्या होत चालल्या आहेत. अशा स्थितींत ब्राह्मण समाजांतील

## सर्व व्यक्तींना

पूर्वकालीन ब्राह्मणी आचार व विचार अबाधितपणें कायम ठेवतां येणें शक्य नाहीं. तथापि ब्राह्मणांना मोठेपणा कशानें प्राप्त झाला व तो त्यांनीं कोणत्या गुणावर राखला, याचें काळजीपूर्वक चिंतन केल्यास आजच्या ब्राह्मणांनाही आपल्या मोठेपणाची गुरुकिल्ली कशांत आहे हें सहज कळून येईल व आपल्या परंपरेला अनुसरून आजच्या स्थितींतही हिंदु समाजांतील आपलें स्थान कायम राखण्याकरितां कोणते गुण नवीन संपादन केले पाहिजेत, पूर्वीच्या कोणत्या गुणांचें रक्षण करून ते वाढीस लाविले पाहिजेत याची जाणीव उत्पन्न होईल. ही जाणीव सर्वांच्या ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून व्हावी म्हणूनच आम्ही ब्राह्मणसंघाची कल्पना ब्राह्मणसमाजापुढें मांडली व ज्या मानानें ती परिणत होऊन मूर्त स्वरूप धारण करील त्या मानानें तें कार्य लवकर अथवा उशिरां होणारें आहे. ब्राह्मण समाजाचें शरीर आज जें स्तिमित झालेलें दिसत आहे त्याला संघाच्या स्थापनेनें चेतना उत्पन्न होईल व ती उत्पन्न झाल्यास भोंवतालच्या स्थितीकडे नजर जाऊन विचारविनिमय सुरू होईल आणि मग साहजिकच स्तिमितपणामुळें आलेलें औदासिन्य व गाफीलपणा नष्ट होऊन विचारविनिमयाच्या घर्षणानें त्यांत ताजें रक्त

खेळूं लागेल. असें झालें म्हणजे जुनें 'ठेवणें' कार्य आहे; परिस्थितीच्या तडाक्यांतून त्यापैकीं किती रक्षण करतां येण्यासारखें आहे, व किती छाटाछाट करणें आवश्यक आहे, तसेंच परंपरा न सोडतां म्हणजे विसंगतपणा न येऊं देतां 'नवीना'ची त्यास किती जोड देणें जरुरीचें आहे, इत्यादि गोष्टींचा शास्त्र व व्यवहार यास धरून खल करतां येईल; व कांहीं तरी निश्चित निर्णय करून तदनुसार कार्यक्रमाची दिशा ठरवितां येईल. असा कांहीं उपक्रम केला तरच आजच्या स्थितींत ब्राह्मण समाज जगण्याचा व

## आर्यसंस्कृति जगण्याचा

संभव आहे. नाहीं तर दोहोंचाही परिस्थितीच्या व कालाच्या वरवंट्याखालीं चुराडा झाल्यावांचून राहणार नाहीं. 'तुका म्हणे उगें रहावें। जें जें होईल तें पहावें।' हा निराशामय दैववाद पुरुषार्थाशीं व आर्यसंकृतीच्या मूलतत्त्वाशीं विसंगत असल्यामुळें त्याचा अंगिकार करून भागणार नाहीं. तुम्ही स्वस्थ बसलां म्हणून जगाच्या हालचाली व कालाची गति थांबत नाहीं. ती वायुवेगानें चालू आहे. अशा स्थितींत स्वस्थ बसणें अथवा उदासीन राहणें म्हणजे जाणूनबुजून मृत्यूला पाचारण करण्यासारखें व अवनतीला आपण होऊन कवटाळण्यासारखें आहे. जसें स्वस्थ बसून चालावयाचें नाहीं तसेंच अंगचुकारपणा किंवा लपंडाव करूनही भागणार नाहीं. त्यायोगानें चालू असलेला संस्कृतीचा तीव्र झगडा थांबणार नाहीं अथवा तुम्हांस फायदेशीर होणार नाहीं. त्यांत यश मिळविणें असेल तर उघडपणें आखाड्यांत उतरून प्रतिपक्षास तोंड देण्याची तयारी केली पाहिजे व साम, दाम, दंड, भेद वगैरे जे युद्धाचे शास्त्रोक्त मार्ग आहेत ते चोखाळले पाहिजेत. ते चोखाळतांना निष्काम व निस्पृहवृत्ति बाळगून संस्कृतिरक्षण अथवा राष्ट्ररक्षण ह्या ध्येयाकडे नजर ठेवून वागल्यास, जवळचे कोण, दूरचे कोण, कोणाला आपल्या पोटांत समाविष्ट करणें इष्ट होईल व कोणाला बाहेर ठेवणें जरूर आहे इत्यादि गोष्टी सहजस्फूर्तीनें बरोबर कळूं लागतील व नवीन परिस्थितीचा जुन्या परंपरेशीं मेळ घालून हिंदु समाजाची अभियुक्त अशी पुनर्घटना करण्याचें काम सुलभ व यशस्वी रीतीनें करतां येईल. अशाप्रकारें हिंदु समाजाची पुनर्घटना केल्यावांचून हिंदु राष्ट्र अथवा

## आर्य संस्कृति जगणार नाहीं

ही गोष्ट निश्चित आहे. अर्थात् ही पुनर्घटना करण्याचें कामीं ब्राह्मणांनीं जर पुढाकार घेतला नाहीं, तर इतर वर्गांतील विचारी लोकांना तो घ्यावा लागेल व तसें झाल्यास ब्राह्मणांना आपलें महत्त्व गमावून हीन स्थितींत काळ कंठावा लागेल; इतकेंच नव्हे, तर कदाचित् नामशेषही व्हावें लागेल ! ब्राह्मणांच्या सद्यःकालीन औदासिन्याचा, बेफिकीरपणाचा अथवा घमेंड-खोरपणाचा व दुराग्रहाचा इतका घोर परिणाम होण्याचा संभव आहे. आम्हांस ठाऊक आहे कीं, कांहीं पुराणमतवादी शास्त्री–भिक्षुक व वैदिक लोक व पूर्वजांच्या कमाईवर श्रीमंतींत लोळणारे जुन्या–नव्या मतांचे कांहीं प्रतिष्ठित ब्राह्मण लोक यांना आमचा सदर कयास पटणार नाहीं; परंतु तें त्यांच्या विवेकशून्यतेचें व गाफिलपणाचेंच लक्षण आहे, असें खुद्द त्यांनाही विवेकांतीं कबूल करावें लागेल ! अशा लोकांनीं आम्हांला मूर्ख ठरविण्या-करितां कां होईना, आपलें औदासिन्य झाडून परिस्थितीचा नीट अभ्यास करावा, भावी कालांतील घडामोडींचें ज्ञानदृष्टीनें आकलन करावें, अशी आमची त्यांस आग्रहाची सूचना नव्हे–विनंति आहे. जर ते असें करूं शकतील तर थोड्याच कालांत त्यांना, असेंच उदासीन व बेफिकीर राहिल्यास आपल्या भावी पिढ्यांची कोण दुर्दशा होईल याचें भयाण चित्र त्यांच्या ज्ञानचक्षूपुढें उभें राहून त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहतील ! ब्राह्मणसमाजांत असा एक वर्ग उत्पन्न होऊं पहात आहे कीं, ज्यास ब्राह्मण्याची व

## ब्राह्मण जातीचीही गरज नसून

जो जातिसंकर करण्यास तयार आहे. परंतु हा वर्ग अल्पसंख्याक असून सध्यां तरी त्यास विचारांत घेण्याचें कारण नाहीं. सुशिक्षित सुधारक ब्राह्मण-लोकांतही ब्राह्मणी रक्त शुद्ध रहावें; वंशदृष्ट्या त्यांत भेसळ होऊं नये अशा मताचेच लोक पुष्कळ आहेत, आणि त्यामुळें पुराणमतवाद अथवा कर्म-कांड आणि आचारकांड या बाबतींत त्यांच्याशीं जरी कोणाचा कितीही मतभेद झाला, तरी ब्राह्मण समाजानें त्यास आपल्या पोटांत घेऊन त्यांच्याशीं तडजोड करून त्यास ब्राह्मण्याच्या कक्षेंत ठेवण्याची सोय केली पाहिजे.

तसेंच ब्राह्मणांमध्यें ज्या बहुविध पोटजाति आहेत, त्यांपैकीं कांहींचें परस्परांत वैमनस्य व द्वेष यांचें कांहीं ठिकाणीं प्राबल्य माजलेलें दिसून येतें, तें नष्ट करून त्यांच्यात एकोपा अथवा सलोखा उत्पन्न करण्याचे यशस्वी प्रयत्न करणें जरुरीचें आहे. शास्त्र, रूढि, व्यवहार, पूर्वेतिहास या सर्वांचा विचार करून हा पोटजातींचा प्रश्न सोडविण्याकरितां जुन्या व नव्या मतांच्या प्राचीन व आधुनिक विद्येंत पारंगत असलेल्या भिन्न–भिन्न पोटजातींतील विद्वान्, निस्पृह व समंजस ब्राह्मणांचें एक मिश्र मंडळ ब्राह्मणसमाजानें स्थापन केलें पाहिजे. बेटी व्यवहाराचा प्रश्न बाजूस ठेवून रोटी व इतर व्यवहार आणि ब्राह्मणजात या दृष्टीनें सर्वांचे एकसारखे असलेले हितसंबंध लक्षांत घेतल्यास, या बाबतींत परिश्रमानें सर्वांचें ऐक्य व सलोखा होण्यास पुष्कळ अवसर आहे. मात्र तसें करण्याची

## उत्कट भावना

आजच्या ब्राह्मणसमाजांत एकसारखी प्रज्वलित होऊन राहिली पाहिजे. सारांश, अंतःकलहाची प्रवृत्ति, औदासिन्य; बेफिकीरपणा ऊर्फ घमेंड, आलस्य, मनोदौर्बल्य, गाफीलपणा, शीलभ्रष्टता, स्वार्थलोलुपता वगैरे जे दुर्गुण कमजास्त प्रमाणानें समाजांत शिरले आहेत, त्यांचें उच्चाटण करून, आपण कोठें आहोंत, कोठें असावयास पाहिजे व कोणीकडे चाललों आहों याचा जागरूकपणें व विचिकित्सकबुद्धीनें विचार करण्याचा प्रसंग आज ब्राह्मणसमाजावर येऊन ठेपला आहे. भावी कालांत जर त्यास जगावयाचें असेल, तर वर निर्दिष्ट केलेल्या दिशेनें त्यानें उद्योगास लागणें जरूर आहे. स्वसमाजांतील बखेडा व विस्कळीतपणा मोडून त्याची प्रागतिक तत्त्वावर संघटना करणें, ही या उद्योगाची पहिली पायरी आहे. ती शक्य तितक्या जलद आक्रमून मग हिंदुसमाजांत आज महत्त्वाचे होऊन बसलेले पतितपरावर्तन, इतर जातींस वेदाधिकार, अस्पृश्योन्नति वगैरे प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडवून आर्यसंस्कृतीचें रक्षण करण्याच्या व्यापक कार्यास त्यांनीं हात घातला पाहिजे. हे प्रश्न कोणत्या प्रकारें नीट सोडवितां येतील याचा विचार पुढें केव्हां तरी करूं.

# ७ द्विजत्व आणि संध्या.

[ लेखकः—शंकर दत्तात्रेय जावडेकर, बी. ए.]

## जन्मना जायते शूद्रः संस्काराद्विज उच्यते

मनुष्याला उपनयन संस्कारानंतर द्विजत्व प्राप्त होतें, असा वरील वचनाचा अर्थ आहे; परंतु हें उपनयन म्हणजे काय आणि द्विजत्व म्हणजे काय, याचें खरें ज्ञान आज फारच थोड्यांना आहे, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. द्विज म्हणजे केवळ ब्राह्मण असा संकुचित अर्थ नसून आपल्या ज्ञानानें समाजाची मानसिक व आध्यात्मिक उन्नति करणारे ब्राह्मण, आपल्या बाहुबलानें संकटाचें निवारण करून समाजाचें संरक्षण करणारे क्षत्रिय आणि आपल्या परिश्रमानें देशाला सधन करणारे वैश्य या सर्वांचा द्विज या शब्दांत अंतर्भाव होतो. उपनयन संस्कार पूर्वी सर्व द्विजकुलोत्पन्नांना करीत असत ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. उपनयनानें द्विजत्व प्राप्त होतें, असें म्हणण्याचें कारण काय, आणि हें खरें द्विजत्व प्राप्त कोणतें आणि हें खरें द्विजत्व प्राप्त होण्याला संध्योपासनेचा कसा उपयोग होत असे, याचा विचार या लेखांत करावयाचा आहे.

द्विज या शब्दाचा धात्वर्थ दोनदां जन्मलेला असा आहे. हाच शब्द पक्ष्यांना लावण्यांत येतो व त्याचें कारण पक्षी दोनदां जन्मतात हेंच होय. मातेच्या उदरांतून बाहेर आलेल्या अंड्याची कवची फोडून पक्षी जेव्हां बाह्य जगांत प्रवेश करतो, त्यावेळीं त्याचा दुसरा जन्म होतो. अंडयांतील पक्ष्याच्या पिलांप्रमाणेंच मनुष्याचें मूल अज्ञान आणि स्वार्थ यांच्या कवचींत गुरफटलेलें असतें. अंड्यांतील पिलांचें जग म्हणजे अंडें, त्याचप्रमाणें अज्ञान मुलांचें जग म्हणजे त्याचें शरीर किंवा त्याच्या चिमुकल्या हातांनीं साडेतीन हात भरणारा त्याचा पंचमहाभूतात्मक देह. त्याचें उपनयन होऊन तो गुरुगृहीं जाईपर्यंत आपल्या भौतिक शरीराचें संरक्षण कसें करावें, याचेंच ज्ञान त्याला दिलें जातें. आपल्या आप्तेष्टांच्या वर्तनावरून आपल्या स्वतःच्या देहाची जोपासना करण्यासाठींच सर्व जग निर्माण

झालेलें आहे, अशी त्याची कल्पना झालेली असते. योग्य काल प्राप्त झाल्यावर कोंबडी ज्याप्रमाणें आपलीं अंडीं फोडून आपल्या पिलांना खऱ्या जगांत आणून सोडते, त्याचप्रमाणें प्राचीन भारतीय आर्य उपनयन संस्काराच्या रूपानें आपल्या मुलांना गुरफटून टाकणारी देहात्मभावाची कवची फोडून टाकून तात्त्विकदृष्टीला अनुभवास येणाऱ्या सच्चिदानंद-स्वरूपी विश्वांत आणून सोडीत असत. ज्याची दृष्टि विवेकाच्या प्रकाशानें पूर्णपणें फांकली, ज्याचा देहात्मभाव नष्ट होऊन सर्वव्यापी परमात्म्याशीं ज्यांचें तादात्म्य झालें, निदान तें तादात्म्य करून घेणें हेंच आपलें परमसाध्य आहे, असें समजून त्या मार्गानें जाण्याचा ज्यांनीं निश्चय केला, तें तादात्म्य प्राप्त करून घेण्यासाठीं सर्व समाजाची निरपेक्षबुद्धीनें व निःपक्षपातीपणानें सेवा करण्याचा ज्यांनीं विडा उचलला, 'मीं द्रव्यार्जन केलें, शस्त्रग्रहण केलें, किंवा विद्याध्ययन केलें,' तरी तें जनताजनार्दनासाठींच करीन अशी ज्यांची वृत्ति झाली, तेच खरे द्विज होत. याच्या उलट लहानपोराप्रमाणेंच अज्ञान आणि स्वार्थ यांच्या कवचींत जे गुरफटून राहिले, त्यांनीं लंगोटी व जानवें घातलें तरी ते शूद्रच आहेत असें मानलें पाहिजे. जो खरा द्विज बनला त्यानें द्रव्यार्जनाचा मार्ग स्वीकारून आपली राष्ट्रजननी सुवर्णालंकारांनीं मंडित करण्याचें ध्येय स्वीकारलें, किंवा आपल्या देशबांधवांच्या जीविताचें व वित्ताच्या संरक्षणाचें क्षत्रियाचें कार्य अंगिकारलें किंवा भावी पिढीला ज्ञानदान करण्याचें पुण्यकार्य अंगीकृत केलें, तरी त्याची योग्यता सारखीच आहे; कारण आध्यात्मिक दृष्टीनें मनुष्याची योग्यता ठरवितांना तो समाजाची सेवा कोणत्या प्रकारें करीत आहे, याचा विचार न करतां, ती सेवा करतांना त्याची दृष्टि स्वार्थी आहे किंवा निःस्वार्थी आहे, त्याची समाजाची भक्ति सकाम आहे किंवा निष्काम आहे, त्याचा अहंकार जागृत आहे कीं नष्ट आहे, या गोष्टींचाच विचार करावयाचा असतो. आणि या विचारानंतर जो जितका निःस्वार्थी, जितका निष्काम व जितका निरहंकार, तितकी त्याची योग्यता अधिक ठरत असते.

वरील विवेचनावरून कोणी असा मात्र आपला गैरसमज करून घेऊं नये कीं, मनुष्याला द्विजत्व प्राप्त होण्याला तो सिद्ध बनला पाहिजे, असें आमचें मत आहे. असा आमच्या म्हणण्याचा मुळींच अभिप्राय नाहीं.

मात्र जीवन्मुक्ताचें किंवा सिद्धाचें ध्येय त्यानें मान्य करून त्या दिशेनें प्रयत्न करण्याचा त्यानें निश्चय केला पाहिजे. गरुडाचें पिलूं अंड्यांतून बाहेर पडलें व आकाशांत उड्डाण करण्याचें ध्येय त्याला समजूं लागलें, म्हणजे त्याला द्विजत्व प्राप्त होतें, परंतु तासच्या तास अनंत अंतराळांत स्वैर विहार करण्याचें सामर्थ्य येण्यास त्याला पुष्कळ काळ लागतो. हीच स्थिति मानवी प्राण्याची आहे. अज्ञानाची कवची फोडून परमार्थाच्या वातावरणांत त्यानें प्रवेश केला, कीं त्याला द्विजत्व प्राप्त होतें, यानंतर या वातावरणांत उंच उंच उड्डाणें घेण्याचें सामर्थ्य त्याला क्रमाक्रमानेंच किंबहुना 'बहूनां जन्मनां अंते'ही प्राप्त होईल. पण ज्यांना म्हणून द्विज म्हणवून घ्यावयाचें असेल त्यांनीं स्वार्थाची भूमि सोडून परमार्थाच्या वातावरणांत शक्त्यनुसार उड्डाण करण्याचा अभ्यास नित्य ठेवला पाहिजे. या अभ्यासाला संध्योपासनेचा अत्यंत उपयोग होतो, म्हणून प्रत्येक द्विजानें ऊर्फ त्रैवर्णिकानें ऊर्फ निष्कामबुद्धीनें समाजसेवा करण्याचें ध्येय मान्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें संध्योपासना केली पाहिजे असा नियम आपल्या पूर्वजांनीं घालून दिलेला आहे.

ही संध्योपासना म्हणजे काय आहे व ती आपल्या आध्यात्मिक उन्नतीला कशी साधनीभूत होते, याचा विचार करूं. "यः संध्यामुपास्ते ब्रह्मैव तदुपास्ते" या श्रुतिवचनाला अनुसरून संध्योपासना ब्रह्मोपासना आहे किंवा या अनाद्यनंत विश्वाला आधारभूत आणि इंद्रियें व मन यांना अ-गोचर अशा अद्‌भुत चिच्छक्तीचें तें ध्यान आहे, असें सिद्ध होतें. ब्रह्मांडाच्या आदिकारणाचें ध्यान करून त्याच्याशीं समरस बनणें आणि सृष्टींतील चराचर भूतमात्रांचें धारणपोषण करण्याच्या त्याच्या कार्यांत निरहंकार आणि निष्काम बुद्धीनें भाग घेणें, हें मनुष्यमात्राचें परमोच्च ध्येय आहे व तें साध्य होण्यास सृष्टींतील कोणत्या तरी उदात्त, प्रचंड व मनाला आल्हादक अशा पदार्थांचें ध्यान करावें असें आपल्या पूर्वजांचें मत होतें. सूर्यास्त आणि सूर्योदय या वेळचा शांत, रम्य व गंभीर देखावा पाहून ज्याचें अंतःकरण कांहीं काळ तरी देहभान विसरून जात नाहीं, असा अभागी मनुष्य सांपडणें फार कठीण आहे. नवोदित सूर्याच्या रश्मींनीं पृथ्वी, आकाश

२८५८

आणि अंतराळ हीं व्याप्त केलीं आणि एखाद्या कुशल जादुगाराप्रमाणें विश्वाच्या भिन्न भिन्न स्वरूपाचें प्रदर्शन सवित्यानें आपल्यापुढें मांडलें म्हणजे विश्वाधारभूत अतर्क्य शक्तीचें स्मरण आपणांस होतें, आणि तिच्या विलक्षण लीलेचें कौतुक वाटूं लागतें. या अफाट विश्वाच्या अमर्याद बाह्य स्वरूपाचें अवलोकन करून आपल्या साडेतीन हात देहाचें क्षुद्रत्व आपल्या मनांत बिंबतें आणि ब्रह्माण्डाचा जो सविता किंवा त्याला प्रसवणारी जी जगज्जननी तिचें ध्यान करावें अशी सहजच इच्छा होते. गायत्रीजप करून आपण त्याच जगज्जननीचें किंवा या ब्रह्माण्डाच्या सवित्याचें ध्यान करतों. या सवित्याच्या अतुल प्रभावाची बरोबर कल्पना यावी म्हणून 'ॐ भूर्भुवः स्वः' या चार शब्दांनीं आपण प्रथम या अमर्याद विश्वाचा अनंत पसारा आपल्या मनश्चक्षूंसमोर आणिला पाहिजे. भूः म्हणजे पृथ्वी, भुवः म्हणजे अंतराळ आणि स्वः म्हणजे, अनंत कोटी ब्रह्माण्डाचा आपल्या उदरांत समावेश करणारें आकाश, हीं सर्व ॐकार-स्वरूप आहेत म्हणजे एकाच परमात्म्यानें निर्माण केलेलीं आहेत. किंवा यांतील प्रत्येक परमाणूंत तो भरलेला आहे. परमेश्वर किंवा परमात्मा हे शब्द नित्यपरिचयाचे असल्यामुळें ते उच्चारल्याबरोबर आपल्यापुढें त्याचा प्रभाव एकदम उभा रहात नाहीं म्हणून त्याचें ध्यान सुरू करण्यापूर्वी "ॐ भूर्भुवः स्वः" या चार शब्दात्मक वाक्यानें त्याच्या अतुल प्रभावाचें प्रथम स्मरण करावें असा या शब्दांचा अर्थ आहे. "तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि" त्या प्रकाशमान (देवस्य) जगत्कारणाच्या (सवितुः) जगदाधारभूत (वरेण्यं) शक्तीला किंवा तेजाला (भर्गः) आम्ही ध्यातों (धीमहि), या मंत्रानें ध्यानास प्रारंभ करावा आणि 'धियो योनः प्रचोदयात्' या शब्दांनीं तोच सविता (यः म्ह० जो) आमच्या अंतःकरणप्रवृत्ति (धियः) प्रकाशित करतो असें ध्यानांत घेऊन त्या ध्यानाची पूर्तता करावी. धीमहि या पदाचा अर्थ "धीमह्यहं सएवेति तेनैवाभेदासिद्धये" तें परब्रह्मस्वरूपच मी आहें अशा भावनेने ब्रह्माशीं आमचें ऐक्य व्हावें याकरितां, आम्ही ध्यान करतों, इतका घ्यावा; असें विद्यारण्यांनीं सांगितलेलें आहे. तात्पर्य, पारमार्थिक वातावरणांत विहार करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक द्विजाचें जे परब्रह्मप्राप्तीचें ध्येय, तें पुढें ठेवून गायत्रीजप प्रत्येकानें केला पाहिजे.

या विश्वाला दोन स्वरूपें आहेत. एक बाह्य आणि दुसरें आंतर. पृथ्वी, अंतराळ आणि आकाश या ठिकाणीं परब्रह्माचें बाह्य स्वरूप किंवा परमात्म्याचा देह आपल्या अनुभवास येतो आणि आपल्या अंतःकरणांत आत्मस्वरूपानें त्याचें अंतःस्वरूप व्यक्त झालेलें असतें. या दोन्ही स्वरूपांचें ध्यान गायत्रीमंत्रांत आहे आणि जगत्कल्याणाला आपला देह समर्पण करावयाचा आणि आपला जीवात्मा परमात्म्यांत विलीन करावयाचा, अशा निश्चयानें दररोज संध्योपासना करणाऱ्या व्यक्तीला द्विजत्व प्राप्त होत असतें.

वरील विवेचनावरून संध्योपासना आणि द्विजत्व यांचा कसा निकट संबंध आहे, हें वाचकांच्या ध्यानांत येईल अशी आशा आहे. सध्यां जो संध्यावंदनाचा लोप झालेला आहे, तो, त्यांतील रहस्य कोणास कळलं नाहीं म्हणूनच झालेला आहे असें प्रस्तुत लेखकास वाटतें. तें रहस्य माझ्या-पेक्षां अज्ञान लोकांच्या मनावर बिंबवावें याकरितांच हा लेख लिहिला आहे. प्रातःस्नान, नमस्कार आणि संध्या या प्रशस्त आचारांचें जितकें चिंतन करावें तितकी त्याची उपयुक्तता, अधिकाधिकच पटूं लागते. त्यांतील रहस्य सर्वांना पटवून देऊन सर्व वर्णांत त्यांचा प्रसार करणें, सर्वत्र पसर-लेल्या अज्ञानाच्या, अहंभावाच्या आणि द्वैतभावनेच्या मायेचा निरास करणें, हें ब्राह्मणांचें आद्य कर्तव्य आहे. केवळ ब्राह्मणवर्णाची उन्नति करणें हें ब्राह्मणांचें ध्येय नसून, सर्व समाजाची उन्नति करणें हें त्यांचें ध्येय आहे. याकरितां आपल्या पूर्वजांनीं घालून दिलेल्या निष्काम कर्मयोगाच्या ध्येयाचा आविर्भाव आपल्या अंतःकरणांत व्हावा, सर्वभूतहितार्थ सदैव झटणाऱ्या चिच्छक्तीशीं आपल्या अंतःकरणप्रवृत्ति समरस व्हाव्यात व आपल्या अंतःकरणांतील अज्ञानांधकार आत्मसूर्याच्या प्रकाशानें नष्ट व्हावा अशी भावना ठेवून प्रत्येक द्विजानें सूर्यास्ताच्या व सूर्योदयाच्या शांत, रम्य व गंभीर प्रसंगीं संधिकालच्या विविध वर्णांनीं चित्रित झालेल्या विश्वरूपी देवालयांत पर-मात्मस्वरूपी इष्टदेवतेचें ध्यान, अंतःचक्षू व चर्मचक्षू पूर्णपणें उघडे ठेवून करावें. हें ध्येय अव्यवहार्य म्हणून सोडून देणें मात्र आत्महानिकारक आहे; कारण राजकारणांत व्यवहार्य–अव्यवहार्यतेचा प्रश्न उद्भवत असला, तरी आत्मोन्नतीच्या धर्मक्षेत्रांत तो प्रश्न अप्रस्तुत आहे. या क्षेत्रांतील स्वानंद-साम्राज्याचा अधिपति होण्याचा प्रयत्न प्रत्येकानें केलाच पाहिजे.

ग्रं. या. को.

— २ —

## रसोहमप्सु कौंतेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।

—भगवद्गीता. अ० ७

Thy voice is on the rolling air,
I hear Thee where the waters run
Thou standest in the rising Sun,
And in the setting, Thou art fair.

–Tennyson.

मी आणि माझ्याभोंवतीं पसरलेल्या विश्वाचा अफाट पसारा, यांचा परस्परसंबंध काय आहे, विश्वांतील असंख्य पदार्थ आणि त्यांचे अनंत व्यापार कसे उत्पन्न होतात, या सर्वांना कांहीं आदिकारण आहे किंवा नाहीं, असल्यास त्याचें स्वरूप कसें असावें, आणि त्या आदिकारणाशीं आपला काय संबंध आहे, हे प्रश्न मनुष्याच्या मनांत उद्भवूं लागल्या-पासून खऱ्या धर्माची उत्पत्ति झालेली आहे. जीव, जगत् आणि जगदा-धारभूत शक्ति यांचा परस्परसंबंध शोधून काढणें हें धर्माचें ध्येय आहे, आणि ज्या धर्मांनीं हें ध्येय साध्य करून घेतलें तेच खरे धर्म होत. हे प्रश्न मनुष्याच्या अन्तःकरणांत प्रथम उदय पावण्यास त्याचें बाह्य सृष्टीचें व अन्तःसृष्टीचें निरीक्षणच कारण झालें, त्या निरीक्षणानेंच या प्रश्नांचें उत्तर देण्याचे त्यानें अनेक प्रयत्न केले आहेत, व कित्येक प्रसंगीं 'नेति नेति' म्हणून मोठमोठ्यांनीं हात टेकलेले आहेत. तथापि प्राचीन व अर्वाचीन तत्त्व-ज्ञान्यांनीं केलेलें हें सृष्टीचें निरक्षिण आणि भौतिक शास्त्रांनीं रासायनिक पृथक्करणादि उपायांनीं केलेलें निरीक्षण यांत महदंतर आहे. मनुष्याच्या पंचभौतिक जडदेहाचें निरीक्षण करणें आणि त्याच्या अन्तरात्म्याचें स्वरूप ओळखणें, यांत जितकें अंतर आहे, तितकेंच रसायन, भूगर्भ,पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रांनीं केलेल्या दृश्य सृष्टीच्या निरीक्षणांत आणि मोठमोठ्या ऋषींनीं, प्रतिभावान् कवींनीं किंवा बुद्धिमान् तत्त्वज्ञांनीं केलेल्या सृष्टीच्या निरी-क्षणांत अंतर आहे. या दोन प्रकारच्या निरीक्षणापासून होणाऱ्या ज्ञानाचें स्वरूपही अगदीं भिन्न आहे. विश्वाच्या बाह्य स्वरूपाचें ज्ञान झाल्यानें त्याच्यावर एक प्रकारचा ताबा आपण चालवूं शकतों अशी आपणांस

भावना होते, व आपले नित्याचे व्यवहार चालण्यास त्या ज्ञानाचा उपयोग होतो; परंतु विश्वांतर्गत परमात्म्याची आणि मनुष्याची जेव्हां दृष्टादृष्ट होते, त्यावेळीं त्याच्या सर्व वृत्ति आनंदमय होऊन त्याचें देहभान विसरतें आणि "हेंचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा" अशासारखे प्रतिभासंपन्न उद्गार त्याच्या तोंडांतून बाहेर पडतात. संध्यासमयींचा भव्य, सुंदर आणि रम्य देखावा, समुद्र, नदी किंवा एखादा तितकाच मोहक जलाशय, घनदाट अरण्यें, विस्तृत मैदानें, इत्यादींच्या निरीक्षणानें मनुष्याचा अन्तरात्मा उच्च वातावरणांत संचार करूं लागतो आणि त्याची व सृष्टीच्या अन्तरात्म्याची दृष्टादृष्ट होऊं शकते. अशाच प्रसंगीं त्याला आपल्या कर्तव्याचें स्मरण होतें आणि आपण केलेल्या पापाचा त्याला पश्चात्ताप होतो. हा पश्चात्ताप व्यक्त करण्याकरितांच तो "**ममोपात्त दुरित क्षयद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं प्रातःसंध्यामुपासिष्ये**" इत्यादि उद्गार काढतो, किंवा **इदमापः प्रवहत यत्किंच दुरितं मयि यद्वाहमभिदुद्रोह यद्वा शेप उतानृतम् ॥**" म्हणजे आपल्या अन्तःकरणांतील पापरूपी मल धुवून जावा, मनांतील द्वेष नष्ट व्हावा, असत्यानें अपवित्र झालेली आपली वाणी पवित्र व्हावी, याकरितां आपोदेवतेची तो प्रार्थना करूं लागतो; कारण उदक हें केवळ शरीर शुद्ध करूनच थांबत नाहीं; तर अंतःकरणांत पवित्र विचार जागृत करण्याचें सामर्थ्य निर्मल जलाशयांत असतें.

या ठिकाणीं कांहीं आधुनिक विद्वानांच्या मनांत उद्भवणाऱ्या शंकांचें थोडें समाधान करणें विषयांतर होणार नाहीं. वरील विवेचन थोडेंसें अलंकारिक किंवा काव्यात्मक असल्यामुळे सत्यदृष्टीनें त्यांत कांहीं तथ्य नाहीं असा आक्षेप घेण्यांत येईल. सूर्य अथवा पृथ्वी इत्यादींना देवता मानणें हें समाजाच्या प्राथमिक अवस्थेंतील वेड आहे, तेव्हां आधिभौतिक शास्त्रांच्या भरभराटीच्या काळांत आपण समाजाच्या बाल्यावस्थेस उचित असें धर्माचरण करणें हें कित्येकांना पसत पडणार नाहीं. या शंकेचें निरसन करण्यासाठीं सृष्टीकडे पाहण्याची आधिभौतिक शास्त्रांची दृष्टि कशी एकांगी आहे, आणि तिच्याकडे पाहाण्याची खरी तत्त्वदृष्टि कोणती याचें थोडें विवरण करणें अवश्य आहे. कोणताही पदार्थ पाहिला असतां, तो कोणत्या घटक द्रव्यापासून झालेला आहे, त्यापासून इतर पदार्थ कसे निर्माण करावेत किंवा

तोच पदार्थ इतरांपासून कसा निर्माण करावा या प्रश्नांचा विचार आधिभौतिक शास्त्रांत होत असतो. जड द्रव्यांचे एकमेकांवर काय परिणाम होतात हा विचार आधिभौतिक शास्त्रें करितात, परन्तु बाह्य सृष्टीच्या आपल्या अन्तःकरणावर होणाऱ्या परिणामांचा विचार त्या शास्त्रांच्या कक्षेबाहेरचा आहे. दृश्य सृष्टीला दोन स्वरूपें आहेत. तिचें एक स्वरूप रूप, रस, गन्ध, स्पर्शादि पंचगुणात्मक असून तें इंद्रियांना गोचर होतें. परन्तु तिचें दुसरें स्वरूप आपल्या अन्तरात्म्यालाच गोचर होतें. आधिभौतिक शास्त्रें सृष्टीच्या एका अंगाकडेच पाहतात. कवि सृष्टीच्या दुसऱ्या अंगाकडे पाहतो. आणि तत्त्वज्ञानी या दोन्ही दृष्टींचा पारमार्थिक दृष्टीनें मेळ घालण्याचा प्रयत्न करितो. पारमार्थिक दृष्टीनें सूर्य, पृथ्वी, आप् इत्यादि भिन्न भिन्न देवता विश्वांत नाहींत, ही गोष्ट आपल्या तत्त्वज्ञान्यांना मान्य आहे. सर्व विश्वांत एकच शक्ति असून पृथ्वी, आप्, तेज हीं त्याच एका शक्तीचीं भिन्न भिन्न स्वरूपें आहेत हा सिद्धांतही आमच्या तत्त्वज्ञानाला मान्य आहे, परन्तु ही विश्वांतील आदिशक्ति जड आहे हा सिद्धांत मात्र आम्हांला मान्य नसून ती आत्मस्वरूपी आहे, ती साभिप्राय आहे असें आम्ही समजतों. जगांतील निरनिराळ्या शक्तींना निरनिराळ्या देवता समजण्यापासून धर्माची उत्पत्ति झालेली आहे हें खरें आहे. परन्तु त्या शक्तींना देवता कां मानण्यांत आलें याचा विचार कोणीच करीत नाहीं. सृष्ट पदार्थांच्या रूप, रस, गन्ध, स्पर्शादि इंद्रियगोचर गुणांचाच विचार करणाऱ्या भौतिक शास्त्रांना सृष्टीच्या आदिकारणाचें पारमार्थिक स्वरूप कळणें शक्य नाहीं. संधिकालचा रम्य देखावा, हा आधिभौतिक दृष्टीनें ईथर नामक द्रव्यांत उद्भवणाऱ्या निरनिराळ्या लाटा आहेत, परन्तु पारमार्थिक दृष्टीनें पाहाणाऱ्या मनुष्याला त्याची किंमत याहून अधिक आहे. त्याच्या दृष्टीनें तो देखावा म्हणजे परमात्म्याचें प्रेमळ व नयनमनोहर स्वरूप आहे. पुष्पाचा सुगंध, उदकाचें माधुर्य, पक्ष्यांचें गायन, वायूची शीतलता या सर्व गोष्टी आधिभौतिक दृष्टीनें एकाच गत्यात्मक जड शक्तीवर मनुष्यानें केलेले अध्यारोप आहेत, परन्तु आध्यात्मिक दृष्टीनें एकाच आनन्दमय परब्रह्माचीं तीं व्यक्त स्वरूपें आहेत. सृष्टींतील निरनिराळ्या पदार्थांत भिन्न भिन्न देवता आहेत, असें मानणें हें अध्यात्मशास्त्राचें एक अपरिणत स्वरूप आहे. अशा भिन्न भिन्न देवता मानल्यानें सृष्टींतील व्यापा-

रांची सुसंगति लागत नाहीं, असें प्रत्ययास आल्यानंतर या देवता भिन्न नसून एकाच परमात्म्याचीं हीं भिन्न भिन्न स्वरूपें आहेत असा शोध लागला व सूर्याला भिन्न देवता मानून तिची प्रार्थना करणाऱ्या ऋषींनींच पुढें “ आसावादित्यो ब्रह्म ” असा सिद्धांत बसविला. या सिद्धांताला अनुसरूनच भगवद्गीतेंत

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।

❀ ❀ ❀

पुण्यो गंधः पृथिव्यांच तेजश्चास्मि विभावसौ ।

असें म्हटलें आहे. विश्वाची आदिशक्ति केवळ सूर्याचा प्रकाश, चन्द्राची ज्योत्स्ना किंवा पर्जन्याच्या धारा इत्यादि स्वरूपांतच व्यक्त होत असती तरी सुद्धां ती केवळ जड आहे असें आपण म्हटलें नसतें. परंतु तीच शक्ति जेव्हां बुद्धिमत्ता, नीतिमत्ता, सदयता, प्रेम, आनंद इत्यादि स्वरूपांत व्यक्त होते, तेव्हां तर ही शक्ति जड असेल अशी शंका सुद्धां शिल्लक रहात नाहीं. भगवद्गीतेंत

बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।

असें म्हटलेलें आहे, तें वाचल्यावर जगदादिकारण जड आहे, असें कोण म्हणेल ? हा परमात्मा नेहमीं आपल्या जवळ असतो, आपल्या भोंवतालच्या प्रत्येक वस्तूंत तो आहे, आपल्या शरीरापेक्षांही तो जवळ आहे, व दुर्बिणींतूनहि न दिसणाऱ्या अति दूरच्या ताऱ्यांतही तो आहे, सुवासिक पुष्पांच्या रूपानें तो आम्हांला आल्हाद देतो, उगवत्या सूर्याच्या पुण्यरश्मींनीं तो आमचें अज्ञानतम नाहींसें करितो, गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी इत्यादि नद्यांच्या सान्निध्यांत तो आपल्या अंतःकरणांत पवित्र भावना उत्पन्न करितो, पृथ्वीच्या अंगच्या आकर्षणशक्तीनें तो आम्हां सर्व भूतमात्रांस धारण करितो, हे विचार भौतिकशास्त्रांची कितीही वाढ झाली तरी अयथार्थ होणार नाहींत. विश्वाचें बाह्य स्वरूप कार्यकारणांच्या शृंखलानीं बद्ध आहे परंतु त्याचें अंतःस्वरूप पूर्णपणें मुक्त आहे, व तें आनन्दमय आहे. हीं दोन्हीं स्वरूपें एकाच वस्तूला कशी प्राप्त झालेलीं आहेत, याचा उलगडा अद्यापि कोणासही झालेला नाहीं. भौतिक शास्त्रांत

विश्वाच्या कार्यकारणांनीं बद्ध झालेल्या दृश्य स्वरूपांचाच विचार केला जातो, परंतु अध्यात्मशास्त्राला त्याच्या पलीकडे जावें लागतें व त्यांत दृश्य सृष्टीच्या बुडाशीं असणाऱ्या आत्मस्वरूपी परब्रह्माची आणि आपल्या शरीरांत कोंडून राहिलेल्या जीवात्म्याची कशी दृष्टादृष्ट होईल व त्यांचें तादात्म्य कसें होईल याचा विचार करावयाचा असतो. भौतिक शास्त्राच्या द्वैती दृष्टीनें निसर्ग हा आपला शत्रु भासतो व त्यावर प्रभुत्व स्थापन करणें, हें आपलें ध्येय आहे असें मनुष्यास वाटतें, परंतु पारमार्थिक दृष्टीनें मनुष्य आणि निसर्ग यांच्यांतील हें द्वैत केवळ दृश्य आहे आणि म्हणूनच निसर्ग मनुष्याला वश होतो. निसर्गांतील पदार्थांचे धर्म आणि शक्तींच्या व्यापारांचे नियम समजून घेऊन तदनुसार वर्तन करणाऱ्याशीं निसर्गाचें वैर नाहीं. हें ज्ञान करून घेतल्याशिवाय आळसांत व अज्ञानांत काळ कण्ठणारांचा मात्र तो वैरी आहे. निसर्गाचें जें स्वरूप कार्यकारणाच्या बंधनांनीं बांधलेलें आहे, त्यांत फेरबदल व्हावा याबद्दल प्रार्थना करणें हें मूर्खपणाचें आहे. कारण प्रत्येक भक्ताच्या प्रार्थनेप्रमाणें परमात्मा जर आपल्या बाह्य व्यापारांत फेरबदल करूं लागला तर जगतावर एक मोठी आपत्तिच येऊन कोसळेल. तथापि परमात्म्यानें चालू ठेवलेल्या संसृतीच्या खेळांत मनोभावानें भाग घेण्याची जर कोणाची इच्छा असेल तर त्याच्या अंगीं तें सामर्थ्य मात्र तो देतो. तें सामर्थ्य आपल्या अंगीं यावें या करितांच संध्यावंदनासारख्या गोष्टी करावयाच्या असतात. अर्थात् त्यांतील रहस्य समजून न घेतां केवळ औपचारिकरीत्या केल्यानें द्विजत्व प्राप्त होणें हें जें त्याचें फळ तें केव्हांही मिळणार नाहीं. सन्ध्यावन्दन हें एक अनेक बाह्य साधनाप्रमाणें साधन आहे या दृष्टीनेंच त्याच्याकडे पाहिलें पाहिजे.

"सदा सर्वदा अंतरीं कुटील। त्यानें गळा माळ घालूं नये ॥" आणि "अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ। त्याचे गळा माळ असो नसो" या दोन अभंगांत तुकाराममहाराजांनीं माळेसंबंधानें जें म्हटलें आहे तें संध्योपासनेलाहि लागू आहे, हें प्रत्येकानें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. हें ध्यानांत न ठेवतां अहोरात्र जाणूनबुजून पापकर्मांत लोळणारांनीं संध्येची चार आचमनें टाकिलीं असतां आपलें पाप धुवून जाईल अशी कल्पना करणें अत्यंत घातक आहे. या जगतांत सर्वत्र परमात्मा भरलेला आहे,

त्याला शरण जाणें हें आपलें कर्तव्य आहे, जगत्कल्याणाला आपला देह समर्पण करण्याचें सामर्थ्य अंगीं यावें अशी ज्यांना इच्छा झालेली आहे, कर्तव्यबुद्धि जागृत झाल्यामुळें आपल्याहातून घडणाऱ्या पापाबद्दल ज्यांना पश्चात्ताप होतो, त्यांना संध्योपासना साहाय्यभूत झाल्याखेरीज राहणार नाहीं, परंतु दांभिकांना ती अधिकच मोहांत पाडील हें नित्य ध्यानांत बाळगलें पाहिजे. अखेरीस "मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः" हाच नियम ध्यानांत ठेवला पाहिजे. समुद्र, नद्या, तलाव किंवा एखादा निर्झर यांच्या संनिध सायंकाळच्या प्रशांत वातावरणांत मनुष्याला परमेश्वराचें स्मरण होतें, त्याची कर्तव्यबुद्धि जागृत होते व आपल्या कर्मांचा मल धुवून जावा म्हणून तो परमेश्वरास शरण जातो, हें सामान्यतः खरें असलें तरी ही त्याची उपरति स्मशानवैराग्याप्रमाणें क्षणिकही असूं शकते. या बाबतींत श्रीकृष्णानीं उपदेशिलेला पुढील सिद्धांत नित्य ध्यानांत ठेवावा.

असंशयं महाबाहो मनोदुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येणच गृह्यते ॥

तात्पर्य, दांभिकांना जरी संध्योपासनेचा फारसा फायदा नसला तरी पृथ्वीची सर्व लोकांना धारण करण्याची शक्ति, विविध वर्णांनीं प्रकट होणारें सूर्याचें तेज, पवित्र भावना जागृत करणारें निर्मल जल, या सर्व ठिकाणीं एकच परमात्मतत्त्व भरलेलें आहे याचें स्मरण ठेवून योग्य कालीं व योग्य स्थलीं परमेश्वराचीं निरनिराळीं नांवें घेऊन दाही दिशांना नमस्कार करणाऱ्यास त्या उपासनेचा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं. दांभिकासंबंधीं "ज्याचें त्यानेंच अनहित केलें । येथें कोणाचें काय बा गेलें ॥" एवढें सांगून व जाणतेपणानें आणि शुद्ध चित्तानें संध्योपासना केल्यास ती उत्तम प्रकारें फलप्रद होते हें जाणून आमच्या तरुण पिढीनें तिचें जरूर आचरण करावें असें सुचवून हा विषय संपवितों.

# ८ ब्राह्मण आणि राजकारण.

[ संपादकीय. ]

ब्राह्मणांनीं राजकारणांत पडावें कीं नाहीं हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे व प्राचीन काळापासून त्याविषयीं उलटसुलट मतें प्रतिपादिलीं गेलीं आहेत असें महाभारत व इतर पुराणग्रंथ यांवरून दिसून येतें. ब्राह्मणी ऊर्फ आर्यसंस्कृतीचा इतिहास पाहिला तर असें आढळून येतें कीं,' भरतखंडांत 'सिंधु' नजिकच्या प्रदेशांत आर्य जेव्हां प्रथम आले तेव्हां त्यांच्यांत व्यवस्थित अशी राज्यसंस्थाहि नव्हती व सामाजिक दृष्ट्या सर्वच आर्य एक वर्णाचे म्हणजे 'ब्राह्मण' होते. परंतु पुढें त्यांची वसाहत वाढून जसजसा व्याप वाढत गेला तसतसे क्षत्रियवैश्यादि इतर वर्ण उत्पन्न होऊन पुढें कालांतरानें प्रथम कर्मसिद्ध व नंतर जन्मसिद्ध अशा अनेक जाति बनत गेल्या. वसाहतीच्या वाढीबरोबर राज्यसंस्थाहि निर्माण होऊन वाढीस लागली व त्या संस्थेचें आधिपत्य ब्राह्मणांनीं क्षत्रियांकडे दिलें. संस्कृतीचा मूलाधार असलेलें जें तत्त्वज्ञान—ब्रह्मज्ञान—त्याची जोपासना व परिपोष करण्याचें श्रेष्ठ व खडतर कर्तव्य ब्राह्मणांनीं आपणाकडे ठेवून घेऊन त्यास आवश्यक असणारी त्यागवृत्ति स्वीकारली व आपल्या वाढत्या समाजाचें धारण, पोषण आणि नियमन करण्यास आवश्यक असणारी क्षात्र, वणिक् व कृषि वृत्ति आणि तज्जन्य सुखोपभोग हीं आपणांतील निरनिराळ्या समूहाकडे—वर्गाकडे—सोंपवून दिलीं. आर्यांचा समाज अगदीं बाल्यावस्थेंत असतांना सर्वांना ब्राह्मणी पेशा बाळगून राहणें शक्य होतें. पण पुढें जसा हा समाज वाढत गेला. व त्यांत इतर समाजांचा समावेश —भेसळ—होत गेला तशी त्या समाजाचें सुखस्वास्थ्य संपादण्यास्तव त्यास निरनिराळीं बंधनें व शासनपद्धति तयार करावी लागली. मात्र त्या सर्वांची रचना त्यांनीं आपल्या, मूळच्या आर्यसंस्कृतीच्या अभिवृद्धीच्या व परिपोषाच्या दृष्टीनें केली. क्षत्रिय, वैश्य, शूद्रादि वर्णव्यवस्थाहि त्यांनीं ह्या संस्कृतीच्या रक्षणार्थ व विकासासाठींच केली. आणि जोंपर्यंत ह्या व्यवस्थे-

नुसार व्यवहार चालून आपल्या संस्कृतीचा विकास व प्रसार होत असल्याचें दिसून येई, तोंपर्यंत या संस्कृतीच्या रक्षणाची अंतिम जबाबदारी शिरावर घेणारा ब्राह्मणवर्ग सहसा आधिभौतिक व्यवहाराच्या जंजाळांत पडत नसे. आर्यसंस्कृतीच्या विकासाचा व उन्नतीचा सुमारें हजार वर्षांचा इतिहास चाळून पाहिला तर ब्राह्मणवर्गानें हा नियम बहुतेक अंशीं अबाधितपणें पाळला असें म्हणण्यास हरकत नाहीं. प्रसंगविशेषीं ब्राह्मणांनीं क्षात्रवृत्ति धारण केल्याचीं व राजकारणाचे डाव खेळल्याचीं कांहीं उदाहरणें प्राचीन व अर्वाचीन काळच्या इतिहासांत नमूद आहेत, परन्तु ते सर्व प्रसंग आपद्धर्म म्हणून घडून आलेले आहेत. कोणत्याहि संस्कृतीचा मूळ आधार त्यांतील तत्त्वज्ञानावर व धर्मभावनांवर किंबहुना धर्मसंस्कारांवर अवलंबून असतो. हें तत्त्वज्ञान अथवा ही धर्मभावना जितकी उज्ज्वल व उन्नत स्वरूपाची असेल तितकें त्या संस्कृतीचें स्थैर्य जास्त व तिचें आयुष्य अधिक असें समजावें. ही तत्त्वज्ञान व धर्मविषयक श्रेष्ठता त्या संस्कृतीच्या भौतिक अंगाच्या उत्कर्षासहि कारणीभूत होते व जोंपर्यंत त्या श्रेष्ठत्वाची जाणीव कायम राहील तोंपर्यंत भौतिक व्यवहारांत अभिवृद्धिबरोबरच विनाशात्मक अशीं जीं बीजें रुजत असतात त्यांविषयीं साक्षेपानें वागण्याचें शहाणपण अंगीं वसत असतें आणि त्या कारणानें विनाशाचा काळ दूर लोटण्यास किंवा टाळण्यास चांगली मदत होते; परंतु भौतिक व्यवहारांत जे नानाप्रकारचे मोह असतात ते अनावर–दुर्धर असल्यामुळें त्यांत लिप्त होऊन राहणाऱ्या मानवसमूहास ते केव्हां गोत्यांत आणतील याचा नियम नसतो हें जाणून त्यापासून शक्य तितकें अलिप्त राहून आपल्या संस्कृतीस प्राणभूत असलेलें तत्त्वज्ञान व धर्मभावना यांची जोपासना करण्याचें अवघड काम मुख्यत्वेंकरून ब्राह्मणांनीं आपल्याकडे घेतलें. हें त्यांनीं स्वार्थबुद्धीनें केलें असें नसून त्या कामास लागणारें नियमबद्ध आचरण व त्यागवृत्ति हीं स्वभावतःच सुखासक्त मानवी प्राण्यास दुःसाध्य असल्यामुळें इतरांना तीं दुःसह होतील व त्यामुळें त्यांनीं त्यांचा त्याग केल्यास आपल्या संस्कृतीची फार हानी होईल अशा भीतीनें त्यांनीं तें काम आपल्या शिरावर घेतलें. आपद्धर्म म्हणून कांहीं ब्राह्मणांनीं जेव्हां भौतिक व्यवहारांत प्रवेश केला तेव्हां त्यांच्या मनाचीही चलबिचल होऊन

तेहि समतोलपणा सोडून विकारवश परिस्थितीच्या ओघांत वाहवत गेल्याचीं उदाहरणें आहेत. यावरून शक्य तोंवर त्यापासून अलिप्त राहून संस्कृतिमूलाधाराचें रक्षण करण्याचेंच काम ब्राह्मणांनीं मुख्यतः करावें अशी जी मर्यादा प्राचीन काळीं घालण्यांत आली तिची युक्तताच अधिक पटणार आहे. तात्पर्य काय, कीं ब्राह्मणांनीं जी त्यागवृत्ति व धर्मतत्त्वावगाहनपरंपरा स्वीकारली तिचा मूळ हेतु आर्यसंस्कृतीचें रक्षण व प्रसार हा आहे. आर्यांचा समाज जोंपर्यंत थोडा होता तोंपर्यंत ब्राह्मणांना आपला हा हेतु केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर सिद्धीस नेतां येण्यासारखा होता. परंतु पुढें जसजसा आर्यसंस्कृतिनिविष्ट समाज वाढत गेला तसतसा ह्या संस्कृतीच्या अभिवृद्धीकरतां व रक्षणाकरतां श्रमविभाग करणें ब्राह्मणांना भाग पडलें व असा श्रमविभाग करून अत्यंत कठीण व कष्टाचें जें काम तें त्यांनीं आपणाकडे घेतलें व ऐहिक वैभवाचा उपभोग घेऊन आपल्या संस्कृतिरक्षणास मदत करण्याचें काम त्यांनीं क्षत्रिय—वैश्यादि वर्ण निर्माण करून त्यांजकडे सोंपविलें. परंतु ज्या ज्या वेळीं उन्मादामुळें, भ्रांतीमुळें किंवा दौर्बल्यामुळें हे इतर वर्ण आर्यसंस्कृतीचें रक्षण करण्यास असमर्थ होतील अथवा तिचा उच्छेद करण्यास प्रवृत्त होतील त्या वेळीं ब्राह्मणांनीं क्षत्रिय—वैश्यादिकांचीं कर्में करून समाजहित व संस्कृतिरक्षण करावें आणि समाजाची व्यवस्था व नियमन सुयंत्रित झाल्यावर योग्य अशा क्षत्रिय—वैश्यादिकांकडे तें काम पुन्हां सोपवून द्यावें व आपण स्वकर्मरत व्हावें, असाहि दण्डक प्राचीन काळच्या तत्त्वज्ञ व समाज-शास्त्रज्ञ ब्राह्मणांनीं घालून दिलेला आहे. आणि त्यास अनुसरून वेळोवेळीं थोर ब्राह्मणलोक वागतहि आले आहेत. **परशुराम, आर्यचाणक्य, रामदास, विद्यारण्य** हीं अशा प्रकारचीं ठळक उदाहरणें आहेत. पैकीं **परशुरामानें** क्षात्रवृत्ति गाजविली व बाकीच्या तिघांनीं मुत्सद्दीपणा गाजवून धर्म व संस्कृति यांचें रक्षण केलें व करविलें. अगदीं अलिकडचे काळांतील पेशव्यांचें उदाहरणहि थोड्या अंशानें वरील कोटींतलें आहे. परंतु त्यांत गुणाबरोबर दोषाचाहि अंश बराच असल्यामुळें तें वरील उदाहरणांपासून वेगळें केलें आहे. पेशवे भोगलोलुप झाल्यामुळें किंबहुना योग्य क्षत्रिय राजपुरुषाच्या अभावामुळें तसें होणें त्यांस भाग पडल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं उपरोक्त चार श्रेष्ठ पुरुषांइतकी जाज्वल्य

ब्राह्मणी वृत्ति टिकली नाहीं आणि ते इतर वर्णीयांप्रमाणेंच भोगासक्त बनले व त्यामुळेंच अखेर स्वतः नाश पावून आर्यसंस्कृतीस व समाजास संकटांत लोटून देण्यास कारणीभूत झाले. तथापि त्यांच्या क्षात्रतेजाचा उगम मात्र शुद्ध होता व तो तसा कांहीं काळ टिकलाहि. शाहूसारखा सुखासीन व दुर्बल क्षत्रिय त्यावेळीं शिवरायाच्या गादीवर नसता तर पेशव्यांना क्षात्रवृत्ति व राजकारणाचा पेशा स्वीकारण्याचें प्रयोजन क्वचितच उद्भवलें असतें. तसेंच शाहूच्या नंतर जरी सातारा अथवा कोल्हापूर येथें एखादा राजकार्यधुरंधर व तेजस्वी क्षात्रवृत्तीचा क्षत्रिय अथवा वैश्य उत्पन्न झाला असता तरीहि पेशव्यांना पुन्हां आपल्या ब्राह्मणी वृत्तीचा विचार करावा लागला असता. आर्यचाणक्याच्या चंद्रगुप्ताप्रमाणें एखादा क्षत्रिय अथवा वैश्य पेशवे अथवा त्यांचे मुत्सद्दी यांनीं तयार करावयास पाहिजे होता. पण त्यावेळच्या परिस्थितींत ती गोष्ट शक्य नसल्यामुळें म्हणा किंवा अन्य कारणानें म्हणा पेशव्यांच्या हातून तें घडलें नाहीं व औरंगजेबाप्रमाणें राज्यवैभवांतहि सावधानता, संस्कृतिरक्षणाच्या जबाबदारीची जाणीव व तत्प्रीत्यर्थ आवश्यक असणारी त्यागवृत्ति आणि निष्काम कर्मयोग्याची कर्तव्यनिष्ठा इत्यादि गुण त्यांचे ठायीं टिकले नाहींत. म्हणून आर्यसंस्कृति व आर्यांचा समाज ह्यास एका दुर्धर प्रसंगांत लोटून देण्याचें पाप त्यांस माथीं घ्यावें लागलें! ह्या गोष्टीस कारण एकटे पेशवेच झाले असें नसून इतरांचाहि त्यांत वांटा आहे. पेशवे एकटेच कारण असते व इतर शहाणे असते तर पेशव्यांच्या हातून तें पाप त्यांनीं खास होऊं दिलें नसतें. पण इतर जरी कारण असले तरी 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' या दृष्टीनें सर्व जबाबदारी पेशवे व त्यांचे भाईबंद ब्राह्मण यांजवरच येते. कारण पेशवे कर्तव्यभ्रष्ट झाल्यामुळें तत्कालीन ब्राह्मणसमाजहि कर्तव्यभ्रष्ट होऊन च्युत झाला! असो, मुख्य मुद्दा हा कीं, ब्राह्मणांना आपद्धर्म म्हणून आर्यसंस्कृतीच्या रक्षणार्थ राजकारणांत पडतां येतें; इतकेंच नव्हे तर क्षात्रवृत्तिही धारण करून राज्याच्या उलथापालथीहि करण्याचा त्यास धर्मशास्त्रदृष्ट्या अधिकार व हक्क आहे; परन्तु तो मर्यादित स्वरूपाचा आहे. आर्यधर्मावर व संस्कृतीवर संकट आले असतां त्यांच्या रक्षणाचा प्रयत्न ब्राह्मणानीं होता-होईल तोंपर्यंत आपल्या समाजांतील क्षत्रिय-वैश्य-शूद्रादिकांच्या द्वारें करावा;

परन्तु जर यांपैकीं कोणी दुर्बलतेमुळें, भ्रांतचित्तामुळें अथवा विपर्यस्त भावनेमुळें किंवा उन्मादामुळें तसें करण्यास समर्थ नसतील तर ते समर्थ होऊन कार्यप्रवृत्त होईपर्यंत ह्या संस्कृतीचें व धर्माचें रक्षण करण्याकरतां ब्राह्मणांनीं क्षात्रवृत्ति, मुत्सद्देगिरी अथवा वणिक्वृत्ति स्वीकारण्यास हरकत नाहीं; इतकेंच नव्हे तर यांपैकीं जरूर ती गोष्ट करून संस्कृतिरक्षणाचें कार्य करण्याची जबाबदारी त्यांनीं कोणाच्या रागालोभाची परवा न करतां आपल्या शिरावर घेतलीच पाहिजे. मात्र असें करीत असतां त्यांनीं लोभाविष्ट होऊन भोगरत ऊर्फ भौतिक सुखमग्न ( materialist ) होऊन राहतां कामा नये. त्यांनीं सर्व व्यवहार निष्काम कर्मयोग्याच्या वृत्तीनें केले पाहिजेत. कार्यसिद्धीकरतां किंवा कर्तव्यकर्माचरणाकरतां पाहिजे तितकें ऐश्वर्य, संपत्ति अथवा इतर साधनसामुग्री जमविण्याचा व्याप ब्राह्मणांनीं करावा; परंतु त्याचा उपयोग त्यांनीं आपली सुखलालसा किंवा भोगतृष्णा तृप्त करण्याकडे करूं नये. अशा वृत्तीनें वागून जर ब्राह्मणलोक राजकारणांत पडतील तर त्यांत त्यांचा अधःपात होण्याचा संभव नाहीं. आणि जर त्यांचा अधःपात होऊं शकला नाहीं तर कसल्याहि बिकट प्रसंगांतून आर्यसंस्कृतीचें रक्षण करण्याची कामगिरी त्यांच्या हातून पार पडल्यावांचून रहाणार नाहीं. आपल्या देशाच्या व विशेषतः महाराष्ट्राच्या सध्याच्या स्थितीचा विचार केला तर आज जरी ब्राह्मणांविरुद्ध सर्वत्र काहूर उठलेलें दिसत असलें तरी संस्कृतिरक्षणाकरतां प्रस्तुतसारख्या आपत्कालीं ब्राह्मणांनीं राजकारणांत पडल्यावांचून चालावयाचें नाहीं. आजचे क्षत्रिय—वैश्य—शूद्रादि ब्राह्मणेतर, प्रतिपक्षाच्या भेदनीतीला बळी पडून ब्राह्मणांचें उच्चाटन करण्याच्या मार्गास लागले आहेत. तें त्यांचें कार्य सिद्धीस गेलें तर ब्राह्मणेतरांच्या कपाळीं कायमचें परदास्य व गुलामगिरी हीं ठेवल्यासारखीं आहेत. याची जाणीव भेदनीतीनें भारलेल्या व तज्जन्य ब्रह्मद्वेषानें बेभान झालेल्या आजच्या ब्राह्मणेतरांस जोंपर्यंत चांगलीशी होत नाहीं तोंपर्यंत आर्यसंस्कृतीचें रक्षण करण्यास ते असमर्थ आहेत. किंबहुना ह्या संस्कृतीचे हातपाय मोडून ती लुली करण्याचे कामीं त्यांची परकीयांस नकळत मदतहि होऊं पहात आहे. अशा स्थितींत ब्राह्मणांनीं राजकारणांतून अंग काढून घेणें घातुकपणाचें होईल. राजकारण हा ब्राह्म-

णांचा धंदा नाहीं व नसावा असेंच आम्हांस वाटतें. परंतु आर्यधर्म व आर्यसंस्कृति धोक्यांत पडली असतांना जर कोणत्याहि कारणामुळें त्यांचें रक्षण इतरांच्या हातून होण्याचा संभव दिसत नसेल तर आपद्धर्म म्हणून ब्राह्मणांनीं आर्य चाणक्याप्रमाणें किंवा परशुरामाप्रमाणें राजनीतीचे डाव खेळले पाहिजेत व क्षात्रतेज गाजविलें पाहिजे. मात्र असें करीत असतां त्यांनीं आपलें ब्रह्मतेज लुप्त होऊं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे. सध्यां वाटेल तसल्या कनिष्ठ व दुय्यम प्रतीच्या सरकारी नोकऱ्या ब्राह्मण करीत आहेत व त्यामुळें ते शीलभ्रष्ट होत आहेत. हा प्रकार त्यास सर्वस्वीं अनुचित असाच आहे. असल्या नोकऱ्या राजकारणाचा भाग होऊं शकत नाहींत सबब त्यांचा मोह आजकालचे ब्राह्मणांनीं सोडून देऊन आपल्या भावी पिढीसही त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न त्यांनीं करणें जरूर आहे. राजकारण म्हणजे उदरंभरणार्थ श्ववृत्ति करावयास लावणाऱ्या वरील प्रकारच्या नोकऱ्या नव्हेत. या नोकऱ्या उदरंभरणार्थ करून परकीय सत्तेचा मार्ग निष्कंटक केल्यानें ब्राह्मणांच्या हातून महान् राष्ट्रीय पातक घडलें आहे व त्याची निष्कृति करण्याकरतां त्यांनीं त्या सोडून देऊन वाटेल ते हाल सोसण्यास तयार होणें जरूर आहे. त्यांतच राष्ट्राचा खरा फायदा असून ब्राह्मणांचें राजकारणहि त्यामुळें साधणारें आहे. परकीयांचे हातीं गेलेली शासनसत्ता जेणेंकरून स्वजनांच्या हातीं येईल असलें धोरण संभाळणें व आचरणांत आणणें यास सध्यांचें राजकारण म्हणतां येईल. हें राजकारण, इतर वर्णांचे अथवा जातीचे लोक त्यांत प्रवीण होऊन ते आपल्या संस्कृतीचे खरे पुरस्कर्ते होईपर्यंत चालविणें म्हणजे ह्या राजकारणांतील श्रेष्ठ प्रतीच्या घडामोडींत अथवा हालचालींत अवश्य तो भाग घेणें हें सध्यां ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य त्यांच्यापैकीं ज्यांना शक्य असेल त्यांनीं तें अतिशय उदात्त भावनेनें व निर्लोभ वृत्तीनें बजावलें पाहिजे. आणि जर ते खऱ्या ब्राह्मणवृत्तीची आठवण बाळगून वरील-प्रमाणें आपलें कर्तव्य बजावतील तर आज त्यांच्या संबंधानें जो निष्कारण गैरसमज व अनादर वाढत चालला आहे त्यासहि आळा पडेल आणि तेणेंकरून त्यांचा मार्गहि सुकर होईल.

वरील कर्तव्य योग्य रीतीनें बजाविलें जाण्याकरतां ब्राह्मणवर्गात सर्वत्र

ऐक्याची भावना दृढ झाली पाहिजे. कोंकणस्थ, देशस्थ, कन्हाडे, देवरुखे, सारस्वत, पळशे ऊर्फ माध्यंदिन, सवाशे, गोवर्धन, जाबाल वगैरे पंचद्रविड आणि पंचगौड विभागांतले सर्व ब्राह्मण आपसांतील भेदाभेद विसरून व्यवहारदृष्टया एकमुखी बनले पाहिजेत. ब्राह्मणांमध्यें हे जे अनेक भेद पडले आहेत ते वंशभिन्नत्वामुळें पडलेले नसून प्रादेशिक आहेत. वंशदृष्टया सर्वांचें मूळ एकच आहे. निरनिराळ्या प्रांतांतून त्यांच्या वसाहती होत गेल्या व त्यावेळीं दळणवळणाचीं साधनें अपुरीं असल्यामुळें दूरत्वामुळें त्यांचा परस्परसंबंध तुटत गेला. आणि प्रांतभिन्नत्वास अनुसरून त्यांच्या राहणींत, खाण्यापिण्यांत व बाह्य आचारांत फरक पडत गेला. परंतु धार्मिक, बौद्धिक आणि भाषेच्या ( संस्कृत ) दृष्टीनें त्यांचा एकसूत्रीपणा अद्यापिही कायम आहे. संस्कृत भाषा प्रचारांतून गेल्यामुळें भाषाभिन्नत्व कोठें कोठें उद्भवलें असलें तरी मूळ मातृभाषेचे संस्कार व तिजविषयीं आदर सर्वांच्या ठायीं सारखाच आहे. सुदैवानें सध्यांच्या युगांत दळणवळणाचीं साधनें वाढल्यामुळें सर्वांचा परस्पराशीं निकटसंबंध येऊं लागला आहे व पूर्वींची बुझालेली ओळख ताजी करून परस्पर संमीलन करण्यास उत्कृष्ट संधी प्राप्त झाली आहे. अशा वेळीं सांचलेल्या पाण्याच्या डबक्यांत उड्या मारणाऱ्या बेडकांच्या संकुचित वृत्तीचा अवलंब न करतां ह्या गतकालीन दूरत्वामुळें दुरावलेल्या भाईबंदांनीं एकमेकांचें प्रेमपुरःसर स्वागत करून व आपलें बंधुत्व ओळखून फिरून एकमेकांच्या हातांत हात घालून आपल्या संस्कृतीचें, व राष्ट्राचें रक्षण करण्यास तयार झालें पाहिजे. देशस्थांनीं कोंकणस्थांचें, कोंकणस्थांनीं देशस्थांचे अथवा इतर पोटजातींनीं एकमेकांचे दोष काढून परस्परांत असूया किंवा मत्सर माजविण्यांत आजकाल कोणाचाही फायदा नाहीं. आपण सर्वजण आज राजकीयदृष्ट्या एकाच नावेंत आहोंत. तेव्हां कोणी कोणाचे दोष न काढतां राष्ट्रकार्यास उपयोगी पडणारा ज्याचा जो गुण असेल तो घेऊन त्याच्याशीं प्रेमपूर्वक सहकार्य करावें यांतच सर्वांचें कल्याण आहे. ब्राह्मणच काय, परन्तु अनेक बाबतींत त्यांच्या बरोबरीचे असणारे कायस्थ प्रभू व शिवकालीन अस्सल मराठा क्षत्रिय घराण्यांचे वंशज, ह्यांच्याशींही दिलजमाई करून सहकार्य करणें आजच्या ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. कोंकणस्थांनीं पेशवाई गाजवून इतर ब्राह्मण

जातींवर अथवा ब्राह्मणेतरांवर जुलूम अथवा अन्याय केला या गोष्टी उकरून काढून त्यांच्याविषयीं द्वेष माजविण्यांत आज कोणाचाच खरा फायदा नाहीं. हें आम्ही कोंकणस्थांचा पुरस्कार करण्याच्या बुद्धीनें लिहितों असें कोणी समजूं नये. आम्ही स्वतः कऱ्हाडे असल्यामुळें कोंकणस्थांवर आमचें जातिविषयक विशिष्ट प्रेम असणें शक्य नाहीं. आम्हांस ब्राह्मणांतील सर्व पोटजाति सारख्याच आदरणीय व उपयुक्त वाटतात. दोष कोणांत नाहींत ? दोष सर्वांच्या ठायीं आहेत; पण त्याप्रमाणें कांहीं विशिष्ट गुणही प्रत्येक जातींत आहेत. दोषांकडे दुर्लक्ष करून सर्वांच्या ठिकाणचे गुण राष्ट्रकार्यार्थ एकत्र करण्यांतच खरें शहाणपण व मुत्सद्दीपणा आहे. कोंकणस्थांचा जुलूम अथवा अन्याय ताजा म्हणून जर लक्षांत घ्यावयाचा, तर त्यांचा एखादा ताजा गुण कां लक्षांत घेऊं नये ? अन्यायाचा व जुलमाचा आरोप यथार्थपणें त्यांचेवर कितीसा लागू पडतो हें सांगणें कठीण आहे. तथापि तो जरी गृहीत धरला तरी त्याबरोबरच हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, इंग्रजांसारख्या बलाढ्य व राजकार्यनिपुण लोकांशीं अखेरपर्यंत नेटानें टक्कर देण्याचें धारिष्ट त्यांनींच दाखविलें व आज इंग्रजांना जर कोणी आपल्या तोलाचे प्रतिस्पर्धी वाटत असतील तर ते हेच होत ! इंग्रजांपाशीं असलेलें शस्त्रबळ त्यांच्याजवळ नव्हतें म्हणून ते पराभूत झाले, परन्तु त्याखेरीज इतर सर्व बाबतींत इंग्रजांच्या तोडीस तोंड देण्याइतकी अक्कल व सामर्थ्य त्यांच्या ठायीं होतें हें खुद्द अनेक मार्मिक व तज्ञ इंग्रजांनींही कबूल केलेलें आहे ! इतिहासाकडे पाहिलें तर देशस्थ, कऱ्हाडे ब्राह्मण, प्रभू, मराठे क्षत्रिय, यांनींही राजकारण व पराक्रम हीं गाजविलीं आहेत; परन्तु कालचक्राच्या फेऱ्यानुसार ते थकल्यावर परकीयांशीं आणि तेंही इंग्रजांसारख्यांशीं तोंड देण्याची पाळी मुख्यतः कोंकणस्थांवरच आली व त्यांत त्यांनीं आपली शिकस्त करून विपरीत परिस्थिति असतां-नाही बराच काळ उत्तम टक्कर दिली व स्वातंत्र्याचा मृत्यु शक्य तितका दूर ढकलला ! अखेरीस त्यांना हार खावी लागली हें जरी खरें; तरी त्यांनीं शत्रूला आपली योग्यता पटवून दिली यांत शंका नाहीं. असल्या लोकांचा द्वेष व मत्सर करण्याचें निदान आतां तरी—कारण सध्यां ते व इतर सर्व सारखेच हतवीर्य आहेत—इतर ब्राह्मणजातीस कारण नाहीं. उलट

सर्वजण समदुःखी असल्याकारणानें सर्वांनीं एकमेकांच्या गुणांकडे पाहून त्यांचा राष्ट्रकार्यार्थ कसा उपयोग करून घेतां येईल याचें चिंतन केल्यास सर्वांचें ठायीं ऐक्याची भावना जागृत होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं. तेव्हां आज या निरनिराळ्या पोटजातींतील जे लोक विचार करण्यास समर्थ आहेत त्यांनीं अशा प्रकारचें ऐक्य सर्वांचें ठायीं घडवून आणण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करावा व सर्वांनीं मिळून एकविचारानें राजकारणांत योग्य तो भाग घ्यावा आणि आपल्या संस्कृतीचें रक्षण करावें अशी प्रार्थना करून हा लेख संपवितों.

---

## ९ ब्राह्मणसमाजाची सद्यस्थिति व ती सुधारण्याचे उपाय.

[ संपादकीय ]

ब्राह्मणसमाजाची आज काय स्थिति आहे, याचें चिकित्सक दृष्टीनें निरीक्षण केल्यास विचारी मनुष्याची बुद्धि क्षणभर स्तंभित झाल्यावांचून राहणार नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीचा विचार केल्यास भावी कालांत त्याच्यावर येणाऱ्या घोर आपत्तीचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहून चित्तवृत्ति अत्यंत प्रक्षुब्ध व खिन्न होण्याचाही संभव आहे. ब्राह्मण समाजाच्या आजच्या स्थितीचें निरीक्षण अनेक दृष्टींनीं व अनेक बाजूंनीं करतां येण्यासारखें आहे. पहिली व महत्त्वाची गोष्ट ही कीं; हा समाज मुळांतच अल्पसंख्याक असून अनेक प्रकारच्या पोटजातींनीं विभागलेला आहे. यापैकीं कांहीं पोटजातींत परस्पर द्वेष, मत्सर, अहंकार व भिन्न आचारविचार यांचा विलक्षण बुजबुजाट झाला असल्यानें ह्या रक्तशोषक कृमींकडून हा समाज हळुहळू पण परिणामकारक रीतीनें पोखरला जाऊन सत्वहीन बनला आहे व त्यामुळें त्यास क्षयाची भावना होऊं पहात आहे. क्षयरोगाचीं पूर्वलक्षणें विचारी लोकांच्या ज्ञानचक्षूंस स्पष्टपणें

दिसूं लागलीं आहेत आणि या रोगापासून जर ह्या इतिहासप्रसिद्ध, पराक्रमशाली आणि चैतन्योत्पादक समाजाचा बचाव करणें असेल तर त्याच्या स्थूल शरीरांतील रक्तशोषण करणारे हे कृमि नाहींसे करण्याचा चिकाटीनें प्रयत्न करणें जरूर आहे. ब्राह्मणसमाजांत जर खरी विचारजागृति सुरू झाली असेल अथवा होईल व भोंवतालच्या परिस्थितीची जर त्यास बरोबर जाणीव होईल तर हें पोटजातीचें चिघळत जाणारें खांडूक कापून काढून त्यांतील दूषित झालेलें रक्त व पु यांचा निःपात करून त्या समाजाचे ठायीं एकात्मकतेचें ताजें व जोमदार रक्त खेळण्याचा मार्ग खुला करून देण्यास तो समाज तेव्हांच तयार होईल यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु आजच्या स्थितींत अशा प्रकारची जागृति व जाणीव या समाजांत कशी व कितपत होण्याचा संभव आहे, हीच काय ती विचाराची बाब आहे. पोटजातींचा प्रश्न बाजूस ठेऊन सर्व प्रकारच्या ब्राह्मणांचा एक गट कल्पून त्याचें जर वर्गीकरण करूं म्हटलें तर तें दोन प्रकारांनीं करतां येईल. एक स्थितिदर्शक व दुसरें स्थलदर्शक. स्थितिदर्शक प्रकारांत (१) सुशिक्षित–प्रज्ञावान्–(२)अशिक्षित ऊर्फ जातिमात्र ब्राह्मण. असे दोन भेद करावे लागतील. व स्थलदर्शक प्रकारांत (१) खेड्यापाड्यांतील ब्राह्मण, (२) शहरांतील ब्राह्मण असे भेद करावे लागतील. शिवाय आर्थिकदृष्ट्याही त्यांचें निराळें वर्गीकरण करून (१) श्रीमंत, (२) मध्यम स्थितींतले व (३) दरिद्री असे आणखी तीन भेद करणें जरूर आहे. ह्या सर्व तऱ्हेच्या ब्राह्मण लोकांची मनोरचना आज कोणत्या प्रकारची आहे व परिस्थितीची आणि समाजाच्या भावी स्थितीच्या अंदाजाची जाणीव कोणकोणाचे ठायीं कितपत उत्पन्न झाली आहे अथवा होण्याचा संभव आहे याचा आतां क्रमानें थोडक्यांत विचार करूं.

सुशिक्षित ब्राह्मणांत आणखी तीन पोटभेद आहेत. एक प्राच्य विद्याविशारद व आर्यसंस्कृतीचा पूर्ण अभिमानी. यास आपण सोईकरितां कट्टा पुराणाभिमानी किंवा पुराणमतवादी असें म्हणूं. दुसरा पाश्चात्यविद्यासंपन्न व पाश्चात्य संस्कृतीचा पुरस्कर्ता आणि त्या अनुरोधानें आपल्या समाजाची पुनर्घटना करूं पाहाणारा. यास आपण नवमतवादी सुधारक म्हणूं. तिसरा भेद या दोन्ही संस्कृतींचें व विद्येचें प्रमाणबद्ध ज्ञान संपादून परि-

स्थितीस अनुसरून परन्तु पूर्वपरंपरा न सोडतां 'देवाण' 'घेवाण' या पद्धतीनें दोहोंचाही मिलाफ करूं इच्छिणाऱ्या किंवा आर्यसंस्कृतीचें वैशिष्ट्य राखून पाश्चात्यसंस्कृतींतला जरूर तो भाग आपल्या संस्कृतींत समाविष्ट करूं पाहणाऱ्या लोकांचा: यास अभिजात सुधारक असें नांव देण्यास हरकत नाहीं. पुराणमतवादी व अभिजात सुधारक ह्या दोन प्रकारच्या लोकांमध्यें गृहस्थ व भिक्षुक अथवा पुरोहित असे आणखी दोन भेद लक्षांत घेणें जरूर आहे. पैकीं पुराणमतवादी लोक सामान्यतः अद्यापही पूर्ण एकांगीं, रूढिबद्ध व परिस्थितीविषयीं अज्ञ किंवा जाणूनबुजून बेफिकीर आहेत. यांस कांहीं थोडे अपवाद कोठें सांपडतील; परंतु ते हा मुख्य नियम सिद्ध करण्यापुरतेच होत, हें नुकतेंच काशीस भरलेल्या हिंदू महासभेच्या अधिवेशनावरून कोणाच्याही सहज लक्षांत येण्याजोगें आहे. त्यामुळें ब्राह्मणसमाजांतला बराचसा बुद्धिमान् वर्ग त्या समाजाच्या प्रगतीस निरुपयोगी होऊन राहिला आहे; तथापि हा वर्ग उपेक्षणीय नसल्यामुळें त्याच्या ठायीं परिस्थितीची व तदनुसार प्रगतीच्या अवश्यकतेची जाणीव उत्पन्न होणें जरूर आहे. हें कार्य करण्यास नवमतवादी सुधारकांचा वर्ग निरुपयोगी आहे. हा वर्ग एक दृष्टीनें ब्राह्मणसमाजाचा व आर्यसंस्कृतीचा अंतःशत्रु होऊं पहात आहे. आर्यसंस्कृतिनिविष्ट समाजव्यवस्था ह्यास नकोशी वाटते व वर्णभेद आणि जातिभेद मोडून सर्वत्र संकर करून एकवर्णीय समाजव्यवस्था ( पश्चात्यांच्या धर्तीवर ) करावी हें याचें सामाजिक ध्येय असून याची प्रवृत्ति पश्चात्यांप्रमाणेंच भौतिक सुखाकडे विशेष आहे. त्यामुळें ते धर्मलंड व नास्तिक होऊं पहात आहेत. ह्या लोकांतही तारतम्यभावाचा फरक आहे आणि अगदीं शेवटच्या टोकास गेलेले लोक फारच थोडे आहेत. परंतु सामान्यतः हा वर्ग बुद्धिमान् लोकांचा असल्यामुळें त्याच्याशीं सामोपचारानें बुद्धिवाद करून मिळतें घेतल्यास त्यांतील बरेच लोक आर्यसंस्कृतीच्या कक्षेंत राहूं शकतील व तिचा अभिमानही धरतील. डॉ॰ केतकरांसारखे किंवा प्रो॰ भाटयांसारखे संकरविवाह करणारे किंवा मिश्रविवाहाचा पुरस्कार करणारे कांहीं थोडे लोक सोडून दिले तर या वर्गांतील बहुतेक लोक अद्याप ब्राह्मणी रक्त शुद्ध ठेवण्याकडे कल असणारे असेच आहेत व जोंपर्यंत

त्यांची ही प्रवृत्ति चळली नाहीं तोंपर्यंत ब्राह्मणसमाज परिस्थितीस अनुसरून झपाट्यानें प्रगतीपर बनत असल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आल्यास ते तसेच रहातील यांत शंका नाहीं. **पुराणमतवाद्यांची** मंदगति ही त्यांच्या मनोवृत्ति क्षुब्ध करण्यास कारणीभूत होते. ही आपत्ति दूर करण्याचें काम **अभिजात सुधारक** नामक मधला वर्ग करूं शकेल; परंतु दुर्दैवानें अद्याप हा वर्ग अल्पसंख्याक असून पाहिजे तितका कार्यक्षम बनलेला नाहीं. **पुराणमतवादी** व **नवमतवादी सुधारक** या दोघांच्याही प्रेमास व आदरास पात्र होण्याची संभाव्यता ह्या मधल्या वर्गाचे ठायीं संभवते, आणि त्या वर्गांतील प्रामाणिक, निस्पृह व कर्तबगार लोक जर मनांत आणतील तर वरील दोन्ही वर्गांचें समाधान करून ब्राह्मणसंघटनेचें कार्य करूं शकतील. मात्र वरील दोन वर्गांनीं थोडी गुणग्राहकता व समाजनिष्ठा व्यक्त करण्यास तयार झालें पाहिजे. हें जर त्यांच्याकडून होणार नाहीं तर **अभिजात सुधारकांचे** प्रयत्न ढिले पडतील व मग ब्राह्मण समाजाच्या विस्कळीतपणास व तज्जन्य दुर्दशेस पारावार उरणार नाहीं. आजच्या स्थितींत हे दोन्ही वर्ग आपापल्या दुराग्रहास चिकटून आहेत. अशिक्षित ऊर्फ जातिमात्र ब्राह्मणांची संख्या बरीच मोठी असून दिवसानु दिवस ती वाढत आहे. कनिष्ठ प्रकारची नोकरी व धंदे अथवा क्षुद्र प्रकारची भिक्षुकी करून हा वर्ग आपल्या आयुष्याचा काळ कंठित असल्यामुळें खालावलेल्या व हीन स्थितीस पोंचलेल्या समाजांत उत्पन्न होणारे अनेक दुर्गुण--अंतःकलहप्रियता, स्वार्थलंपटता, दुर्बलता, भ्याडपणा, हलकटपणा, आचारभ्रष्टता, अनीति वगैरे--ह्या वर्गांत कळसास पोंचले आहेत व सुशिक्षित ब्राह्मणवर्गानें यांचें नियंत्रण करण्याची व त्यांस सुधारण्याची जर लवकर कांहींतरी तजवीज केली नाहीं तर ह्या वर्गांतील बहुतेक लोक ब्राह्मणत्वापासून च्युत होऊन ब्राह्मण समाजास पारखे होतील ! खेड्यापाड्यांतील ब्राह्मणवर्गांत याच प्रकारच्या लोकांचा भरणा फार आहे आणि त्यामुळेंच ब्राह्मणेतरांच्या व सत्यशोधकांच्या अविवेकी व अत्याचारप्रवण चळवळीचें बीं शहरांपेक्षां खेड्यांत विशेष रुजतें. खरें पाहिलें तर खेड्यापाड्यांत अल्प प्रमाणांत वस्ती करून राहिलेले हे ब्राह्मण पूर्वकालीन आर्यसंस्कृतीचे प्रचारक व प्रतिनिधी यांचे वंशज असल्यामुळें त्यांची योग्यता व महत्त्व हीं

फार थोर आहेत व त्यांचेवरील जबाबदारीही मोठी आहे; परंतु या गोष्टीची जाणीव आज त्यांच्यापैकीं बहुधा कोणासच राहिलेली दिसत नाहीं. त्यांना तर राहोच; पण त्यांच्याहून शहाणे व समंजस समजल्या जाणाऱ्या शहरांतील विद्वान् ब्राह्मणांसही याची कितपत जाणीव असेल हें सांगणें कठीण आहे. शहरांतील विद्वान्, सुखवस्तु व विचार करण्यास समर्थ असणारे ब्राह्मण आपल्या समाजाच्या एकंदर स्थितीविषयीं अत्यंत बेफिकीर व उदासीन आहेत व कांहीं तर पोकळ घमेंडींत चूर आहेत! ब्राह्मण्याचा अथवा ब्राह्मणजातीचा सामुदायिक हिताच्या दृष्टीनें अभिमान बाळगण्याची आवश्यकता त्यांना वाटत आहे असें त्यांच्या आचार–विचारांवरून मुळींच दिसून येत नाहीं. व्यक्ति, कुटुंब किंवा फार तर आपली विशिष्ट जात अथवा पोटजात यांच्या स्वार्थापलीकडे त्यांची सामाजिक दृष्टि पोंचत नाहीं. कांहीं विश्वबंधुत्वाच्या अशक्य व अव्यवहार्य कल्पनेच्या नादीं लागल्यामुळें व कांहीं संकुचित बुद्धीच्या आणि आपल्यापुरतेंच पाहण्याच्या प्रवृत्तीस बळी पडल्यामुळें ब्राह्मणसमाजावर व ब्राह्मण्यावर होत असलेल्या हल्ल्यांकडे त्यांचें लक्ष लागत नाहीं व लागलें तर त्याचा सांगोपांग विचार करून उपाययोजना करण्याइतकें त्यांचें मन त्या विषयांत गुंतत नाहीं. यामुळें ब्राह्मणवर्गाची अधोगति दिवसानुदिवस अधिकाधिक वाढत चालली आहे. आज खरा निकृष्टावस्थेस पोंचलेला ( dipressed ) जर महाराष्ट्रांत कोणता एखादा वर्ग असेल तर तो ब्राह्मणवर्ग होय. जो वर्ग एके काळीं श्रेष्ठपणाच्या व उन्नतीच्या शिखरावर जाऊन पोंचला होता तो आज वाटेल त्या कनिष्ठ प्रतीच्या लोकांकडून लाथाडला जाण्याची पाळी यावी, यापरती आणखी लज्जास्पद ती कोणती गोष्ट असेल? ही स्थिति बदलावयाची व आपलें पूर्वीचें महत्त्व कायम राखावयाचें असें जर ब्राह्मणसमाजास वाटत असेल तर त्यानें इतःपर उदासीन व बेफिकीर राहून चालणार नाहीं. आपण कोणत्या परिस्थितीनें घेरलों आहों, कोणत्या संकटाची छाया आपल्या समाजावर पडली आहे, यांचें आस्थापूर्वक व चिकित्सक पद्धतीनें निरीक्षण करून त्यावर कोणती मात्रा अथवा तोडगा लागू पडेल याचें विवेकपूर्ण चिंतन करणें जरूर आहे. नुसतें चिंतनच करून भागणार नाहीं, तर चिंतनांत निश्चित झालेले उपाय ताबडतोब अंमलांत आणण्याची

तयारी करावयास पाहिजे. ब्राह्मणसमाजांत आज जे दरिद्री व अशिक्षित किंवा असंस्कृत लोक आहेत त्यांच्या हातून हें काम होणें नाहीं. त्या समाजांत आज जे संपन्न, विचारी, विद्वान् ऊर्फ सुसंस्कृत लोक आहेत त्यांचें हें काम आहे. व त्यांनीं मनावर घेतल्यास तें होणें दुरापास्त नाहीं. परन्तु खेदाची गोष्ट ही कीं, यापैकीं पुष्कळ लोकांना अद्याप ह्या विषयाकडे लक्ष देण्याची इच्छाच होत नाहीं. ब्राह्मण संस्थानिक, जहागिरदार, बडे व्यापारी व श्रीमान् लोक हे आपल्याच वैभवांत गुंग आहेत; पण बिचाऱ्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, ब्राह्मणसमाजाचा एकसारखा ऱ्हास होत गेल्यास त्यांनाही अखेर ब्राह्मणेतरांच्या हल्ल्यास बळी पडून आपल्या वैभवास मुकण्याचा एक दिवस लवकरच येईल! **भवितव्यतेवर नजर देऊन अविवेकी व खुशालचंदाप्रमाणें आयुष्यक्रम चालविल्यानें तो दिवस टळणार नाहीं.** तो टाळावयाचा असेल तर आतांपासूनच सावध होऊन ब्राह्मणसमाजाच्या पुनर्घटनेचें कार्य करण्यास त्यांनीं स्वतः पुढाकार घेऊन तयार व्हावें किंवा जे हें कार्य करण्यास प्रवृत्त होतील त्यांस **मनोभावेंकरून** हरएक प्रकारचें सहाय्य करावें; परंतु या लोकांचे ठायीं सध्यां तरी अशा प्रकारची बुद्धि वसत नाहीं असें मोठ्या कष्टानें व अनुभवानें म्हणावें लागतें. आणि जोंपर्यंत अशी स्थिति आहे तोंपर्यंत हें कार्य ब्राह्मणवर्गांतील मध्यम स्थितींतल्या विचारी, सुसंस्कृत व कर्तबगार लोकांनीं स्वार्थत्यागपूर्वक करणें जरूर आहे. ह्या वर्गांतील लोकांमध्यें ह्या कार्याविषयीं बरीचशी जाणीव उत्पन्न झालेली आहे व त्यामुळें तें करण्याचा उत्साह व पात्रता हीं त्यांच्या ठायीं उत्पन्न होण्याचा संभव आहे.

आमच्या समजुतीप्रमाणें हें कार्य सिद्धीस नेण्यास पुढील उपाय योजणें जरूर आहेः—

(१) ब्राह्मणवर्गांतील भिन्न-भिन्न जातींतल्या विचारी, सुवृत्त, उद्योगी, समंजस व उत्साही कार्यकर्त्या लोकांनीं पुढें होऊन अखिल ब्राह्मणसमाजाच्या उन्नतिकरितां व हितसंरक्षणाकरितां आपसांतील भेदाभेद बाजूस सारून एक ब्राह्मण संघ निर्माण करावा.

(२) ब्राह्मणसमाजाची धार्मिक, सामाजिक व आर्थिक स्थिति आज कोणत्या प्रकारची आहे, याचा बारकाईनें शोध करून ती सुधारण्याचे उपाय सुचविण्यास व ते अमलांत आणण्याचा उपक्रम करण्यास कार्यक्षम लोकांचें एक अधिकृत मंडळ सदर संघानें नेमावें.

(३) बेटीव्यवहार खेरीज करून इतर सर्व बाबतींत ब्राह्मणांतील निरनिराळ्या जातींत एकरूपता उत्पन्न व्हावी म्हणून सर्वांस सारखी लागू पडेल अशी सुलभ आचारपरंपरा व शिस्त कालमानास अनुसरून उत्पन्न करण्यांत यावी व त्याचें परिपालन केलें जाईल अशी तजवीज व्हावी. तसेंच संघाचें एक विशिष्ट ध्येय (Creed) ही ठरविण्यांत यावें. हें ध्येय आणि त्यास अनुरूप अशी वरील विशिष्ट आचारपरंपरा व शिस्त जे पाळतील त्यांचाच संघांत समावेश करावा व अशांची संख्या वाढविण्याचे प्रयत्न संघाच्या कार्यकारी मंडळानें करावेत.

(४) ब्राह्मणांचें ब्राह्मण्य, व परंपरागत कर्तव्यकर्मे यांचें हल्लींच्या परिस्थितींत कोणतें किती प्रमाणांत रूपांतर करणें जरूर आहे; तसेंच समाजसेवा व समाजनियंत्रण हीं कर्मे ब्राह्मणांच्या हातून होण्यास त्यांस कोणत्या प्रकारचें शिक्षण देणें जरूर आहे व त्याची काय व्यवस्था करावी, इत्यादि बाबींचा निर्णय करून निरनिराळ्या व्यवसायांत व राष्ट्रसेवेच्या निरनिराळ्या शाखेंत ज्या ज्या गुणांची आवश्यकता असेल त्या त्या गुणांनीं मंडित असलेले ब्राह्मण तयार करणें व तद्विरुद्ध गुण असणाऱ्या ब्राह्मणांची ब्राह्मणसमाजांतून हकालपट्टी करणें हें अवघड व नाजूक कार्यही सदर संघास करावें लागेल व तें त्यानें न्यायनिष्ठुरपणानें केलें पाहिजे. हल्लीं समाजांत भिक्षुक अथवा धर्मप्रचारक या नात्यानें वावरत असलेले बहुतेक ब्राह्मण त्या पेशास नालायक असे असल्यामुळें ब्राह्मणांची व ब्राह्मणी धर्माची बेअब्रू होत आहे. तसेंच गृहस्थाश्रमांतील कनिष्ठ प्रतीच्या ब्राह्मणांच्या आचार व शीलभ्रष्टतेमुळेंही ब्राह्मणजातीचा बोजवारा उडून तिजविषयीं लोकांचे मनांत अनादर किंबहुना द्वेष व तिरस्कार उत्पन्न होऊं लागला आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या लोकांतले ठळक दोष काढून टाकून ते खऱ्या ब्राह्मण्याची परंपरा—अर्थात् परिस्थितीनुरूप—जागृत ठेऊं शकतील असें केलें पाहिजे.

(५) ब्राह्मणसमाजाची वरील प्रकारें अंतर्गत सुधारणा झाली म्हणजे ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद आपोआप बंद होईल; परंतु तोंपर्यंत त्या वादांत टिकाव धरून राहण्यास आवश्यक अशा गोष्टी म्हणजे परस्पर–सहाय्य, सहानुभूति, धारिष्टानें संकटांस तोंड देण्याची व कष्ट सोसण्याची तयारी, सर्वांनीं एकजुटीनें आणि शिस्तीनें चालण्याची आवश्यकता, इत्यादींचें शिक्षण ठिकठिकाणच्या ब्राह्मण लोकांस देणें जरूर आहे. ब्राह्मणेतरांच्या द्वेषमूलक व अत्याचारी चळवळीचे अनिष्ट परिणाम खेडयांतील ब्राह्मणांवर विशेष रीतीनें घडून येतात. त्यापासून त्यांचें रक्षण करण्याची जबाबदारी शहरांतील सुविद्य, संपन्न व वजनदार ब्राह्मणांनीं आपल्या शिरावर घेतली पाहिजे. परंतु दुर्दैवानें या लोकांस खेड्यांतील परिस्थितीची असावी तशी जाणीव नसते व ती करून घेण्याची प्रवृत्तीही त्यांचे ठायीं फारशी आढळून येत नाहीं. यामुळें शहरांतील ब्राह्मण लोक खेड्यांतील ब्राह्मणांविषयीं अगदीं उदासीन राहतात. जणूं काय त्यांचा व यांचा संबंधच नाहीं! परंतु समाज-शास्त्रदृष्टया ही मोठी चूक आहे. खेड्यांतील ब्राह्मण नष्ट झाल्यास शहरांतील ब्राह्मणांचें वर्चस्व कमी होऊन तेही धुळीस मिळण्याच्या मार्गास लागण्यास फारसा वेळ लागणार नाहीं; पण या गोष्टीची त्यांस जाणीवच होत नाहीं. ही आपत्ति दूर करून खेड्यांतील व शहरांतील ब्राह्मणांस परस्पर सहानुभूतीच्या दुव्यानें जोडण्यास वरील प्रकारचा संघ विशेष उपयुक्त होईल. अशा रीतीनें कांहींतरी निश्चित स्वरूपाची व सुव्यवस्थित अशी संघटना केल्यावांचून भावी कालांत ब्राह्मणसमाजाची धडगत दिसत नाहीं. याचा प्रत्येक विचारवान् ब्राह्मणानें नीट विचार करावा, असें सुचवून लेखणी खालीं ठेवितों.

---

# १० ब्राह्मण्य म्हणजे काय ?

( लेखकः—महादेवशास्त्री दिवेकर, वांई.)

भरतखंडाच्या प्राचीन इतिहासास वेदापासून सुरुवात होते. वेद हें जगांतील अत्यंत प्राचीन वाङ्मय होय. वेदामध्यें यज्ञसंस्था आहे. यज्ञसंस्थेचा इतिहास पाहिला तर त्यांतही ब्राह्मण्याचें महत्त्व आढळतें. वेदकाल, स्मृतिकाल, पौराणकाल, आणि त्या नंतरचा आज तागायतपर्यंतचा काल पाहिला तर असा सिद्धांत निघतो कीं, भरतखंडाच्या इतिहासांत पुष्कळ दिवसांपासून ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व आहे. निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या संस्कृतींचे तडाखे बसले व बसत आहेत तरी ब्राह्मण हे आपलेपणानें जिवंत आहेतच. समाजांतील हें ब्राह्मणांचें श्रेष्ठस्थान पटकवावें म्हणून आजपर्यंत पुष्कळांचे प्रयत्न झाले. परंतु त्याचा कांहीं उपयोग झालासा दिसत नाहीं. अविच्छिन्न परंपरेनें जी ही ब्राह्मणसंस्था इतके दिवस टिकली तिच्या कारणांची मिमांसा या लेखांत करावयाची आहे.

ब्राह्मण हा वर्ण कीं ब्राह्मण ही जात, असा एक प्रश्न नेहमीं उपस्थित होतो. आम्हीं प्रथमच स्पष्ट सांगतों कीं, वर्ण आणि जात या उभयतांमध्यें महदंतर आहे. चातुर्वर्ण्याच्या दृष्टीनें "गुणकर्म विभागशः" ब्राह्मणवर्गाची उत्पत्ति झाली. परंतु वर्णकर्तव्याविरुद्ध गुणकर्मे दिसूं लागलीं तरी जेव्हां त्या व्यक्तीचें ह्या वर्णांतच समावेशन होऊं लागलें तेव्हांच जन्माला म्हणजे जातीला महत्त्व आलें असावें. चातुर्वर्ण्य हें जन्मावर कां गुणकर्मांवर अवलंबून आहे असा प्रश्न केल्यास त्याला असें उत्तर देतां येईल कीं, चातुर्वर्ण्य हें दोहींच्या तोंडमिळवणीवर अवलंबून आहे. इतकेंच नव्हे, तर अव्यवस्थित समाजांत व्यवस्था उत्पन्न करण्याकरितां पहिल्यानें गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें जातें. वर्णविशिष्ट कर्तव्य आणि वर्णविशिष्ट गुण आनुवंशिक पद्धतीनें अंगीं मुरावे म्हणून पुढें जन्माला महत्त्व येतें. असो. हा अवांतर विषय येथें काढण्याचें कारण ब्राह्मणवर्ण किंवा ब्राह्मणजात या दोहोंच्या कर्तबगारीनें जी एक ब्राह्मणसंस्था उत्पन्न झालेली आहे, तिचाच आम्हांस विचार करावयाचा आहे.

ब्राह्मण कोणाला म्हणावें ? ब्राह्मण्याची व्याख्या काय ? कारण 'ब्रह्मविद् ब्राह्मणः स्मृतः' अशाप्रकारच्चीं कांहीं ब्रह्मनिष्ठांना उद्देशून वाक्यें आढळतात, तर प्रत्येक गांवढळ मनुष्याच्या तोंडीं "ब्रह्मजानाति" तो ब्राह्मण, असें एक वेडेंवांकडें सुभाषित असतेंच. परंतु ब्रह्मनिष्ठांची उठाठेव करण्याचें व्यावहारिक लोकास प्रयोजन नाहीं. ब्राह्मणांचे अंगीं कोणते गुण पाहिजेत, त्यांनीं कर्म, समाज, संस्कृति, या दृष्टीनें कोणकोणतीं कर्तव्यें केलीं पाहिजेत, त्यांचा त्याग, त्यांची विद्या इत्यादि प्रश्नांचा विचार करणें हें ब्राह्मणांचेंच कर्तव्य आहे.

आजच्या व्यवहाराच्या दृष्टीनें ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जो जन्माला आला तो ब्राह्मण; अशीच व्याख्या केली पाहिजे. हा जातिब्राह्मण आजसुद्धां समाजाचें केंद्र आहे. मुसलमान व इंग्रज आणि पूर्वीं बौद्ध यांनीं हें केंद्रस्थान हिरावून घेण्याचे प्रयत्न केले; पण अद्याप ते यशस्वी झालेले नाहींत.

आमच्या मतें सहज ज्ञानलालसा, सहज वैराग्यशीलता, आणि सहज आचारसंपन्नता हे ब्राह्मणाचे गुण आहेत. यालाच आम्ही ब्राह्मण्य असें समजतों. जातिविशिष्ट ब्राह्मणांना या गुणांची ओळख असल्याचें दिसत नाहीं; म्हणून आतां ब्राह्मण्याचें विवेचन करूं.

ठिकठिकाणीं जें ब्राह्मणांचें आणि ब्राह्मण्याचें वर्णन आलें आहे, त्यावरून ज्ञान हा ब्राह्मणांचा मोठा गुण असल्याचें आढळतें. ब्राह्मणांचें डोकें हें नेहमीं ज्ञानाचाच विचार करीत असतें. शूद्र शारीरिक सेवेनें, वैश्य आर्थिक सेवेनें, क्षत्रिय राजसत्तेच्या सेवेनें स्वतःला धन्य मानतो; परंतु ब्राह्मणाला या तिन्हींमध्यें समाधान वाटणार नाहीं. कांहीं तरी ज्ञानदृष्ट्या बौद्धिक सेवा करावी अशीच मनःस्थिति त्याची असते. समाजांतील विचार आणि भावना ह्यांची शुद्धाशुद्धता शोधण्याची ब्राह्मणास संवय असल्यामुळें त्यांस योग्य प्रकारचें कसें वळण लावावें याची चिंता ब्राह्मण करीत असतो.

तपो विद्या च विप्रस्य निःश्रेयसकरं परम् ।
तपसा किल्बिषं हन्ति विद्ययामृतमुच्यते ॥—मनु.
विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यं क्षत्रियाणांतु वीर्यतः ।
वैश्यानां धान्य धनतः शूद्राणामेव जन्मतः ॥—मनु.

या मनुस्मृतींतील श्लोकावरून ब्राह्मण आणि ज्ञान, ब्राह्मण आणि विद्या यांचा कसा संबंध आहे याची चांगली कल्पना येते. विश्वविद्यालयाची पदवी पटकावणारा विद्यार्थी हा जसा क्रमाक्रमानें एकेक ईयत्ता पास होत होत वर आलेला असतो, त्याप्रमाणें शौद्र, वैश्य आणि क्षात्र या सर्व वृत्ति पचवीत पचवीतच ब्राह्मणाला वर यावें लागतें. केल्या सवरल्या अनुभवी माणसाची जशी व्यवहारांत प्रतिष्ठा असते, तशीच प्रतिष्ठा इतर वृत्तींतून वर आलेल्या आणि केवळ ज्ञानरूप झालेल्या ब्राह्मणाची असावयास पाहिजे; पण ब्राह्मण जेव्हां सहजज्ञानलालसेपासून च्युत होऊन खालच्या क्षेत्रांत उतरतो तेव्हां शौद्र, वैश्य वगैरे वृत्ति त्यानें पचविल्या नाहींत, असाच अर्थ होतो. जातिब्राह्मण हा शूद्राप्रमाणें साधुसंतांच्या वचनांवर विश्वास ठेवून भजनानंदांत निमग्न होत चालला. विहिरी, पाणपोया, धर्मशाळा वगैरे बांधून वैश्याप्रमाणें आर्थिक सेवेंत कृतार्थता मानूं लागला, म्हणजे त्याची ब्राह्मण्यापासून च्युति झाली असें सहजच ठरतें. आतां दुसरा गुण जो सहजवैराग्यशीलता तिकडे वळूं.

श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलेलें शम, दम, तप, शौच हे गुण म्हणजेच वैराग्य होय. हा विषयविराग, जो जो ब्राह्मण असेल त्याच्या ठिकाणीं छायेप्रमाणें असला पाहिजे. हा जर नसेल तर ब्राह्मणाच्या हातून विद्यादान, न्यायदान, धर्माधर्मविचार आणि समाजनियमन हीं कोणतींही कामें होणार नाहींत. मनुस्मृतीमध्यें राग-द्वेष--शून्य विद्वानांनीं ज्याचें हृदयापासून सेवन केलेलें आहे तो धर्म; असें जें दुसऱ्या अध्यायाच्या प्रारंभीं म्हटलें आहे, त्यांतील तत्त्व हेंच होय. विषयाबद्दल सहजप्रेम प्रत्येक मनुष्याच्या ठिकाणीं असतें; परंतु ब्राह्मण जर विषयलोलुप होऊन मोहग्रस्त झाला तर त्याचें ब्राह्मण्य तें काय राहिलें? शूद्र हा दरिद्री असल्यामुळें विषयाबद्दल नेहमीं बुभुक्षित असतो. वैश्य हा द्रव्याच्या जोरावर पाहिजे तो विषयोपभोग घेऊं शकतो; क्षत्रियाला विषयोपभोगापेक्षां राजसत्तेचें महत्त्व अधिक वाटतें. अर्थात् त्या सत्तेच्या पायीं तो प्रसंगीं सर्व सुखावर लाथ मारतो. ब्राह्मण हा सर्वांच्या पलीकडचा असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं शूद्राप्रमाणें आणि वैश्याप्रमाणें विषयबुभुक्षा, क्षत्रियाप्रमाणें विषयसंयोगवियोग हे स्वाभाविकच नसले पाहिजेत. शारीरिक सेवा,

अर्थ आणि सत्ता, यांचे पलीकडे जेव्हां ब्राह्मणाची वृत्ति जाईल तेव्हांच त्याच्या ठिकाणीं कांहीं निस्पृहता दिसून येईल. शारीरिक, आर्थिक सेवा करणारे आणि सत्तेच्या योगानें समाजसेवा करणारे याहून ब्राह्मण आपला निराळेपणा जेव्हां दाखवील तेव्हांच तो रामशास्त्री प्रभुण्याप्रमाणें यजमानास देहांत प्रायश्चित्त घेण्यास सांगून काशीची वाट धरील. एवंच ही सहजवैराग्यशीलता हा जो दुसरा गुण तो पहिल्या गुणाचा पोषकच आहे. ज्ञान आणि वैराग्य यांचा साध्य-साधक संबंध आहे.

तिसरा गुण म्हटला म्हणजे आचारसंपन्नता हा होय. आचार हा धर्माचा पाया आहे. सामाजिक बंधनाचें आणि नैतिक भावनेचें परिणत स्वरूपही आचारच आहे. श्रुतिस्मृति यांच्या खालोखाल जें एवढें शिष्टाचाराचें किंवा सदाचाराचें महत्त्व आहे, त्याचें कारण आचार हें धर्माचें प्रथमांग आहे, हेंच होय. आचार म्हणजे एका दृष्टीनें पोषाखासारखे असतात. ऋतुमानाप्रमाणें जसे पोषाख बदलतात तसे आचारही बदलावे लागतात. आचारांत क्रांतीही ब्राह्मणच घडवितात आणि त्यांना स्थैर्यही ब्राह्मणच आणतात. वैराग्यवृत्ति ही एका दृष्टीनें आचारधर्माची पोषकच आहे. म्हणून परिस्थितीप्रमाणें मान्यवर झालेली आचारसंपन्नता ब्राह्मणांच्या ठिकाणीं असते हें सिद्ध आहे.

सारांश, ज्ञान, वैराग्य आणि आचार हींच ब्राह्मण्यवान् ब्राह्मणांचीं मुख्य लक्षणें होत. ब्राह्मणानें समाजाच्या ज्ञानामध्यें भर टाकली पाहिजे आणि आचारसंपन्नतेनें लोकांना अनुकरणीय उदाहरण घालून दिलें पाहिजे. जुन्या मतांच्या लोकांना फक्त एक विशिष्ट तऱ्हेचा आचार किंवा या आचाराची कवाईत म्हणजेच आचारसंपन्नता असें वाटतें. परंतु त्या आचाराबरोबर उदात्त विचार जर नसतील तर तो ब्राह्मण्याला कमीपणाच आहे.

"यन्मनसा मनुते तद्वाचा वदती" जे मनांत विचार असतात तेच उच्चारांत येतात; म्हणून ब्राह्मण्हाची महति उच्च आचारविचार व उच्चार यांवरच अवलंबून आहे, हें ब्राह्मणांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे.

चमत्कार असा आहे कीं, आज ब्राह्मणजातींतील व्यक्तींनाच ब्राह्मण्य म्हणजे काय हे विचारण्याचा प्रसंग येत आहे! ब्राह्मणेतर समाज क्षुब्ध झालेला, परकीय सत्तारूपी राहू समूळ ग्रास करण्यास टपलेला आणि

स्वतः ब्राह्मण दैवदुर्विपाकांत सांपडलेला, यामुळें त्याचें ब्राह्मण्याचें ज्ञान स्वाभाविकच नाहींसें झालें आहे. हजारों वर्षांपासून आर्यसंस्कृतीचा आणि वैदिकधर्माचा प्रतिनिधी, यज्ञसंस्थेचा प्रवर्तक, चातुर्वर्ण्यसंस्थेचा मुख्य घटक, निरनिराळ्या पाखंड पंथांना, संप्रदायांना आणि उत्पातांना टक्कर देणारा वीर, ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांमध्यें भर घालणारा ज्ञानी, अशा विविध नात्यांनीं ब्राह्मणांचा इतिहास भरलेला आहे. म्हणून अनेक दृष्टींनीं ब्राह्मण्याचा विचार व्हावयास पाहिजे आहे. धर्म, समाज, शिक्षण, संस्कृति, प्रसार या प्रत्येक बाबतींत ब्राह्मणांची कामगिरी अविच्छिन्न अशी आढळते. आतां महाभारतांतील म्हणजे त्या कालांतील ब्राह्मणांच्या व ब्राह्मण्याच्या कल्पना काय होत्या या पाहूं.

महाभारतामध्यें ब्राह्मण्यविचार ठिकठिकाणीं आलेला आहे. त्यांतील कांहीं उतारे विवेचनाच्या सोईकरितां येथें देतोंः—

जातकर्मादिभिर्यस्तु संस्कारैः संस्कृतः शुचिः ॥
वेदाध्ययनसंपन्नः षट्सु कर्मस्ववस्थितः ॥ २ ॥
शौचाचारः स्थितः सम्यग्विघसाशी गुरुप्रियः ॥
नित्यव्रती सत्यपरः स वै ब्राह्मण उच्यते ॥ ३ ॥
सत्यंदानमथाद्रोह आनृशंस्यं त्रपा घृणा ॥
तपश्च दृश्यते यत्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥ ४ ॥

—शांतिपर्व, अध्याय १८९

जातकर्मापासून सर्व संस्कार झालेला, पवित्र वेदाध्ययनसंपन्न अध्यापन, अध्ययनादि षट्कर्म करणारा, आचारसंपन्न, गुरुला प्रिय असणारा, नित्य यमनियम पाळणारा, सत्यनिष्ठ, निर्मत्सरी, दयाशील, तपस्वी अशीं ब्राह्मणांचीं लक्षणें या ठिकाणीं सांगितलीं आहेत.

सत्यं दानं क्षमाशीलमानृशंस्यं तपोघृणा ॥
दृश्यते यत्र नागेंद्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥ २१ ॥

वनपर्वाच्या शेवटीं धर्मराजा आणि यक्ष यांचा संवाद आहे. त्यांत धर्मराजानें वृत्त म्हणजे सदाचरण किंवा शील यावरच भर दिला आहे.

वेदशास्त्रपरायणता आणि इतर विद्वत्ता हीं ब्राह्मण्याच्या दृष्टीनें गौण असून मुख्य ब्राह्मण्याचें लक्षण सत्त्वशीलपणा हेंच येथें सांगितलें आहे. मनुस्मृतीमध्यें "सावित्री यात्र सारोऽपि वरं विप्रः सुयंत्रितः"॥ असें एका ठिकाणीं म्हटलें आहे. त्याचाही अर्थ सुवृत्त ब्राह्मणच खरा ब्राह्मण असा आहे, निरनिराळ्या स्मृतींमध्यें ब्राह्मणांचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांवरून ब्राह्मण्य म्हणजे काय याची चांगली कल्पना येते.

उत्पत्तिरेव विप्रस्य मूर्तिधर्मस्य शाश्वती॥ —मनु, अ. १
सहि धर्मार्थमुत्पन्नो ब्रह्मभूयाय कल्पते॥ ९८ ॥
विधाता शासिता वक्ता मैत्रौ ब्राह्मण उच्यते ॥—मनु, अ. ११
योगस्तपो पमो दानं सत्यं शौचं दया श्रुतम् ।
विद्याविज्ञानमास्तिक्यमेतद ब्राह्मणलक्षणम् ॥ २१ ॥
ये शांत दांता श्रुतिपूर्णकर्णा जितेंद्रिया प्राणिवधानिवृत्ताः ।
प्रतिग्रहे सकुंचिता गृहस्तारते ब्राह्मणास्तारयितुं समर्थाः ॥ २२ ॥

—वसिष्ठस्मृति, अध्याय ६

शौचंमंगल मायास अनसूयास्पृहादमः ।
लक्षणानिच विप्रस्य तथादानं दयापिच ॥ ३३ ॥

—अत्रिस्मृति.

वर दिलेल्या मनु, गौतम, अत्रि आणि वसिष्ठ स्मृतींतील श्लोकांचा इत्यर्थ ब्राह्मण हा धर्माचा मूर्तिमंत पुतळा, धर्माकरितां उत्पन्न केलेला, विहित कर्में करणारा, शिष्यांना शिकविणारा, प्राणिमात्रांशीं मित्रभावानें वागणारा वेदवेदांगें जाणणारा, इतिहासपुराणज्ञ, विधियुक्त संस्कारांनीं संस्कृत झालेला, षट्कर्मनिरत, तत्त्वज्ञ, योग, तप, दम, दान, सत्य, शौच, दया, इत्यादिकांनीं युक्त, जितेंद्रिय, प्रतिग्रहापासून सामान्यपणें निवृत्त असणारा असा पाहिजे. एवंगुणविशिष्ट जो ब्राह्मण असेल तोच खरा ब्राह्मण.

ब्राह्मण आई–बापांच्या पोटीं जन्मास आलेल्या ब्राह्मणपुत्रानें विद्यार्थी-दशेंत उपयुक्त ब्राह्मण्य हस्तगत करून घेतलें पाहिजे. कारण हें ब्राह्मण्य साधनकोटींतील आहे. साध्य कोटींतील नाहीं. या साधनकोटींतील ब्राह्मण्या-

च्या साह्यानें ब्राह्मणाला फार मोठमोठीं कामें समाजाच्या उन्नतिकरितां करावयाचीं असतात. टोलेजंग इमारतीचा जसा भरभक्कम पाया दगड-चुन्यांनीं भरून काढावयाचा असतो. त्याप्रमाणें ब्राह्मण्याच्या भरभक्कम पायावर ब्राह्मणांना मोठमोठीं कामें करावयाचीं असतात. कोणकोणतीं मोठमोठीं कामें करण्याची ब्राह्मणांवर जबाबदारी आहे याची कल्पना महाभारतांतील अनुशासनपर्वांतल्या पुढील उल्लेखावरून येईल.

"ब्राह्मण हे सर्व लोकांचे महान् धर्मसेतु होत. त्यांना धनादिकांचें दान करणें मनापासून आवडतें. ते वाणीचा निरोध करण्यांत सदैव रममाण असतात, सर्व प्राण्यांना ते आवडतात, सर्वांचे ते प्रेमनिधान होतात, ते नेहमीं व्रतवैकल्यें करितात, ते लोकांना सन्मार्ग दाखवितात, ते यशस्वी पुरुष शास्त्रें रचितात, त्यांना नित्य तपश्चर्या हेंच धन आणि वाणी हेंच विपुल बल वाटतें, ते सूक्ष्मदर्शी धर्मज्ञ व सर्व धर्मांचा उगम होत, धर्माचरण हीच त्यांची सदासर्वकाळ इच्छा असते, ते नित्य धर्माप्रमाणें वागून सुकृत संपादितात, धर्माचे ते केवळ सेतुच होत, त्या धर्मसेतूंच्या समाश्रयानेंच सर्व चतुर्विध प्रजा उपजीवन पावतात; हे सर्वांचे मार्ग होत, हे सर्वांचे नायक होत, हे सनातन पुरुषच यज्ञयागाचें धारण करितात, पितृपितामहरूप जी जड धुरी (जूं) ती नित्य तेच वहातात. संकटाच्या प्रसंगीं उत्तम बैलाप्रमाणें ते धुरीच्या भारानें थकत नाहींत; सर्व लोकांचे दीप हेच होत; डोळसाचेही डोळे हेच होत; सर्व लोकांना वळण हेच लावितात; श्रुति हेंच यांचें धन होय; मोक्षाचे हे उत्तम वाटाडे होत; सर्व प्राण्यांची गति यांनाच समजते; अध्यात्माच्या स्थितीचें चिंतन हेच करितात; सर्व ब्रह्मांडाचें आदि, मध्य व अवसान ह्यांनाच कळतें; ह्यांच्याच हृदयांतील संशयग्रंथि तुटलेला असतो; आत्मा व अनात्मा ह्यांचें यथार्थ ज्ञान ह्यांनाच असतें; श्रेष्ठ गति ह्यांनाच मिळते; मोक्षाचे अधिकारी हेच होतात; पातकाचें क्षालन करण्यास हेच समर्थ असतात; थंड—उष्ण, सुख-दुःख इत्यादि द्वंद्वें ह्यांच्या ठिकाणीं नसतात; सर्वसंगपरित्याग हेच करितात; बहुमानाला पात्र हेच असतात; ज्ञानवान् महात्मे नित्य यांनाच मान देतात; चंदनाची उटी किंवा भोजन किंवा घाणीची राडही यांना समान वाटते; भोजन व उपवास हीं यांना सारखीं असतात; उंची रेशमी वस्त्रें आणि वल्कलें किंवा मृगचर्में या

दोहोंनाही हे समान मानणारे होत; अन्नपाण्यावांचून ते बहुत दिवसही राहूं शकतील; इंद्रियांचें आकलन करून वेदाध्ययनानें हे गात्रें शुष्क करतील."

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून ब्राह्मण्य म्हणजे काय आणि ब्राह्मणांवर कोणकोणतीं कर्मे करण्याची जबाबदारी आहे याची कल्पना येईल.

प्रत्येक ब्राह्मणाला कांहींतरी आपलेपणाची ओळख पाहिजे. ती ओळख पटावी म्हणून आम्हीं खालीं निवडक असे महाभारतांतील आठ श्लोक दिले आहेत. महाभारतांतील ब्राह्मण्याबद्दलच्या सर्व श्लोकांचे हे श्लोक सारभूत आहेत. हे श्लोक प्रत्येक ब्राह्मणानें पाठ करावे आणि अर्थ समजून घ्यावा अशी आमची आग्रहाची विनंति आहे.

जितेंद्रियो धर्मपरः स्वाध्यायनिरतःशुचि ॥
कामक्रोधौ वशौ यस्य तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ १ ॥

योऽध्यापयेदधीयीतयजेद्वा याजयीत वा।
दद्याद्वापि यथाशक्ति तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ २ ॥

येनकेनचिदाच्छन्नो येनकेनचिदाशितः ।
यत्रक्कचनशायीच तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ ३ ॥

न क्रुध्येन्न प्रहृष्येच्च मानिनोऽमानितश्चयः ।
सर्वभूतेष्वभयदस्तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ ४ ॥

जीवितं यस्य धर्मार्थं धर्मोहर्थमेवच ।
अहोरात्राश्च पुण्यार्थी तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ ५ ॥

अनुत्तरीयवसनमनुपस्तीर्णशायिनं ।
बाहूपधानं शाम्यंतं तं देवा ब्राह्मणं विदुः ॥ ६ ॥

सत्यंदानं क्षमाशीलमानृशंस्यं तपोघृणा ।
दृश्यंते यत्र नागेंद्र स ब्राह्मण इतिस्मृतः ॥ ७ ॥

नैतादृशं ब्राह्मणस्यातिवित्तम् । यथैकता समतासत्यताच ॥
शीलंस्थितिर्दंडनिधानमार्जवम् । ततस्ततश्चोपरमः क्रियाभ्यः ॥८॥

भारतकालानंतर बौद्धधर्माचा पुढें लवकरच उदय झाला, व ब्राह्मण्याचा ऱ्हास होऊं लागला. बुद्धोत्तरकालांत ब्राह्मण्याचा ठसठशीतपणा गेला असेंच म्हटलें पाहिजे. बुद्धपूर्वकालांत चातुर्वर्ण्यसंस्था, यज्ञसंस्था, प्रवृत्तिधर्म ह्या वैदिकधर्मातील विशिष्ट गोष्टी पूर्ण जोरांत होत्या. बुद्धधर्मानें पहिल्यानें यांवरच हल्ला चढविल्यामुळें वैदिकधर्माच्या ऱ्हासाबरोबर ब्राह्मण्य हळुहळू अस्तंगत होऊं लागलें. बुद्धोत्तरकालापासून वर्णविशिष्ट ब्राह्मण्य जाऊन त्याचें जातिवैशिष्ट्यांत व व्यक्तिवैशिष्ट्यांत रूपांतर झालें, म्हणूनच कुमारिलभट्ट, शंकराचार्य, मंडणमिश्र, आर्यचाणक्य, श्रीसमर्थ रामदास अशा कांहीं विभूति ब्राह्मणजातीच्या ब्राह्मण्याच्या प्रतिनिधी म्हणून दाखवितां येतील. बुद्ध, इस्लाम आणि पाश्चात्य संस्कृतीच्या कचाट्यांतून जिवंत राहिलेले थोडेंबहुत ब्राह्मण्य आजच्याही ब्राह्मणांत आढळतें. इतर वर्ण आणि इतर जातीपेक्षां ब्राह्मणजातींत कांहीं कांहीं विशिष्ट गुण, गोत्रप्रवरबंधन, आनुवंशिक संस्कार व परंपरा या द्वारांनीं आलेले आहेत. बीजक्षेत्रशुद्धि, गुणाधिक्य, नियमधारणा संस्कारविशेष हींच ब्राह्मणाच्या ब्राह्मण्याचीं लक्षणें म्हटलीं तरी चालतील. हल्लीं ब्राह्मणजातींत इतस्ततः ब्राह्मण्याचे कांहीं कण विखुरलेले दिसतात त्याचें दिग्दर्शन आतां करतों.

( १ ) जन्मदारिद्र्य आणि अल्पसंतुष्टता हा एक ब्राह्मणजातींत विशेष गुण आहे. इंग्रजी राज्यामध्यें सगळा हिंदुस्थान देश दरिद्री बनला आहे हें खरें; परन्तु त्यांतल्या त्यांत ब्राह्मणजातीच्या वृत्तीचें परीक्षण केलें तर दारिद्र्यांत राहणें व त्या स्थितींत समाधानानें कालक्रमणा करणें हा गुण ब्राह्मणांमध्यें विशेष आढळतो. ब्राह्मण व दारिद्र्य याचा व्याप्तिरूप संबंध पूर्वींपासून आजतागायत कायम आहे. वेदकाल, भारतकाल किंवा अगदीं अलीकडचा काल जरी घेतला तरी उञ्छवृत्ति, शीलवृत्ति, अथवा भिक्षावृत्ति हीच ब्राह्मणांनीं पत्करलेली दिसते. भिक्षुक ब्राह्मण व गृहस्थ ब्राह्मण हे भेद अलीकडचे आहेत. विद्या-दान हेंच ब्राह्मणांचें ध्येय होतें. आजच्या सुधारलेल्या जगांत विद्यादानाची ही कल्पना आणि स्वतः भीक मागून विद्यादान करण्याची वृत्ति उत्पन्न झाली आहे असें आम्हांस वाटत नाहीं. विद्यादानाची जुनी कल्पना फारच उच्च कोटींतील आहे.

आजच्या बदललेल्या कालांत जगण्याचीं साधनें विविध झालीं, ती गोष्ट निराळी. परंतु पूर्वींच्या कालांत निर्वाहापुरतें अन्नाच्छादन मिळण्याला बिलकुल अडचण पडत नसे. त्यामुळें ज्ञानदान करण्यांत कृतार्थता मानणारे ब्राह्मण दारिद्र्याची परवा करीत नसत. अभिमानाची गोष्ट अशी आहे कीं, महाराष्ट्रांत अद्याप असे ब्राह्मण आढळतात. ठिकठिकाणच्या निम सरकारी, राष्ट्रीय व स्वतंत्र शिक्षणसंस्थांमध्यें अठराविश्वे दारिद्र्यांत आनंद मानणारे ब्राह्मणच कार्य करतांना आढळतात.

( २ ) तप हा एक ब्राह्मणाच्या ठिकाणचा विशिष्ट गुण दिसतो. तप याचा अर्थ विशिष्ट नियमांनीं आचरणाला आणि वृत्तीला आळा घालून एका विशिष्ट ध्येयाच्या, उपासनेच्या किंवा देवतेच्या मार्गाकडे चित्तसर्वस्व खर्च करणें असा आहे. तप म्हणजे तापणें. उपनिषदांत एका ठिकाणीं ब्रह्मदेवानें इतकी तपश्चर्या केली कीं, त्याच्या अंगांतून घाम येऊं लागला, असें वर्णन आहे. तेव्हां तप करणें म्हणजे कर्मेंद्रियांच्या व ज्ञानेंद्रियांच्या सर्व शक्ति एका विशिष्ट कार्याकडे इतक्या जोरानें लावणें कीं, त्यामुळें त्या माणसामध्यें अग्नीप्रमाणें प्रखरता येईल. प्राचीनकाळीं ब्राह्मण दृष्ट व अदृष्ट सुखाकरितां तप करीत असत, अग्निहोत्री ब्राह्मण अग्नीची व पुढच्या काळांतले ब्राह्मण निरनिराळ्या देवतांची तपश्चर्या करीत असत. अद्यापसुद्धां निरनिराळ्या पंथांची दीक्षा घेतलेले ब्राह्मण तपश्चर्या करतांना आढळतात.

तपश्चर्येबद्दलच्या पुष्कळ अशास्त्रीय अशा कल्पना ब्राह्मणांमध्यें आहेत हें खरें; तथापि ब्राह्मणांना कांहीं विशिष्ट नियमांनीं स्वतःला बंधन घालून एका विशिष्ट ध्येयाचा पिच्छा पुरविण्याची हौस असते यांत शंका नाहीं.

( ३ ) त्याग हा एक ब्राह्मणजातीमध्यें विशेष गुण आहे. त्याग व भोग यांच्या संग्रामालाच देवासुरयुद्ध असें म्हटलें आहे. जग माझ्या-करितां आहे; आणि मी जगाकरितां आहे असें प्रतिपादन करणाऱ्या संस्कृतीमध्यें जितका फरक आहे; तितकाच त्याग व भोग यांमध्यें फरक आहे भोगैश्वर्यप्रसक्त असे जे लोक असतात त्यांच्याकडून जगाला तापच होतो; पण त्यागप्रधान माणसें हीं जगदुपकारक होतात. त्याग या शब्दाचा अर्थ हल्लीं स्वार्थत्याग असा झाला आहे. पण मूळचा अर्थ यज्ञ शब्दावरून आलेला आहे. देवतांच्या उद्देशानें अग्नीमध्यें हविर्द्रव्याचा होम ऊर्फ

यज्ञ करण्यांत येतो. म्हणजे त्याग करण्यांत येतो. त्याग करण्याला जवळ कांहीं असावें लागतें. कोणी म्हणेल कीं, ब्राह्मण दरिद्री आहे, मग तो त्याग कसला कपाळाचा करणार? यास उत्तर इतकेंच कीं, **दरिद्र्याच्या त्यागाचीच किंमत श्रीमंताच्या त्यागापेक्षां अधिक आहे.** बुकर टी वॉशिंग्टनच्या संस्थेस एका गरीब बाईनें दोन अंडीं दिलीं, तीं हातीं घेतल्यावर त्याला जेवढा आनंद झाला तेवढा एका श्रीमंतानें दोन हजार रुपड्या दिल्यावरही त्याला झाला नाहीं. याच दृष्टीनें महाभारतांतील अश्वमेधपर्वांत धर्मराजाच्या यज्ञापेक्षां मापटेंभर सातूच्या उसळीनें यज्ञ करणाऱ्या ब्राह्मणाच्या यज्ञाची योग्यता श्रेष्ठ ठरविली आहे. सारांश, ब्राह्मणाच्याजवळ जरी कांहीं नसलें तथापि जें कांहीं असेल त्या मानानें त्याचा त्याग पूर्वींही मोठा होताच; पण आजही आहे असें सकौतुक म्हणतां येईल. महाराष्ट्रांतील नाना प्रकारच्या ज्या सार्वजनिक पैशांवर संस्था चालल्या आहेत त्यांच्या आश्रयदात्यांच्या नांवाची जरा बारकाईनें झडती घेतली तर आम्ही म्हणतों याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर येईल. ब्राह्मणांच्या ठिकाणीं त्यागवृत्ति जोंवर आहे तोंवर ते द्रव्योत्पादनाच्या कोणत्याही स्पर्धाक्षेत्रांत पडले तरी हरकत नाहीं. परंतु त्यागवृत्ति जर त्यांच्यांतून गेली तर हे **भोगैश्वर्यप्रसक्त ब्राह्मण जगाचा नाश करितील.** सर्वस्वावर लाथ मारून अरण्याची वाट धरणारे श्रीरामदास आणि त्यांच्या भोंवतालचें शिष्यमंडळ यांनीं त्यागाच्या जोरावर कांहीं सामान्य कामगिरी केलेली नाहीं. ब्राह्मणांच्या त्यागाची छटा अलीकडे सुद्धां वरचेवर दृग्गोचर होत असते. सुधारकाग्रणी कै० आगरकर यांनीं आपल्या मातुश्रीस "आई, आपला मुलगा आतां पुष्कळ पैसे मिळवील व सुनेच्या हातांत गोठतोडे घालील असें जर तुला वाटत असेल तर तें चुकीचें आहे. मी तर अखंड दारिद्र्यांत राहून मला पटतें व इष्ट वाटतें तें देशकार्य करण्याचें ठरविलें आहे." असें पत्र लिहिल्याचें सुप्रसिद्धच आहे! विदर्भरत्न श्रीयुत माधवरावजी अणे यांचे वडील मोठे नामांकित वैदिक होते. दे०भ० माधवरावजींची सनद १९०८ च्या धकाधकींत कांहीं दिवस रद्द झाली होती, त्या वेळीं माधवरावांच्या वडिलांनीं अर्थात् त्या जुन्या कर्मनिष्ठ ब्राह्मणानें आपल्या पुत्रास उत्तेजन देण्याकरितां पुढीलप्रमाणें उद्गार काढिले:—"माधवा, अरे वकिली गेली

तरी कांहीं बिघडलें नाहीं.. अरे, आमच्या वडिलांनीं संपादिलेली भिक्षुकी कांहीं इंग्रज रद्द करीत नाहीं. आणि तीच खरी वृत्ति आहे." हीं उदाहरणें देण्याचा उद्देश; त्याग हा ब्राह्मणांच्या हाडींमासीं किती खिळला आहे, हें दाखविण्यापुरताच आहे.

( ४ ) बुद्धिमत्ता हा एक ब्राह्मणजातीमध्यें आनुवंशिक गुण आहे, असें म्हटल्यास पुष्कळांना राग येण्याचाही संभव आहे. मॉडर्न रिव्ह्यूच्या सप्टेंबरच्या अंकांत "Laws of Heridity and their application to man "या लेखांत प्रो० भाटिया यांनीं एक असेंच विधान केलें आहे, तें असें:—

(1) The casts do not any longer represent heriditary occupations. Many Brahmans are not learned and not a few of our most eminent men in literary scholarships are not Brahmans.

या आक्षेपांत नाविन्य आहे असें नाहीं. "ब्राह्मणांनाच काय बुद्धिमत्ता वाटून दिलेली आहे? इतर जातींत सुद्धां पुष्कळ बुद्धिमान् व विद्वान् आढळतात. हिंदुस्थानांतच काय ते ब्राह्मण आहेत; पण इतर देशांत जे बुद्धिमान् लोक आढळतात आणि ज्यांनीं सगळ्या जगाला थक्क करून सोडलें आहे ते कोठें ब्राह्मण आहेत?" असा हा सर्वसामान्य नेहमींचा आक्षेप आहे. आम्हांस पहिल्यानें असें निक्षून सांगावेसें वाटतें कीं, ब्राह्मण बुद्धिमान् आहेत म्हणजे इतर जाती किंवा इतर देशांतले लोक हे अबुद्धिमान् आहेत असा बिल्कुल अर्थ नव्हे. मुख्य मुद्दा इतकाच कीं, ब्राह्मणजाति बुद्धिमान् आहे. बौद्धिक कार्य करण्यांत त्या जातीला आनंद वाटतो; किंवा तो तिचा सहजधर्म आहे. इतर जातींत व इतर देशांत बुद्धिमान् लोक नाहींत असें कोण म्हणेल? पण सरासरीचें प्रमाण गणिताच्या परिभाषेप्रमाणें काढावयाचें असल्यास ब्राह्मणांत जास्त आहे असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. यावरही कोणी असें म्हणतील कीं, ब्राह्मणांनीं इतरांना अज्ञानांत ठेविलें याचा हा परिणाम आहे. आमच्या मतें हें म्हणणें साफ खोटें आहे. ब्राह्मणांनीं तत्कालीन परिस्थितीला अनुसरून जी विद्या इतरांना अर्थात् त्रैवर्णिकांना देण्यासारखी होती ती दिलीच,

फार काय, पण ब्राह्मण स्वतः शेतकी करीत होते म्हणून त्यांना, चवथ्या वर्णालाही शेतकीचें शिक्षण देतां आलें. तेव्हां ब्राह्मणांनीं इतरांना अज्ञानांत ठेविलें हा आक्षेपच मुळीं भ्रामक आहे. बरें, जरी घटकाभर अज्ञानांत ठेविलें असें कबूल केलें, तर मुसलमानी राज्यांत मुसलमानांना तरी कोणी प्रतिबंध केला नव्हता ना ? ज्ञानाचीं सर्व द्वारें त्या सर्वांना मोकळीं असतांना त्यांजकडून जगाला आदर्शभूत असें काय मिळालें आहे ? ज्ञानाच्या कोणत्या शाखेंत त्यांच्याकडून भर पडली आहे ? मुसलमान पुढारी तर स्वच्छ असें म्हणतात कीं, आमची जात फार अडाणी आहे ! ब्राह्मणांनीं प्रतिबंध केला म्हणून इतर जाति अडाणी राहिल्या तर मुसलमान लोकांना कोणी प्रतिबंध केला होता काय ? मुख्य मुद्दा एवढाच कीं, जो गुण आहे तो गुण नाकबूल करण्यांत कांहीं हंशील नाहीं. ब्राह्मणांप्रमाणें इतरांतही बुद्धिमान् लोक असले, तरी त्यांची परंपरा पहावयाची असते. कुलशीलसंपन्न घरंदाज घराण्यांत सर्व माणसें चांगलींच निपजत असतात असें नाहीं. तर बरीचशीं माणसें वृत्तीनें, स्वभावानें चांगलीं निपजतात, एवढेंच खात्रीनें म्हणतां येईल. इतर कुलांमध्यें चांगलीं माणसें निपजत नाहींत असें नाहीं; परंतु तीं अपवादात्मक असतात. ब्राह्मणांच्या परंपरेचा इतिहास पाहतां यावा म्हणून ब्राह्मणज्ञातीमध्यें तर्पणाची योजना आहे. या तर्पणांत प्रत्येक शाखीयांच्या पूर्वजांची अर्थात् ऋषींची व आचार्यांची मालिका आहे, ती लक्षांत घेतली म्हणजे ब्राह्मणांच्या बौद्धिक परंपरेची चांगली कल्पना येईल. प्रत्येक ब्राह्मणाला ब्रह्मयज्ञामध्यें कांहीं ऋषि व आचार्य यांचें तर्पण करावयाचें असतें. प्रत्येकाच्या शाखेचे निरनिराळे ऋषि व निरनिराळे आचार्य आहेत. दुर्दैवानें आपला प्राचीन इतिहास उपलब्ध नाहीं. नाहींतर इतिहासावरून प्रत्येक ऋषीचें ब्राह्मण्याच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे हें कळलें असतें. ऋषींचा इतिहास म्हणजेच ब्राह्मण्याचा इतिहास, असें म्हणतां येईल. असो.

माध्यंदिनशाखेच्या ब्राह्मणांमध्यें वेदांत–विचार करणाऱ्या ब्राह्मणांचे दोन ठिकाणीं वंश दिले आहेत. त्यावरून–ब्राह्मण स्त्री-पुरुषांच्या बौद्धिक परंपरा लक्षांत येतील आणि हा वर्ण किती बुद्धिमान् लोकांचा आहे

याचीही कल्पना येईल. प्राचीन व अर्वाचीन संस्कृत वाङ्मय, जैन व बौद्धधर्मांवरील संस्कृत ग्रंथ, म्हणजेच ब्राह्मणांचा बौद्धिक इतिहास होय.

( ९ । ६ ) हिंदुस्थानांतल्या कोणत्याही जातीपेक्षां फार काय, पण महाराष्ट्राबाहेरील ब्राह्मणजातीपेक्षां महाराष्ट्रीय ब्राह्मणांत आणखी एक-दोन गुण विशेष दिसतात. ते म्हटले म्हणजे स्वच्छ आणि स्पष्ट **वर्णोच्चार आणि स्वच्छ व साधी राहणी** हे होत. वर्णोच्चाराचें एक शास्त्र असून तें वेदांगांत मोडलें आहे. दक्षिणी ब्राह्मण काशींत जाऊन राहिल्यापासून तेथें त्यांनीं आपलें स्थान या शास्त्रांत व विद्वत्तेंत अढळ ठेविलें आहे. काश्मीर देशांत, बंगाल्यांत मोठमोठे प्राचीन विद्यापंडित आहेत. न्यायशास्त्र तर बंगाल्यांत पाणी भरत आहे; परंतु ह्या पंडितांची वाणी बेताचीच शुद्ध आढळते. पाणिनीच्या शेवटच्या सूत्रांत ‘अ’ चा उच्चार जसा सांगितला आहे तसा बंगाल्यांतल्या लोकांना करतांच येत नाहीं. ते चिनी लोकांप्रमाणें तोंडाचें वोळकें करून ‘ऑ’ असा उच्चार करतात. ‘नमस्कारा’चा उच्चार ‘नॉमस्कार’ करतात. काशी, प्रयाग, गया, हरिद्वार वगैरे ठिकाणीं गेलेल्या दक्षिणी ब्राह्मणांना तेथील पंड्यांचे मंत्र ऐकण्याचा प्रसंग आला म्हणजे कानांत बोटें घालावीशींच वाटतात. वाणीचा हलकेपणा–तरळपणा व पाहिजे तो वर्णोच्चार करण्याची शक्ति ही महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या इतकी किंबहुना कांकणभर जास्तच दक्षिण हिंदुस्थानांतील ब्राह्मणांमध्यें आहे.

स्वर आणि वर्ण यांच्या उच्चारांमध्यें जशी स्पष्टता आणि शुद्धता आहे, तशीच महाराष्ट्रीय ब्राह्मणांची राहणी फार स्वच्छ आणि साधी आहे. त्यांतल्या त्यांत गोदावरी व कृष्णा या दोन नद्यांमधील प्रदेशांत जे ब्राह्मण राहतात, ते फारच स्वच्छ असतात. याचें कारण मुबलक पाणी व समशीतोष्ण हवा हेंच असावें. महाराष्ट्रीय ब्राह्मण दररोज स्नान करतो. त्याच्या कपड्यांपैकीं मुख्य कपडे म्हणजे उपरणें व धोतर तो दररोज धुतो. वस्त्रांच्या बाबतींत जसा ब्राह्मण अत्यंत साधा व स्वच्छ आहे, तसाच आहाराच्या बाबतींत तो फार साधा व स्वच्छ आहे. कोंकणच्या ब्राह्मणाला येवढा ताक भात मिळाला, कीं मग त्याला कांहीं नको. आणि देशावरच्या ब्राह्मणाला भाजी-भाकरी किंवा डाळ-भाकरी मिळाली म्हणजे झालें.

हिंदुस्थानांतील बहुतेक ब्राह्मणांचें भात हेंच अन्न आहे. मनुष्याच्या गरजा थोड्या असल्या, कीं त्याला फार सुख होतें. ब्राह्मणांची राहाणीही प्राचीन काळापासून स्वच्छ, साधी व सुटसुटीत अशी असल्यामुळें त्यांना कोणत्याही स्थितीचा—स्वावलंबन अंगीं बाणलें असल्यामुळें—त्रास वाटत नाहीं.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनाचा निष्कर्ष इतकाच कीं, जन्मदारिद्र्य, अल्पसंतुष्टता, तप, त्याग, बुद्धिमत्ता, स्पष्ट वर्णोच्चार, साधी व स्वच्छ राहाणी हे गुण ब्राह्मणजातीमध्यें अद्याप वैशिष्ट्यानें आढळतात. हा गुण-समुच्चय इतर जातींतही थोडाबहुत आहे. परंतु तो ब्राह्मण-अनुकरणामुळें आणि ब्राह्मण-सहवासामुळेंच आहे; ब्राह्मणांची स्थिति हल्लीं फार शोचनीय आहे, याबद्दल वाद नाहीं; परंतु हा ब्राह्मण्यऱ्हास कांहीं आजकालचा नाहीं. एकाद्या जुन्या मजबूत इमारतीचा एकेक दगड हळुहळू सुटत सुटत पुढें जशी ती इमारत धडाडते तसाच ब्राह्मण्याचा हा प्रबळ दुर्ग बऱ्याच वर्षांपासून ढांसळत चालला आहे, असें आमचें मत आहे. त्याच्या जीर्णोद्धाराचा प्रयत्न करणें हें सध्यांच्या विद्वान् व विचारी ब्राह्मणांचें कर्तव्य आहे.

---

# ११ संस्कृतिरक्षण आणि ब्राह्मण्य.

[ लेखक:—महादेवशास्त्री दिवेकर, वांई.]

सर्व जगांतील अत्यंत प्राचीन अशी जी आर्यसंस्कृति तिच्या आजतागायतच्या इतिहासापर्यंत दृष्टि पोहोंचविली तर ब्राह्मण्यवान् ब्राह्मणांनीं आर्यसंस्कृतीच्या संरक्षणाच्या नकाशांत पुष्कळच कार्यक्षेत्र व्यापिलें आहे असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. ब्राह्मण्याचा पूर्ण विकास ज्या ज्या वेळीं झालेला होता, त्या त्या वेळींच आर्यसंस्कृतीची चलचलाट होती अशी इतिहास साक्ष देईल. ब्राह्मण्याचा उत्कर्षापकर्ष आणि आर्यसंस्कृतीचा उत्कर्षापकर्ष कसा निगडित झालेला आहे हें पुढील विवेचनावरून कळेल.

ऋक्संहिताकालीं जो आर्यांचा समाज एका विशिष्ट स्थलीं होता, त्या वेळीं संस्कृतीचा विकास व ब्राह्मण्याचा विकास पूर्ण झालेला होता असें वैदिकवाङ्मयावरून सिद्ध करून देतां येईल. अल्पसंख्याक त्रैवर्णिक समाज आणि भावना व विचार यांचें शुद्धीकरण करणारे ब्राह्मण या दोहोंची जोडी एकत्र असल्यामुळें वैदिककाळीं आर्यसंस्कृतीचा विकास तिच्या प्राथमिक आणि सुटसुटीत स्वरूपांत झाला होता यांत शंका नाहीं. वैदिककालानंतरच्या दुसऱ्या कालाचा टप्पा म्हणजे भारतीय युद्धकाल हा होय. भारताचे महाभारत आणि भृगूनें सांगितलेले मनूचे कायदे म्हणजे मनुस्मृति हे जरी इसवी सनापूर्वी दोनशें तीनशें या कालांत झालेले असले तथापि भारतीय युद्धाचा काल इसवी सनापूर्वी तीन हज़ार वर्षें असल्याचें सर्वमान्य आहे. आमच्या समजुतीनें भारतकालीं ब्राह्मण्याचा किंवा संस्कृतीचा अपकर्ष झाला होता. स्वराज्य होतें एवढी गोष्ट खरी; तथापि कौरव आणि यादव या कुलांतील पुरुषांची बुद्धि आपसांतील भांडणांमध्येंच गढून गेली होती. संस्कृतिविकासाचें उपलक्षण म्हणून जसें रामराज्य म्हणतां येईल, तसें धर्मराज्य म्हणतां येईल कीं नाहीं याची शंकाच आहे. ब्राह्मण्य-ऱ्हासाचें या काळांतील ठळक उदाहरण म्हणजे द्रोणाचार्यांचें आहे. द्रोणाचार्यांसारख्या 'शापादपि शरादपि' ब्राह्मणाला पोटाकरितां कौरवांची विशेषतः दुर्योधन सांगेल ती चाकरी करण्याचा प्रसंग यावा, हा दैवदुर्विपाकच होय. अध्यापन करून पोट भरणें हा ब्राह्मणांचा धर्म होय. पण यावेळीं शिष्य गुरुगृहीं जात नसत आणि गुरूला विद्यार्थी शोधीत हिंडावें लागे, असें द्रोणाचार्यांच्या उदाहरणावरून अनुमानितां येईल; परंतु भारतांत जीं इतर धौम्य मुनीसारख्या ऋषींचीं वर्णनें आहेत त्यावरून हा कांहीं उत्सर्ग होऊं शकत नाहीं. द्रोणाचार्यांनीं पुढें धर्मराजाला मी कौरवांच्या अन्नाचा मिंधा झालों आहे, असें जें "अर्थस्य पुरुषोदासः" या श्लोकानें उत्तर दिलें, त्यांत आणि भर सभेंत द्रौपदीची विटंबना झाली असतां त्यांनीं जी मान खालीं घातली त्यांतच ब्राह्मण्य-ऱ्हासाचें बीज आहे. ब्राह्मणांची निस्पृहवृत्ति त्यांच्या वर्तनामध्यें दिसत नाहीं. दुर्योधनासही निरनिराळ्या ब्राह्मणांनीं बोध केला; परंतु 'पालथ्या घागरीवर पाणी' असाच त्याचा उपयोग झाला. कौरव आणि

यादव हे इतके बेगुमान झाले होते कीं, ब्राह्मणांना त्यांच्या विचारांची आणि भावनांची बिलकुल शुद्धि करितां आली नाहीं. ब्राह्मणांतही ब्राह्मण्य त्या वेळीं जाज्वल्य असें नव्हतें असें म्हटलें पाहिजे. कारण समाजाच्या निरनिराळ्या घटकांस जें वरचेवर नवजीवन मिळावयास पाहिजे तें न मिळाल्यामुळें आणि त्या वेळीं चातुर्वर्ण्यसमाज आणि अनार्यसमाज बहुसंख्याक असल्यामुळें मोठा संहार ओढवला. विचार आणि भावना यांच्या शुद्धीकरणाचें कार्य जेव्हां ब्राह्मणांच्या आटोक्याबाहेर गेलें तेव्हां त्यांनीं ईश्वराच्या मनांत भूभार हरण करावयाचा आहे, होणार तें टळत नाहीं, अशीं वाक्यें उच्चारून आपल्या कपाळाला हात लावून समाधान मानून घेतलें! प्रत्यक्ष महाभारतांत निरनिराळ्या ठिकाणीं ब्राह्मणांचें वर्णन आलेलें आहे, त्यांत कांहीं ब्राह्मण पक्के लबाड, तर कांहीं चोर, कांहीं कृषि-गोरक्ष-वृत्तीवर निर्वाह करणारे तर कांहीं फसवेगिरीवर पोट भरणारे, कांहीं बहुरूपीच्या धंद्यावर, तर कांहीं नाटकावरही पोट भरीत होते. म्हणजे ब्राह्मण्यापासून ब्राह्मणांचा ऱ्हास झालेला होता असें वर्णन आहे.

भृगुप्रोक्त मनुस्मृति जरी खिस्तपूर्व दुसऱ्या तिसऱ्या शतकांतली असली, तथापि तींत सांगितलेल्या गोष्टी आणि तत्त्वें भारतकालाच्याही पूर्वींचीं आहेत. मनुस्मृतीमध्यें दुसऱ्या अध्यायांत श्राद्धाला अभोज्य ब्राह्मण कोणते याचा विचार आलेला आहे. तो पाहिला म्हणजे ब्राह्मणवृत्तीशिवाय निर-निराळे शेंदीडशें धंदे करून ब्राह्मणांना पोटें भरावीं लागत असत, असें म्हटलें पाहिजे. अमके अमके ब्राह्मण श्राद्धसमयीं अभोज्य होत असें म्हण-ण्याचा प्रसंग बराच ब्राह्मण्यऱ्हास झाल्याशिवाय आलेला नसावा. जुन्या पद्धतीनें रामावतार हा श्रीकृष्णावतारापूर्वींचा, अर्थात् रामायणकाळही पूर्वींचा असें समजण्यांत येतें. यावरून अनार्यसंस्कृतीवर आर्यसंस्कृतीचा विजय हें जसें रामावतारासंबंधीं सांगतां येईल तसें भारतीय युद्धाबद्दल संस्कृतिउत्कर्षाच्या दृष्टीनें कांहीं सांगतां येणार नाहीं. उलट ब्राह्मण मागें पडले; ब्राह्मण्याचा ऱ्हास झाला म्हणून श्रीकृष्णासारख्या यादवाला पुढें येऊन अर्जुनाला गीता सांगावी लागली असें म्हणतां येईल. श्रीकृष्ण, गीता आणि अर्जुन यांबद्दलची जरा भाविक दृष्टि बाजूला ठेविल्यास भारतीय युद्ध टाळतां आलें असतें, तर फार चांगलें झालें असतें असें

म्हणावें लागेल. आम्हाला तर असें वाटतें कीं, भारतीय युद्धांतील अठरा अक्षौहिणींचा म्हणजे क्षात्रतेजाचा विनाकारण संहार झाला. रामायण-काल पूर्वींचा धरला तर त्यावेळीं आर्यानार्यांच्या वसाहतीचा तंटा होता म्हणून युद्ध अपरिहार्य होतें हें ठीक आहे; परन्तु वसाहती झाल्या, स्थैर्य प्राप्त झालें, देश संपन्न झाला, तेव्हां "रिकामा न्हावी आणि कुडाला तुंबड्या लावी" अशी अवदसा कौरवांना आठवली हें वाईट. त्यावेळीं जर हा क्षात्रतेजाचा संहार झाला नसता तर कदाचित् दुसऱ्या संस्कृतीचे भावी आघातही टळले असते. तात्पर्य, भारतीय काळ हा ब्राह्मण्याच्या जोमाचा काळ म्हणतां येणार नाहीं.

भारती युद्धानंतर ब्राह्मण्याचाच नव्हे, तर चातुर्वर्ण्याचाही जोर हळुहळू कमी होऊं लागला असें दिसतें. म्हणूनच "छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति" या न्यायानें व्रात्य क्षत्रिय आणि व्रात्य वैश्य या वर्णांतून जैन व बुद्ध हीं पाखांड मतें उत्पन्न झालीं आणि त्यांनीं आर्यसंस्कृतीवर हल्ला चढविला.

ऋक्संहिताकालीं श्रौतधर्म जोरांत होता म्हणून ऋत्विक् आणि पौरोहित कर्मांवर ब्राह्मणांचीं पोटें भरत होतीं; पण भारतांतील द्रोणाचार्य, कृपाचार्य यांचीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे पौरोहित कर्म न मिळाल्यामुळें बेकार झालेले ब्राह्मण निरनिराळे धंदे शोधीत होते असें दिसतें. शांति-पर्वांतील ७६ व्या अध्यायावरून निरनिराळ्या प्रकारचे ब्राह्मण किती निरनिराळे धंदे करीत होते याची कल्पना येते. ब्राह्मणांकडून कोणत्याही प्रकारचा कर घेऊं नये, हा धर्मशास्त्राचा नियमही पुढें पुढें शिथिल झाला.

तान्सर्वान्धार्मिकोराजा बलिं विष्टिं च कारयेत ॥ ५ ॥—अ. ७

म्हणजे धार्मिक राजानें अब्राह्मण वृत्तीवर जगणाऱ्या सर्व ब्राह्मणांना वेठ-बिगारीला धरावें असा अर्थ आहे. असो.

बुद्धपूर्व कालांत जो ब्राह्मण्य-ऱ्हास झालेला होता तोच पुढें बुद्धोत्तर कालांतही उत्पन्न झालेल्या ग्रंथांत दिसूं लागतो. बुद्धधर्माचा प्रतिकार, गुप्तघराण्यांतील राजे आणि भट्ट कुमारिल व श्रीशंकराचार्य यांनीं केला यांत शंका नाहीं. परंतु बौद्धधर्माच्या पाडावानंतर ब्राह्मण्यांतही कांहीं जिवंतपणा राहिला नव्हता, असें भागवतादि पुराणांवरून म्हणतां येईल.

बुद्धधर्माचा बौद्धिक हल्ला ब्राह्मणांनीं परतविला, तोंच इस्लाम संस्कृतीचा तडाखा आर्यसंस्कृतीवर बसला. बुद्धांच्या बौद्धिक हल्लयानंतर इस्लामचा बौद्धिक आणि पाशवी हल्ला परतविण्याकरितां श्रीसमर्थ आणि शिवाजी हे दोघे पुढें आले. परंतु श्रीसमर्थांसारख्या कर्तृत्ववान् ब्राह्मणाला "ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्ट झाले ।। गुरुत्व गेलें कुपात्रीं ।... आतांचे ब्राह्मणीं काये केलें । अन्न मिळेना ऐसें जाले" ।। असे उद्गार काढावे लागले. यावरून ब्राह्मण्याची स्थिति कशी होती याची कल्पना करितां येईल. श्रीसमर्थांनीं आपल्या हजारों शिष्यांकरवीं राष्ट्रांत जिवंतपणा आणला व स्वराज्यसंस्थापनेस मदत केली. पुढें शिवाजीमहाराजांच्या पश्चात् विशेषतः शाहूच्या कारकीर्दींत हिंदुपदपादशाहीचा व्याप वाढूं लागला. मराठे महाराष्ट्राबाहेर निरनिराळ्या प्रांतांत मुलुखगिऱ्या करूं लागले. पूर्वीं मराठ्यांचें क्षेत्र संकुचित होतें, तेव्हां एक रामदास पुरले. पुढें विस्तृत क्षेत्र आणि अनावर कार्य झाल्याबरोबर एकही ब्राह्मण विचार आणि भावना यांचें शुद्धीकरण करण्याकरितां पुढें आला नाहीं. म्हणून मराठ्यांचा स्वार्थ बळावला. देवाब्राह्मणांचें राज्य ही कल्पना अस्पष्ट झाली, व त्यामुळें मराठेशाही धडाडली !

आज पाश्चात्य संस्कृतीचा हल्ला आर्यसंस्कृतीवर होत आहे. पूर्वींच्या हल्ल्यापेक्षां या हल्ल्याचें स्वरूप निराळें आहे. पूर्वींचे हल्ले बौद्धिक व पाशवी शक्तीचे होते तर प्रस्तुतच्या हल्ल्यांत वरील दोन्ही गोष्टी असून शिवाय त्यास भौतिकशास्त्रसंपन्नतेची जोड मिळाली आहे. या तिहेरी माऱ्यांतून आर्यसंस्कृतीचा बचाव करण्याची दुस्तर कामगिरी आजकालच्या व भावी कालांतील ब्राह्मणांस करावयाची आहे. ती करण्याकरितां त्यांनीं जरूर तर क्षात्रवृत्ति व वैश्यवृत्ति यांचें अवलंबन करावें; परंतु तें आपद्धर्म म्हणूनच करावें. ह्या वृत्तींचीं कर्में करीत असतां त्यांनीं आपली मूळची ब्राह्मणवृत्ति मात्र विसरतां कामां नये. प्रत्येक कर्मांत तज्ञता म्हणजे कर्मकुशलता संपादून इतरांस त्यांत प्रवीण करून सोडणें व समाज, राष्ट्र आणि संस्कृति यांचे रक्षणास त्यांस प्रवृत्त करणें हेंच ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन ब्राह्मणानें सर्व ऐहिक व्यवहार केले पाहिजेत. सर्वच ब्राह्मण असे असणें शक्य नाहीं; परंतु कांहीं ब्राह्मणांमध्यें तरी ही निरापेक्ष अशी ब्राह्मणवृत्ति असलीच

पाहिजे. म्हणजे तिच्या जोरावर इतरांचे ठायीं चैतन्य व कार्यक्षमता हीं उत्पन्न होऊं शकतात.

तात्पर्य, आपत्कालामध्यें ब्राह्मण्याची जाणीव राहील अशी व्यवस्था करणें भाग आहे. संस्कृतिसंरक्षणाकरितां माझा जन्म आहे, ब्राह्मण्य हें माझें ध्येय आहे ही जाणीव ब्राह्मणाच्या अंतःकरणांत असेल तरच तो आपली परंपरा राखूं शकेल. ज्या ब्राह्मणवर्गानें चातुर्वर्ण्यव्यवस्था निर्माण केली, ज्यानें वेदांचें संगोपन करून व सदाचार संवर्धनकरून ब्राह्मण्य कायम ठेविलें, वेदबाह्य पाखंडें नाहींशीं केलीं, सहवासांत आलेल्यांचें चातुर्वर्ण्यांत समावेशन केलें, आर्यसंस्कृतीची जिवंत ज्योत ज्यानें कायम ठेविली, ज्यानें उज्ज्वल नीतितत्त्वें व धर्मतत्त्वें प्रस्थापित केली, धर्मशास्त्र निर्माण केलें, संस्कृत विद्या आणि शास्त्रें यांची अभिवृद्धि केलीं आणि संकट प्रसंगीं कर्त्या पुरुषांची जबाबदारी अंगावर घेऊन समाजाचें गाडें चालू ठेवण्यास मदत केली, व ज्यानें अत्यंत परिश्रमानें व शौर्यानें बौद्ध आणि इस्लाम संस्कृतीच्या तडाख्यांतून आर्यसंस्कृतीचें व धर्माचें रक्षण केलें तोच ब्राह्मणवर्ग सध्यांच्या प्राश्चात्यसंस्कृतीचा हल्ला परतवून आपली परंपरा कायम ठेवील असा भरंवसा बाळगण्यास हरकत नाहीं. मात्र त्यासाठीं तो चांगला जागृत झाला पाहिजे.

---

## १२ ब्राह्मण्यरक्षणासंबंधीं विचार.

[ लेखकः–श्रीयुत रामचंद्र पांडुरंग वैद्य, केरी (गोंवा.) ]

ब्राह्मण्य हें ब्राह्मणांनींच घालविलें आहे. तें संरक्षण करण्यासाठीं त्यांना आपल्या वागणुकींत काय फेरफार केला पाहिजे, त्याची दिशा स्थूल मानानें येथें दाखविली आहे. तो मार्ग मुख्यत्वें असा आहे कीं, स्वतांचें आचरण होतांहोईल तों शास्त्रानें आणि व्यवहारानें पवित्र राखिलें पाहिजे. हें एक आणि भिक्षुकी व पौरोहित्य ह्या दोन्ही गोष्टींची निर्वाहांतून अगदीं फारकत केली पाहिजे. म्हणजे अन्न-वस्त्र मिळून साधा निर्वाह

अन्य कोणत्याही विद्या किंवा कलाकौशल्य अगर व्यापार यांच्या साधनानें करून राहण्यास प्रत्येक ब्राह्मणपुत्रास शिक्षण द्यावें आणि नित्यनैमित्तिक धर्मकृत्यें स्वयमेव घरीं करण्याइतकें धार्मिक शिक्षण त्यांना द्यावें. हा पुढची पिढी तयार करण्याचा क्रम प्रत्येकानें लक्षांत ठेविला पाहिजे. हव्यकव्यादि कृत्यें करण्यास बोलावील त्याकडे सवड असेल तेव्हां अवश्य जाऊन तीं संपादावीं; पण त्याचा मोबदला कांहींच मागूं नये. अशांत कोणी स्वसंतोषानें दिला तर तो कमीअधिक न म्हणतां स्वीकारावा. पण त्याची इच्छा मात्र धरून जाऊं नये. अर्थात् तीं कामें फुकटच होतील; पण जो तीं उत्तम विधीनें करील त्यालाच बोलावतील व मुद्दाम बोलावतील त्याची संभावनाही योग्य करतील. अशा रीतीनें आपोआप खरे ब्राह्मण तयार होतील व खोटे ब्राह्मण जे भिक्षुकीस म्हणजे ब्रह्मकर्मास लांच्छनरूप असतात, ते आपोआप रद्द होऊन दुसऱ्या निर्वाहानें संपन्न होतील. अर्थात् ब्राह्मणांना तेज आपोआपच चढेल. माझ्या या लिहिण्याचा मुद्दा शास्त्रबाह्य होणार नाहीं. कारण वेदविक्रय करणें, लग्नमुंजीचा, मरणोत्तर क्रियेचा ठराव करून पैसा घेणें, दानें घेणें, हीं कृत्यें किंबहुना पौरोहित्य (ग्रामजोशीपणा बराच दोषार्ह आहे. व त्याबद्दल सद्विप्र असतील ते प्रायश्चित्त केल्यावांचून शुद्ध होत नाहींत, असें शास्त्रांत लिहिलेलें असणारच. अशी माझी समजूत आहे; आणि ब्राह्मणांनीं सरसकट त्या दोषी कृत्यांचा बिनदिक्कत व बिनप्रायश्चित्त प्रघात घातला व त्याच धंद्यावर आपली पोटगी अवलंबून ठेविली म्हणूनच त्या धंद्याला म्हणजे पर्यायानें एकंदरींत ब्राह्मण्याला धोका, लांच्छन आणि लोकसमूहांत अप्रीतीच नव्हे; पण द्वेषसुद्धां उत्पन्न झाला! जर हीं सर्व कृत्यें कोणी निरपेक्ष केलीं, तर वरील दुर्गुणांस रीघच नाहीं. तशांत यजमानानें आपण होऊन दक्षिणादि पदार्थ दिलेच तर निरपेक्षतेमुळें त्यांचा दोष लागावयाचा नाहीं. हेंच ब्राह्मण्यसंरक्षणाचें मुख्य तत्त्व होय.

ब्राह्मण्य किंवा पौरोहित्य ह्यांची उभारणी केवळ श्रद्धेवर आहे. ती व्यापारी तत्त्वावर नाहीं. ज्याप्रमाणें दुकानांत चार किंवा पांच आणे पाठवून साखर मागितली असतां साखर मिळते, त्याप्रमाणें ब्राह्मणांच्या हातावर रुपये ठेवून एकादशणीच्या पाठाचें पुण्य किंवा नवचंडीचें कल्पोक्त फळ

मिळून त्याच्या पापाचा परिहार व पुण्याचा संचय प्रत्यक्ष दाखवितां आला असता, तर, यजमान व पुरोहित यांच्या श्रद्धेला यत्किंचित् धोका कधींच आला नसता. परंतु ह्या धंदाच मुळीं असा आहे कीं, त्याचें फळ अदृश्य असून तें प्राप्त करून देण्याचा आधिकारी ह्या दोघांपेक्षां निराळाच एक धनी ( देवता ) आहे. त्या देवतेला ह्या दोघांची पोकळ भीड मुळींच नसते. तो धनी दोघांचींही अंतःकरणें ओळखणारा असतो; कोणतें कर्म कोणी कसें केलें म्हणजे मनाच्या श्रद्धेनें केलें, कीं श्रद्धारहित केलें हें तो जाणतो व तें कधीं व कोणत्या प्रकारें सफळ करावयाचें किंवा विफल करून दाखवावयाचें हे त्याला समजतें; तें त्याच्या मर्जीचें काम आहे. त्यावर सत्ता ह्या दोघांचीही चालत नाहीं. कां चालत नाहीं ? ह्यांची श्रद्धा कच्ची असते; ती व्यापारी पद्धतीची असते. म्हणून व्यापाराचे पदार्थ दृश्य असतात आणि पापपुण्यें ही धर्मकृत्यांच्या अकार्य कार्यांचीं मुळें पण अदृश्य असल्या-मुळें तीं सामान्य मनश्चक्षूंना दिसत नाहींत. तीं पहावयास दृढ श्रद्धा-रूपीं चष्मा लागतो. म्हणजे दोघांच्या अंतःकरणांत पवित्र विश्वास असावा लागतो. ह्या विश्वासाचे व श्रद्धेचे अभावीं एकंदर धर्मकृत्यें यथार्थ रीतीनें जरी फुकट जात नाहींत, तरी तीं यजमान व पुरोहित यांच्या मनाला समाधानकारक मुळींच होत नाहींत. या योगानें उत्तरोत्तर तीं कर्में लोक फारच कमी करूं लागले, त्यांचा लोप होऊं लागला; लोपच होत गेल्यावर त्याचा प्रत्यय कसा यावयाचा ? एकंदरींत अशाप्रकारें मूळ मुद्दाच चुकल्या-मुळें श्रद्धा, भक्ति, धर्मकृत्यें, धर्माचरण आणि ह्या सर्वांचें स्थान जें ब्राह्मण्य त्याचा ऱ्हास होऊं लागला; अशी माझी विचारसरणी आहे. **ह्या लोप बंद होण्यास त्या त्या कृत्यांसंबंधाची पैशाची देवघेव ही आवश्यक न धरितां श्रद्धा व निरपेक्षिता हीच आवश्यक समजण्याचा प्रघात प्रथम ब्राह्मणांनींच स्थापन केला पाहिजेत.** म्हणजे त्यांच्याविषयीं इतरांच्या मनांत श्रद्धा उत्पन्न होईल. ब्राह्मणांनीं तो प्रघात पाडणें म्हणजे त्यांच्याच स्वतःच्या हृदयांत धर्मश्रद्धा व इतर भक्ति हीं निर्हेतुक निरपेक्ष–फलाशा विरहित–[ म्हणजे भगवत्‌गीता प्रतिपादित कर्मयोग-रूपी ] पाहिजे. त्यापासून म्हणजे ह्याच बीजापासून बाकीच्या समाजांत श्रद्धा उत्पन्न होणार आहे.

+ + + आम्हां ब्राह्मणांनीं ब्राह्मण्य हें मनाला खुषी नसेल तर जुलमानें तें बाळगूं नये, हें मी स्पष्ट सांगतों. कारण आज आपण ब्राह्मण्य बेलाशक झुगारून दिलें व क्षत्रियत्व, वैश्यत्व, शूद्रत्व, चांडालत्व इतकेंच नव्हे पण यवनत्व व म्लेंच्छत्व जरी राजरोस स्वीकारिलें तरी आमच्या शरीराला, घरादाराला व मालमिळकतीला काडीमात्र धक्का बसण्याची भीति नाहीं. त्याबद्दल आम्हांला कोणीही प्रत्यक्ष शासन करणार नाहीं. शासनाधिकार मुख्यत्वें सरकारचाना ? त्याला ब्राह्मण्याची चाड व जरूरी मुळींच नाहीं. म्हणून तें इकडे मुळींच पह्यात नाहीं हें खास. शस्त्रधारी सरकारची भीति याप्रमाणें नाहींशी झाल्यावर बाकी काय राहिलें ? लोकांची लज्जा ? ती तर आज ब्राह्मण्याच्या विरुद्धच आहे ! पाहिजे तिकडे दृष्टि फेंका. ब्राह्मण्याचा द्वेष आणि ब्राह्मणांची निंदा यांवांचून तुम्हांला जागाच दुर्मिळ होईल ! तेव्हां ब्राह्मण्य हें बहुजनसमुदायाचे डोळ्यांत कांट्यासारखें सलत आहे; खुपत आहे; हेंच सिद्ध होत नाहीं काय ? मग त्याला झुगारून देण्यांत लोकभीति मुळींच नसून उलट लोकप्रीतीच मिळाली तर मिळेल हेंही स्पष्ट आहे. तेव्हां आम्ही ब्राह्मण्य बाळगावयाचें तें राजाकरितां ( कायद्याकरितां ) नव्हे आणि लोकभीति ( समजा ) करितांही नव्हे हें स्पष्ट झालें. तर मग आम्हीं ब्राह्मण्य संरक्षावयाचें तें कोणाकरितां ?

राजकीय आणि सामाजिक बाबत ह्या दोन्ही बाबती जर ब्राह्मण्याला साहाय्यकारक नाहींत तर तें ब्राह्मण्य केव्हांच नामशेष जाहलें पाहिजे होतें. तसें तें झालें आहे कीं नाहीं, या गोष्टीचा विचार बाहेर कोठेंतरी न करतां प्रत्येकानें तो स्वतःच्या अंतःकरणांतच केला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीनें स्वतःच्याच मनाला प्रश्न करावा कीं, "मी ब्राह्मण राहूं का नको ?" ह्या प्रश्नाला आपलें मन कसें उत्तर देईल तसें आपण करावें. हाच पक्ष योग्य असून आज शिल्लकही तोच मार्ग आहे. केवळ आपल्या मनाकरितांच जर आम्हांला ब्राह्मण राहावयाचें आहे, तें लोकाकरितां जर नाहीं तर त्या ब्राह्मण्यांत दिखाऊपणा व दांभिकपणा मुळींच कामाचा नाहीं ! केवळ स्वतःकरितां जो पदार्थ घ्यावयाचा असतो तो अस्सल तोच घ्यावा हेंच योग्य नाहीं काय ? आम्हीं आमचें ब्राह्मण्य लोकांकरितां संरक्षण करण्याची गरज संपली. तें आम्हांला, आमच्या स्वतःच्या

अंतःकरणाला हवें असेल तरच तें रक्षण करावयाचें आहे. आणि स्वतःकरितां जर आहे व लोकांस फसविण्याकरितां जर नाहीं तर हें ब्राह्मण्य शुद्ध, निर्मळ, स्वच्छ, अस्सल तेंच असलें पाहिजे. खऱ्या ब्राह्मणाचीं लक्षणें भगवद्गीतेमध्यें आहेत; मनुस्मृतीमध्यें आहेत; दुसऱ्या अनेक धर्मग्रंथामध्यें असतील, तीं आपणांमधून ज्यांना ठाऊक नसतील त्यांनीं आज नाहींतर उद्यां योग्य विद्वानापासून समजून घेतलीं पाहिजेत आणि ब्राह्मण्याची आवड असली तर तीं लक्षणें आपले ठिकाणीं अखंडित बाळगिलीं पाहिजेत; तेव्हांच ब्राह्मण्याचें संरक्षण घडेल. नुस्तें जानवें आणि शेंडी, भस्माचे पट्टे व नामटिळे, सोंवळेंभांडें व शाली, धाबळ्या यांचें तेज फुकट जाणार आहे! ह्या बाह्य चिन्हांची मी निंदा करतों असें समजू नका. ब्राह्मणाला ओळखण्याला हीं बाह्य लक्षणें आवश्यक आहेत; पण तीं बाह्य चिन्हें! अंतर्गत लक्षणें असल्याशिवाय यांची किंमत म्हणजे खोबरें आंत नसलेल्या नारळाचीच किंमत ठरणार!

ब्राह्मण्याचें संरक्षण होण्याकरितां ब्राह्मण म्हणविणारानें शास्त्रशुद्ध आचरण ठेवण्याची, प्रसंगीं दिवसभर उपोषण करण्याची, अवेळीं भोजन करण्याची, एका आसनावर बसून काम करण्याची, दिवसभर, रात्रभर जाग्रण करून पारायण करण्याची संवय केली पाहिजे हें जसें उघड आहे तसेंच, श्रीमंती थाटाला न भुलण्याची, संपत्तीचा लोभ सोडण्याची, काया, वाचा व मन यांचें दमन करण्याची संवयही केली पाहिजे. आजकाल अनुष्ठानाचे आरंभीं चहा, काफी आणि विलायती साखर हे तिन्हीही पदार्थ–शारीरिक व मानसिक पवित्रतेची किती हानी करणारे आहेत हें सर्वत्र प्रसिद्ध असतांही–आम्ही डोळेझांक करून त्यांचें यथेष्ट सेवन करितों. वस्तुतः ह्या पदार्थांप्रमाणेंच तंबाकू शारीरिक व मानसिक पवित्रतेची किती हानी करते याचा विचार विचारवंतांनीं करूं नये तर दुसऱ्या कोणीं करावयाचा बरें? असलीं हीं दुष्ट व्यसनें आम्हांला कशाला पाहिजेत? हे जिन्नस औषधी आहेत खरें, पण ते नित्य सेवनाला उपयोगी नसून विषरूपीच आहेत. ब्राह्मणांचें शास्त्रशुद्ध आचरण सर्व रोगांचा नाश करण्यास समर्थ आहे. त्याचा अभ्यास असेल तर रोगच होत नाहीं. मग औषधांची व ह्या भ्रष्ट पदार्थांची गरजच कोणती? हे सर्व पदार्थ मादक आहेत. चित्त

बिघडवून टाकणारे आहेत. यांचा त्याग करण्याची प्रतिज्ञापूर्वक व्यवस्था करणें हें ब्राह्मण्यसंरक्षणाचें अंगच आहे. हें प्रत्येकाचे स्वाधीनचें आहे; पराधीन नाहीं. या ठिकाणीं मुद्दाम हेंही सांगून ठेवतों कीं, परदेशी साखर जोंपर्यंत सेवन केली जाते तोंपर्यंत आमचीं शरीरें ब्राह्मण्याला पात्र नाहींत. कारण ती साखर अपवित्र पदार्थांच्या साह्यानें बनली असते. एथवर लिहिलेला मजकूर हा ब्राह्मण्याच्या अंतःशुद्धीसंबंधाचा झाला. आतां सध्याचे कालमानाला अनुसरून लोकव्यवहार जो सर्वत्र रूढ होऊन बसला आहे, त्यामध्यें आपला निभाव लागण्यासाठीं ब्राह्मणसमूहानें काय काय केलें असतां चालेल, या मुद्याचा थोडक्यांत विचार करूं.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ब्राह्मण्य हें उपजीविकेच्या कामांत गुंतलेलें उपयोगी नाहीं. ब्राह्मण्य हें वेगळेंच कर्तव्य म्हणून ठेविलें पाहिजे व उपजीविका निराळ्या धंद्यानें करतां आली पाहिजे, हा मुद्दा लक्षांत असेलच. आतां हे निराळे धंदे कोणते हा प्रश्न ज्याचा त्यानेंच सोडवावयाचा आहे. लोकांना ज्या ज्या वस्तूची अचुक गरज असते, त्या त्या वस्तु तयार करणें, आणून देणें आणि त्या तयार करण्यास इतरांना शिकवणें हीं सर्व कामें रोखठोक पैसे मिळविण्याचीं साधनें होत. हीं आजचे कालीं शेंकडों नव्हे पण हजारों सांपडतील. करणारांची तयारी आणि प्रबळ इच्छा यांचीच चहूंकडे वाण आहे. धंद्यांची वाण कोठेंच नाहीं. प्रामाणिकतेनें, चिकाटीनें आणि नियमानें उद्योग करून पैसा मिळविण्याचा निश्चय ज्यांचा दृढतर झालेला आहे त्यास वाटेल तेथें व वाटेल तितका धंदा, करणारांची वाटच बघत आहे असें समजण्यास हरकत नाहीं. मात्र ह्या धंद्यासंबंधानें उच्चनीचता जी कित्येक लोकांच्या भ्रामक समजुतीच्या पायावर आरूढ झालेली आहे, तो पाया ढांसळून पाडून, ती उच्चनीचता पावित्र्य आणि भ्रष्टत्व, मालिन्य आणि निर्मलत्व ह्यांच्या पायावर बसविली पाहिजे. म्हणजे ब्राह्मणांनीं मद्य, मांस, चामडीं, घाणेरीं खतें यांच्यासारख्या शिवाशिवीला निषिद्ध व ओंगळ पदार्थांखेरीज इतर कोणत्याही पदार्थांचा व्यापार व त्याची बनावट पत्करली असतां सुलभरीत्या निर्वाह होण्यास कोठें म्हणजे शहरांतच नव्हे पण खेड्यापाड्यांत सुद्धां अडचण पडावयाची नाहीं.

तात्पर्य, ब्राह्मण्याला बट्टा लागू न देतां निर्वाह करण्याचेच नव्हे पण

पुष्कळ संपत्ति मिळविण्याचेही धंदे जगांत भरपूर आहेत. आपण कल्पनाशक्ति वाढविली, आळस व भीति सोडून दिली, दृढनिश्चयानें उद्योगाच्या पिच्छा पुरविला, तर ब्राह्मण्यसंरक्षणपूर्वक दुसरे हजारों धंदे करून निर्वाहच काय पण मोठी थोरली श्रीमंतीही गांठतां येईल.

---

## ब्राह्मणांची सामाजिक भावना जिवंत आहे काय ?

(संपादकीय)

जीवसृष्टीचें जर सूक्ष्म निरक्षिण केलें तर स्वतःची व स्वजातीची प्रजा वाढवून त्यांचें संरक्षण व परिपालन करण्याची उपजत बुद्धि प्रत्येक जातीच्या किंवा वर्गाच्या प्राणिमात्रांत असलेली आढळून येते. मनुष्यप्राणी हा जीवकोटींतील सर्वांत श्रेष्ठ व उन्नत असा प्राणी असल्यामुळें त्याचे ठायींही ती भावना तीव्र स्वरूपानें जन्मसिद्ध असते, हें सुधारणेच्या प्राथमिक अवस्थेंतील अथवा रानटी स्थितींतील म्हणजे नैसर्गिक स्थितींत असणाऱ्या मानवसमाजांतील लोकांच्या जीवनक्रमाचें अवलोकन केल्यास दिसून येईल. या भावनेची आत्मिक व सामाजिक अशीं दोन स्वरूपें आहेत. पहिलें केवळ स्वतःपुरतें असून दुसऱ्यांत स्वतःहून अन्य, परंतु स्वजातीय म्हणजे स्वतःच्या रक्तापासून उद्भवलेल्या अथवा विस्तार पावलेल्या समूहाच्या रक्षणाचा व अभिवृद्धीचा समावेश होतो. यालाच Social instinct ऊर्फ सामाजिक भावना म्हणतात. रानटी अथवा सुधारणेच्या प्रथमावस्थेंत असणाऱ्या मानवसमाजाचे ठिकाणीं ही भावना तीव्र अथवा अगदीं उघडी (naked) असते व सुधारलेल्या मानवसमाजांत ती संभावितपणाच्या निरनिराळ्या आवरणांनीं झांकून गेलेली असते. पण दक्ष अशा सर्व निरनिराळ्या जातींच्या किंवा वर्गांच्या मानवसमूहांत ती जिवंत असते हें मात्र खास. आणि निरनिराळ्या मानवसमूहाच्या पृथक् आस्तित्वास आणि अभिवृद्धीस त्या भावनेची निसर्गतः जरूरीच असल्यानें ती ज्यांत नसेल तो मानवसमाज जीवनकलहांत टिकावच धरूं शकणार नाहीं.

२८५६

असें जरी असलें तरी जगांत अनेक जातींचे अथवा वर्गाचे मानवसमूह वावरत असल्यामुळें सर्वांना आपापल्या उन्नतीस अवकाश मिळावा म्हणून मानवी सुधारणावाद्यांनीं परस्पर सहकार करण्याचें तत्त्व ( Co-operation ) उत्पन्न करून अंमलांत आणलें. या तत्त्वांत निरनिराळ्या समूहाचें स्वतंत्र आस्तित्व कायम ठेवून परस्परांच्या हितसंबंधाची विवक्षित मर्यादेंत सांगड घालून त्या सर्वांच्या उन्नतीस अवसर मिळावा अशी योजना असते. आर्य-लोकांनीं आपल्या समाजयंत्राची रचना याच तत्त्वाच्या पायावर केली आहे. त्यामुळें वैयक्तिक स्वार्थमूलक स्पर्धा कमी होऊन सहकार्य व श्रमविभाग यांचा आमच्या समाजांत फैलाव झाला. त्या कारणानें इतर सर्व समाजां-पेक्षां हा समाज अधिक सुखी व संतुष्ट होऊन राहूं शकला. आणि त्या योगानें जें सामाजिक स्वास्थ्य उत्पन्न झालें तें आमच्या समाजाचा अनेक बाजूनें उत्कर्ष होण्यास कारणीभूत झालें. धर्म, तत्त्वज्ञान, विद्या, कला, शास्त्र, नीति वगैरे बाबतींत प्राचीन आर्यसमाज एकेकाळीं जो अत्युच्च शिखरावर जाऊन पोंचला होता, त्याचें कारण मुख्यतः हें सामाजिक स्वास्थ्यच होय. सर्व मानवच केवळ नव्हे तर भूतमात्र यांच्या ठायीं परब्रह्मरूपी एकच आत्मा भरून राहिला असल्यामुळें सर्वांकडे समदृष्टीनें पाहण्याची कल्पना उत्पन्न करण्याइतकी उंच भरारी प्रथम आर्य तत्त्ववेत्यांनींच तत्त्व-ज्ञानाच्या क्षेत्रांत मारली, व अंशतः त्या कल्पनेचा अनुभव घेऊन स्वानंद-साम्राज्यांत लीन होऊन जाणारेहि कांहीं आर्य निघाले. परंतु हें जग कांहीं केवळ आर्य लोकांनींच व्यापलेलें नव्हतें. आर्यांप्रमाणें इतर मानववंशही या भूतलावर वास करीत होते व आर्यांची संस्कृति व सुधारणा जेव्हां अत्युच्च शिखरावर गेली तेव्हां हे सुधारणेच्या निरनिराळ्या खालच्या पायरीवर नाचत बागडत होते. पुढें कांहीं कालानें आर्यावर्तांत यांचें आगमन होऊन आर्यांच्या व त्यांच्या संस्कृतीचें घर्षण होऊन आर्यही वरच्या पायरीवरून खालीं घसरूं लागले. कारण आर्यांनीं या भरतखंडांतील अनेक बहुसंख्याक अनार्य जातींचा—त्यास सुधारण्याच्या हेतूनें—आपल्या समाजांत समावेश केला होता; पण त्यांना आत्मसात् करण्याचें त्यांचें कार्य यावेळीं पूर्ण झालेलें नसल्यामुळें जात्या कमी दर्जाच्या संस्कृतिपथावर उभे असणारे अनेक अनार्य लोकांचे समूह या बाहेरून नवीन येणाऱ्या जेत्यांच्या

कक्षेंत जाऊं लागले व त्यांचे संबंधी बनलेले आर्यहि त्यांच्या संसर्गानें किंकर्तव्यमूढ होऊन मूळच्या उच्चत्वापासून हळुहळू च्युत होत गेले. तथापि ते आपल्या संस्कृतीला, धर्माला व तत्त्वज्ञानाला सर्वस्वी विसरले नाहींत. मात्र त्यांच्या विचारसरणींत व आचारांत जो शुद्धपणा होता तो कमी होऊन त्यांत बऱ्यावाइटांची भेसळ झाली. त्यामुळें त्यांच्या तत्त्वज्ञानाचें, धार्मिक समजुतीचें व आचाराचेंही विपर्यासात्मक रूपांतर होत गेलें व विचारप्रवाहाचा शुद्ध झरा गढूळ झाला. याचा परिणाम असा झाला कीं, निवृत्तिमार्गासारखा श्रेष्ठ मार्ग व ब्रह्मासारखी उच्च कल्पना यांचा दुरुपयोग होऊन सर्व समाज आळशी व नाकर्ते लोकांचा बनला. अंगांतील योग्यता खालच्या पायरीवर उभे राहण्याची; वागणूक त्याच लायकीची आणि मनांतील विचाराची भरारी मात्र उच्च दर्जाची (ही कधीं प्रामाणिक तर कधीं दांभिक) अशी स्थिति उत्पन्न होत चालली आणि त्यामुळें उन्नतीच्या ऐवजीं अवनतीकडे हा समाज वेगानें जाऊं लागला. मध्यंतरीं धर्मक्षेत्रांत शंकराचार्य, विद्यारण्य, रामदास आणि कर्मक्षेत्रांत विजयानगरचे बुक्कवंशीय राजे, छत्रपति शिवाजी, यांनीं आमच्या लोकांच्या आचारविचारांची शुद्धि करण्याचे प्रयत्न केले परंतु ते अल्पजीवी ठरले. पुढें आधिभौतिक व व्यक्तिस्पर्धा—प्रधान अशा पाश्चात्य संस्कृतीची गांठ पडली व आमच्या समाजाचें शासनतंत्रही त्या संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांकडेच गेल्यामुळें आमच्या आचार-विचारांत त्यांच्या आचारविचारांची अनुकरणेच्छेमुळें भेसळ होऊं लागली. हें अनुकरण पुष्कळ अंशीं अंध व विवेकशून्य होतें त्यामुळें त्या संस्कृतींतील इष्ट गोष्टींपेक्षां अनिष्ट गोष्टीच आमच्यांत अधिक शिरल्या. अनेक बाबतींत आमचे आचारविचार त्यांच्या आचारविचारांचे फोनोग्राफ बनले. याचें प्रत्यंतर पहाणें असल्यास कित्येक ब्राह्मण सुधारक व अब्राह्मण सत्यशोधक यांचें चारित्र्य पहावें. आज आम्हांस फक्त ब्राह्मणसमाजापुरताच विचार करावयाचा असल्यामुळें इतरांची पंचाईत आम्ही करीत नाहीं. ब्राह्मणांची स्थिति आज अशी चमत्कारिक झाली आहे कीं, त्यांना त्यांच्या पूर्वजांचें उदात्त व विश्वप्रेमी ध्येयही साध्य करण्याची हिंमत व ताकद उरली नाहीं व आत्मरक्षणास–स्वसमाजरक्षणास–जरूर ती आत्मीय भावनाही त्यांचे ठायीं जागृत नाहीं. कांहीं लोक ब्रह्मज्ञानाची, विश्वबंधुत्वाची बडबड

करतात पण त्याप्रमाणें वागणें त्यांच्या हातून होत नाहीं, किंबहुना तसें वागणें आजच्या स्थितींत कितपत शक्य अथवा अशक्य आहे याचाहि सूक्ष्म विचार ते करीत नाहींत किंवा करूं शकत नाहींत. पंडित किंवा आधुनिक विद्वान् यांची ही स्थिति, तर सामान्य शिक्षित व अशिक्षित ब्राह्मणसमुदाय उदासीनता, आळस व हीन स्वार्थबुद्धि यांत गुरफटलेला. अशा विलक्षण पेंचांत ब्राह्मणसमाज सध्यां सांपडला आहे. भोगेच्छा प्रदीप्त करणारी व वैयक्तिक स्पर्धेला प्राधान्य देणारी संस्कृति अखिल हिंदू समाजाला विळखा घालून बसली असतांना ब्राह्मणांनीं, परब्रह्माच्या कल्पनेचा कितीही घोष केला अथवा प्रत्यक्ष समाधि लावून ब्रह्मानंदाचा आस्वाद घेतला तरी त्यामुळें फार तर वैयक्तिक समाधान प्राप्त होईल, पण सर्व समाजाचें हित होणार नाहीं. जेथें प्रवृत्तिमार्ग व्यवस्थित व नीटस चालण्याची सोय असेल तेथें त्याचा अतिरेक टाळण्याकरितां निवृत्तीची जरूरी असते. रोज पक्वान्नावर हात मारणारांस रोग होऊं नये म्हणून लंघन–चिकित्सेचे पाठ देणें जरूर आहे; परंतु जेथें रोज पोटभर अन्न मिळण्याचीच पंचाईत त्याला उपोषणाचा उपदेश केल्यास फायदा न होतां त्याचा लवकर प्राणनाश होण्याचाच संभव फार! भोंवतालीं सर्व राक्षस जमा होऊन खाऊं कां गिळूं म्हणून 'आ' पसरून बसले असतांना आम्हीं नुसता शांतिब्रह्माचा पाठ केल्यानें आमचा उद्धार होईल ही कल्पना चुकीची आहे. शांतिब्रह्माचा पाठ करूं नका असें आम्ही म्हणत नाहीं, तो अवश्य करा; पण त्यांतच इतिकर्तव्यता मानूं नका अशी आमची विनवणी आहे. त्या पाठामुळें अंगांत तेज वाढवा व त्या तेजाच्या योगानें बुद्धीस चालन देऊन परिस्थितीचें निरीक्षण करा व आपल्या समाजावर भावी कालांत काय काय आपत्ति ओढवणार आहेत याचें आकलन करून त्या दूर करण्यास काय उपाय योजावेत याचें चिंतन करून कामास लागा. एखाद्या अजगरासारखे सुंद होऊं नका किंवा अजागळासारखे स्तिमित अथवा बेफिकीर होऊन राहूं नका. आजकाल प्रत्येक मानववंश व त्यांचा समाज स्वतंत्रपणें आपापल्या हिताकरितां धडपड करीत आहे. पाश्चात्य संस्कृति या कृत्यास उत्तेजन देत आहे. आर्यांच्या समाज-रचनेपेक्षां आमचीच समाजरचना चांगली असें त्या संस्कृतीचे

पुरस्कर्ते कंठरवानें सांगत असून हिंदू समाजाचा बराचसा भाग त्यांच्या नादीं लागून त्यांचें अनुकरण करूं लागला आहे. या सर्वांनीं आर्यांच्या समाजरचनेचा धुव्वा उडवून देण्याचा संकल्प केल्याचें स्पष्ट दिसत आहे. ब्राह्मणांवर सध्यां चोहोंकडून जो हल्ला होत आहे त्याचें कारण हेंच कीं, आर्यसंस्कृति व आर्यांची समाजरचना याचे उत्पादक व चालक ब्राह्मण आहेत. ही ब्राह्मणी संस्कृति आम्हांस नको असें स्पष्ट उद्गार पाश्चात्य संस्कृतीच्या भेदनीतीस बळी पडलेले अनेक ब्राह्मणेतर आज काढूं लागले आहेत. वास्तविक पहातां आर्यसंस्कृति ही मुळांत जितकी ब्राह्मणांची आहे तितकीच ती क्षत्रिय व वैश्य यांचीहि आहे; परंतु बहुतेक क्षत्रिय व वैश्य यांची सध्यां इतकी अवनति झाली आहे कीं, परप्रत्ययनेय-बुद्धीमुळें त्यांना आपल्या उज्ज्वल संस्कृतीचा वारसाही नकोसा झाला आहे ! आणि त्यामुळें त्यांच्यापैकीं कांहीं शत्रुपक्षास मिळून स्वसंस्कृतीवर घाव घालण्यास प्रवृत्त होत आहेत ! ही गोष्ट ते कदाचित् मोहामुळें किंवा अज्ञानामुळें करीत असतील पण त्यामुळें त्यांच्या कृत्यांचे परिणाम टळतील असें नाहीं. अशा आणीबाणीच्या वेळीं ह्या संस्कृतीचें रक्षण करण्याची जबाबदारी मुख्यत्वेंकरून ब्राह्मणांवरच आहे. त्याकामीं त्यांना कांहीं समंजस क्षत्रिय—वैश्यांचें साहाय्य मिळणार नाहीं असें नाहीं. प्रयत्न केल्यास मिळेल; पण हल्ल्यास तोंड देण्याचे कामीं पुढाकार ब्राह्मणांनींच घेतला पाहिजे व त्याबद्दलचे कष्टहि मुख्यत्वेंकरून त्यांनींच सोसले पाहिजेत. त्यावर आज अंतस्थ व बहिःस्थ शत्रूंकडून एकसमयावच्छेदेंकरून हल्ला होऊं लागला आहे. कोणी त्यांना आर्थिक दृष्टीनें कंगाल बनवून दारोदार भीक मागण्याची स्थिति प्राप्त करून देण्याची तयारी करीत आहे, कोणी त्यांच्या बायकांस आपल्या घरीं कुणबिणींचीं व दासींचीं कामें करण्यास भाग पाडण्याची प्रतिज्ञा करीत आहे, कोणी त्यास सरकारी नोकरींतून काढून त्यांचा अधिकारन्यास करूं इच्छीत आहे, कोणी त्यांच्या सावकारीवर व सुंदर माड्या—बंगले यावर डोळा ठेवून त्यांचें वैभव नष्ट करण्याची खटपट करीत आहे, कोणी त्यांच्या जमिनी पाडून अडवणुकीनें त्या उपटण्याची शक्कल काढीत आहे तर कोणी त्यांचीं कामें न करण्याचा ठराव करून समाजांत त्यांचा कोंडमारा करूं इच्छीत आहेत. असे नानाप्रकारचे

पेंच लावून ब्राह्मणांना 'सळो कीं पळो' करून सोडण्याचा उपक्रम सुरूं आहे, त्यांतच कांहींजण अत्याचार करून ब्राह्मणांचें जीवित, अब्रू आणि वित्त यांवर घाला घालीत आहेत! इतकें चाललें आहे तरी ब्राह्मण आपले उदासीन व बेफिकीर ते बेफिकीर! कांहींची समबुद्धि व विश्वबंधुत्व प्रतिकाराच्या आड येतात तर कांहींना आपल्या कुटुंबापुरतेंच पाहण्याची संवय जडल्यामुळें आपल्या समाजबंधूंच्या स्थितीकडे दुर्लक्ष करण्याची घातुक संवय जडलेली आहे. कित्येक अज्ञान, दरिद्री व भ्याड असल्यामुळें त्यांच्याकडून कांहीं होत नाहीं. खेडेगांवांतल्या ब्राह्मणांची स्थिति शहरांतल्याला नीट कळत नाहीं व जरी कळली तरी त्याला त्याची कळ उत्पन्न होत नाहीं. खुद्द शहरांतहि एका आळींतील ब्राह्मणाची दुसऱ्या आळींतील ब्राह्मणास सहानुभूति वाटत नाहीं मग मदत कोठून होणार? ब्राह्मणांमध्यें अशाप्रकारें औदासिन्य व विस्कळितपणा दिसून येण्याचें कारण असें दिसतें कीं, अलीकडे बराच काल त्यांना स्वसमाजाची स्वतंत्रपणें काळजी घेण्याचें फारसें कारण पडलें नाहीं. ब्राह्मणाचा बच्चा म्हटला कीं, त्याचा सर्वत्र सहज बोलबाला होत असे. त्यामुळें कोणी कोणाला फारसें साहाय्य करण्याची जरूरीच नसे. दुसरें असें कीं, ज्यांनीं ब्रह्माची सर्वव्यापक कल्पना उदयास आणली त्यांना आपल्या विशिष्ट समाजाच्या हिताहिताची काळजी वाहणें गौणपणाचें वाटणें साहजिक आहे. आणि जगाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें व अंतिम ध्येय म्हणून हें त्यांचें वर्तन भूषणावहही आहे. परंतु जेव्हां **'जगावें कीं मरावें'** हा प्रश्न त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा राहतो तेव्हां **आपद्धर्म** म्हणून त्यांनीं हें उच्च ध्येय क्षणभर बाजूस ठेवून कनिष्ठ प्रतीच्या पण कावेबाज संस्कृतीशीं झुंज खेळण्याचा प्रसंग आल्यास थोडेसें खालच्या पायरीवर येऊन समाजरक्षणाच्या भावनांनीं उद्दीपित होणें जरूर आहे. जेथें सर्वच स्वार्थी व जातिविशिष्ट भावनांनीं प्रेरित होऊन एका विशिष्ट अल्पसंख्याक समाजावर एकवटून तुटून पडतात तेथें अशा अल्पसंख्याक समाजांतील लोकांत जर आपलेपणाची तीव्र सामाजिक भावना उत्कटपणें वास्तव्य करणार नाहीं तर तो समाज अशा कलहांत फार दिवस टिकाव धरूं शकणार नाहीं. हें लक्षांत ठेवून ब्राह्मणांनीं आपल्या पोराबाळांचें आयुष्य कष्टमय न व्हावें म्हणून आपलें परस्परविषयींचें औदासिन्य सोडून

द्यावें. युरोपीयन अथवा पार्शी समाजांत जसें एकाला दुःख झालें कीं दुसऱ्याला त्याची कळ येऊन तो तत्काळ त्याच्या साह्यार्थ धावतो तसा प्रकार ब्राह्मणसमाजांत सुरूं झाला पाहिजे. आजच्या प्रौढ पिढीनें तरुण पिढीस हा कित्ता घालून देऊन तो तिच्या अंगीं मुरला तरच ब्राह्मणसमाज भावी कलहांत टिकाव धरूं शकेल, हें ब्राह्मण पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें.

## भाग पहिला समाप्त.

परिशिष्ट—अ

# ब्राह्मण्य व ब्राह्मणजाति.*

[संपादक.]

" केवल शास्त्राच्या अनुरोधानें अथवा केवल बुद्धीनें धर्मनिर्णय करितां येणें शक्य नाहीं. कारण, त्याला त्या दोहोंचीही अपेक्षा आहे, असें बृहस्पतीचें मत प्रत्यक्ष इंद्रानें सांगितलें आहे * * * श्रुत्यनुकूल असणारा जो तर्क आणि वचन, त्या दोहोंच्या योगानेंच शास्त्र प्रशंसनीय ठरतें.

—शांतिपर्वांतर्गत आपद्धर्मपर्व–महाभारत. (अ० १४२)

थोडे दिवसांपूर्वीं कऱ्हाड येथें जें ब्राह्मण्यसंरक्षणसभेचें अधिवेशन झालें, त्यांत ब्राह्मण्याची व्याख्या ठरवितांना 'कुल, शील व विद्या' (आणि विद्येच्या अंगभूत संस्कार) या लक्षणांवर विशेष जोर देण्यांत आला. परंतु ब्राह्मण्याची ही व्याख्या आम्हांस अत्यत अपुरी व संकुचित वाटते. शिवाय त्यांत इतराहून निराळें वैशिष्टयही नाहीं. कारण हीं तीन लक्षणें (संस्कारसुद्धां) क्षत्रिय व वैश्य ह्या वर्णांसहि लागू पडणारीं आहेत. क्षत्रिय, वैश्य इत्यादि वर्णांस देखील त्या त्या वर्णास अनुलक्षून शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें कुल, शील व विद्या (संस्कार) इत्यादींची अपेक्षा असते व त्यावरूनच त्यांचाहि वर्ण ठरतो. मग त्याहून निराळें असें ब्राह्मण्याचें कांहीं तरी लक्षण असल्यावांचून ब्राह्मण व ब्राह्मण्य यांत इतरांपासून पृथक् असें वैशिष्टय तें काय राहिलें ? यापेक्षां सभेंत वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे यांनीं आपल्या भाषणांत 'शम, दम, तप' इत्यादींची कुल, शील, विद्या यांस जोड देऊन त्या सर्वांचा ब्राह्मण्यांत समावेश करून एतत्गुण-विशिष्ट असणारें तेंच ब्राह्मण्य अशी ब्राह्मण्याची उपपत्ति सांगितली तीच

[* सदरहु लेख, खानापूरच्या 'लोकमित्र' मासिकांत प्रथम छापला होता. तो या विषयावरचा असल्यामुळें परिशिष्ट रूपानें येथें दिला आहे.]

अधिक सयुक्तिक दिसते; व महाभारतांतील शांतिपर्वांत ब्राह्मण व ब्राह्मण्य या संबंधानें ठिकठिकाणीं जें उद्‌घाटन करण्यांत आलें आहे त्यांतहि वरील उपपत्तीस पोषक अशींच विधानें असल्याचें आढळून येतें. उदाहरणार्थ पुढील वचनें पहाः—

" इंद्रियदमन आणि वेदाभ्यास हाच पुरातन कालापासून चालत आलेला ब्राह्मणांचा धर्म होय. " ( राजधर्म पर्व अ० ६० )

" विद्या आणि ब्राह्मणांचीं शमदमादि लक्षणें यांनीं युक्त व सर्वत्र समदृष्टि असलेले जे ब्राह्मण ते ब्रह्मतुल्य होत." ( रा० प. अ. ७६ )

" सत्य, दान, द्वेषाभाव, क्रौर्याभाव, विनय, दया आणि तप हीं ज्याचे ठायीं दिसून येतात तो ब्राह्मण." " जातकर्मादि संस्कारांच्या योगानें संस्कृत, शुचिर्भूत, वेदांचें अध्ययन केलेला, अध्ययन-अध्यापन, यजन, याजन, दान व प्रतिग्रह हीं षट्‌कर्में करणारा, सदाचारनिष्ठ, सत्यनिष्ठ " वगैरे गुणसंपन्न तोच खरा ब्राह्मण. ( मोक्ष ध. प. अ. १८९ )

" दान, अध्ययन, यज्ञ, तप, लज्जा, सरलता आणि दम यांच्यायोगानें ब्राह्मणांचें तेज वाढतें." " कर्मशील, श्रद्धाळु, इंद्रियनिग्रहसंपन्न, प्राज्ञ, असूयाशून्य व धर्म आणि अधर्म यांतील विशेष जाणणारा, धैर्यसंपन्न, अप्रमत्त, जितेंद्रिय, धर्मवेत्ता, आत्मवान् आणि हर्ष, मद व क्रोध यांपासून अलिप्त तो ब्राह्मण. " ( मो. ध. प. अ. २३५ ) या सर्व वचनांचा निष्कर्ष **मोरोपंताच्या** आर्यार्धांत पुढीलप्रमाणें काढलेला आढळून येईल— " तोचि ब्राह्मण जेथें शांति, दया, दान, सत्य, तप, धर्म ॥ " यावरून ब्राह्मण्याचें खरें लक्षण कोणतें याचा सहज निर्णय होण्यासारखा आहे. ब्राह्मणांच्या अंगीं जर वरील लक्षणें नसतील तर केवळ ब्राह्मणकुलांत जन्म झाला एवढ्यावरून तो ब्राह्मण ठरत नाहीं अशाबद्दलचे अनेक उल्लेख **महाभारतांत** जागोजागीं आहेत. वरील लक्षणांनीं वियुक्त असणाऱ्या ब्राह्मणांस शूद्र अथवा दस्यु समजावें असेंही सांगण्यांत आलें आहे, अर्थात् प्राचीन काळीं ब्राह्मण्य हें जातीवर अवलंबून नसून गुणकर्मांवर अवलंबून होतें हें उघड आहे. परंतु पुढें तें जातीवरच अवलंबून रहात आलें, व जाति आणि वरील गुणकर्मयुक्त लक्षणें या दोहोंचा मेळ घालून ब्राह्मण्य

ठरविण्याची परिस्थिति उत्पन्न झाली. ती कशी हें समजण्याकरितां वैदिक कालापासून तों मुसलमानी संस्कृतीशीं हिंदु संस्कृतीचा संबंध येईपर्यंत आर्यांच्या समाजव्यवस्थेंत जीं स्थित्यंतरें होत गेलीं त्यांचें सिंहावलोकन करणें जरूर आहे. महाभारतांत आलेलीं लोकस्थितीचीं वर्णनें, कै० कुंटे यांचा आर्यसंस्कृतीच्या स्थित्यंतराचा इतिहास, चिंतामणराव वैद्य यांचें मध्ययुगीन भारताचें वर्णन, व महाभारताचा उपसंहार; रा० राजवाडे (इतिहाससंशोधक) यांचे प्राचीन इतिहासात्मक निबंध या सर्वांचा निष्कर्ष काढल्यास असें दिसून येतें कीं, आर्य लोक प्रथम जेव्हां हिंदुस्थानच्या उत्तर भागांत आले तेव्हां त्यांच्यांत हल्लीं प्रचलित असलेला जातिभेद तर नव्हताच, पण चातुर्वर्ण्यात्मक चार वर्णही नव्हते. वैदिक कालानंतर त्यांचें जें पहिलें स्थित्यंतर झालें त्यावेळीं त्यांच्यामध्यें फक्त ब्राह्मण व क्षत्रिय असे दोनच वर्ण होते, व त्याच्याही मागें गेल्यास प्रारंभीं ब्राह्मणांचाच तेवढा वर्ण होता असे उल्लेख आढळून येतात. तथापि इतक्या लांबचा काळ सोडून महाभारताच्या काळापासून पुढें आर्यलोकांच्या सामाजिक स्थितींत जे फेरफार झाले त्यांचाच केवळ जरी विचार केला, तरी आर्य लोक प्रथम पंजाबांत आले त्यावेळीं त्यांच्यामध्यें ब्राह्मण आणि क्षत्रिय असे दोनच वर्ण होते. पंजाबांत आलेली आर्य लोकांची पहिली टोळी असून ती सूर्यवंशी होती व त्यांच्यामागून गंगायमुनांच्या खोऱ्यांतील सपाट प्रदेशांत उतरलेली दुसरी आर्यांची टोळी ही चंद्रवंशी होती असें इतिहासवेत्त्यांचें मत आहे.

पंजाबांत लोकवस्ति फारशी नसल्यामुळें आर्यांची तेथें कायमची वसाहत लवकरच झाली, व तेथील जमीन लागवडीस आणण्याचें कामही त्यांस करावें लागलें. तेव्हां त्यांच्यांत शेतकी, वाणिज्य गोरक्षण वगैरे धंदे करणारा त्यांच्यांतीलच एक वर्ग उत्पन्न झाला, व त्यास विश म्हणजे वसाहत करणारा ऊर्फ वैश्य अशी संज्ञा प्राप्त झाली. अशा रीतीनें त्यांच्या समाजांत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांची उत्पत्ति झाली. हे लोक पंजाबांत आले तेव्हां तेथें कांहीं मूळचे द्रवीड व अनार्य लोक होते. त्यांचा आर्यांपुढें टिकाव न लागल्यामुळें ते दक्षिणेकडे निघून गेले व जे कांहीं थोडे पंजाबांत राहिले ते दास होऊन राहिले. सोमवंशी आर्य ज्या भागांत

येऊन राहिले तेथें मूळच्या द्राविड व नाग वगैरे अनार्य जातीच्या लोकांची वस्ति अधिक असल्याकारणानें त्यांचें आर्यांना समूळ उच्चाटन करितां आलें नाहीं. शिवाय तसें करणें हा युरोपियन आर्यांप्रमाणें भारतीय आर्यांचा स्वभाव नव्हता. तथापि या अनार्य लोकांची संस्कृति व त्यांची राहणी ही आर्यांपेक्षां पुष्कळ अंशीं हलक्या दर्जाची असल्यामुळें त्यांना एकदम आपल्या समाजांत प्रविष्ट करून घेणें आर्यांस इष्ट वाटलें नाहीं. म्हणून त्यांनीं त्यांचा एक चवथाच वर्ण उत्पन्न केला व त्यास शूद्र हें नांव दिलें. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे त्रिवर्णिक आर्य व शूद्र हे त्यांच्या बाहेरचे असें मानण्यांत बराच काल गेला. पण शूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांतही कांहीं वरिष्ठ प्रतीचे वर्ग होते. त्यांच्या स्त्रियाही सुंदर होत्या.° (विशेषतः नागांच्या) त्यांच्यांशीं आर्यांपैकीं शेतकी करणाऱ्या वैश्य वर्गाचें समव्यवसायी या नात्यानें अधिकाधिक संघटन वाढत गेल्यामुळें त्यांच्या दरम्यान रोटीबेटीव्यवहार सुरू झाला. तसेंच वरिष्ठ म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय या वर्णांचे लोकही खालच्या वर्णांतील स्त्रिया करू लागले. यामुळें कांहीं काळानें शूद्रांचाही समावेश आर्यांच्या समाजांत होऊं लागला. व पुढें संकराची भीति वाढत चालल्यामुळें वर्णांस जातीचें स्वरूप प्राप्त होऊन सवर्ण विवाहाचा नियम निर्माण झाला; आणि संकरजातीची उत्पत्ति झाली. पुढें बौद्धधर्मानें जातिबंधनें आणि वर्णबंधनें शिथिल केलीं.

त्यानंतर शंकराचार्यांनीं जेव्हां पुनः सनातन वैदिक धर्माची स्थापना केली त्या वेळीं वर्णव्यवस्थेच्या अनुरोधानें पुन्हा समाजाची पुनर्घटना करण्यांत आली. अर्थात् बौद्धकालांत कोण कसा वागला याबद्दल संशय उत्पन्न होऊन वंशशुद्धीच्या अभिमानानें प्रेरित झालेल्या निरनिराळ्या समूहांचे अनेक गट उत्पन्न झाले, व त्यास पुढें वैवाहिक निर्बंधामुळें जातीचें स्वरूप प्राप्त झालें. अशा रीतीनें हजारों जाति उत्पन्न होऊन त्यांची संख्या कालानुसार वाढतच चालली. वैवाहिक निर्बंधांत आणखी प्रादेशिक आचारभिन्नतेची भर पडल्यामुळेंही मूळच्या एका जातींत अनेक पोटजाती निर्माण झाल्या. अशा रीतीनें हें जातीचें खूळ हिंदुस्थानांत पिकलें.

गुणकर्मांच्या दृष्टीनें प्रारंभीं उत्पन्न झालेल्या चातुर्वर्ण्यांतून जातिसंस्था ह्या देशांत जी निर्माण झाली त्याचें कारण असें कीं, आर्यांच्यापेक्षां

संस्कृतिदृष्ट्या हीन असलेला एक बराच मोठा लोकसमूह त्यांना ह्या देशांत आढळून आला. याची संख्या बरीच मोठी असल्यामुळें त्यांचा निःपात-करणें मानुष्याच्या दृष्टीनें त्यांना श्रेयस्कर वाटलें नाहीं. अर्थात् त्यांना आपले दास करून त्यांचा संग्रह करणें भाग पडलें. त्यांचें दासत्व न पत्कारितां स्वतंत्रपणें राहणारेही कित्येक अनार्य लोक त्यावेळीं होते. त्यांना आर्य म्लेंच्छ म्हणत असत. ह्या म्लेंच्छांची वस्ति व राज्यें आर्यलोकांच्या राज्यानजीक होतीं. हे लोक व स्वसमाजांत शूद्र म्हणून संग्रह केलेले दास यांच्या संसर्गामुळें आर्यांच्या रक्तांत भेसळ होऊं नये म्हणून आर्यांना त्यांच्यापासून स्वसमाजास अलिप्त ठेवणारे निर्बंध उत्पन्न करावे लागले. तथापि आर्यांपैकींच जे वैश्य त्यांचा धंदा शेतकी व व्यापार हा असल्या-मुळें शेतकी करणाऱ्या मूळच्या अनार्य लोकांचा व त्यांचा निकट संबंध येई व त्यामुळें अनेक वैश्य, शूद्र स्त्रियांशीं विवाह करीत. त्याचें अनुकरण कांहीं क्षत्रिय, क्वचित् ब्राह्मणही करीत असल्याचें महाभारतावरून दिसून येतें. आणि अशा रीतीनें संकर वाढत गेल्यामुळें पुढें ज्या त्या वर्णांतील स्त्री-पुरुषांनीं आपापल्या वर्णाबाहेर विवाह करूं नयेत असा कडक निर्बंध झाला व संकरजाति वेगळ्या काढण्यांत येऊन त्यांसही आपापल्या जातीबाहेर विवाह करण्याची मनाई करण्यांत आली. ह्या सर्व इतिहासा-वरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, जातीचे निर्बंध हे वंशशुद्धि व आचार-शुद्धि राखण्याकरतां निर्माण झालेले असून आनुवंशिक संस्काराच्या तत्त्वानु-सार गुणकर्मांचेही ते द्योतक अथवा अधिष्ठान होण्यासारखे आहेत.

मनुष्याचा वर्ण जन्मस्थ जातीवरून ठरविणें जास्त श्रेयस्कर किंवा त्याच्या गुणकर्मांवरून ठरविणें जास्त श्रेयस्कर हा वाद फार पुरातनकालापासून हिंदुसमाजांत चालू आहे व त्याचा निर्णय कधीं या पक्षातर्फे तर कधीं त्या पक्षातर्फे झालेला पहाण्यास मिळतो. तथापि येथील बहुजनसमाजाच्या व बहुतेक विद्वानांच्या मतें जाति व गुणकर्म या दोहोंचाही सामग्र्यानें विचार करण्याची व जातीस प्राधान्य देण्याची प्रवृत्तीच अधिक श्रेयस्कर ठरलेली आहे. हिंदुस्थान ज्या विशिष्ट * परिस्थितीमुळें उत्पन्न झालें त्या परंपरेचा

* या विशिष्ट परिस्थितीचें वर्णन चिं० वैद्य यांनीं आपल्या महाभारताच्या उपसंहारांत पुढीलप्रमाणें केलें आहे:—

विचार करितां तीच योग्य आहे व त्यास पोषक अशा आचारशुद्धीस—वंशशुद्धीची भावना असें म्हणणें प्राप्त आहे. या भावनांचा मनुष्याच्या मनावर जो पगडा बसलेला असतो तो नाहींसा करणें फार दुस्तर आहे. मानवी उन्नतीच्या दृष्टीनें तो नाहींसा करणेंहि मोठेंसें श्रेयस्कर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. उच्च प्रकारच्या आचरणानें जर उच्च प्रकारची नीतिमत्ता वाढते व अशा प्रकारची नीतिमत्ता हेंच जर वंशशुद्धिविषयक अभिमानाचें मूळ कारण किंवा हेतु असेल तर त्यांत वास्तविक गैर तें काय आहे ? परंतु हा अभिमान मर्यादित असणें जरूर आहे. त्यामुळें केवळ विशिष्ट जातींत जन्मल्यामुळें समाजांत असूया अथवा द्वेष उत्पन्न होण्याइतका प्रखर उच्च-नीच भाव निर्माण होतां कामा नये.

बौद्धधर्मानें जर वर्णसंकरास उत्तेजन देऊन जातिभेद मोडून टाकण्याचा प्रयत्न केला नसता तर शंकराचार्यांच्या काळानंतर किंवा त्यांच्या काळांत

---

" ही परिस्थिति म्हटली म्हणजे बाहेरून येणारे आर्य व हिंदुस्थानांतील राहणारे दास अथवा अनार्य यांच्यामधील महदंतर हें होय ** या दोन वंशांचें मिश्रण होणें संभवनीय नव्हतें. * * * त्यांच्या बौद्धिक शक्तीमध्येंही मोठी तफावत होती. दुसऱ्या आर्यशाखा जेथें जेथें गेल्या तेथें अशा प्रकारची परिस्थिति कोठेंच नव्हती. तेथील पूर्वींचे रहिवासी बहुतेक आर्य-वंशाचेच होते. आर्यवंशाचे नसलेले लोक वर्णानें किंवा बुद्धिमत्तेनें बाहेरून येणाऱ्या आर्यांपेक्षां फारसे कमी नव्हते. जर्मनींत तर भिन्नपणा मुळींच नव्हता. रोम, ग्रीस, इराणमध्यें थोडा होता तो लवकर दूर झाला. हिंदुस्थाना-मध्यें मात्र हा फरक एवढा मोठा होता कीं, दोन्ही जातींचें मिश्रण होणें असंभाव्य झालें आणि दोन्ही जातींमध्यें वाद सुरू झाला तो अद्यापही मिटला नाहीं. या कारणामुळें आर्यजातीच्या लोकांतील जातिनिर्बंध फार कडक झाले व त्यांच्यायोगानें निरनिराळ्या अनेक जाति निर्माण झाल्या." हिंदुस्थानांतल्या प्रमाणेंच सध्यां आफ्रिकेंत गोऱ्या लोकांना परिस्थिति उत्पन्न झाली आहे. तेथें गौरवर्ण आर्य–युरोपियन–व कृष्णवर्ण निग्रो यांचा संबंध आलेला आहे व युरोपियन लोक कशा तऱ्हेनें वागत आहेत हें वर्तमान-पत्रांच्या वाचकांस माहितच असेल. —संपादक.

जातीभेदाचे निर्बंध समाजांत द्वेष माजविणारा उच्चनीचे भाव उत्पन्न करण्याइतके तीव्र झाले नसते. बौद्धधर्म पूर्वपरंपरा सोडून भलत्याच मार्गानें एका टोंकास गेला तेव्हां त्याचा पराभव करणारा सनातन हिंदु-वैदिक-धर्म प्रतिक्रियेच्या रूपानें दुसऱ्या टोंकास गेला! परंतु हीं दोन्ही टोकें समाजास अहितकारक असल्याचा अनुभव आल्याकारणानें आतां त्यांच्या दरम्यानचा मध्यबिंदु शोधून काढून त्या अनुरोधानें समाजाची नवीन पुनर्घटना केली पाहिजे. ही पुनर्घटना करतांना जन्मसिद्धजाति ऊर्फ वंशशुद्धीची भावना व गुणकर्माचें तत्त्व या दोहोंचीही सांगड घालण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. या दृष्टीनें विचार केल्यास आज ब्राह्मण्याची व्याख्या करणें झाल्यास ती केवळ गुणकर्मावरूनही निश्चित करणें बरोबर होणार नाहीं व केवळ जन्मसिद्ध जातीवरूनही ती ठरवितां येणार नाहीं. जाति म्हणजे ब्रह्मकुल आणि सत्य, शम, दम, सरलता, दया, तप इत्यादि गुण व उच्च नीतिमत्तेस पोषक असे विहित ठरलेले आचार व विद्या× इत्यादि लक्षणांनीं युक्त असणारें तेंच ब्राह्मण्य अशी ब्राह्मण्याची व्याख्या करणें जरूर आहे. आर्य लोक येथें आल्यानंतर दक्षिणेंतील द्रविड जातीचें व त्यांचें मिश्रण झालें; परंतु तें विशेषेंकरून खालच्या वर्णांत झालें. हें मिश्रण ब्राह्मणजातींत होऊं नये म्हणून ब्राह्मणांनीं वेळोवेळीं फार दक्षता बाळगिली असल्याचें इतिहासावरून दिसून येतें.* प्राचीनकाळीं ब्राह्मणांस खालच्या वर्णांतील स्त्रियांशीं विवाह करतां येत असे व जोंपर्यंत शूद्र स्त्रियांशीं आर्यांपैकीं वैश्यजातीचा संबंध आला नव्हता तोंपर्यंत कनिष्ठ प्रकारच्या रक्ताचें मिश्रण होण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. परंतु वैश्य, क्षत्रिय वगैरे वर्णांतील लोक द्राविडादि दक्षिणेंतील व नागादि उत्तरेकडील स्त्रियांशीं विवाह करूं लागलेले पाहून ब्राह्मणांनीं त्रैवर्णिक

---

× यांतच संस्कारांचाही समावेश होतो.

* "सांप्रत या देशांतील अनेक जातींच्या लोकांत जरी आर्यांचें येथील मूळच्या द्राविडी लोकांशीं झालेलें मिश्रण कांहींसें दिसून येतें, तथापि त्यांतील वरचे-सर्व व खालचे बरेच वर्ग बहुतांशीं-आर्यच आहेत."

—मध्ययुगीन भारत, पृष्ठ ७६.

आर्यांच्या वंशशुद्धीकरितां व हिताकरितां स्ववर्णाबाहेरच्या विवाहसंबंधास प्रतिबंध केला व तो मान्य ठरला. मधून मधून कांहीं लोक संकर करीत; परंतु त्यांस शिष्टपणाचें स्वरूप केव्हांही प्राप्त होत नसे व अशा संकरापासून झालेली प्रजा कोणत्या तरी संकर जातींत समाविष्ट होत असे. तथापि एकंदरींत ब्राह्मण व क्षत्रिय व विशेषेंकरून ब्राह्मण यांनीं वंशशुद्धि राखण्याचे कामीं पुष्कळच यश मिळविलें आहे व ती परंपरा एकाएकीं मोडणें शक्य नाहीं व इष्टही नाहीं.

सध्यां म्हणजे गेल्या शेंदीडशें वर्षांपासून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे सर्वच आपत्कालांत सांपडले आहेत. तथापि अशा स्थितींतही ब्राह्मणांनीं आपलें कुल, विद्या व संस्कार आणि आचारशुद्धि बऱ्याच अंशानें कायम राखलीं आहेत. इतर वर्णांनीं त्याकडे होईल तितकें दुर्लक्षच केलेलें आहे. आजचा शुद्रवत् झालेला खेड्यापाड्यांतील ब्राह्मण व इतर वर्णांतील त्याच ठिकाणचा पुढारलेला व ब्राह्मणाची बरोबरी किंवा पायमल्ली करूं इच्छिणारा कोणीही पुरुष पाहिला तरी एकंदरीनें दुसऱ्यापेक्षां पहिल्याचीच कौटुंबिक राहणी व आचार आजही श्रेष्ठ ठरतील. सत्यशोधकी चळवळीमुळें आज पुष्कळ मराठे ब्राह्मणांसारखी वागणूक व रहाणी ठेऊं लागेल आहेत व कित्येक तर ब्राह्मण भिक्षुकाचा धंदाही करूं लागले आहेत. परंतु हे लोक स्वतः जितके शुचिर्भूत वागतात तितक्या त्यांच्या बायका अगर मुलें वागत असल्याचें मुळींच दिसून येत नाहीं. ब्राह्मण कुटुंब कितीही निकृष्ट अवस्थेस पोंचलें तरी त्या कुटुंबांतील लहानथोर सर्व मंडळी रोज स्नान व थोडें तरी नैमित्तिक धर्मकृत्य केल्यावांचून रहात नाहींत. ब्राह्मण स्त्रिया तर स्नान केल्याखेरीज अन्नग्रहण करीत नाहींत. सत्यशोधकी आवेशानें ब्राह्मणांची टर उडविणाऱ्या खेड्यापाड्यांतील किती मराठे लोकांच्या बायका व मुलें रोज स्नान करतात व नंतर स्वयंपाक किंवा भोजन करतात?

तात्पर्य काय कीं, आजच्या हीन स्थितींतही ब्राह्मणांनीं आपलें आचार-वैशिष्ट्य राखलेलें आहे व ब्राह्मण्याचीं वर जीं लक्षणें सांगितलीं आहेत तीं कमजास्त प्रमाणानें अंगीं असणारे शेंकडों ब्राह्मण आजही अस्तित्वांत आहेत. त्यांनीं आपले वैदिक संस्कारही कायम राखळे आहेत. इतर

वर्णांनीं ते राखले नाहींत. अशा स्थितींत जात व गुणकर्म ह्या दोहोंस धरूनच ब्राह्मण्याचें लक्षण ठरविल्यावांचून सोय नाहीं. कांहीं पाश्चात्य विद्याविभूषितांचें मत ब्राह्मण्यास जातीचा निर्बंध असूं नये असें आहे व हे लोक सुसंस्कृत युरोपियनांस व हिंदुस्थानांतील राज्यकर्त्या इंग्रजांस ब्राह्मण समजतात; परंतु ही त्यांची चूक आहे. युरोपियन आर्य व भारतीय आर्य यांचें मूळचें कुल जरी अतिप्राचीनकाळीं एकच होतें तरी उभय शाखांचें परिभ्रमण वेगवेगळ्या स्थितींत झालेलें असल्यामुळें देशकालानुरूप त्यांचे स्वभाव, आचार व संस्कृति यांत महदंतर पडलेलें आहे. भारतीय आर्यांनीं धर्म, तत्त्वज्ञान, नैतिक उन्नति, शुद्धता वगैरे बाबतींत पाश्चात्यांहून फार पुढें मजल मारलेली आहे व त्यांच्या दृष्टीनें युरोपियन समाजांतील निरनिराळे मानवसमूह हे दस्यु, दैत्य, दानव, राक्षस, वगैरे जातिविभागांत येतात.* त्यांची मांसाशनाची व सुरापानाची वृत्ति, त्यांचें क्रौर्य, कापट्य, भोगलालसा इत्यादि गुण भारतीय आर्यांशीं विसदृश असे आहेत. अशा स्थितींत भारतीय ब्राह्मण जातींत त्यांचा समावेश करणें किंवा उभयतांना समान लेखणें अशक्य आहे व तसा कोणीं प्रयत्न केल्यास तो भारतीयांची हानि करण्यासच कारण होईल.

हा बाह्यासंबंधानें विचार झाला. परंतु भारतवर्षांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्या जातीही वर निर्दिष्ट केलेल्या कारणामुळें आजच्या स्थितींत एकरूप होणें इष्ट नाहीं व तें शक्यही नाहीं. तथापि आजच्या ब्राह्मणांनीं आपणच तेवढे श्रेष्ठ आहों व बाकी इतर सर्व समाज शूद्र आहे असा अविर्भाव आणणें हेंही योग्य नाहीं. सुव्यवस्थेच्या दृष्टीनें आपल्या समाजाची जर पुनर्घटना करावयाची असेल तर चातुर्वर्ण्यात्मक मूळच्या चार जाति आज मान्य करून तदंतर्गत सर्व पोटजाति मोडण्याची तजवीज केली पाहिजे. जे मराठे अथवा कुणबी आपणांस क्षत्रिय समजत असतील ते तसे आहेत कीं नाहींत हें ठरविण्याचें काम त्यांच्या

* युरोपियन राष्ट्रांतील लोकांस वरील नामाभिधानें सार्थपणें कशीं लागू पडतात हें गुरुवर्य वि. का. राजवाडे यांनीं आपल्या ऐतिहासिक लेखांतून सप्रमाण सिद्ध केलेलें आहे.

जातीकडेच सोंपवावें व त्यांचा निर्णय ब्राह्मणांनीं मान्य करावा. हीच गोष्ट वैश्य व शूद्र यांसही लागू करावी. याचा अर्थ असा कीं, प्रत्येक जातीला स्वयंनिर्णयाचा अधिकार असावा. त्या, त्या जातींची एक मध्यवर्ती सामाजिक शासनसंस्था असावी आणि त्या संस्थेनें आपसांतील पोटजाति मोडण्याचा यत्न करावा. ब्राह्मणांनीं या कार्यास उत्तेजन देऊन मदत करावी. खुद्द ब्राह्मणांनींही आपापसांतील पोटजाति—आचार व भक्ष्य यांविषयींच्या साहश्याकडे लक्ष देऊन—मोडून टाकाव्यात. आचारशुद्धि व सात्विक आहार हें ब्राह्मणांचें वैशिष्ट्य त्यांनीं हरतऱ्हेनें संभाळलेंच पाहिजे. व त्यांस अनुसरून निवृत्तमांस असणाऱ्या सर्व ब्राह्मण पोटजातींत रोटीबेटी व्यवहार सुरू करून त्यांचें एकीकरण करावें व मांसाशन करणाऱ्या ब्राह्मण जातींतील जीं कुटुंबें ( व्यक्ति नव्हे ) तीन पिढीपर्यंत सतत निवृत्तमांसवृत्तीनें राहतील त्यांनाही ह्या एकीकरणांत सामील करावें. तसेंच ज्या ब्राह्मणजाति मांसाशन वर्ज करूं न इच्छितील त्यांनींही आपल्या पोटजाति मोडून एकच मोठी जात करावी. म्हणजे कालांतरानें त्यांना मांसनिवृत्त होण्याची इच्छा झाल्यास एकदम त्यांचा संग्रह मांसनिवृत्त अशा श्रेष्ठ ब्राह्मणजातींत समाविष्ट करण्याचा मार्ग सुलभ होईल.*

ब्राह्मणांतील पुष्कळशा पोटजाति प्रादेशिक परिस्थितीमुळें उत्पन्न झालेल्या आहेत, व त्यामुळें त्यांच्या आचारविचारांतही थोडीबहूत भिन्नता उत्पन्न झालेली आहे. ही स्थिति गतकालास जरी अनुरूप अशी असली तरी दळणवळणाचे मार्ग सुलभ झाल्याकारणानें आर्यावर्तांतील वाटेल त्या प्रदेशांतील एका ब्राह्मण पोटजातीस दुसऱ्या प्रदेशांतील पोटजातीशीं व्यवहार करणें, संबंध ठेवणें व संघटन वाढविणें सुलभ झालें आहे. अर्थात् आतां त्यांनीं परस्परांपासून पृथक् राहण्याचें कांहीं प्रयोजन उरलेलें नाहीं व

* ब्राह्मणांच्या निरनिराळ्या पोटजातींत बेटीव्यवहार सुरू करण्यास शास्त्राची कोणतीही आडकाठी नाहीं, हें रा० चिंतामणराव वैद्यांनीं 'मध्ययुगीन भारतां'त पुढील शब्दांनीं व्यक्त केलें आहे:—" विवाहाना स्मृतिग्रंथांची आडकाठी मुळींच नाहीं. सांप्रतची एकशाखीयांतच शरीरसंबंध व्हावा असें वाटण्याची प्रवृत्ति केवळ रूढीला अनुसरून झालेली असून तिला शास्त्राचा कांहीं आधार नाहीं."

उभयतांच्या उन्नतीसही हा पृथकपणा इत:पर पोषक न होतां अपकारकच होणार असल्यामुळें त्यांचें शक्य तितक्या लवकर एकीकरण होण्यांतच ब्राह्मणसमाजाचा फायदा आहे. निवृत्तमांस व मांसाशन करणारे, असे ब्राह्मण जातीचे दोन पृथक् विभाग केल्यावर त्या प्रत्येकांत पुन्हा दोन पोटविभाग करणें प्राप्त आहे. एक आचार्य ऊर्फ धर्मशास्त्रवेत्ते किंवा धर्मप्रवर्तक यांचा ( यांतच शास्त्री, पंडित व वेदाभ्यासी, भिक्षुक यांचा समावेश होतो ) व दुसरा सामान्य ( लौकिक व्यवहार व धंदे करणारे ) ब्राह्मण लोकांचा. प्रारंभीं वर्णन केलेल्या ब्राह्मण्याचें रक्षण व संवर्धन करण्याचें काम पहिल्या विभागांतील समूहानें करावें व दुसऱ्या विभागांतील लोकांनीं हरतऱ्हेनें ब्राह्मणजातीचा ऐहिक उत्कर्ष साधून पहिल्या विभागांतील धर्मप्रवर्तकांस ब्राह्मण्य व धर्म रक्षणाचे कामीं मन:पूर्वक सहाय्य करावें. अशा रीतीनें हे दोन्ही वर्ग अन्योन्याश्रयी असून ब्राह्मण समाजाची जर एकसूत्री संघटना करतील तरच इत्युत्तर ब्राह्मण जातीचा सध्यांच्या धावपळींत निभाव लागेल व ती ब्राह्मण्याचें रक्षण करूं शकेल. इतर जाति सध्यां जागृत झालेल्या असून त्यांच्यामध्यें एकीकरणाचें व संघटनेचें कार्य कमजास्तप्रमाणानें चालू झालेलें आहे व त्यापैकीं कांहीं जातींनीं ब्राह्मण जातीवर व ब्राह्मण्यावर हल्ले करण्यास सुरवात केली आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ब्राह्मण जातींत एकीकरणाची व संघटनेची कल्पनाही अद्याप उत्पन्न झालेली नाहीं. आज कित्येक ठिकाणीं ब्राह्मण--ब्राह्मणेतर वादास उग्र स्वरूप प्राप्त झालें असून सातारा जिल्ह्यांतील खेड्यापाड्यांतून अविचारमूलक अशा ब्राह्मण द्वेषाचें बीजारोपण जाणूनबुजून केलें जात आहे. आणि त्यांमुळें पुष्कळ ब्राह्मण कुटुंबें संकटग्रस्त झालीं आहेत व होत आहेत. परंतु शहरांतील सुखासीन व मध्यम वर्गांतील ब्राह्मणसमाजाचें त्याकडे जावें तसें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. तो पूर्वीप्रमाणेंच बेगुमान व धुंदींत आहे. एका भागांतील ब्राह्मण समाजाच्या स्थितीची दुसऱ्या भागांतील ब्राह्मण समाजास असावी तशी माहिती नसते आणि त्यामुळें दोन्ही ठिकाणच्या लोकांची कार्यक्षमता दुर्बल ठरते.

ब्राह्मणांनीं—विशेषत: शहरांतील सुशिक्षित व संपन्न ब्राह्मणांनीं—असला बेफिकीरपणा इत:पर सोडून दिला पाहिजे व आपल्या समाजांतील विस्क-

ळितपणा काढून टाकून आत्मरक्षण व आत्मोन्नति आणि त्याबरोबरच इतरांची म्हणजे अखिल भरतखंडाची उन्नति करण्याकरितां स्वसमाजाचें एकीकरण करून त्याची पायाशुद्ध संघटना केली पाहिजे.* ब्राह्मणांनीं याप्रमाणें आपली जरी संघटना केली तरी त्यांचें धोरण इतर जातींशीं सहकारितेचें व प्रेमाचेंच राहिलें पाहिजे. खालच्या वर्गाशीं सहानुभूतीनें वागून त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार करणें व इतर हरएक तऱ्हेनें त्यांच्या उन्नतीस मदत करणें हें ब्राह्मणांचें पूर्वापारपासून चालत आलेलें कर्तव्य आहे व त्यासंबंधानें कोणी कितीही गैरसमज केला तरी तें ब्राह्मणांनीं सोडतां कामा नये. प्रसंगीं छळ सोसूनही हें कर्तव्य ब्राह्मणांनीं बजावलें पाहिजे. तसेंच त्यांनीं—विशेषतः लौकिकधंदे करणाऱ्या ब्राह्मणांनीं —इतर जातींस लौकिक व्यवहारांत आपणांहून हीन मानतां कामा नये व आपल्या जातीच्या उच्चपणाचा टेंभा मिरवितां कामा नये. त्यांनीं फक्त रोटीबेटी व्यवहारापुरता इतर जातींशीं पृथक्पणा ठेवावा; परंतु बाकीच्या सर्व व्यवहारांत सर्वत्र समता बाळगून ज्याच्या त्याच्या अंगच्या गुणानुसार अथवा कर्तबगारीप्रमाणें त्यास कमजास्तप्रमाणानें उदयास आणण्याचा यत्न करावा. धंदा अथवा जात यांवरून कोणासही हीन लेखूं नये. अशा तऱ्हेची वृत्ति ठेऊन जर ब्राह्मणांनीं आपली योग्य रीतीनें संघटना केली तर इतर जातींस त्यांच्या संघशक्तीची भीति वाटण्याचें अथवा त्याबद्दल द्वेष बाळगण्याचें कांहींच कारण रहाणार नाहीं. आजकाल ब्राह्मणांवर जो हल्ला चालू आहे तो त्यांच्या कर्तव्यपराङ्मुखतेचाच परिणाम आहे. त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होऊन ते जागृत झाले व आपलें श्रेष्ठ कर्तव्य करूं लागले म्हणजे त्यांच्याविषयीं उत्पन्न झालेला किंतू व द्वेष हे कालांतरानें शमलेच पाहिजेत. निदान समंजस अशा बहुसंख्याक ब्राह्मणेतरांचा तरी त्यांस पाठिंबा मिळेल यांत शंका नाहीं.

* दाक्षिणात्य ब्राह्मणांची अशा प्रकारें संघटना करण्याचें कार्य पेशव्यांनीं हातीं घेतलें होतें; असें डॉ० केतकरांच्या ज्ञानकोशाच्या प्रस्तावना खंडांतील १५ व्या प्रकरणांत सप्रमाण सिद्ध केलें आहे तें वाचून पहावें. त्यावरून आजच्या कार्याची दिशा कळेल.

# ब्राह्मण-अब्राह्मणबोध

उर्फ

ब्राह्मण--पत्रिकेच्या
पहिल्या वर्षांतील निवडक लेख.

भाग दुसरा

## ब्राह्मण--ब्राह्मणेतरवादासंबंधीं
## कांहीं चर्चात्मक लेख.

# ब्राह्मणेतरांच्या विकृत भावना.

[ संपादकीय ]

[ ता० ५ आक्टोबरच्या ज्ञानप्रकाशांत पुण्याच्या कन्याशाळेचे मुख्याध्यापक गो० म० चिपळूणकर यांनीं सातारानजीक पाडळी येथील ब्राह्मणेतरांच्या अड्ड्यांत जाऊन त्यांच्या मतांचा व चळवळीचा ठाव घेण्याचा प्रयत्न करून मिळविलेली माहिती प्रसिद्ध केली आहे, त्यांत सत्यशोधकांच्या ज्या विकृत भावना व लपंडावाच्या क्लृप्त्या बाहेर आल्या आहेत त्यांचें आविष्करण करणें जरूर आहे.]

सत्यशोधकांची चळवळ प्रार्थनासमाजाप्रमाणें* धार्मिक असून त्यांत राजकीय अगर सामाजिक अंतस्थ हेतु नाहीं असें जे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचें मत बाहेर आलें आहे तें केवळ ढोंग आहे. चारपांच वर्षांपूर्वीं कदाचित् असलें विधान खरें मानतां आलें असतें; पण सध्यां चहूंकडे जी सत्यशोधकी तमासगिरांची व शिष्टांची चळवळ चालू आहे त्यांत ब्राह्मणांचें सामाजिक व आर्थिक महत्त्व नष्ट करून मराठ्यांचें वाढविण्याचा व मराठेशाही स्थापन करण्याचा अंतस्थ हेतु असल्याचें स्पष्ट दिसून येण्यासारखें आहे. वास्तविक सत्यशोधक समाजास एखादें विशिष्ट दर्जाचें उच्च तत्त्वज्ञान व तदनुषंगिक आचार यांचें अधिष्ठान बिलकुल नाहीं. मिशनऱ्यांनीं हिंदुधर्मांतील कांहीं खरींखोटीं वैगुण्यें काढून त्या धर्माच्या केलेल्या पोरकट टवाळीवर या समाजाच्या मतांची उभारणी झालेली असून

* यासंबंधानें पुण्याचे 'मराठा'कर्ते आपल्या ता. ३-२-२४ च्या अंकांत म्हणतातः—

"Their ideal is more of the negative than the positive and consequently their actions are more directed towards destructive than constructive side and there lies it's main difference from the work of the Aryasamaj, Brahmosamaj or even Prarthanasamaj."

मिशनऱ्यांची व हिंदु संस्कृतीचे शत्रु असणाऱ्या युरोपियन ग्रंथकारांची विचारसरणी व ब्रह्मद्वेष यांच्या आधारावर सदर मतांची इमारत उभी करण्यांत आली आहे. ह्या मतांचा जनक जोतीबा फुले याच्या अंगीं नवीन धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय पंथ स्थापन करणारांचे अंगीं असणारे गुण नव्हते. एका ब्राह्मणाकडून त्याचा एक पूर्वज मारला गेल्यामुळें चिडून संतापानें त्यानें ब्राह्मणांविरुद्ध चळवळ सुरू केली. अर्थात् त्यांत नवीन धर्मपंथस्थापनेचा शुद्ध व सात्विक हेतु असणें शक्य नाहीं. कै० शाहू छत्रपति यांनीं वेदोक्त प्रकरण त्यांच्या हातचें गेल्यावर चिडून ब्रह्मद्वेषात्मक चळवळीची धुरा आपल्या शिरावर घेण्याचे वेळींच जोतीबास एकदम 'महात्मा' बनविलें. तत्पूर्वीं ब्राह्मणेतर चळवळींत त्यास फारसे महत्त्व नव्हतें असें म्हटलें तरी चालेल, सत्यशोधकांची चळवळ जर मुळींच राजकीय स्वरूपाची नाहीं व केवळ धार्मिक आहे तर 'सरकारशीं राजनिष्ठ राहण्या'ची उपाधी तिला कशाला पाहिजे? व त्या बाबीचा प्रामुख्यानें डांगोरा पिटण्याचें काय कारण? धार्मिक बाबतींत सरकारचा संबंधच येत नाहीं मग राजनिष्ठेचें मुद्दाम दार उघडून साक्ष घालण्याचें प्रदर्शन कशाला? तसेंच हिंदूंच्या देवतांची यांच्या तमाशांतून व लेखांतून जी किळसवाणी विटंबना चालू असते ती त्यांच्या धार्मिकतेचेंच लक्षण मानावयाचें काय? देव व मनुष्य यांत मध्यस्थ नकोत म्हणून गुरु अथवा पुरोहित यांचे उच्चाटण करणें हें जर त्यांचें खरें ब्रीद तर मग स्वतःच्या किंवा अन्य ब्राह्मणेतर जातींचे गुरु व पुरोहित ( जंगम, वाणी, मराठे वगैरे ) यांना कशाला लागतात? व ते ब्राह्मणांपेक्षांही गरीब लोकांस डोईजड होत चालल्याच्या तक्रारी उद्भवतात, त्या कां? फक्त सातारा जिल्ह्यांत सत्यशोधकांची संख्या सात लाख आहे असें या पाडळीच्या अड्ड्यांतील पुढारी म्हणतात; पण त्यास आधार काय? 'हुराळली मेंढी लागली लांडग्याच्या मागें' या म्हणीप्रमाणें तमाशा झाला, कीं कांहीं दिवस ब्राह्मणद्वेषाचें वारें त्या गांवांत खेळतें व त्या भरांत शेंकडों अडाणी लोक सत्यशोधक बनल्याचा आव आणतात; पण तो फारवेळ टिकत नाहीं. कांहीं कांहीं इरसाल गांवांत हें वारें कायम असतें; पण तें फार थोड्या लोकांत व तेंही सत्यसमाजाच्या तत्त्वापेक्षां

स्वार्थाकरितां टिकून राहिलेलें असतें. सत्यशोधकांचा सांप्रदाय जर धार्मिक आहे तर त्याची खूण म्हणून कांहीं विशिष्ट विधी असणें जरूर आहे; पण तो 'नाहीं' असेंच जर या पुढाऱ्यांचें मत असेल तर त्याला धार्मिक सांप्रदाय कशावरून म्हणावयाचें? थोड्या ब्राह्मणांनीं या सांप्रदायाचें उघडपणें अनुयायित्त्व पत्करलें असें म्हणण्यांत कांहीं ब्राह्मण त्यांत असल्याचा ध्वनि निघतो; पण त्यांना गुप्तपणें शिरण्याचें प्रयोजन काय? सत्यशोधकांची चळवळ 'सर्व ठिकाणींच निरनिराळ्या स्वरूपांत सुरू आहे' हें, हे लोक कबूल करतात, त्यावरून सत्यशोधकांच्या सांप्रदायाचें स्वरूप एक नसून भिन्न भिन्न आहे हें उघड ठरतें व तेंच खरें आहे. अशा स्थितींत त्याचें खरें व उपयुक्त आणि खोटें व समाजांत बखेडा माजविणारें स्वरूप कोणतें हें निश्चित सांगणें अर्थातच कठीण आहे. तेव्हां सातारा जिल्ह्यांत जर याविषयीं विशेष ओरड होत असेल तर त्यास हें भिन्नत्वच कारणीभूत होत असलें पाहिजे. म्हणजे ती ओरड सकारणही असूं शकेल हें स्पष्ट आहे.

## ब्राह्मणेतरांचा असंतुष्टपणा

या मुद्यावर बोलतांना ब्राह्मण सावकार व जमिनदार यांच्याप्रमाणेंच इतर जातीचे सावकार व जमीनदारही ब्राह्मणेतर कुळाशीं वागतात हें अप्रत्यक्षपणें या पुढाऱ्यांस कबूल करणें भाग पडलें; परन्तु त्यांच्यापेक्षां ब्राह्मणच कसे जास्त त्रासदायक वाटतात याचें पुढें त्यांनीं जें निरूपण केलें आहे व ज्यांत लो॰ टिळक व महात्मा गांधी यांचीं कृत्यें व वर्तनसुद्धां ब्राह्मणेतरांच्या हितास विघातक असल्याचा जो उल्लेख आहे तो सर्व भाग पोरकट कोटिक्रमानें व अज्ञानानें भरलेला आहे. हें निरूपण केवळ अज्ञानाचेंच द्योतक नसून ब्रह्मद्वेषाचें व कृतघ्नपणाचें द्योतक आहे. वस्तुस्थितीचा त्यांत जाणून बुजून विपर्यासही केलेला आढळतो. ब्राह्मण शिक्षक, ब्राह्मण अधिकारी, ब्राह्मण पुढारी, ब्राह्मण वकील, ब्राह्मण कौन्सिलर एकजात 'नीचपणाच्या विचारांनीं भारलेले असतात.' हें विधान सत्य व परमेश्वर यास स्मरून विचारी ब्राह्मणेतरांस करतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. पेशवाई गेल्यानंतर ब्राह्मणांनीं पाश्चात्य विद्या संपादन करून पुढारीपणा संपादन केला व

ज्ञानार्जन आणि द्रव्यार्जन करून पडता काळ सावरून धरला हें खरें; पण स्वतःचे पाय मुंईला टेकतांच त्यांनीं आपल्या इतर देशबंधूंच्या हिताचे उद्योग व चळवळ सुरू केली व सरकारचा रोषही त्याकरितां संपादन केला. ब्राह्मणेतरांत शिक्षणाची गोडी त्यांनींच प्रथम उत्पन्न केली व गेल्या पिढींतील शेंकडों ब्राह्मणेतर विद्वान्, ब्राह्मण शिक्षकांचे हातून तयार झाले व त्यांतील कित्येक मोठ्या पदवीसही चढले. या लोकांनीं ब्राह्मणांबद्दल तक्रार केल्याचें ऐकण्यांत नाहीं. न्या०रानडे, ना०गोखले न्या०चंदावरकर, कै० गोपाळराव आगरकर, लोकहिवादी, मंडलीक, वगैरे जुन्या पिढीच्या ब्राह्मण पुढाऱ्यांनींच ब्राह्मणेतरांच्या हिताच्या चळवळी प्रथम सुरू केल्या व आजही महत्त्वाच्या व मोठ्या प्रमाणावर चाललेल्या ब्राह्मणेतरांच्या हिताच्या चळवळींत अनेक ब्राह्मण प्रामुख्यानें काम करीत असल्याचें दिसूत येतें. ब्राह्मणांनीं जाणूनबुजून इतर जातीस विद्येंत मागें ठेविलें हा आरोप खोटा असून अनुचित व इतिहासाला विसंगत असा आहे. मराठशाहींत व पेशवाईंत इतर जातींस पांडित्य करावयास लागणारी पुस्तकीविद्या शिकण्याची आवश्यकताही नव्हती व तसें करण्यास आवश्यक असें लोकस्वास्थ्यही नव्हतें. इंग्रजी राज्य झाल्यावर देशी लोकांचे लष्करी व औद्योगिक पेशे संपुष्टांत येऊन स्मशानवत् शांतता झाल्यावर खरडेघाशीचें व पोकळ पांडित्यात्मक विद्या शिकण्याचें काम सुरू झालें.ह्या विद्येचें द्वार सर्वांस सारखें खुलें असतांना गेल्या दीडशें वर्षांत किती ब्राह्मणेतरांनीं त्याचा फायदा घेतला? व त्यांच्यांतील योग्य संख्येनें तो घेतला नसल्यास त्याचा दोष कोणाकडे येतो ? वास्तविक स्थिति अशी आहे कीं, ब्राह्मणांना निर्वाहाचें विद्येशिवाय दुसरें साधनच नसल्यामुळें विद्या शिकावी लागली. ब्राह्मणेतरांना हीं साधनें विपुल व सुलभ असल्यामुळें त्यांना विद्या शिकण्याची जरूरीच भासली नाहीं. फार कशाला, ब्राह्मणेतरांप्रमाणेंच ज्या कांहीं देशस्थ ब्राह्मण कुटुंबास निर्वाहाचीं अन्य साधनें ( जमीनजुमला वगैरे ) उपलब्ध होतीं त्यांतील लोकही विद्येंत मागासलेलेच राहिले व अजून देखील त्या वर्गांत असे लोक पुष्कळ आहेत. आज जे ब्राह्मणेतर ह्या मुद्यावर मोठें आकांडतांडव करतात त्यांनीं तरी आपापल्या जातीपेशां इतर जातींची अशी काय उन्नति केली आहे ? मराठ्यांनीं आपल्या जातीची तरी खरी

उन्नति कितींशी केली आहे? गेल्या पांच वर्षांतील महाराष्ट्रीय ब्राह्मणेतरांच्या चळवळींचा निस्पृहपणें आढावा काढल्यास त्यांनीं ब्राह्मणांची मदत न घेतां केवळ स्वतःच्या हिंमतीवर फारच थोडें कार्य केलें आहे असें आढळून येईल. नाहीं म्हणावयास पांचदहा वर्षांपूर्वी ब्राह्मण-ब्राह्मणेतर सुखासमाधानानें एकत्र वावरत होते त्यांत ब्रह्मद्वेषाचा बिब्वा घालून सामाजिक अस्वास्थ्य व अत्याचारप्रवणता यांचा मात्र सर्वत्र सुळसुळाट करून टाकिला व ह्या द्वेषाच्या बळावरच आपली उन्नति अवलंबून आहे अशी त्यांनीं ब्राह्मणेतर जनतेची समजूत करून दिली! हा कृतघ्नपणा तर खराच; पण त्यांत ब्राह्मणेतरांचा आत्मघातही आहे.

महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतर आत्मोद्धाराच्या भावनेपेक्षां ब्राह्मण द्वेषानेंच कसे विशेष प्रेरित झाले आहेत हें त्यांच्यापैकींच कांहीं जण अलीकडे अलीकडे स्पष्टपणें बोलूं लागले आहेत. अशांपैकींच एकाचा (प्रबोधनकार) उतारा मागील अंकांत 'फुले व छत्रपति' या लेखांत येऊन गेला आहे व आज दुसऱ्या एकाचा पुढें देतों. पुण्याचे वकील एम्. जी. व्होरा हे ता. १२।१२।२३ च्या 'दीनमित्रां'त 'ब्राह्मणेतरांची चळवळ' या सदराखालीं लिहितात कीं:—

"महाराष्ट्रांतील ब्राह्मणेतरांची चळवळ विस्कळित होण्याचीं जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं प्रमुख हें कीं, तिच्या पुढाऱ्यांतील कांहींचें धोरण ब्राह्मणेतरांच्या उन्नतिपेक्षां ब्राह्मण द्वेषावरच अधिक भिस्त ठेवण्याचें आहे. अगदीं आकुंचित विचाराचा, सोंवळा, सरकारच्या बगलेंत

---

१ यासंबंधानें तरुण मराठ्यांचें 'शिवस्मारक' पत्र काय म्हणतें पहाः—

"या सोळा वर्षांच्या अवधींत मराठा समाजांत असा एक तरी पुरुष निर्माण झाला, कीं ज्यानें आत्मसुखाचा यज्ञ केला आहे? असा एक तरी त्यागी दिसला, कीं ज्यानें आपल्या संसारावर अंगार ठेवला? असा एक तरी संन्याशी पुढें आला कां, कीं ज्यानें जनसेवेकरितां आपल्या सुखावर तुळशीपत्र ठेवलें?"—(दीनमित्र पत्राच्या ता. २६।१२।२३ च्या अंकावरून) अर्थात् त्या पत्रकर्त्यासही हें मान्य असल्याचें उघड दिसतें.

शिरणारा व लाळघोट्या स्वजातीय असला तरी तेवढ्याच मुद्यावर त्याचे सर्व दोष गिळावयाचे; आणि उदार विचाराच्या निस्पृह अशा ब्राह्मणासही तो ब्राह्मण आहे एवढ्याच मुद्यावर शिव्या द्यावयाच्या ! +++ या ब्राह्मण द्वेषाच्या जोडीला मराठेतर पुढाऱ्यांचा मत्सर व द्वेष हींही कांहीं प्रमुख मराठी सद्‌गृहस्थांच्या हृदयांत स्थानापन्न झालीं आहेत.” वगैरे.

ब्राह्मणेतरांच्या बाजूचें पुण्याचें ‘ज्ञानप्रकाश’ पत्र म्हणतें:—

अस्पृश्यतानिवारण हा मोठा व मोघम शब्द सोडून त्याच्या तपशिला-कडे बारकाईनें पाहूं लागल्यास “ब्राह्मणेतरां”च्या वतीनें म्हणून बोलणारे रा० बागडे व रा० भाऊराव पाटील वगैरे मंडळी कोणत्या स्वरूपाची आहेत हें चटकन् दिसून येईल. प्रत्येक अनिष्ट प्रकारचा दोष ब्राह्मण जातीवर टाकून स्वतः खाका वर करून मोकळें व्हावयाचें यांतच त्यांचें सर्व अवसान आहे. ++ त्यांना स्वतः ब्राह्मणद्वेषाचा प्रसार करण्यापेक्षां दुसरी कोणतीच कामगिरी करावयाची नाहीं. ++ रा० बागडे व रा० पाटील यांना आमचें हेंच सांगणें आहे कीं, तुम्हीं स्वतःचीं प्रामाणिक मतें असतील तीं लोकांपुढें मांडा व तदनुसार कांहीं वर्तन प्रत्यक्ष करा. परंतु केवळ ब्राह्मणद्वेष पसरविण्याच्या आपल्या महत्त्वा-कांक्षेस बिचाऱ्या अस्पृश्यांचे बळी घेऊं नका ! +++ ते असेंही भासवितात कीं, हे धर्मगुरु जे ब्राह्मण ते अस्पृश्योद्धारास विरोधी असल्या-मुळें बाकीचा ब्राह्मणेतर समाज त्यांचेंच ऐकणार! ब्राह्मणांची आज्ञा इतर कोणत्याही बाबतींत ज्या सत्यशोधकांना आड येत नाहीं, तीच अस्पृश्यो-द्धाराच्या बाबतींत मात्र त्यांना एकाद्या लोखंडी शृंखलेप्रमाणें बंधनकारक होते हें आश्चर्य नव्हे काय? ब्राह्मणसमाजानें अगर ब्राह्मणांतील धर्मगुरूंनीं उद्यां असा जाहीरनामा काढला कीं, “आम्ही ब्राह्मणेतरांचे गुरु नाहीं. त्यांनीं अस्पृश्यांत रोटीबेटी व्यवहार सुरू केला तरी त्यांना आमची हरकत नाहीं” तर मग रा० बागड्यांचे हे ब्राह्मणेतर काय करतील असा त्यांचा तर्क आहे! +++ वास्तविक पाहूं गेल्यास कडू, गोड अगर इतर उच्चनीच भाव मानण्यांत लहानथोर मराठे व तत्सम घराणीं जितका

कर्मठपणा पाळतात तितका तो आज ब्राह्मणजातींतही दिसून येणार नाहीं. हिंदुसमाजसभेंत महार, मांग वगैरे मंडळी येतात, हें पाहतांच त्या सभेचा विटाळही होऊं द्यावयाचा नाहीं हा मराठा राष्ट्रीय संघ, नामदेव शिंपी परिषद्, कासार वगैरे जातींचा बाणा अद्यापि सुटत नाहीं. त्या जातींच्यातर्फे रा० बागडे यांनीं बोलण्याचा आव आणून वेळ मारून नेण्याकरितां वाटेल त्या बाता झोकून द्याव्या, अघळपघळ भाषणें करावीं म्हणजे बाष्कळपणाची कमालच होय! + + + अंत्यज लोकांशीं एका पंक्तीला बसून सहभोजन करण्याची तयारी कित्येक ब्राह्मण सुधारकांनीं सभांतून बोलून दाखविली आहे व त्याप्रमाणें ते करीतही असतात, हें आजपर्यंत झालेल्या अनेक ठिकाणच्या सहभोजनांवरून उघड झालें आहे. परंतु सत्यसमाजाचे पुढारी म्हणून मिरविणाऱ्या किती गृहस्थांनीं छातीठोकपणें सहभोजनांत भाग घेण्याची तयारी दर्शविली आहे? पुण्याचेच महार जातीचे एक पुढारी रा० शि. जा. कांबळे यांनीं सत्यशोधकी पुढाऱ्यांना जाहीर सहभोजनाचें निमंत्रण देऊन त्यांची परीक्षा पाहिली आहे व परीक्षेला हे पुढारी उतरले नाहींत. परंतु यंदाच्या परिषदेंत सातारचे रा० भाऊराव पाटील यांनीं या बाबतींत एक नवीनच शक्कल लढवून अस्पृश्यांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याचा प्रयत्न केला. ते म्हणतातः—"म्हणे काय तर सहभोजन करा! अरे, या ब्राह्मणांना भोजनावांचून दुसरें तिसरें दिसतें आहे काय? जेवण म्हटलें कीं, त्यांचा पाय पुढें! पण आम्हां ब्राह्मणेतरांचे असें मुळींच नाहीं!" रा० भाऊरावांच्या या कोलांटीचें मर्म जरी अंत्यज लोकांपैकीं बहुतेकांच्या लक्षांत आलें नसलें तरी ते अशा लटपटीनें निरंतर फसले जातील असें नाहीं.

### ब्राह्मणद्वेष

हीच या चळवळीची प्रेरकशक्ति (motive-power) असल्यामुळें उलट्या बाहुल्यांच्या डोळस माणसाप्रमाणें त्यांना आपल्या सर्व प्रकारच्या दुःखाचें व अवनतीचें कारण ब्राह्मणच आहेत असा भास होत असतो. परंतु स्वतःच्या अवनतीस कारणीभूत असणारीं अनेक कारणें आहेत व त्यांपैकीं कांहीं स्वतःच्या दोषांतही आहेत याची त्यांस जाणीव होत नाहीं.

कावीळ झालेल्या मनुष्याला पिवळ्या रंगाशिवाय दुसरें कांहीं स्वच्छ दिसतच नाहीं, त्यांतलाच हा प्रकार आहे व तो आत्मघातक आहे. कैकेयीच्या अंगांत कलिसंचार झाल्यावर पूर्वी प्रिय असलेला राम शत्रुवत् भासूं लागला व ती त्याच्यासंबंधानें वाटेल तशी बरळूं लागली. तोच प्रकार कोल्हापुरी ब्रह्मद्वेषाच्या संचारानें महाराष्ट्रांतील व कर्नाटकांतील कित्येक ब्राह्मणेतरांचा झाले'ा आहे. त्यामुळें ब्राह्मण वकील, सावकार, जमीनदार, अधिकारी, भट, कारकून वगैरे चट सारे एकूणएक आपला नाश करणारे सैतान आहेत असं त्यांस वाटूं लागलें आहे! कुळावर खटला काय ते ब्राह्मण जमीनदार व सावकारच भरतात, ब्राह्मणेतर सावकार व जमीनदार अगदीं कानांत तुळशीपत्र घालणारे आहेत, नाहीं काय? ब्राह्मणेतरांना ब्राह्मण अधिकाऱ्यांकडून न्याय कधीं मिळतच नाहीं हें अगदीं सत्यांतलें सत्य ना? ब्राह्मण वकील आपलीं पोटें जाळण्याकरितां कज्जेदलाली वाढवितात आणि ब्राह्मणेतर वकील परोपकारार्थ वकिली करतात, असेंच ना? ब्राह्मणेतर वकिलांच्या परोपकाराचा अनुभव आमच्या वाळवें तालुक्यांत गेल्या दोन वर्षांत सत्यशोधकीय अत्याचाराच्या खटल्यांत ब्राह्मणेतरांस फार चांगला आलेला आहे! अमुक रुपयाला अमक्या वकिलांनीं आमचा गांव बुडविला व 'सत्यसोद'चें सोंग काढून आमची फजिती व बुडवणूक केली अशा तक्रारी खेड्यांतील अडाणी कुणब्यांनीं व इतर जातीच्या लोकांनीं केलेल्या आम्हांस माहीत आहेत. वास्तविक पाहिलें तर कज्जेदलाली वाढविण्याचें काम वकिलांपेक्षां खेड्यापाड्यांतले टगे लोक व पाटील-कुलकर्णी या जातीचे लोकच करीत असतात व ब्राह्मण कुलकर्णी या कामांत जितका प्रवीण असतो तितकाच मराठा पाटीलही असतो. किंबहुना क्रेडिट सोसायट्या निघाल्यापासून अनेक पाटील व साक्षर कुणबी अथवा इतर ब्राह्मणेतर यांची सामाजिक व आर्थिक स्थिति सुधारल्यानें ते ह्या कज्जेदलालीच्या व गांवगुंडीच्या धंद्यांत ब्राह्मणापेक्षांही जास्त पुढें जात चालले आहेत, असें खेड्यांतील परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करणारास आढळून येईल. हीच गोष्ट इतर धंद्यांसही लागू करतां येईल. तात्पर्य हें कीं, कांहीं धंदे व अधिकाराच्या जागा जनतेच्या नुकसानीस कारण होतात; मग त्यांत ब्राह्मण पडला असो किंवा इतर कोणी असो. थोडेसें तारतम्य व सारासार

विचार असल्यास ह्या गोष्टी ब्राह्मणेतरांच्या लक्षांत येण्यासारख्या आहेत; पण वेड घेऊन पेड गांवाला जाण्याचाच जेथें हेतु असतो तेथें त्यांकडे लक्ष कोण देतो ? सुदैवानें सर्वच ब्राह्मणेतर ह्या रोगानें पछाडले नाहींत आणि जे पछाडले आहेत तेही अनुभवांतीं व कालांतरानें शुद्धीवर येतील अशी आमची मनोदेवता आम्हांस सांगत असल्यामुळें आम्ही याविषयीं जास्त कटु लिहूं इच्छीत नाहीं. तथापि जातां, जातां आमच्या ह्या ब्रह्मद्वेषानें भकलेल्या बांधवांस आम्ही अशी प्रेमाची सूचना करितों कीं, त्यांनीं निष्कारण व निखालस ब्रह्मद्वेष माजविण्याचें सोडून आपल्या उन्नतीचीच दृष्टि ठेवून चळवळ केल्यास त्यांचे हेतु अधिक लवकर व अधिक सुलभ रीतीनें सिद्धीस जातील. महाराष्ट्रापेक्षां मद्रास इलाख्यांत ब्राह्मण-ब्राह्मणेतरांत अधिक विषमता आहे; परंतु तिकडील ब्राह्मणेतर चळवळींत सत्यशोधकी चळवळीप्रमाणें द्वेष व अत्याचारप्रवणता दिसून येत नाहीं. आणि त्यामुळेंच त्यांची संघटना इकडील ब्राह्मणेतरांपेक्षां अधिक चांगल्या स्वरूपाची आहे. आजकाल ब्राह्मणेतर जर ब्राह्मणद्वेष न माजवितां आपल्या उन्नतीचेच प्रयत्न प्रामाणिकपणें करूं लागतील तर त्यांत अडथळा करण्याचें सामर्थ्य ब्राह्मणांचें अंगीं मुळींच नाहीं. सत्ता व शहाणपण ह्या दोन्ही बाबतींत ब्राह्मण पंगु आहेत. त्यांना स्वतःची सुधारणा करण्याकडेच प्रथम लक्ष देणें जरूर आहे. दुसऱ्याच्या आड येण्यासारखी आज त्यांची स्थिति नाहीं. व आज ते आपलें धर्मगुरुत्वै अथवा वर्णगुरुत्वही लादण्याचा प्रयत्न करीत नाहींत. तसा प्रयत्न करण्याची त्यांची ताकदच नाहीं. मग वृथा वितंडवाद माजवून समाजांत नसता बखेडा उत्पन्न करण्यापासून ब्राह्मणेतरांचें तरी काय जास्त कल्याण होणार आहे? स्पर्धा व द्वेष यांत फार अंतर आहे. स्पर्धा उपकारक व उन्नतिकारक असते; परंतु द्वेषाचें तसें नाहीं. द्वेष हा उभयपक्षांत नाशाचें बीज पेरण्यास कारणीभूत होतो. ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणांशीं स्पर्धा खुशाल करावी; त्यामुळें ब्राह्मण व ब्राह्मणेतर या दोघांचीही उन्नति होईल; परंतु त्यांनीं एकमेकांचा द्वेष केल्यास उभयतांचीही अवनति होऊन तिसराच त्याचा फायदा घेईल हें ब्राह्मणेतरांच्या जितकें लवकर लक्षांत येईल तितकें बरें.

---

# सत्यसमाजाच्या अध्यक्षाची असत्य वाणी !

[ संपादकीय ]

ब्राह्मणसमाजाचे विरोधी भक्त, सत्यसमाजाचे अध्यक्ष व मुंबई इलाख्याच्या दिवाणगिरीवर आरूढ झालेले मि० जाधव यांची मुंबईच्या 'व्हाइस ऑफ इंडिया' पत्राच्या प्रतिनिधींनें घेतलेली मुलाखत प्रसिद्ध झाली असून त्यांत मि० जाधव यांनीं सत्यसमाजिस्ट लोक सातारा जिल्ह्यांत अत्याचार करतात, ही गोष्ट असत्य असल्याचें बोलून दाखविल्यावरून केसरींत त्यावर टीका आली होती. त्या टीकेस उत्तर देऊन ती खोडसाळ ठरविण्याचा प्रयत्न 'राष्ट्रवीर,' 'दीनमित्र,' वगैरे ब्राह्मणेतर पत्रांतून करण्यांत आला आहे. यासंबंधानें शाब्दिक वाद न करतां मि. जाधव यांचें सदर विधान असत्य ठरविणारा पुरावाच आम्ही पुढें दाखल करितों.

इसलामपूरच्या फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेटनें क्रि. केस नं. २२ ऑफ १९२२ मध्यें केलेल्या निकालांत पुढील वाक्यें आहेत:—

"As regards the motive, it is proved that there exists satya-shodhak samaj at Peth and on account of violence alleged to have been committed a special Head constable and one constable were stationed at pe'h in May last or so. It is alleged by the defence that the aims of the samaj are innocent. No One can find fault with such aims of the samaj but when the ignorant masses join the samaj the innocent attitude is not observed by the ignorant portion and it becomes impatient to bring about the aims and objects at times with violence... In the present Case it is certain that the two innocent mohamadens though Usman their brother was warned by the leaders of the samaj did not relinqu'sh Bhat's land, because, they had to pay a Large sum of rent to the owner of the mala and so they were beaten by some satya-samajists. Accused

No. 1 and No. 2 belong to Satya-samaj......the aim of the offenders was that the two mohamadens should abandon the land of the Bhat and that others should take example not to work Brahmin's lands......It may be noted that though there were huts at some distance, no cultivators went to the hut of the two mohamedens though there was loude cry."

याचा सारांश:—" आरोपींच्या हेतूसंबंधीं पाहतां असें दिसून येतें कीं, पेठेस सत्यसमाजाच्या लोकांकडून गुन्हे होत असल्यामुळें एक हेडकान्स्टेबल व एक शिपाई बंदोबस्ताकरितां ठेविला असल्याचें पुराव्यानें शाबित झालें आहे. सत्यसमाजाचे हेतु निरुपद्रवी आहेत असें आरोपीतर्फे सांगण्यांत आलें आहे. अशा हेतूबद्दल कोणी तक्रार करणार नाहीं; परंतु जेव्हां अडाणी लोक या समाजांत शिरतात तेव्हां त्यांचा निरुपद्रवीपणा कायम रहात नाहीं व कांहींजण उतावळेपणानें समाजाचे हेतु सिद्ध करण्यास्तव अत्याचारास प्रवृत्त होतात. ह्या खटल्यांत दोन गरीब मुसलमानांना, समाजाच्या पुढाऱ्यांकडून त्यांच्या उस्मान नांवाच्या भावास भटाची जमीन सोडण्याबद्दल ताकीद मिळाली असतां ती न सोडल्यामुळें सत्यसमाजिस्टांकडून मार खावा लागला हें निःसंशय खरें आहे. आरोपी नं. १ व २ हे सत्यसमाजिस्ट आहेत. + + + त्यांनीं भटाच्या जमिनी सोडाव्यात व ब्राह्मणांच्या जमिनी केल्यास काय स्थिति होते याचें उदाहरण घालून द्यावें असा ही मारामारी करण्यांत आरोपींचा हेतु होता."

या निकालावर डिस्ट्रिक्ट जजाकडे अपील झालें होतें. त्या कोर्टाच्या निकालांत पुढील वाक्यें आहेत:—

" It was saught to suggest that some other musalmans Yakub and Dadu were at enimity with Lala and Ibrahim and that it might have been they who committed the offence but if that were so there should be no reason why Lala should not have mentioned their names rather than those of the accused against

whom he had no ill-will beyond possibly such as might arise from the fact that they or their friends had tried to dissuade Lala and his brother from cultivating the land of Bramhins. The evidence of all these witnesses agrees upon the point that the assailents numbered some 12-25 and their explanation of the reason for the attack, viz-that they were cultivating the lands of Bramhines, seems in the circumstances, the most likely. I don't think that Lala and Ibrahim up to the time when the former's statement was recorded by the police patil were in a condition to concot a false story and as pertinently remarked by the magistrate that possibility is further discounted by the fact that Ibrahim in his statement to the police admitted that he had been unable to identify his assailants.

I agree with the conclusion arrived at by the magistrate and confirm the convictions and sentences."

याचा सारांशः—"याकूब व दादू यांचें व फिर्यादीचें वांकडें असल्यामुळें त्यांनीं त्यास मारलें असावें असें सुचविण्यांत आलें आहे. पण जर तसें असतें तर लालानें त्यांचीं नांवें सोडून ज्यांच्याशीं त्याचा, त्यांनीं व त्यांच्या मित्रांनीं ब्राह्मणांच्या जमिनी करण्यापासून त्यास परावृत्त केलें यापेक्षां दुसरा कोणताही वांकुडपणाचा संबंध नव्हता, अशांचीं नावें घेतलीं नसतीं. मारामारी करणारे लोक १२ ते २५ पर्यंत असावेत या मुद्यावर सर्व साक्षिदारांची एकवाक्यता असल्याचें दिसून येतें. तसेंच ब्राह्मणांच्या जमिनी केल्यामुळें ही मारामारी झाली असें जें त्यांचें म्हणणें आहे तेंही सर्व परिस्थितीचा विचार करतां पुष्कळ अंशीं खरें ठरतें. लाला व इब्राहिम यांच्या पोलिस पाटलापुढें झालेल्या जबाबांचा व त्यावेळच्या परिस्थितीचा

विचार करितां मॅजिस्ट्रेटनें चातुर्यानें म्हटल्याप्रमाणें या बाबतींत खोटी अथवा बनावट हकीकत सजवून सांगण्यास त्यास अवसरच नव्हता. एकंदरींत मॅजिस्ट्रेटनें या खटल्यासंबंधानें जो निष्कर्ष काढला आहे, तो मला मान्य असल्यामुळें झालेली शिक्षा व गुन्ह्याची शाबिती मी कायम करतों."

सातारा जिल्ह्यांतील पूर्वभागचे सबडिव्हिजनल ऑफिसर मि० हिरेमठ यांच्यापुढें १३ आरोपीवर चॅप्टर केस इ. स. १९२२ अखेर चालली, त्या केसच्या निकालांत पुढील मजकूर आहे: —

"It is alleged that Satya-samajists generally indulged themselves in anti-Brahmine movements which led to ecrtain excesses... the allegations specifically against the accused may for convenience be taken into three groups.

(a) That the accused caused people to strike doing any services to Brahmins such as milkmen supplying milk to Brahmines and Barbers shaving brahmines etc; and,

(b) That they advised people to strike cultivating lands of brahmines and that to enforce the strike they caused thefts of property of brahmines and their tenants, and,

(c) That they indulged in outrages against Brahmines as by assulting them and by damaging their wells.

The accused deny all these allegations against them and attribute them to their differences with Brahmines arising out of their social movement of satyasamaj. They performed their own marriages and other religious rites instead of getting them done by Brahmines, where by the Brahmines feel exasperated at losing their vested rights of social functions. On hearing the evidence for prosecution and for defence, I come to the conclusion that the differences between the two Communities have resulted in certain excesses and that some of the accused are guilty of actively taking part in them.

......I believe that these series of acts of damage to Brahmin's wells to be well founded and true... ..Accused state that the Brahmines broke their own pulleys in order to concot a false case against them...I do not believe these witnesses for the defence, and I do not think that the story of concoction has any truth ...The fact is that the pulleys were damaged and the motive of the accused is stated to be a tit for tat against the Brahmines because they had suspected them to be the cause of spoiling their own water supply. I believe that the **Brahmine Womenfolk were realy troubled by the accused**. Giving a margin to accuracies and other possibilities I leave out those accused who are implicated in not more than a single specific instance and by not more than a single witness "

याचा सारांशः—" आरोपींविरुद्ध करण्यांत आलेल्या तक्रारींचें वर्गीकरण असें:—

(अ) आरोपींनीं ब्राह्मणांविरुद्ध लोकांस संप करावयास लावलें. म्हणजे त्यांना दूध कोणीं घालूं नये, त्यांच्या हजामती न्हाव्यांनीं करूं नयेत, वगैरे प्रकार केले.

(ब) ब्राह्मणांच्या जमिनी कोणी करूं नयेत असें त्यांनीं लोकांस सांगितलें. व त्याचा अंमल व्हावा म्हणून ब्राह्मणांचा व त्यांच्या कुळांचा माल ( पिकें ) चोरून नेण्याचा उपक्रम केला.

(क) त्यांनीं ब्राह्मणांवर हल्ले केले व त्यांच्या विहिरी–आड यांची नासधूस केली.

आरोपी या गोष्टी केल्याचें नाकबूल करतात व ब्राह्मणांना आपण आपलीं धर्मकृत्यें करण्यास बोलावीत नाहीं म्हणून ते चिडल्यामुळें व त्यांच्या आपल्या दरम्यान सामाजिक मतभेद उत्पन्न झाल्यामुळें त्यांनीं आपणांवर सदर आरोप खोडसाळपणानें केले असें आरोपींचें म्हणणें आहे. दोन्ही बाजूंचा पुरावा ऐकून माझें असें मत बनलें आहे कीं, ह्या उभय जातींतल्या लढ्यामुळें गोष्टी विकोपास जाऊन कांहीं बाबतींत अतिरेक झाला व त्यासंबंधानें कांहीं आरोपी अपराधी आहेत. + + + ब्राह्मणांच्या विहिरी–आड यांस इजा करण्याच्या तक्रारी खऱ्या आहेत. + + + ब्राह्मणांनींच आपल्या

आडांचे रहाट पाडले व आमच्यावर खोटी तोहमत घेतली असें आरोपींचें म्हणणें आहे व ते साक्षीदारांमार्फत शाबीत करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे; परंतु हे साक्षीदार खोटें बोलत आहेत असें माझें मत आहे. ब्राह्मणांनीं बनावट किंवा खोटे आरोप केले हें म्हणणें खरें दिसत नाहीं. ब्राह्मणांनीं त्यांच्या झऱ्याचें पाणी घाण केल्याचा संशय आल्यामुळें जशास तसें म्हणून त्या आडाचे रहाट पाडण्यांत आले ही गोष्ट शाबीत झाली आहे. **ब्राह्मणांच्या स्त्रियांना आरोपींनीं त्रास दिला ही गोष्ट मला खरी वाटते.** + + + पुराव्याची अस्पष्टता व इतर गोष्टींची संभाव्यता लक्षांत घेऊन मी एकापेक्षां अधिक गुन्ह्यांत व एकापेक्षां अधिक साक्षीदारांच्या सांगण्यांत ज्यांचीं नांवें आलीं नाहींत त्या आरोपींना वगळून (सोडतो)." (यापुढें जामीन घेतलेल्या आरोपींविषयीं चर्चा आहे.)

याही खटल्यांत डि० मॅजिस्ट्रेटकडे अपील झालें होतें व त्यांनीं उभयपक्षांच्या तक्रारी ऐकून खालच्या कोर्टाचा निकाल कायम केला.

याशिवाय आणखीही कित्येक उदाहरणें देतां येतील. पण स्थलसंकोचास्तव तसें करणें शक्य नाहीं. तथापि आणखी एकदोन त्रोटक उल्लेख करून हें प्रकरण पुरें करितों. सातारा जिल्ह्यांतील वाळवें तालुक्यांत सागांव येथें व तासगांव तालुक्यांतील बुरली, अमणापुर येथें सत्यशोधकी अत्याचारांमुळेंच जादा पोलीस बसविण्यांत आलें आहे व सागांव येथें तें बसूं नये म्हणून मि० जाधव व त्यांचे अनुयायी यांनीं शक्य तितकी कसोशीनें खटपट केली असूनही त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. इतकेंच नव्हे, तर सांगावयाचें अत्याचार इतके स्पष्ट व शरम वाटण्याजोगे होते कीं, त्यांचें परिमार्जन करण्याकरितां त्या भागांतील मि० जाधवांचा पट्ट शिष्य असणाऱ्या एका सब इन्स्पेक्टरला डिपार्टमेंटल शासन करणें वरिष्ठ अधिकाऱ्यांस जरूर वाटलें ! या गोष्टी मि० जाधव यांस माहीत नाहींत असा बहाणा ते करूं शकतील काय ? याखेरीज सोलापूर जिल्ह्यांतील कित्येक खटल्यांत सत्यशोधकांवर अपराध शाबीत होऊन त्यांस शिक्षा झाल्याचीं उदाहरणें सोलापूरच्या कल्पतरूवरून आम्हीं आमच्या गेल्या दोन अंकांत प्रसिद्ध केलीं आहेतच. इतक्या सर्व गोष्टी नजरेपुढें असतां सत्यसमाजाचे लोक अत्याचार मुळींच करीत नाहींत. अत्याचारांची बोंब ब्राह्मण उगाच मारीत

सुटतात असें ठासून सांगणाऱ्या माणसाची गणना कोणत्या कोटींत करावयाची हें ठरविण्याचें काम आम्ही वाचकांवर सोंपवितों! बेळगांवच्या 'वीरा'नें तर असें स्पष्ट विधान केलें आहे कीं, 'सातारा जिल्ह्यांतील कांहीं ब्राह्मण आपल्या शेतांतील खोपट्यास आपणच आग लावून फिर्याद एखाद्या सत्यशोधकावर करतात.' पण यास आधार काय? अशा प्रकारच्या उलट्या काळजाच्या कोट्या अत्याचारप्रवण सत्यशोधक नेहमीं करीत असतात व उपरोक्त चॅप्टरच्या खटल्यांतही रहाट पाडण्यासंबंधानें अशीच कोटी आरोपींनीं केली होती; पण त्याची ब्राह्मणेतर मॅजिस्ट्रेटनेंच काय वाट लावली तें पाहिलें असतां 'चोरांच्या उलट्या बोंबा' पैकींच हा प्रकार असतो याविषयीं समंजस मनुष्याची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. 'सागांव', बुरली, अमणापूर, कासेगांव, चरण व इतरत्र ब्राह्मणांचीं हजारों रुपयांचीं घरें व वाडे या अत्याचारांमुळें जळालीं तीं सर्व सत्यशोधकांचें नांव बद्द करण्याकरितां ब्राह्मणांनींच आपणं होऊन जाळलीं काय? कित्येक ठिकाणचीं मणोगणती पिकें कापून अगर गुराला चारून टाकलीं गेलीं तीं देखील ब्राह्मणी कारस्थानेंच काय? असल्या उरफाट्या कल्पना उराशीं बाळगून किंवा त्यांचा प्रसार करून क्षणभर ब्राह्मणसमाजाची नालस्ती करण्याचें समाधान जरी कित्येकांस लाभत असलें तरी त्यापासून ब्राह्मणेतरांचा खरा फायदा होणें शक्य नाहीं. उलट त्यायोगानें त्यांचें नैतिक अधःपतन होण्यास मात्र मदत होईल व त्याचा परिणाम आज नाहीं उद्यां तरी त्या समाजास खास भोगावा लागेल. ब्राह्मणांचें दौर्बल्य, अधिकाऱ्यांची सहानुभूति व जनतेचें अज्ञान या कारणांमुळें आज जरी त्यांचें हें धोरण त्यांना तापदायक झालें नाहीं तरी हीं कारणें सृष्टीच्या नैसर्गिक नियमास कायमचा अडथळा करूं शकणार नाहींत हें सत्यशोधकांच्या जहाल पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें.

---

# म० जोतिबा आणि राजर्षि शाहू महाराज.

[ लेखकः—एक सुधारक ब्राह्मण.]

भगवान् श्रीकृष्ण व गौतमबुद्ध यांच्या काळापासून आतांपर्यंत हिंदुस्थानांत अनेक धर्मसुधारक होऊन गेलेले आहेत; व पुढेंही होतील; परंतु म. जोतिबा आणि राजर्षि शाहू महाराज यांच्यासारखी गुरु—शिष्याची जोडी अद्यापि निर्माण झाली नाहीं व पुढेंही होईल असें वाटत नाहीं. पौरस्त्य किंवा पाश्चात्य उच्च शिक्षणाचा गंधही नसलेले सत्यसमाजाचे आद्य प्रस्थापक म० जोतिबा फुले आणि लो० टिळक व म० गांधी यांनीं चालविलेल्या स्वराज्याच्या चळवळीच्या मार्गांत शक्य तितके अडथळे उत्पन्न करणारे, कारस्थानी व स्वार्थी ताराबाईचे पाताळयंत्री वंशज, राजर्षि शाहू महाराज यांचा अपूर्व संगम झाल्यावर आर्यसंस्कृतीच्या आणि स्वराज्याच्या चळवळीच्या जिवावर उठणारे अनेक डफ तुणतुणेंवाले खंदे वीर महाराष्ट्रांत पसरावेत आणि त्यांच्या निरर्गल प्रलापांना आणि अमर्याद अत्याचारांना, विचार आणि आचारस्वातंत्र्याच्या भपकेदार नांवाखालीं आमच्या परधर्मी व परदेशीय प्रभूंनीं हवा तितका अवकाश द्यावा, हें सर्व साहजिकच आहे. जातिभेद नष्ट करण्याचें सोंग करून जातिमत्सराची ज्योत प्रज्वलित करणारे, सुधारक लोकांतही ब्राह्मण ब्राह्मणेतर ही भावना जागृत करणारे आणि अभद्र शब्दांनीं धर्मसुधारणेची द्वाही फिरविणारे सदरहू गुरुशिष्य व त्यांच्या अनुचरांचा सांप्रदाय थोड्याच काळांत नामशेष होणार हेंही भविष्य वर्तविण्यास एखाद्या मोठ्या ज्योतिष्याची जरूरी आहे असें मुळींच नाहीं. तथापि त्यांच्या स्वरूपाचें आविष्करण करण्याचें कार्य सध्याच्या परिस्थितींत अवश्य झालेलें आहे व तें या पत्रांत दोन तीन लेख लिहून करण्याचें प्रस्तुत लेखकानें ठरविलेलें आहे.

धर्म म्हणजे काय व त्याची सुधारणा कशी करावयाची याविषयीं गाढ अंधकारांत चांचपडणाऱ्या जोतिराव फुल्यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ

सत्यशोधकसमाजाचा वेदग्रंथ आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांतील पुढील उतारा वाचल्यास या महात्म्याच्या भारतीय इतिहासाच्या ज्ञानाची अगाधता ध्यानांत येईल !

"विचाराअंतीं असें ठरतें कीं, ब्राह्मणलोक हे समुद्राचे पलीकडे जो इराण देश त्या देशांतील मूळचे राहणारे होत. पूर्वी त्यास इराणी अथवा आर्यलोक म्हणत असत असें कित्येक इंग्लिश ग्रंथकारांनीं त्यांच्याच ग्रंथावरून सिद्ध केलें आहे...वामनाच्या मागून आर्यलोकांचा ब्रह्मा या नांवाचा मुख्य अधिकारी झाला. त्याचा स्वभाव फार हट्टी होता. त्यानें आपल्या मूळ पूर्वजांस रणांगणीं जिंकून आपले दास केलें व आपले लोक आणि हे दास यांमध्यें हमेशा भेद रहावा म्हणून त्यानें अनेक तऱ्हेचे नेम बांधले. ब्रह्मा मेल्यानंतर आर्यलोकांच्या मूळच्या नांवाचा लोप होऊन त्यांचें नांव ब्राह्मण पडलें. ब्रह्मयानें बांधलेल्या नेमांचा धिक्कार पुढें कोणीं करूं नये, याकरितां मनूसारखे मागाहून अधिकारी झाले त्यांनीं ब्रह्मयाविषयीं अनेक कल्पित गोष्टी रचिल्या." यांत पहिली गोष्ट अशी गृहीत धरण्यांत आली आहे कीं, सर्व आर्य हे ब्राह्मणच होते. क्षत्रिय व वैश्य हे आर्यच आहेत याची मुळींच जाणीव या महात्म्यांना नाहीं. क्षत्रियासंबंधीं हे महात्मे पुढें लिहितात, "येथील मूळचे रहिवासी जे क्षत्रिय लोक त्याजबरोबर भट लोकांचा मुख्य अधिकारी जो परशुराम त्यानें किती क्रूरपणाचें वर्तन केलें हें या ग्रंथांत पुढें दाखविलेंच आहे." सारांश, क्षत्रिय हे मूळचे अनार्य आणि ब्राह्मण हे इराणांतून आलेले आर्य, या ऐतिहासिक सत्याच्या आधारावर म० जोतीबांच्या सत्यशोधकसमाजाची भव्य इमारत रचलेली आहे; आणि याच असत्य मतांच्या प्रसारार्थ त्यांचे शिष्यवर राजर्षि शाहू महाराज यांनीं स्वतःच्या खर्चानें किंवा प्रजेच्या पैशानें गांवोगांवीं तमाशे उभारले. म० जोतिबांच्या माहात्म्याची कथा येथेंच संपवून कोल्हापूरच्या राजर्षींच्या मताचा व चारित्र्याचा थोडा विचार करूं.

कोल्हापूरचे शाहू छत्रपति यांची सामाजिक किंवा धार्मिक मतें काय होतीं, याचा अद्यापि कोणालाच ठाव लागलेला नाहीं किंबहुना सुव्यवस्थित मतें बनविण्याइतकी विद्वत्ताही त्यांचे अंगीं होती किंवा नाहीं

याची वानवाच आहे. यांच्या अनुचरांनीं त्यांना बहाल केलेल्या राजर्षि या पदवीस उचित असें त्यांचें खाजगी चारित्र्य होतें किंवा कसें हें सर्व महाराष्ट्राला विदितच असल्यामुळें त्यांच्या सार्वजनिक चारित्र्याचाच विचार येथें करावयाचा आहे. शाहू महाराज हे आपणांस सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते म्हणवीत असत; तथापि त्यांचा जातिदुरभिमान इतका प्रखर होता कीं, महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध सुधारक व देशभक्त रानडे, आगरकर हे केवळ ब्राह्मण म्हणून त्यांचें अनुयायित्व न पत्करतां त्यांनीं जोतिबा फुले यांनाच महात्मा बनवून त्यांच्या सत्यशोधक समाजाचा प्रसार सर्वत्र करण्याचा विडा उचलला. या महात्म्यानीं जरी "क्षत्रिय हे अनार्य आहेत" व "महारमांगाचे व आपले पूर्वज एकाच वंशांतील" असलीं विधानें आपल्या स्मृतींत केलेलीं आहेत, तरी क्षत्रिय हे आर्य आहेत, व आपण क्षत्रिय आहोंत व म्हणून आपले धर्मविधि वेदोक्त पद्धतीनें व्हावेत याबद्दल शाहू महाराजांनीं पुष्कळ चळवळी केल्या होत्या; परंतु त्यांत त्यांना यश न आल्यामुळें त्यांनीं जातिभेद मोडूं इच्छिणाऱ्या जोतीबांच्या सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करण्याचें ठरविलें. तथापि त्यांचें खरें प्रेम फक्त क्षत्रिय जातीवर किंबहुना स्वतःवरच होतें असें म्हणण्यास पुष्कळ आधार आहे. त्यांनीं वेदोक्त प्रकरणाच्या मिषानें केलेला धुडगूस, संकेश्वराच्या मठांतील गादीसंबंधानें उत्पन्न केलेला वाद, कोल्हापुरास नवीन निर्माण केलेलें जगद्गुरूचें पीठ, क्षात्र जगद्गुरूचें माजविलेलें स्तोम, शिक्षणप्रसाराचें आणि अस्पृश्यतानिवारणाचें माजविलेलें अवडंबर या सर्वांचा विचार केला असतां त्यांच्या अनुयायांनीं ब्रिटिश मुलखांत माजविलेली पुंडाई फारशी आश्चर्यकारक मानण्याचें कारण नाहीं. त्यांच्या सर्व कृत्यांत ब्राह्मणद्वेष आणि स्वराज्यद्रोह यांशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. सत्यशोधकांच्या पुंडाईची सत्यता आतां सर्वांस पटली असून जोतीराव फुले यांचे एक चहाते प्रबोधनकार यांनीं आपल्या पत्रांत सत्यशोधक गुंडांच्या अत्याचारांची कबुलीच दिलेली आहे. ते तारीख १६ नवंबरच्या आपल्या अंकांत म्हणतातः—

Consequently hundreds of vagabonds with the mask of Satyashodhak commenced their devil dance throughout the Deccan......Down with Brahmins was and still is their motto, no matter what the tennets of Samaj may be. Naturally this movement got wild and reports of atrocities committed on the Brahmins by the Satyashodhak Samajists began to flood the newspaper colomns.

अर्थः—" यामुळें सत्यशोधक या नांवानें सर्व दक्षिणेंत शेकडों गुंडांनीं आपला राक्षसी धिंगाणा सुरू केला. समाजाचीं तत्त्वें कांहींही असलीं तरी "ब्राह्मणांचा विध्वंस करा" एवढें एकच त्यांचें ब्रीदवाक्य होतें व अद्यापि आहे. साहजिकपणेंच ही चळवळ भडकली आणि सत्यशोधकांनीं ब्राह्मणांवर केलेल्या अत्याचारांच्या बातम्यांनीं वर्तमानपत्राचे रकानेच्या रकाने भरून जाऊं लागले." यानंतर प्रबोधनकारांनीं पुढील वाक्यांत केलेलें शाहू महाराजांच्या नीतिधैर्याचें वर्णन फारच वाचनीय आहे.

" In about a year or so, Shahu realised the consequences of this, and *in order to save his skin* made a public declaration to the effect that he never belonged to the Satyashodhak Party and refused to bear any relations to that movement. This declaration was translated by many people in many shades of meanings; but it is an open secret that it has made very little impression on the activities of the Samajists. Whatever may be the truth, it is a plain fact that this declaration was merely a political necessity.

अर्थः—" एक दोन वर्षांतच शाहू महाराजांना या चळवळीचे परिणाम दिसूं लागले आणि म्हणून **आपली कातडी बचावण्यासाठीं** आपण कधींच सत्यशोधक पक्षांत नव्हतों व त्या चळवळीशीं कोणताही संबंध ठेवण्याचें नाकारलें होतें, असें त्यांनीं जाहीर केलें. यांतील सत्य कांहींही असो, राजकीय कारणामुळें असें जाहीर करणें त्यांना भाग पडलें हें गुपित सर्वश्रुत आहे." जोतिराव फुले आणि शाहू महाराज यांच्या चहात्या प्रबोधनकारांच्या कलमांतून उतरलेलीं वरील वाक्यें वांचलीं असतां राजर्षि शाहू महाराज यांचें धैर्य, सत्यप्रियता, आणि अनुयायांवरील निष्ठा हीं

उत्तमप्रकारें मनावर बिंबणार आहेत! असल्या राजाला राजर्षीचा मान देण्याइतकी अवनत स्थिति आपल्यांतील कांहीं लोकांना तरी आलेली पाहून कोणा सुविचारी मनुष्याच्या अंतःकरणाला वेदना होणार नाहींत? असो. म० जोतिबा यांनीं अज्ञानामुळें म्हणा किंवा जाणूनबुजून म्हणा ज्या असत्य इतिहासाच्या आधारावर आपली 'गुलामगिरी' ही स्मृति लिहिली, कोल्हापुरच्या विद्वान् आश्रितांनीं जे नवे नवे ऐतिहासिक शोध लावले व त्यावरून भारतीय इतिहासाला जें विकृत स्वरूप दिलें, त्या बीजापासून अत्याचार, जातिमत्सर आणि राष्ट्रद्रोह हींच फळें धारण करणारा वृक्ष निर्माण होणें साहजिक होतें व त्या विषवृक्षाचें निर्मूलन करण्यास मूळें कुठारच घालणें अवश्य आहे, असें प्रस्तुत लेखकाचें ठाम मत झालेलें आहे जोतिबांनीं ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामधील तंटयांना आर्य आणि अनार्य यांच्यांतील तंटयाचें स्वरूप दिलेलें आहे तर त्याच तंटयाला शाहूमहाराजांच्या पदरच्या विद्वद्रत्नांनीं जातिभेद मोडणाऱ्या व जातिभेद वाढविणाऱ्या पक्षांतील तंटयाचें स्वरूप दिलेलें आहे. ब्राह्मणांनीं स्वार्थबुद्धीनें जातिभेद निर्माण केला, अनेक पौराणिक कथा रचल्या व क्षत्रियांनीं तो भेद मोडून सर्वांना समानतेनें वागविण्याचे प्रयत्न केले, याकरतां ब्राह्मण तितके स्वार्थी व क्षत्रिय तेवढे परोपकारी व क्षत्रियांनींच लोकांचें खरें कल्याण केलें, या मतावर कोल्हापूरच्या राजर्षींच्या सांप्रदायाची सर्व मदार आहे. परन्तु ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामधील तंटयाचें हें स्वरूप केवळ काल्पनिक आहे. भारतीय संस्कृतींतील रहस्य मुळींच न कळणाऱ्या मिशनऱ्यांच्या मतांवरून वरील तत्त्वें घेतलीं गेलेलीं आहेत. प्राचीन ब्राह्मण ऋषि हेच खरे लोकहितदक्ष लोकनायक होते. यांनीं राजांशीं केलेले तंटे लोकहितार्थच केलेले होते. राजानें प्रजेवर कसें राज्य करावें, कोणते कर बसवावेत, कोणते कायदे करावेत, हें ठरवून देण्याचें सध्यांच्या काळांतील कायदेमंडळाचें कार्य ते करीत होते. त्यांनीं स्वतःला राज्य मिळावें म्हणून राजांशीं तंटे केलेले नाहींत; तर अधर्मानें वागणाऱ्या वेनराजासारख्या जुलमी क्षत्रियांचा वध करून त्यांच्या वंशजांनाच त्यांनीं गादीवर बसविलें आहे. कायदे करणें व त्यांची अंमलबजावणी करणें हीं कामें अनुक्रमें ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांत वाटलीं जावींत व तीं एकाच्या हातीं असूं नयेत हें लोकशाहीचें उच्च तत्त्व भारतीय

संस्कृतींत बीजरूपानें दिसून येतें. इतकेंच नाहीं तर आपल्या प्राचीन ऋषिकालिन ब्राह्मणांच्या संस्थेवरून अर्वाचीन पाश्चात्यांनाही शिकण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. दे० भ० लाला लजपतराय यांनीं आपल्या युनायटेड स्टेटस् ऑफ् अमेरिका या ग्रंथांत प्राचीन ब्राह्मणांसंबंधीं पुढील उद्गार काढले आहेतः—

"The world has yet to produce a class of high-minded, noble spirited, selfdenying and unselfish leaders of society such as the Brahmins were The democracies of the West know it to their cost how hard it is to get laws made which would secure them justice and protection against the blood sucking and soul killing devices of the capitalist. They have yet to discover that the legislators of a nation should be men, who have no interest in property, in trade, in business, in capitalism or in industries. No comparison can be instituted between the Brahmin Legislators of ancient India and the capitalist legislators of the modern world."

अर्थः—" प्राचीन ब्राह्मणवर्गासारखा उच्च विचारांचा, उदार अंतःकरणाचा, स्वार्थत्यागी व निःस्वार्थी लोकनायकांचा वर्ग अद्याप जगांत कोठेंही निर्माण झालेला नाहीं. भांडवलवाल्या लोकांच्या डावपेंचांतून मुक्त करणारे, न्यायी कायदे करणें किती कठीण आहे, ही गोष्ट पाश्चात्य लोकसत्ताक राज्यांनाही स्वानुभवानें कळून आली आहे. राष्ट्रांतील कायदे करणारे लोक संपत्ति, व्यापार, धंदे, कारखाने व भांडवलशाही यांत गुरफटलेले असतां कामा नयेत, या तत्त्वाचा शोध त्यांना अद्यापि लागावयाचा आहे. प्राचीन भारतवर्षांतील लोकांना धर्मबंधनें घालून देणारे ब्राह्मण शास्त्रकार आणि सध्यांच्या काळांतील भांडवलवाले कायदेकार यांची तुलना करणें देखील अशक्य आहे."

दे० भ० लाला लजपतराय हे जातीनें क्षत्रिय आहेत. शिवाय ते प्रख्यात समाजसुधारक असून चातुर्वर्ण्य केवळ जन्मावर अवलंबून नसावें, सर्व वर्णांतील लोकांना समतेनें वागविलें जावें, वगैरे त्यांचीं मतें सर्वश्रुत आहेत; तथापि भारतीय इतिहासाकडे व चातुर्वर्ण्यसंस्थेकडे पाहण्याची

त्यांची दृष्टि किती व्यापक आहे, हें पाहिल्यास स्वतंत्र विचाराचे राष्ट्रीय पुढारी आणि जातिमत्सरानें ग्रस्त झालेला अज्ञानी जोतिबा फुले व स्वार्थ-साधू शाहूमहाराज यांतील अंतर स्पष्टपणें डोळ्यांपुढें उभें राहतें. भारतीय इतिहासाप्रमाणेंच युरोपियन इतिहासाकडे पाहण्याची ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची दृष्टि कशी चुकीची आहे व युरोपियन सुधारणेच्या अर्वाचीन इतिहासापासून आपण काय धडा घ्यावा, याचा विचार पुढील लेखांत करूं.

---

## [ लेखांक २ रा. ]

युरोपियन इतिहासाचें अध्ययन या देशांत सुरू होऊन त्यांच्या संस्कृतीशीं येथील विद्वान् लोकांचा परिचय होऊं लागल्यापासून आपल्या सामाजिक व धार्मिक विचारांना बरेंच चालन मिळालें आहे व तदनुसार धार्मिक व सामाजिक सुधारणेचे अनेक प्रयत्न चाललेले आहेत. या कार्याकरितां अनेक समाजही स्थापन झालेले आहेत. परंतु म० जोतिबांच्या सत्य-शोधकसमाजाला राजर्षि शाहूमहाराजांनीं हातभार लावण्यापूर्वीं या सामाजिक व धार्मिक विचारांना सुधारणांच्या चळवळीपासून मारामाऱ्या व दंगेधोपे झाल्याचें कधीं ऐकूं येत नव्हतें. याचें कारण काय असावें, हा विचार करीत असतां, सत्यशोधक समाजाच्या आद्यप्रस्थापकाचा वेदग्रंथ 'गुलामगिरी' हा आमच्या पाहण्यांत आला व त्यांतील ऐतिहासिक असत्याच्या पायावर उभारलेली मूढ विचारसरणीची भव्य इमारत पाहून वरील प्रश्नाचा पूर्णपणें उलगडा झाला. म० जोतिबांचा सत्यशोधक समाज आणि राजर्षि शाहूमहाराज यांचा ब्राह्मणेतरपक्ष यांची स्थापना होण्यापूर्वीं सामाजिक वर्गद्वेषाच्या साहाय्यानें समाजसुधारणा करण्याचे प्रयत्न येथें कोणींही केले नव्हते. युरोपांत असे प्रयत्न झालेले आहेत व त्यांचीं कडु फळें तेथील लोकांनीं वाटेल तितकीं चाखलेलीं आहेत. यामुळें तेथील विचारी लोकांनाही, वर्गद्वेषाला चेतना देऊन समाजसुधारणा करण्याचा मार्ग अनर्थावह आहे असें आतां वाटूं लागलें आहे. यासंबंधीं फिलिप स्नोडन हे आपल्या 'सोशॅलिझम् व सिंडिकॅलिझम्' या नांवाच्या पुस्तकांत म्हणतातः—

"The preaching of this doctrine of the class war keeps alive and excites that very spirit of sectionalism and hatred which prevents men from realising that in the highest sense the interest of each is the interest of all."

सारांशः—" वर्गद्वेषाच्या तत्त्वांचा प्रसार करण्यामुळें समाजांतील संकुचित वृत्ति व द्वेषबुद्धि, या जागृत राहून त्यांना चेतना मिळते व यामुळेंच सर्वांचें हित, तेंच प्रत्येकाचें हित हें तत्त्व लोकांना पटत नाहीं." आजपर्यंत जातीजातींतील मत्सर नष्ट करण्यास वर्गद्वेषाचें औषध हिंदुस्थानांत योजिलें नसलें तरी सत्यशोधकांनीं व ब्राह्मणेतर पक्षानें, त्या मार्गाचा अवलंब केला असल्यामुळें युरोपांत या मार्गानें गेलेले लोक कसे खड्ड्यांत पडले आहेत याची अगदीं संक्षिप्त माहिती जनतेच्या हिताकरितां आणि ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे डोळे उघडावे म्हणून, या लेखांत देण्याचें योजिलें आहे.

अर्वाचीन युरोपियन सुधारणेचा प्रारंभ ल्यूथरनें केलेल्या धर्मसुधारणेपासून झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. मार्टिन ल्यूथर यानें धार्मिक जुलमांतून जनतेला सोडवून स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें, प्रथम जर्मनींत पोपविरुद्ध बंड उभारलें. या कामीं त्यानें तेथील सरदार–जहागिरदारांचें साहाय्य घेतलें होतें. हळूहळू या बंडाला केवळ वर्गद्वेषाचें स्वरूप प्राप्त झालें. पोपच्या धार्मिक वर्चस्वाचा अंत करण्यांत सरदार–जहागिरदारांचा स्वार्थी हेतु होता आणि पोपची सत्ता झुगारून दिल्यानंतर त्यांनीं जनतेच्या हिताची यत्किंचितही परवा न करतां आपला अनियंत्रित कारभार आणि जुलमी अंमल यथापूर्व चालू ठेवला. आपल्या देशांतील धर्माधिकारी आपल्या सत्तेखालीं आणल्यानंतर जनतेच्या हिताचें त्यांना पूर्ण विस्मरण झालें हें पाहून शेतकरी लोकांनीं बंड केलें, पण त्यावेळीं ल्यूथरनें शेतकऱ्यांना दगा दिला आणि तो सरदारवर्गास मिळाला. ल्यूथरच्या पडत्या फळाच्या आज्ञेचा आधार घेऊन जर्मनींतील सरदारांनीं शेतकऱ्यांचें बंड तलवारीच्या जोरावर मोडून टाकलें, हजारों लोकांना ठार मारलें आणि शेतकऱ्यांची स्थिति पूर्वींपेक्षांही अधिक कष्टावह केली. ल्यूथरनें केलेल्या धर्मसुधारणेपासून शेतकरी लोकांचें खरें हित कांहींही न होतां पोपच्या जुलमाऐवजीं राजांच्या जुलमाखालीं लोकांना मान वांकवावी

लागली आणि पूर्वीचा धर्माधिकाऱ्यांचा जुलूम बरा असें म्हणण्याची पाळी आली!

वरील शेतकऱ्यांच्या बंडाचें व त्यानंतरच्या त्यांच्या कष्टावह स्थितीचें वर्णन रॉबिन्सन आणि ब्रेस्टेड यांच्या युरोपियन इतिहासांत केलें आहे. त्याचा सारांश वाचकांकरितां पुढें दिला आहे.

"आतांपर्यंत सुधारणेची भाषा रेलचेल ऐकूं येत होती; परंतु अद्यापपर्यंत प्रत्यक्ष असें कांहीं करण्यांत आलें नव्हतें. सुधारकांच्या निरनिराळ्या वर्गांतील भेद स्पष्ट झाला नव्हता, धर्मव्यवस्था सुधारण्यासाठीं कांहींतरी केलें पाहिजे एवढें सर्वांना मान्य होतें, परंतु सुधारकांतील निरनिराळ्या वर्गांचे हेतु किती भिन्न होते याची जाणीव फारच थोड्यांना होती. राजे व जहागिरदार यांनीं ल्यूथरचा उपदेश ऐकला, याचें कारण धर्मपीठाचें उत्पन्न जप्त करण्यास आणि आपल्या देशांतील रोमच्या पोपकडे जाणारें द्रव्य बंद करण्यास त्यांना कांहींतरी सबब हवी होती. शेतकरी लोक ल्यूथरचा उपदेश ऐकत होते, याचें कारण ल्यूथरनें त्यांना बायबल दिलें होतें व जहागिरदार लोकांना आजपर्यंत देत असलेले कर द्यावेत, असें त्यांना त्यांत कोठेंही सांपडलें नाहीं.

वॉर्टबर्गमध्यें ल्यूथर बायबलचें भाषांतर करीत असतां, लोकांनीं त्याचा उपदेश आचरणांत आणण्यास सुरवात केली. जोगिणी व जोगी हे आपले मठ सोडून जाऊं लागले. त्यांपैकीं कांहींनीं तर विवाहही केले. ही गोष्ट पूर्वपद्धतीच्या लोकांना अत्यंत गर्ह्य वाटली. विद्यार्थी व इतर नागरिक यांनीं धर्ममंदिरांतील साधुसंतांच्या मूर्ति फोडून टाकल्या आणि कॅथॉलिक धर्मविधींना विरोध करण्यास सुरवात केली.

इतक्या घाईनें आणि अत्याचारानें केलेल्या सुधारणा ल्यूथरला पसंत पडल्या नाहींत; म्हणून त्यांस विरोध करण्यासाठीं तो बाहेर पडला. त्यानें विटेनबर्ग येथें बरींच व्याख्यानें देऊन, धर्मोपदेश व धर्मविधि यांत जे फेरबदल करावयाचे, ते सरकारमार्फत केले गेले पाहिजेत व ते लोकांनीं करूं नयेत; हें तत्त्व पुढें मांडलें." —पान ५९७.

यानंतर १५२५ मध्यें शेतकऱ्यांनीं बंड केलें, त्यासंबंधीं पुढील हकीकत वाचावी:—

" जर्मन जहागिरदारांनीं ल्यूथरचा उपदेश भयंकर स्वरूपांत शब्दशः अमलांत आणला, आणि त्यांनीं शेतकऱ्यांवर निष्ठुरपणें सूड घेतला. १५२५ च्या उन्हाळ्यांत त्यांच्या पुढाऱ्याचा पराभव करून त्याला ठार केलें, आणि एकंदर दहा हजार शेतकऱ्यांना यमसदनास पाठविण्यांत आलें, असा अंदाज आहे ! जहागिरदार व जमीनदार यांपैकीं फारच थोड्यांनीं आपल्या प्रदेशांत सुधारणा केल्या. द्रव्यनाश आणि निराशा यांमुळें शेतकऱ्यांवर कोसळलेल्या आपत्तींची कल्पनाही करणें शक्य नाहीं. सुधारणेचें तत्त्व आपल्या हिताचें नाहीं असा निष्कर्ष काढून ते ल्यूथरला डॉ० लिगर म्हणजे लुच्चा म्हणूं लागले. जमीनदारांचा जुना भार कोणत्याही प्रकारें कमी झाला नाहीं. या बंडानंतर शेंकडों वर्षेंपर्यंत शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याऐवजीं अधिकच कष्टावह झाली." —पान ५९९.

तात्पर्य, ल्यूथरनें धर्मसुधारणा करतांना वर्गद्वेषाचें बीज पेरलें व त्यामुळें खरी सुधारणा झाली नाहीं. सामान्य जनतेची स्थिति सुधारण्याऐवजीं ती अधिकच हीन झाली. त्यांत जर कोणाचें हित झालें असेल, तर तें कोल्हापूरच्या राजर्षिप्रमाणें जे जहागीरदार व राजे सुधारणेच्या कामांत पडले त्यांचें झालें, आणि गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांना मृत्युमुखीं पडावें लागलें. रोम येथील जगद्गुरु पोप याची सत्ता नष्ट होऊन ती राजांच्या हातीं आली. धर्माधिकारी हे राजांचे सेवक झाले आणि समाजांतील भटजींचें वर्चस्व नष्ट होऊन क्षत्रियांचा जुलूम सुरू झाला.

हा क्षत्रियांचा जुलूम नष्ट करण्यासाठीं पुनः अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रेंच राज्यक्रांतीचें होमकुंड पेटलें व त्यांत राजाराणींच्या आहुति देण्यांत आल्या. तरीही या कुंडांतील ज्वाला वर्गद्वेषाच्या वाऱ्यानेंच प्रज्वलित केली असल्यामुळें पुनः वैश्यवर्गाचा जुलूम लोकांवर सुरू झाला, हें भांडवलशाहीच्या गेल्या शतकांतील लोकांच्या इतिहासावरून स्पष्टपणें दृष्टीस पडत आहेच. यानंतर रशियांत सध्यां वैश्यशाहीचा अंत करून बोल्शेविझमच्या नांवानें शूद्रशाही स्थापन करण्यांत आली आहे. तिचीही कटु फलें लवकरच लोकनिदर्शनास आल्याशिवाय राहणार नाहींत. तात्पर्य, युरोपांतील कोणत्याही देशाची सामाजिक स्थिति अद्यापि स्पृहणीय अशी झालेली नाहीं; व त्याचें जर एक मुख्य कारण असेल तर तेथील लोकांनीं

आजपर्यंत ज्या ज्या समाजसुधारणा किंवा राजकीय सुधारणा अमलांत आणल्या, त्या खालच्या वर्गांत स्वार्थबुद्धि आणि द्वेषबुद्धि जागृत करूनच अमलांत आणलेल्या आहेत, हेंच देतां येईल. या मार्गानें खरी सुधारणा कधींही होणें शक्य नाहीं. हाच धडा युरोपच्या अर्वाचीन इतिहासावरून आमच्या सुधारकांनीं व लोकांनीं शिकला पाहिजे.'

ऐहिक सुखांची वृद्धि करणें हेंच मनुष्यमात्राचें ध्येय आहे, असें समजून ज्या त्या व्यक्तीनें व सामाजिक वर्गानें आपापल्या हक्कांचाच विचार करावा, असल्या विचारसरणीचा अवलंब करण्यानें खरी सुधारणा कशी दूर पळत जाते, याचें प्रत्यंतर युरोपचा गेल्या तीन चार शतकांचा इतिहास उत्तम प्रकारें पटवून देत आहे. या काळांत युरोपांत पुष्कळ सुधारक निघाले; स्वातंत्र्य, समता व बंधुता यांसारख्या उच्च तत्त्वांचा जयघोष अनेक वेळां करण्यांत आला, सामान्य लोकांनीं वेळोवेळीं असामान्य धैर्याचीं कृत्यें करून जुलमाचा अंत करण्याचे अनेक प्रयत्न केले आणि तसें करतांना कांहीं व्यक्तींनीं अतुल स्वार्थत्याग केला; या सर्व गोष्टी खऱ्या आहेत व त्यांपासून आम्हांला शिकण्यासारख्या पुष्कळ गोष्टी आहेत; परंतु ऐहिक सुखोपभोग हेंच मनुष्यमात्राचें ध्येय आहे, हें त्यांचें तत्त्वज्ञान चुकीचें आहे व वर्गद्वेषाच्या साहाय्यानें सुधारणा करण्याचा त्यांचा मार्गही चुकीचा आहे, यामुळें युरोपांतील कोणत्याही देशाची सामाजिक स्थिति अद्यापि चांगली झालेली नाहीं. युरोपियन लोकांच्या वरील ढोबळ चुकीचेंच अनुकरण आमच्या इकडे सत्यशोधक व ब्राह्मणेतर लोकांनीं चालविलें आहे.

येथील ब्राह्मणेतरपक्षानें भटशाहीच्या जाचांतून जनतेला सोडविण्याचा विडा उचललेला आहे असें सांगण्यांत येतें. पण हें कार्य करतांना 'ब्राह्मणेतर' हें जातिभेदसूचक नांव घेऊन सररहा ब्राह्मणांबद्दल द्वेष उत्पन्न करण्याचा प्रयत्न केल्यानें तो पक्ष कोणतें देशहित साधणार आहे, हें त्याचें त्यासच माहीत! युरोपांत जेव्हां भटशाही होती तेव्हां तिला शस्त्राचें व द्रव्याचें बल होतें. यामुळें कदाचित् तेथील धर्मसुधारकांना वर्गद्वेषाची भावना उपयोगांत आणणें भाग पडलें असेल, पण सध्यां खेड्यांतील भटजींना कोणाचेंही पाठबळ नसतां त्यांचा हवा तसा

छल करण्यास उद्युक्त होणाऱ्या सत्यशोधकांना आपल्या कृतीचें समर्थन करतां येणें शक्य नाहीं. मोठमोठ्या जहागिरी उपभोगणारे, राजाशीं प्रतिस्पर्धा करणारे, शस्त्रबळाचा उपयोग करणारे आणि आपली स्वतंत्र कोर्टें व तुरुंग ठेवून लोकांवर अनन्वित जुलूम करणारे, मध्ययुगीन युरोपांतील पोपचे धर्माधिकारी आणि हल्लींचे खेड्यापाड्यांत राहणारे निराश्रित ब्राह्मण भिक्षुक, यांची तुलना करून कांहीं कारण नसतां ब्राह्मण-वर्गावर आग पाखडणाऱ्या ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचें ऐतिहासिक ज्ञान खरोखरच विकटोपर्यंत गेलेलें आहे, असें म्हणावें लागतें ! त्यांना जर खरोखरच सामाजिक किंवा धार्मिक सुधारणा करावयाची असती तर त्यांनीं सुधारक हें नांव सोडून ब्राह्मणेतर ही जातीय भावना सूचित करणारी पदवीच धारण केली नसती.

---

## [लेखांक ३ रा.]

वरील दोन लेखांत सत्यशोधकांचें सामाजिक धोरण कसें अनर्थावह आहे, त्याचा विचार केला. "ब्राह्मण तेवढे परके, ब्राह्मणेतर तेवढे मूळचे हिंदु व इराणांतून आलेल्या ब्राह्मणांनीं भटजीच्या वेषानें आपला हिंदूंत शिरकाव करून घेतला व मूळच्या हिंदूंना गुलाम बनविलें" या निराधार इतिहासाच्या शिकवणीनें सर्व महाराष्ट्रांत द्वेषाग्नीचा वणवा पेटवून देऊन या ब्राह्मणेतर-सत्यशोधकांनीं राष्ट्रकार्याचा घात करण्याचा कसा उप-क्रम चालविला आहे याचें अधिक विवेचन करण्याचें कारण नाहीं. स्वामी विवेकानंद, रामतीर्थ, श्रद्धानंद किंवा महात्मा गांधी यांसारखे लोक आर्य-संस्कृतीचा प्रसार अस्पृश्यासुद्धां सर्व जातींत करून प्राचीन चातुर्वर्ण्याची स्थापना करण्याचे प्रयत्न करीत असतां सत्यशोधक लोक, ब्राह्मण निराळे व ब्राह्मणेतर निराळे, ब्राह्मण लोक इराणी ब्राह्मणेतर लोक मूळचे हिंदु, असल्या कंड्या उठवून ब्राह्मणेतर समाजाला आर्यसंस्कृतीपासून परावृत्त करीत आहेत. याचें कारण त्यांना आर्यसंस्कृतीचें मुळींच रहस्य समजलेलें नाहीं हेंच होय. यांच्या कल्पनेप्रमाणें आर्यसंस्कृतींतील वर्णाश्रमधर्मामुळें हिंदुस्थानांत जातिभेद माजला आहे. आर्य लोक येण्यापूर्वी हिंदुस्थानांत

जातिभेद नव्हता व तो ब्राह्मण भटजींनीं वर्णाश्रमधर्मामुळें उत्पन्न केला. ही सर्वच दृष्टि आमूलाग्र चुकीची आहे. ती कशी ती पाहूं.

आर्यांच्या चातुर्वर्ण्यांतील निदान वरच्या तीन वर्णांत तरी जातिभेद नसून गुणकर्मांवर अवलंबून असणारी श्रमविभागाची व्यवस्था होती. शूद्र लोक हे अनार्यांतून आलेले किंवा अनार्यांत मिसळलेले म्हणून त्यांना वर्णाश्रमधर्मांत समतेनें वागविलें जात नसे हा विचार थोडा वेळ बाजूस ठेवला तर आर्यांची वर्णव्यवस्था आणि जातिभेद यांतील अंतर दिसून येतें. जातिभेदामुळें प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीची सेवा करण्याची जाणीव होते तर वर्णव्यवस्थेमुळें व्यक्तीला एका विशिष्टप्रकारें सर्व वर्णांची सेवा करण्याची जाणीव होते. अर्थात् जातीयभावना राष्ट्रैक्याला विघातक होते तशी चातुर्वर्ण्याची भावना होत नाहीं. चातुर्वर्ण्यांतील सर्व वर्गांतील लोकांना परस्परावलंबनाची जाणीव होऊन परस्पर प्रेम उत्पन्न होतें. या दृष्टीनें पाहिल्यास सर्व अनार्य जातींना चातुर्वर्ण्यांत गोंवून टाकल्या-मुळेंच मूळच्या अनेक अनार्य जातींचें हिंदूराष्ट्र बनूं शकलें, हें उघड होतें. हिंदू लोकांत एकराष्ट्रीयत्व उत्पन्न करण्याचे प्रयत्न इतिहासांत तीन प्रकारें करण्यांत आलेले दृष्टोत्पत्तीस येतात. ( १ ) जातिभेदाऐवजीं चातु-र्वर्ण्याची भावना प्रसृत करणें; ( २ ) "स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः" या तत्त्वावरून समाज उपयोगी कोणतेंही कर्म निष्कामबुद्धीनें केल्यास मनुष्य मुक्त होतो, हा उपदेश करणें आणि त्यावरून कोणतेंही कर्म हीन न मानणें; आणि ( ३ ) मनुष्याची योग्यता केवळ जन्मावरून न ठरवितां त्याच्या आंगच्या गुणांवरून ठरविणें. हीं तत्त्वें ज्या ज्या वेळीं विशेष जोरानें प्रतिपादण्यांत आलीं त्या त्या वेळीं हिंदू लोकांत राष्ट्रीय भावना जागृत होऊन जातीय भावना मागें पडली आहे. जातिभेद मोडण्याच्या मार्गांतील वरील तीन पायऱ्या आहेत असें म्हणतां येईल. आजपर्यंत या तत्त्वांचा प्रसार व्हावा तितका झाला नसल्यामुळेंच जातिभेद समूळ नष्ट झालेला नाहीं. तो समूळ नष्ट करण्याचें ध्येय गांठण्याची ज्यांना इच्छा आहे, त्यांनीं वरील तीन पायऱ्यांच्या जिन्यावरूनच गेलें पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं श्रमविभागाच्या तत्त्वावर उभारलेल्या वर्णाश्रमधर्माच्या जिन्याचा उपयोग करूनच, हिंदु लोकांत राष्ट्रीय भावना निर्माण केली आहे. परंतु

सत्यशोधक लोकांची वृत्ति अगदीं याच्या उलट आहे. त्यांच्या मतानें ह्या वर्णाश्रमधर्माचा जिनाच मोडून टाकणें, हा ध्येयप्राप्तीचा खरा उपाय आहे. इराणांतून आलेल्या ब्राह्मणांचा वर्णाश्रमधर्म अस्तित्वांत येण्यापूर्वी हिंदुस्थानांतील सर्व लोक एका जातीचे होते असें त्यांना वाटतें; पण खरी वस्तुस्थिति अगदीं भिन्न आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जाति ब्राह्मणांनीं किंवा आर्यांनीं निर्माण केलेल्या नाहींत; मात्र त्या सर्व जातींना चातुर्वर्ण्याच्या चौकटींत बसवून सर्वांच्या साहाय्यानें एक राष्ट्र बनविण्याचा प्रयत्न आर्यलोकांनीं केलेला आहे. तो सर्वस्वीं पूर्ण झाला नाहीं व हळुहळू चातुर्वर्ण्याची कल्पना मागें पडून पुन: अनंत जाति अस्तित्वांत आल्या ही गोष्ट वेगळी. तरी सध्यांही या चातुर्वर्ण्याच्या कल्पनेनेंच जातिभेदाला पुष्कळ आळा घालतां येणार आहे. परंतु सध्यां चातुर्वर्ण्य व जातिभेद यांतील भेद लोकांच्या ध्यानांत न आल्यामुळें जातिभेदाबरोबरच चातुर्वर्ण्याला विरोध करण्यांत येत असतो.

सध्यांची वस्तुस्थिति पाहिली तरी ब्राह्मणजातीला आपणचातु र्वर्ण्यांतील एक वर्ण आहोंत याची जाणीव असल्यामुळें ब्राह्मणजातीचा संघ झाल्यास तो इतर जातींच्या संघापेक्षां केव्हांही अधिक व्यापक दृष्टीचा बनूं शकेल. आज बहुतेक ब्राह्मणांस आपणांस इतर जातींशीं कांहींतरी कर्तव्य आहे, याची जाणीव अंधुक तरी आहे. अलीकडे अनेक जातींच्या स्वोन्नतीच्या चळवळी चालल्या आहेत; परन्तु त्यांपैकीं एकाही ज्ञातिपरिषदेच्या वेळीं आपणांस हिंदुधर्मांतील इतर लोकांशीं कांहीं कर्तव्य आहे, याची जाणीव कोणास असलेली दिसून आली नाहीं. ब्राह्मणसंघाची किंवा परिषदेची चर्चा सुरू झाली, कीं मात्र ब्राह्मणांनीं इतर जातिसंबंधाचें आपलें कर्तव्य कसें करावें, याची चर्चा सुरू होते. याचें कारणही ब्राह्मणलोकांत जातीय भावनेपेक्षां चातुर्वर्ण्यानें निर्माण केलेली राष्ट्रीय भावना अधिक जागृत आहे, हेंच होय. याकरितां ज्या लोकांना हिंदू लोकांत राष्ट्रीय भावना निर्माण करावयाची असेल त्यांनीं ज्ञातिपरिषदा न भरवितां वर्णपरिषदा भरविल्या पाहिजेत. वर्णपरिषदेंत वर्णाभिमान जागृत होत असतो; पण तो राष्ट्रीयत्वाला विघातक होत नाहीं. मराठा शिक्षण परिषद् भरविण्यापेक्षां क्षत्रिय शिक्षण परिषद् भरविल्यास

आपण इतर जातींची सेवा केली पाहिजे याची जाणीव तेथील लोकांत जागृत होईल. अर्थात् जोंपर्यंत चातुर्वर्ण्य गुणकर्मावर येऊन राहिलें नाहीं तोंपर्यंत या संघटनांत दोष रहाणारच; परंतु ब्राह्मणेतर संघासारखे ज्यांना कांहींच आगापिछा नाहीं, असले संघ निर्माण करण्यापासून कोणतेंही राष्ट्रहित साध्य होणें शक्य नाहीं. एखाद्या व्यक्तीला तूं क्षत्रिय आहेस, किंवा वैश्य आहेस, किंवा ब्राह्मण आहेस, असें म्हटल्यानें आपल्या पूर्वापार चालत आलेल्या कर्तव्याची जाणीव त्यास होते, परंतु त्यास तूं ब्राह्मणेतर आहेस असें म्हटल्यानें, आपण ब्राह्मणांचा द्वेष केला पाहिजे, ब्राह्मण इराणांतून आले आहेत, त्यांचा धर्म व आमचा धर्म निराळा आहे, असल्या दुष्ट भावनाच त्याच्या अंतःकरणांत जागृत होणार हें उघड आहे. यापासून कोणाचें कोणतें हित साध्य होत असेल, तें एक त्या सत्यशोधकांस माहीत! एवढें मात्र खरें कीं, आर्यसंस्कृतींतून सर्व ब्राह्मणेतरांना फोडून घेऊन त्यांना खिस्ती धर्मांत नेऊं इच्छिणाऱ्या पाद्री लोकांचें हित या कार्यामुळें अनायासें साध्य होणार आहे.

वर्णाश्रमधर्म हा जातिभेदाला पोषक नसून राष्ट्रीयत्वाला पोषक आहे, ही गोष्ट सत्यशोधकांना समजत नाहीं. त्याचप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे राष्ट्रपुरुषाचे मुख, बाहू, ऊरू व पाय आहेत, या कल्पनेंतील रहस्य त्यांना समजत नाहीं. ही कल्पना ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्यासाठीं शोधून काढलेली नसून समाजांतील वर्गांचें परस्परावलंबित्व सूचित करण्यासाठीं तो दृष्टान्त योजिलेला आहे. मनुष्याला तोंडाची व पायाची सारखीच जरूरी आहे. समाजाला वाङ्मयसेवा करणाऱ्यांची व शरीरकष्ट करणाऱ्यांची सारखीच जरूरी आहे व शरीराच्या कोणत्याही भागाला रोग झालेला जसा सर्व शरीराला भोगावा लागतो त्याचप्रमाणें समाजांतील कोणत्याही एका वर्गाचें स्वास्थ्य बिघडल्यास सर्व जातीचें स्वास्थ्य बिघडेल ही कल्पना वरील दृष्टांत सुचण्यास कारण झाली असली पाहिजे. अर्थात् त्यामुळें समाजांतील वर्गांत परस्पर कळकळ व प्रेम उत्पन्न होतात असें असतां सत्याचा शोध लावावयास निघालेल्या या तमासगीर पक्षाला तो दृष्टांत ज्याला प्रथम सुचला, तो ब्राह्मण जातिविषयक द्वेषाचा पुतळा भासतो; यावरून त्याच लोकांना द्वेषाची कावीळ झालेली आहे असें म्हणणें भाग

आहे. सारांश, आर्यसंस्कृतीचें रहस्य मुळींच समजून न घेतां तिच्या जिवावर सत्यशोधक लोक उठलेले आहेत! यांच्या सर्व कल्पना ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या डोक्यांतून निघालेल्या आहेत व म्हणूनच स्वधर्म आणि स्वराज्य यांची स्थापना त्यांना असह्य वाटते. समर्थ रामदास आणि शिवछत्रपति यांना जितका स्वधर्माचा व स्वराज्याचा अभिमान होता, तितकाच महात्मा जोतिबा व राजर्षि शाहूमहाराज यांना स्वधर्माचा व स्वराज्याचा तिटकारा होता, हें सर्वांस माहीतच आहे. याचें कारण काय आहे याचा उलगडा सत्यशोधक लोकांचे धर्मग्रंथ वाचले असतां सहज होतो. त्याचें थोडेसें दिग्दर्शन या लेखमालेंतून केलें. आतां पुढील लेखांत या मालेचा समारोप करण्यांत येईल. हा लेख संपविण्यापूर्वी कै० आगरकर यांनीं सुधारक लोकांस केलेला उपदेश सत्यशोधक लोकांस नजर करण्याची परवानगी घेतों.

“ स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत व स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छलास न भितां त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, कधीं दटावून त्यांची सुधारणा करणें, यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता व खरा देशाभिमान आहे. याच्या उलट जे वर्तन करितात ते सुधारणा करीत नाहींत! तर शृंखलांतर करतात! अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींही सुटावयाची नाहीं. भरतखंडांत अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षां तें आहे त्याच प्रकारचें गुलामांचें राष्ट्र राहिलें तरी हरकत नाहीं! ”

---

## [ लेखांक ४ था.]

आतांपर्यंत ब्राह्मणद्वेषाच्या पायावर उभारलेली सत्यशोधकांची ब्राह्मणेतर चळवळ कशी अज्ञानमूलक, अनर्थावह व राष्ट्रघातकी आहे हें सविस्तरपणें दाखविलें. या लेखांत त्यांच्या धर्मसुधारणेसंबंधीं चार शब्द लिहून या विषयाची रजा घ्यावयाची आहे. सत्यशोधक पंथ हा मूळचा धार्मिक स्वरूपाचा आहे, असें सांगण्यांत येत असल्यामुळें त्याच्या धार्मिक अंगावर दोन शब्द लिहिल्याखेरीज या विषयाची सांगता होत नाहीं. त्यांचें

समाजसुधारणेचें धोरण जसें द्वेषमूलक तसेंच त्यांनें धर्मसुधारणेचें धोरणही द्वेषमूलक आहे. पुराण, कीर्तन, भजन किंवा निरूपण इत्यादि धर्मजागृति करण्याचीं पूर्वापार चालत आलेलीं साधनें सोडून देऊन कोल्हापूरच्या राजर्षींनीं जेव्हां सत्यशोधक जलशे या नांवानें खेडोपाडीं तमाशे उभे केले, आणि सत्यशोधकांच्या अपूर्व तत्त्वांचा प्रसार दारूच्या धुंदींत व गांवढळ लोकांच्या अपशब्दांत होऊं लागला, तेव्हां धर्मसुधारणा या शब्दाचा अर्थच बदलला गेला असें म्हणण्यास हरकत नाहीं. आजपर्यंत लोकांत नीतिप्रसार करणें, भूतदयेचा उपदेश करणें, त्यांस व्यसनांपासून परावृत्त करणें आणि परमेश्वराच्या चराचर व्यापक परब्रह्म स्वरूपाची लोकांना ओळख करून देऊन निरनिराळ्या जातींच्या व पंथांच्या लोकांत प्रेमभावना उत्पन्न करणें, याला धर्मसुधारणा असें म्हटलें जात असे. परंतु सत्यशोधकांचा संचार महाराष्ट्रांत सुरू झाल्यापासून अज्ञान लोकांच्या धर्मभावनांची टर उडविणें, ब्राह्मणांवर व देवतांवर शिव्यांची लाखोली वाहणें, लोकांना अत्याचारास प्रवृत्त करणें, या गोष्टींना धर्मसुधारणा या गोंडस नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें. सत्यशोधकांना ज्याप्रमाणें हिंदूंच्या सनातन वर्णाश्रमसंस्थेचें रहस्य समजलेलें नाहीं, त्याचप्रमाणें हिंदूंच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचें मर्म त्यांच्या बुद्धीला आकलन करतां येत नाहीं. याचें कारण ते आपल्या हिंदुधर्माकडे परकीयांच्या चष्म्यांतून पहात असतात. कोणत्याही लोकांच्या आचारविचारांचें केवळ बाह्य स्वरूप पाहून त्यांची सुधारणा करण्यास निघणाऱ्यांच्या हातून ज्या चुका होण्याचा संभव आहे, त्या चुका सत्यशोधक लोकांच्या हातून होत आहेत. इंग्लिश लोकांचे राजकीय आचार केवळ बाह्यतः पाहिल्यास हे लोक अनियंत्रित राजसत्तेचे भोक्ते आहेत असा ज्याप्रमाणें भास होण्याचा संभव आहे, त्याचप्रमाणें हिंदू लोकांचें बाह्य धार्मिक आचरण पाहणारास ते अनेक देवतांचे उपासक भासण्याचा संभव आहे; परंतु पहिला समज जितका भ्रामक आहे तितकाच दुसराही भ्रामक आहे. इंग्लिश लोक ज्याप्रमाणें राजाची मूर्ति पुढें ठेवून राष्ट्र या अव्यक्त वस्तूची उपासना करतात व राजनिष्ठा या नांवानें राष्ट्रनिष्ठेचा फैलाव करतात त्याचप्रमाणें हिंदु लोक राम, मारुति, विठोबा किंवा श्रीकृष्ण यांच्या मूर्तींचें व्यक्त प्रतिक पुढें ठेवून सर्वशक्ति, सर्वव्यापि, सर्वांतरयामी परमात्म्याची उपासना करीत असतात.

रानटी लोकांप्रमाणें देव पाषाणाच्या किंवा धातूच्या मूर्तींत बसलेला आहे अशी त्यांची कल्पना नसून " विष्णुमय जग, वैष्णवांचा धर्म; भेदाभेद भ्रम, अमंगल " हें तत्त्व त्यांच्या पूर्ण परिचयाचें आहे. हिंदु लोकांतील धर्म-सुधारकांनीं इंग्लंडांतील राजकीय सुधारकांप्रमाणें धार्मिक संस्थेचें व विधींचें बाह्य स्वरूप कायम ठेवून त्यांचें अंतरंग सुधारण्याचा मार्ग पतकरिला होता.

या मार्गाचा अवलंब केल्यामुळें मूळच्या अनेक देवतांच्या उपासक अशा अनेक जातींच्या लोकांत त्यांची धर्मभावना न दुखवितां उच्च धार्मिक तत्त्वज्ञानाचा प्रसार करणें, त्यांना शक्य झालें. लोकांचें बाह्य आचार बदलण्याचा प्रयत्न न करतां त्यांचे विचार बदलण्याचा प्रयत्न करणें हें हिंदू धर्म-सुधारकांचें धोरण आहे. त्याला अनुसरून त्यांनीं कोणत्याही असंस्कृत जातीला पूज्य असणाऱ्या देवतेची टर न उडवितां ती देवता म्हणजे परमेश्वराचीच एक विभूति आहे व हा परमेश्वर सर्वत्र भरलेला असून तो भक्तांच्या अंतःकरणांतही नित्य भरलेला आहे, अशा पायऱ्यांनीं मूळच्या अनार्य लोकांत उपनिषदांतील उच्च तत्त्वज्ञानाचा प्रसार केलेला आहे. आज हिंदुधर्मांतील कोणत्याही व्यक्तीपुढें परमेश्वराच्या सर्वव्यापी व सर्वांतर्यामी स्वरूपाचें विवरण केल्यास तें त्यास अपरिचित आहे, असें दिसून येणार नाहीं. यामुळें हिंदु लोकांतील अगदीं खालच्या जातींतही मोठमोठे साधुसंत झालेले आहेत व मोठमोठ्या घमेंडखोर वेदान्त्यांचाहि गर्व त्यांनीं हरण केला आहे. आजच्या इंग्लिश लोकांस जर एखादा मनुष्य जाऊन तुम्ही राजसत्तेचे उपासक आहां, तुम्ही आपल्या राजाला पहिल्यानें फांसावर चढवा व मग लोकसत्तेची स्थापना करा वगैरे उपदेश करूं लागला, तर त्याची ते लोक जितकी मुरवत ठेवतील, तितकीच सत्यशोधक लोकांची मुरवत आमच्या इकडचे शेतकरी लोक त्यांच्या मूर्तिभंजनाच्या उपदेशाबद्दल ठेवीत असतात. सत्यशोधक लोकांच्या उपदेशापैकीं अगदीं परिणामरहित असा जर कोणता भाग असेल तर तो त्यांच्या धार्मिक तत्त्वज्ञानाचा होय. यामुळें अलीकडे त्यांनीं तें आपलें अंग थोडें लपवून ठेवून ब्राह्मणांचा उच्छेद करण्याचें सामाजिक अंगच विशेष पुढें केलेलें आहे. त्यांच्या सामाजिक मताप्रमाणेंच त्यांची धार्मिक मतेंही खिस्ती पाद्र्यापासून घेतलेलीं आहेत, हें कोणासही दिसून येणार आहे. असो.

येथपर्यंत आम्हीं सत्यशोधक लोकांच्या मूलभूत सिद्धांताचा विचार करून त्यांतील दोष वाचकांच्या नजरेस आणले. आतां या विषयांच्या समारोपादाखल दोन शब्द लिहावयाचे उरले आहेत. तें कार्य करतांना ब्राह्मणेतर पुढारी, ब्राह्मणेतर जनता आणि ब्राह्मण लोक या तिघांनाही निरनिराळ्या स्वरूपांत प्रेमाची विनंति करावयाची आहे.

प्रथमतः ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना अशी विनंति करावयाची कीं, तुम्ही हिंदू लोकांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे पाडलेले तट मोडून टाका. ब्राह्मण तेवढे परदेशी व ब्राह्मणेतर तेवढे मूळचे हिंदु ही भावना प्रसृत करूं नका. त्याचप्रमाणें आर्य व अनार्य हेही पूर्वींचे बुजून गेलेले भेदाभेद पुनः जागृत करूं नका. आज ब्राह्मणापासून महारापर्यंत सर्वच लोक आपण हिंदू आहोंत असें समजत असतात. त्यांच्यांत आर्य व अनार्य असा भेद पुनः उत्पन्न करण्यापासून कोणाचेंही हित साध्य होणार नाहीं. तसेंच वर्णाश्रमधर्म, औपनिषदिक तत्त्वज्ञान व हिंदुधर्मसंस्कृति यांचा पूर्ण अभिमान बाळगा. तुम्हांला त्या संस्कृतीपैकीं कांहीं हक्क इतरांकडून मिळत नसल्यास त्यांच्याशीं प्रेमानें भांडा; परंतु सर्वच ब्राह्मणी संस्कृति टाकून देण्याचा राष्ट्रविघातक प्रयत्न करूं नका. परदेशी व परधर्मी लोकांच्या नादीं लागून हिंदु संस्कृतीचा सर्वस्वीं त्याग करण्यास तुम्ही उद्युक्त झाल्यास तुमचें तुम्हीच सर्वस्वीं नुकसान करून घ्याल. याकरितां हिंदूहिंदूंत भेद-भाव उत्पन्न करण्यास यानंतर तरी आपण कारण होणार नाहीं असा दृढ निश्चय करून राष्ट्रहिताच्या कार्यास मनोभावनेनें लागा. आज ब्राह्मण लोकांची इच्छा असली तरी तुमच्या उन्नतीच्या आड येणें त्यांना शक्य नाहीं. व यापुढेंही तुम्हीं दक्षता ठेवल्यास त्यांची भीति बाळगण्याची तुम्हांला यत्किंचितही गरज नाहीं.

ब्राह्मणेतर पुढाऱ्यांना वरील विचारसरणी पटली नाहीं तरी ब्राह्मणेतर जनतेला विनंति करणें आमचें कर्तव्य आहे. सध्यां आपल्या राष्ट्राची स्थिति अत्यंत शोचनीय झालेली आहे. देशांत दारिद्य आणि अज्ञान यांचें साम्राज्य सर्वत्र पसरलेलें आहे. परकीयांचा जुलूम दिवसेंदिवस वाढत आहे आणि आपसांतील दुहीमुळें तिसऱ्याचा फायदा होत आहे. ब्राह्मणांनीं आज तुमचें कांहीं नुकसान केलेलें नाहीं. आजच्या विपत्तीचें

निवारण करणें राजसत्ता हातीं आल्याखेरीज होणें शक्य नाहीं, याकरितां ती हातीं घेण्याचा प्रयत्न करा. असें करतांना आपापसांतील भेदभाव वाढविणाऱ्या सत्यशोधक भ्रामक मताच्या नादीं लागून फसूं नका. आपली पूर्वापार चालत आलेली हिंदुसंस्कृति सत्यशोधक लोक सांगतात, त्याप्रमाणें स्वार्थी ब्राह्मणांनीं निर्माण केली नसून तिच्यामुळेंच आपली कीर्ति सर्व जगांत पसरलेली आहे. हिंदू संस्कृति ही अद्वैतसिद्धांतावर उभारलेली असल्यामुळें तिच्यांत द्वैतभावनेला जागा नाहीं. परमेश्वर सर्व भूतमात्राच्या अंतर्यामीं वास करीत असतो व प्रत्येक मनुष्य आपल्या प्रयत्नांनीं परमेश्वर-पदास पोहोंचतो, असा स्फूर्तिदायक संदेश आपल्या तत्त्वज्ञानांत सांगितलेला आहे. ज्यांना संस्कृत भाषा येत नाहीं त्यांनाही हा संदेश साधुसंतांनीं मराठी भाषेच्या द्वारा दिलेला आहे. आपल्या गुलामगिरीचें कारण आपणच आहों व आपलें स्वातंत्र्यही आपणच मिळवणार आहों, असा दृढ विश्वास तुमच्या अंतःकरणांत असूं द्या. तुमच्यापैकीं प्रत्येकाच्या अंतःकरणांत परमेश्वरी शक्ति गुप्त रूपानें वास करीत आहे, तिच्या स्वरूपाचें ज्ञान करून घेऊन आपल्या गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकण्याचा मनोभावानें प्रयत्न करा, म्हणजे तुमच्यापुढें कोणाचें कांहींही चालणें शक्य नाहीं. मात्र असें करतांना कोणाचाही द्वेष करूं नका व अत्याचारांचा अवलंब करूं नका.

अखेरीस प्रस्तुत लेखकाच्या ज्ञातिबांधवांस विनंति करावयाची आहे ती अशी कीं, ब्राह्मणेतर चळवळ नाहींशी होऊन राष्ट्रैक्याची वृद्धि व्हावी, ही जर तुमची इच्छा असेल, ब्राह्मण लोकांना प्रिय असणारा हिंदुधर्म व संस्कृति टिकावी असें जर तुम्हांस वाटत असेल, हिंदुस्थान देशाला सुस्थिति यावी व तो इतर स्वतंत्र देशाप्रमाणें वैभवशाली व्हावा, हें ध्येय जर तुम्हांस मान्य असेल तर आपली संकुचित वृत्ति व दुराग्रहबुद्धि सोडून देण्यास तुम्हीं तयार झालें पाहिजे. ज्या वेळीं अनार्य लोकांना तुम्हीं हिंदुधर्मांत घेतलें तेव्हांपासून त्यांना समतेनें वागवून त्यांचा उद्धार करण्याची जबाबदारी तुमच्यावर येऊन पडली आहे. आज आर्य व अनार्य हे सर्व हिंदू बनलेले आहेत. त्यांच्यांतील कृत्रिम भेदभावना नष्ट करणें आणि प्राचीन आर्यांचा गुणकर्मांवर अवलंबून असणारा वर्णाश्रम-धर्म शुद्ध स्वरूपांत स्थापन करणें हें तुमचें कार्य आहे. सर्व हिंदूंना

सामान्य असा आचारधर्म घालून देणें, त्यांच्यांतील अज्ञानाचा व दुर्व्यसनाचा निरास करणें आणि त्यांची आध्यात्मिक उन्नति करणें हें ब्राह्मणवर्गाचें परंपरागत कर्तव्य आहे. तें ज्या मानानें तुम्ही कराल, ब्राह्मणेतर लोकांत शिक्षणप्रसार करून मद्यपानासारख्या धर्माला कलंकभूत गोष्टींचा ज्या मानानें तुम्ही उच्छेद कराल व संकुचित स्वार्थबुद्धि टाकून देऊन व्यापक राष्ट्रहितबुद्धि ज्या मानानें तुमच्यांत फैलावेल त्या मानानें तुमची सुस्थिति व मानमान्यता राहील. आपल्या जातिपुरताच विचार करून तुमचा निभाव लागणार नाहीं. सर्व हिंदुलोकांची बौद्धिक व आध्यात्मिक उन्नति करण्याची व्यापक दृष्टि जेव्हां तुमच्या सर्व समाजांत दिसूं लागेल तेव्हां सर्व ब्राह्मणेतर जनता तुमच्या पाठोपाठ येण्यास तयार होईल. आम्ही श्रेष्ठ आहोंत व इतर जाति कनिष्ठ आहेत हा अहंकार तुम्हीं सोडून दिला पाहिजे. चातुर्वर्ण्यांतील प्रत्येक वर्णाची सारखीच योग्यता आहे. समाजाला उपयोगी असें कोणतेंही कार्य आपापल्या सामर्थ्याप्रमाणें निष्काम बुद्धीनें करीत राहणें हेंच वर्णाश्रमधर्माचें रहस्य आहे. बुद्धीच्या निष्कामत्वावर मनुष्याची योग्यता अवलंबून आहे. त्यांच्या अंतःकरणाच्या औदार्यावर त्याचा दर्जा अवलंबून असतो. तो त्याच्या केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून नाहीं, हें तुम्हीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. आजपर्यंत तुम्हांला जो मान मिळत असे तो केवळ तुमच्या बुद्धिमत्तेमुळें मिळत नसून ती बुद्धिमत्ता सर्व राष्ट्राच्या हितांत खर्च होत असे म्हणून मिळत होता. तसें तुमचें आचरण होऊं लागलें म्हणजे तुम्हांला कोणाची भीति नाहीं, व तुमच्याबद्दल कोणालाही अनादर वाटणार नाहीं. सध्यां आपल्या भारतीय संस्कृतीवर फार मोठें अरिष्ट आलेलें आहे व त्याच्या निरनिराळ्या स्वरूपांपैकींच सत्यशोधक पंथ हा एक आहे. तें अरिष्ट टळण्यास खरा उपाय म्हणजे सर्व हिंदु लोकांची सर्वांगीण उन्नति करण्याचे आपण आटोकाट प्रयत्न करावयाचे, हाच होय. ते तुम्ही करूं लागलां म्हणजे ब्राह्मणेतर व ब्राह्मण हा वाद मिटण्यास फार काळ लागणार नाहीं व सर्व राष्ट्रांत फिरून ऐक्य दिसूं लागेल. ब्राह्मणेतर जनतेंतील अज्ञान व अनीति यांच्या निरसनार्थ निःस्वार्थबुद्धीनें प्रयत्न करणें हा एकच मार्ग खरें राष्ट्रैक्य घडवून आणील; व आर्यसंस्कृतीचें रक्षण करील.

## परिशिष्ट

# ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाची मीमांसा

[ही लेखमाला प्रथम इसलामपूरच्या 'भारतमाता' पत्रांत सन १९२२ च्या ऑगस्ट महिन्यांत प्रसिद्ध झाली होती.]

[ संपादकीय ]

अलीकडे आमच्या प्रांतांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादास आणि तदंगभूत असणाऱ्या सत्यशोधकी चळवळीस बराच ऊत आला आहे. महायुद्ध व 'मॉटेग्यु चेम्सफर्ड सुधारणा' यांमुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीच्या जीवनानें हा वाद पोसला जात असून त्यामुळें देशांतील खालच्या व मागासलेल्या वर्गांत एक प्रकारची जागृति होत आहे आणि ह्या दृष्टीनें त्याबद्दल कोणाही देशभक्तास समाधानच वाटणार आहे. खालच्या वर्गांत उत्पन्न झालेली ही जागृति हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांत आढळून येते. जेथें ब्राह्मण वर्ग फारसा नाहीं अथवा असल्यास समाजांत त्याचें फारसें महत्त्व नाहीं अशा प्रांतांत देखील ही जागृति 'कुळें व जमीनदार,' 'मजूर व कारखानदार' व शेतकरी आणि सावकार' या द्वंद्वांच्या रूपानें अवतीर्ण झालेली आढळून येईल. अशा रीतीनें एकसमयावच्छेदेंकरून चोहोंकडे एकसारखी खळबळ सुरू असल्यामुळें व ही खळबळ ज्या वर्गांत सुरू आहे तो सामान्यतः अशिक्षित व आडमुठा असल्याकारणानें अनेक धूर्त, मतलबी, कारस्थानपटु व उपद्व्यापी लोक खवळलेल्या समुद्रावर येणाऱ्या बुडबुड्यांप्रमाणें व लाटांप्रमाणें ह्या चळवळीच्या पृष्ठभागावर उदय पावून कांहीं काळ अनिष्ट प्रकारची खळबळ करून अस्त पावणार हें जरी स्पष्ट दिसत असलें, तरी दूरवर विचार करणारास ही चळवळ राष्ट्रहितैकदृष्टीनें इष्टापत्तीसारखीच वाटेल यांत शंका नाहीं. निदान प्रस्तुत लेखकास तरी ती तशी वाटते व ती शक्य तितकी निर्दोष किंवा कार्यक्षम व्हावी याच हेतूनें तिजविषयीं येथें थोडीशी साधकबाधक चर्चा करण्यांत येत आहे.

ह्या चळवळीचा सामान्य ओघ व तिचे सामान्य हेतु हे जरी सर्वत्र सारखे असले तरी तिला एक प्रकारचें प्रांतिक वैशिष्ट्य हें आहेच. कारण प्रत्येक प्रांताची परंपरा व परिस्थिति हीं निरनिराळीं आहेत. व त्यांस अनुसरून प्रत्येक प्रांतांतील मागासलेल्या लोकांचे हितसंबंध व कार्याची दिशा हीं वेगवेगळीं आहेत. तेव्हां ज्यास अखिल हिंदुस्थानांतील ह्या चळवळीची सांगोपांग चर्चा करावयाची असेल त्यानें प्रत्येक प्रांतांतील परिस्थितीचें व पूर्वपरंपरेचें बारकाईनें निरीक्षण करणें जरूर आहे. परन्तु मोठ्या खेदाची गोष्ट कीं, ह्या चळवळीविषयीं लिहिणारे अथवा बोलणारे सुशिक्षित आणि शहरांतील पुढारी म्हणविणारे लोक अशाप्रकारचें निरीक्षण करण्याच्या भानगडींत फारसे पडत नाहींत व वर्तमानपत्रांतून येणाऱ्या एकतर्फी अथवा दुतर्फी माहितीवरच समाधान मानून आपलीं मतें बनवितात व त्याचा प्रसार करितात. यामुळें खरा प्रकार एक असतां त्यास दुसरें स्वरूप प्राप्त होतें व तेणेंकरून सर्वत्र दुराग्रह व गैरसमज यांचें दूषित वातावरण उत्पन्न होतें व त्यामुळें प्रगतीचा मार्ग दुष्कर होतो. इतकेंच नव्हे, तर कित्येकदां प्रगतीच्या ऐवजीं अवनति होते कीं काय, अशी भीति वाटूं लागते. ह्या गोष्टीचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास सध्यां महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांतून व व्याख्यानांतून ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद व सत्यशोधक चळवळ यांसंबंधाची चालू असलेली चर्चा पहावी. त्यांतील माहिती, कोट्या, सिद्धांत हीं उभयपक्षीं इतकीं भ्रामक असल्याचें आढळून येतें कीं, खेड्यापाड्यांतील ज्या लोकांत ही चळवळ चालू असेल तेथील वस्तुस्थितीचें निरीक्षण करणारास ती वाचून अथवा ऐकून कित्येकदां हंसू येतें व कित्येक वेळां उद्वेग उत्पन्न होतो. आणि हा सारा नजरबंदीचा अथवा गारोड्याचा खेळ कशाकरितां चालला आहे, त्यांत कोणाचें हित आहे व कोणाची हानि आहे हें कळेनासें होतें! यापेक्षां ज्या लोकांत ह्या चळवळीविषयीं खरी आस्था असेल व ज्यांच्या हिताकरितां ती चालू आहे, त्यांच्या हिताची ज्यांस जाणीव असेल त्यांनीं खेडोंपाडीं हिंडून या चळवळीचें खरें स्वरूप काय आहे, तिचे चालक कोणत्या हेतूनें प्रेरित झाले आहेत; ती चालविण्याचे त्यांचे मार्ग कोणते आहेत व त्या मार्गाचे सामाजिक व राष्ट्रीय दृष्ट्या कोणते परिणाम होत आहेत अथवा होणायच संभव आहे, यांचें

काळजीपूर्वक निरीक्षण केल्यास त्यांना त्यांतील गुणदोष कळून येतील व त्यांत इष्ट ती सुधारणा करून सदर चळवळीस योग्य वळण लावतां येईल. कांहीं स्थानिक ब्राह्मणेतर अथवा ब्राह्मण पुढारी म्हणवून घेणाऱ्यांना खरी स्थिति अवगत असूनही स्वार्थामुळें ती झांकून ठेवण्यांत भूषण वाटणें संभवनीय आहे. परंतु त्यांचें खरें स्वरूप जाणून घेऊन त्यांना ताळ्यावर आणणें अथवा त्यांचा दंभस्फोट करून त्यांच्या अनुयायांना खरा मार्ग दाखविणें हें व्यापक व राष्ट्रीय दृष्टि बाळगणाऱ्या सुशिक्षित ब्राह्मणांस अथवा ब्राह्मणेतरांस फारसें कठीण नाहीं. किंबहुना तें त्यांचें कर्तव्यच आहे. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, शहरांतील सुशिक्षित ब्राह्मणवर्ग यासंबंधानें अद्याप उदासीन आहे व ब्राह्मणेतरवर्ग गाफिलपणें खालच्या लोकांकडून येणाऱ्या अथवा पुरविल्या जाणाऱ्या माहितीवर विश्वासून आपला कार्यक्रम आंखीत आहे. हा वाद मिटवावा म्हणून ब्राह्मणांच्या पत्रांतून वरचेवर 'टाहो' फोडण्यांत येत असतो, व कित्येक सार्वजनिक संस्थांनीं तो मिटविण्याकरितां पंचांच्या नेमणुकाही केलेल्या आहेत; परंतु त्यांचा कांहीं एक उपयोग झालेला नाहीं व जोंपर्यंत दोन्ही पक्ष ह्या प्रश्नाकडे वरवर दृष्टीनेंच पहात राहतील तोंपर्यंत हें असेंच चालावयाचें. ब्राह्मणांना आज फार त्रास होत असल्यामुळें ते वाद मिटविण्यास उद्युक्त आहेत तर ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांचा सूड उगवून नामोहरम करण्याची आवश्यकता व शक्यता वाटत असल्यामुळें ते वाद मिटविण्याच्या भाषेकडे लक्ष देत नाहींत, आणि त्या कारणानें दिवसानुदिवस हें प्रकरण विकोपास जात चाललें आहे. ही स्थिति उभयपक्षांसही हानिकारक आहे, याची जाणीव त्यांच्यापैकीं कर्त्या लोकांस नसावी अथवा असल्यास तिचा उपयोग होऊं नये हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय.

---

## [लेखांक २ रा.]

या वादाच्या ऐतिहासिक परंपरेंत शिरण्याची तूर्त आमची इच्छा नाहीं. कारण त्याचा सध्यां कांहीं उपयोग नाहीं. तथापि त्यासंबंधाची एक महत्त्वाची बाब ब्राह्मणेतरांच्या नजरेस आणणें जरूर आहे, व ती ही कीं,

पेशवाईत जर ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांवर कांहीं जुलूम केला असेल अथवा अन्यायाचें वर्तन केलें असेल तर तें कृत्य त्यांनीं ब्राह्मण म्हणून केलें असें मानण्यापेक्षां 'राज्यकर्ते–सत्ताधीश' या नात्यानेंच केलें, असें मानणें जास्त सयुक्तिक होईल. तत्पूर्वी किंवा तदनंतर धर्मगुरु या नात्यानें जर त्यांचेकडून कांहीं जुलूम झाला असेल तर त्याची जबाबदारी ब्राह्मणांइतकीच तत्कालीन क्षत्रिय अथवा अक्षत्रिय राजदंडधारी वर्गावर अथवा राजांवर आहे ही गोष्टही प्रस्तुतच्या ब्राह्मणेतरांनीं लक्षांत घेणें जरूर आहे. पेशव्यांनीं 'ब्राह्मण' ह्या जातीच्या अभिमानानें इतरांस लाथाडलें असें न मानतां राजसत्तेच्या मदानें त्यांनीं तसें केलें, असें मानल्यास ब्राह्मण जातीविरुद्ध काहूर माजविण्यास व ब्राह्मणांचा द्वेष करून त्यांचा सूड उगविण्यास ब्राह्मणेतरांस फारसें सबळ कारण नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, पेशव्यांच्या वेळीं जे मराठे राजे अथवा सरदार होते त्यांनीं कांहीं आपल्या राज्यमदाचा दर्प कमी गाजविला नाहीं. त्यांनीं देखील खालच्या वर्गाशीं वागतांना पेशव्यांच्याच राजनीतीचें अनुकरण केलें. उदाहरणार्थ, ज्या करवीर सरकारचें नांव ब्राह्मणेतरांच्या अग्रणींत गाजत आहे त्यांच्या पूर्वजांच्या कायद्यांपैकीं पुढील कलम अथवा नियम पहा:—

"(कलम ४४) ज्याकडे लांच लागू होईल त्यास व देणाऱ्यास बेडी घालून परजांत हुकूम होईपर्यंत ठेवून देणारापासून जो लांच दिला असेल ती बेरीज गुन्हेगारीबद्दल घेऊन घेणारापासून लाचाचे दुप्पट रुपये भरून घेऊन जेथें गुन्हा केला असेल त्या पेठयांत त्या गांवीं नेऊन ब्राह्मण व मराठे, परभू व शेणवी, असल्यास लहान तटावर बसवून धिंड काढावी. धिंड काढणे ती तटावरून नाहीं, गाढवावरून आहे. परन्तु सदरीं लिहिलेले मंडळीस जातींत घेणार नाहींत सबब तटावरील मुकर केली असे. 'अन्य जाती कुणबी* व मुसलमान हरएक जातीचा दस्तूर माफक गाढवावरून काढून सोडून देऊन जाहिरनामा करावा म्हणोन छ. ५ मोहरम ता. १० आगस्ट सन १८२६ इसवी या तारखेचा जाहिरनामा सादर झाला आहे." वगैरे.

---

*ह्या कलमांत मराठे व कुणबी ह्या दोन जाति भिन्न मानल्या असून कुणबी जात मराठ्यांपेक्षां कनिष्ठ मानली आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सदरील कलमांत ब्राह्मण, मराठे, परभु व शेणवी ह्या वरिष्ठ जातींस व त्यांच्याहून कनिष्ठ जातींस सांगितलेल्या शिक्षेच्या प्रकारांतील भेद लक्षांत घेतला म्हणजे ब्राह्मणांनीं आमच्यावर जुलूम केला असें म्हणण्यास उपरोक्त जातींस फार थोडी जागा राहते. कनिष्ठ जातींस तर ह्यासंबंधानें एकट्या ब्राह्मण जातींस जबाबदार धरण्यास मुळींच अवसर रहात नाहीं. त्यांच्यावरील जुलुमाच्या पापाचे वाटेकरी ब्राह्मणांप्रमाणें मराठे, प्रभु, शेणवी वगैरे जातीही आहेत. तेव्हां एकट्या ब्राह्मण जातीवरच त्यांनीं आपला राग काढण्यांत स्वारस्य नाहीं. पण आमच्या मतें सदर जुलुमास जातीचा अभिमान कारण झाला असें मानण्यापेक्षां राजसत्तेचा मदच कारण झाला आहे असें मानणें सयुक्तिक होईल. आणि तसें मानणें हेंच ऐतिहासिक व व्यवहारदृष्ट्या योग्य आहे. जेते अथवा राजसत्ताधारी लोक कोणत्याही जातीचे असले तरी अंकित लोकांवर कमजास्त मानानें त्यांचा जुलूम होतच असतो. आजकालच्या सुधारलेल्या युरोपियन राष्ट्रांतील सत्ताधारी वर्गासही हा नियम लागू पडण्यासारखा आहे. युरोपियन व हिंदी यांच्या दरम्यान खुद्द हिंदुस्थानांत व वसाहतींत हा प्रकार चालू आहे. तो चांगला आहे असें आमचें म्हणणें नाहीं, तसेंच तो मोडण्याच्या प्रयत्नाविरुद्धही आमची तक्रार नाहीं; परंतु मनुष्यस्वभावाचा विचार करतां तो अपरिहार्य आहे, स्वाभाविक आहे. तेव्हां त्याचा जातींशीं संबंध न जोडतां राजसत्तेशीं जोडला पाहिजे, व तसा तो जोडला तरच त्या जुलुमाचा नायनाट करण्याची आशा करण्यास जागा आहे असें आमचें मत आहे. कारण राजसत्ता हिरावून घेणें शक्य आहे; पण जाति नष्ट करणें शक्य नाहीं. राजसत्तेशिवाय जात्यभिमान पंगु आहे व जरी क्वचित् प्रसंगीं जुलमाचें कारण जात्यभिमानांत असलें तरी राजसत्तेच्या मदतीशिवाय तें कार्यक्षम होऊं शकत नाहीं. तेव्हां ज्यांना जुलूम नाहींसा करावयाचा असेल त्यांनीं विवक्षित जातीचा नायनाट किंवा द्वेष करण्याचा खटाटोप करून आपलें सामर्थ्य व हिंमत वायफळ खर्च करण्यापेक्षां विवक्षित जातीच्या हातची राजसत्ता काढून घेण्याचा यत्न करणें अधिक श्रेयस्कर आहे. या दृष्टीनें विचार केल्यास आज ब्राह्मण जातीवर हल्ला चढविण्याचें ब्राह्मणेतरांस प्रयोजनच नाहीं. आजकाल जुलमाचें अधिष्ठान असणारी राजसत्ता त्यांचें हातीं मुळींच नाहीं. फारतर इतकेंच

म्हणतां येईल कीं, अशा राजसत्तेच्या चक्रांतील कांहीं कांहीं दुवे कित्येक ब्राह्मण बनले आहेत. ह्या परिस्थितींत ते केवळ अर्थाचे दास असल्यामुळें राज्यकर्त्यांचें सामान्य धोरण व राजनीति यांच्या अनुरोधानें वागण्यास ते बांधले गेले आहेत. व त्या स्थितींतही ते ब्राह्मणेतरांवर स्वार्थबुद्धीनें किंवा स्वजातीच्या अभिमानानें प्रेरित होऊन जुलूम करतात अथवा करूं शकतात असें जर ब्राह्मणेतरांचें प्रामाणिक मत असेल तर योग्य मार्गानें स्पर्धा करून त्यांची राज्ययंत्राच्या साखळींतून म्हणजे सरकारी नोकरींतून हाकलपट्टी करणें हाच मार्ग प्रशस्त आहे व त्याचा ब्राह्मणेतरांनीं अवलंब केल्यास त्याबद्दल त्यांस कोणी नावें ठेवणार नाहीं. किंबहुना त्याकामीं अनेक विचारी ब्राह्मणांचें साहाय्यही मिळेल. ब्राह्मणांना प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं प्रारंभीं जें हाताशीं धरलें तें परोपकारबुद्धीनें किंवा त्यांच्यावर त्यांचें विशेष प्रेम होतें म्हणून नव्हे, तर त्यांची सत्ता स्थिर होण्यास त्यांच्या बुद्धिमत्तेचा व स्वार्थपरायणतेचा त्यांस उपयोग होण्याजोगा होता म्हणूनच धरलें व ही गोष्ट आतां ब्राह्मणवर्गाच्या पूर्णपणें लक्षांत आल्यामुळें स्वभावतःच तो सरकारी नोकरीविषयीं उदासीन बनून पापक्षालन करण्यास तयार झाला आहे आणि त्यामुळेंच राज्यकर्ते त्याच्यावर आग पाखडून त्याचें उच्चाटन करण्याचा प्रयत्न करणारांवर फिदा होत आहेत! ह्या स्थितीचा फायदा घेऊन ब्राह्मणेतरांनीं वाटल्यास आपला स्वार्थ साधावा व ब्राह्मणांनीं डोळ्यांवर झांपड घेऊन आजवर इंग्रजांच्या राज्ययंत्राचा घाणा जसा ओढला तसा ब्राह्मणेतरांनींही दमेपर्यंत तो खुशाल ओढावा. मात्र ब्राह्मणांना या कामीं जो अनुभव आला त्याकडे त्यांनीं अगदींच दुर्लक्ष करूं नये, म्हणजे त्यांच्या हातून राष्ट्रविघाताचें पातक कमी होईल.

---

## [लेखांक ३ रा.]

ब्राह्मणांच्या जुलुमाविषयीं राजकीयदृष्ट्या हा विचार झाला. आतां सामाजिक अथवा धार्मिकदृष्ट्या ब्राह्मणांचा जुलूम सध्यां कितपत शक्य आहे याचा विचार करूं. सुशिक्षित ब्राह्मण व अब्राह्मण ह्या दोघांच्याही धार्मिक व सामाजिक विचारांत पाश्चात्य संस्कृतीच्या संसर्गानें बरीच क्रांति झालेली

असल्यामुळें ब्राह्मणांचा वर्णगुरुत्वाचा अभिमान व तत्संबंधींच्या ब्राह्मणेतरांच्या पूज्यत्वदर्शक भावना यांचा सहजावृत्तीनें लोप होत चालला आहे, व जरी चुकून कोणाच्या मनांत अहंभाव अथवा उपमर्द यांच्या द्योतक भावना असल्या तरी शिष्टाचारास अनुसरून त्यांचें दमन करणें त्यांस भाग पडतें. अशा स्थितींत सुशिक्षित व शहरवासी लोकांत ब्राह्मणांना जुलूम करण्यास वाव कोठून मिळणार ? राहतां राहिले खेड्यापाड्यांतील लोक. यांच्यावर मात्र ब्राह्मण जोशी, कुलकर्णी व सावकार यांचा थोडाफार जुलूम होत आला आहे. परंतु तोही दिवसानुदिवस कमी होत चालला आहे. सातारा जिल्ह्यांतील कित्येक खेड्यापाड्यांत हिंडून आम्हीं जी माहिती मिळविली आहे त्यावरून आम्ही असें विधान करूं शकतों कीं, आजकाल बहुतेक खेड्यांतील जोशी आपलें गुरुत्व ब्राह्मणेतरांच्या माथीं मारण्यास तयार आहेत. इतकेंच नव्हे, तर आपली वृत्ति ब्राह्मणेतरांपुरती गुंडाळून ठेवण्यास तयार आहेत. कुलकर्णी लोक कर्जेदलाली करतात, पण त्यांच्या या व्यवहारास आळा घालणें हें पुष्कळ अंशीं ब्राह्मणेतरांच्याच हातीं आहे. कुलकर्णी आपण होऊन कधींही ब्राह्मणेतरांकडे जात नाहींत. तेच त्यांच्याकडे आपलीं भांडणें घेऊन जातात व त्याला आपलीं स्वार्थसाधु कारस्थानें रचण्यास संधी देतात. कुलकर्ण्यांनीं अशा रीतीनें आपल्या उपजत बुद्धीचा व अल्प शिक्षणाचा दुरुपयोग करून आपल्या अडाणी देशबांधवांस नागवावें हें वाईट तर खरेंच; परंतु याचा दोष त्यांच्या ब्राह्मणत्वाकडे नसून मनुष्यस्वभावाकडे आहे. कुलकर्णी तर बोलून चालून अन्य जातीचे; पण खुद्द ब्राह्मणेतर व शेतकरी वर्गांतलेच जे पाटील, कुलकर्ण्याइतके शहाणे व कर्ते होतात ते आपल्या ज्ञातिबांधवाशीं वागतांना कुलकर्ण्यांचेंच अनुकरण कां करतात ? यावरून हें स्पष्ट आहे कीं, ह्या प्रश्नाचा संबंध जातीशीं नसून विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीशीं व मनुष्यस्वभावाशीं आहे. कुलकर्णी व पाटील यांच्या जागीं दुसरे जरी कोणी आले तरी त्यांचेंही वर्तन हल्लींच्या परिस्थितींत यांच्याप्रमाणेंच होईल; तें बदलण्यास एकच मार्ग आहे व तो शेतकऱ्यांस अथवा मजूरवर्गास आणि इतर ब्राह्मणेतरांस साक्षर बनवून त्यांस आपलें स्वतःचें खरें हिताहित कळण्याला सुलभ जाईल इतकें शिक्षण त्यांना देणें हा होय. परंतु

दुर्दैवाची गोष्ट ही कीं, ब्राह्मणेतरांचे प्रयत्न ह्या दिशेनें फारसे होत नसून ह्या प्रयत्नांच्या नांवाखालीं अत्यंत अश्लाघ्य व देशहितविघातकच नव्हे तर आत्मविघातक अशी आततायीपणाची चळवळ सध्यां ते करीत आहेत. उदाहरणार्थ, सातारा जिल्ह्यांत सध्यां चालू असलेली सत्यशोधकांची चळवळ घ्या. ह्या चळवळीचें मुख्य साधन म्हणजे जलसे ऊर्फ तमाशे असून ते मध्यरात्रीं खेड्यापाड्यांतून केले जातात. जलशांत म्हणावयाच्या लावण्याचें पुस्तक छापलेलें असतें; परंतु प्रत्यक्ष म्हणतांना त्यांत अनेक फेरफार किंवा पुस्त्या जोडतात व त्यांचा हेतु ब्राह्मणांची उत्कट निंदा करून त्यांच्याविषयीं द्वेष अथवा तिरस्कार उत्पन्न करावयाचा असतो. *ह्या लावण्यांतून इंग्रज सरकारची भरपूर स्तुति व पेशव्यांची नालस्ती असते. ही ह्या चळवळवाल्यांची ढाल होय. हिच्या आश्रयानें ते ब्राह्मणांवर हल्ला करूं शकतात व हिंदूंच्या धार्मिक भावना व कल्पना यांचे वाभाडे काढून सामान्य जनसमूहाच्या धार्मिक श्रद्धेस धक्का देऊन त्यांच्यांत नास्तिकपणाचें बीज पेरतात. त्यांत शिक्षण घ्यावें म्हणूनही उपदेश असतो, पण तो त्रोटक असल्यामुळें व तें काम कष्टाचें असल्यामुळें त्या उपदेशाचा परिणाम फारच थोडा होतो.

---

* यासंबंधीं पुढील उतारा पहाः—

'सत्यशोधकांचा जलसा':—या मथळ्याखालीं सोलापूरचें 'कल्पतरू' पत्र लिहितें:—

"सत्यशोधकांचा जलसा गुदस्तां येथें आला होता व त्यांस त्यावेळचे डि. मॅजिस्ट्रेट मे. भरूचासाहेब यांजकडून प्रथम परवानगीही मिळाली होती; पण डि. मॅजिस्ट्रेटनीं अकस्मात् जाऊन स्वतः जेव्हां तो तमाशा पाहिला, तेव्हां दिलेला परवाना त्यांनीं लागलीच रद्द केला. यंदाही तमाशेवाल्यांनीं पुनः परवाना मिळविण्याचा नुक्ताच यत्न केला, पण हल्लींचे डि. मॅजिस्ट्रेट मे. ब्लाथवेटसाहेब यांनीं, तमाशांतील गाण्यांचा सर्व रोख ब्राह्मणांच्या द्वेषाकडेच दिसत असल्यामुळें अशा जातीजातींत द्वेष पसरविणाऱ्या खेळास परवानगी देतां येत नाहीं, असा अर्जदारास जबाब दिल्याचें कळतें."

सातारा जिल्ह्यांतील कांहीं मॅजिस्ट्रेटच्या दप्तरींही असाच दाखला असल्याचें समजतें.

ब्राह्मणांची खोड मोडण्याविषयीं केलेला उपदेश अघळपघळ व भेदक असल्यामुळें तो तात्काळ फलद्रूप होतो.

जलसा झालेल्या गांवांत शेतकऱ्यांचा संघ ऊर्फ संप ह्या नांवाखालीं स्थानिक पाटील पुढारी ब्राह्मणेतरांचा—ह्यांत बहुधा मराठे व कुणबी यांचीच जास्त संख्या असते, कारण महाराष्ट्रांतील खेड्यांत यांचीच वस्ती अधिक आहे—एक कंपू तयार करतात व ब्राह्मणांवर सामाजिक बहिष्कार घालून त्यांची अडवणूक करतात व तेवढ्यानें ब्राह्मण वठणीवर येत नाहींसें पाहून त्यांचीं पिकें कापणें, विहिरींचे वरंवटे पाडणें, जाळपोळ करणें व क्वचित् मारामारी करणें इत्यादि पापकर्में केलीं जातात. खेडे-गांवांत ब्राह्मण वस्ती थोडी व मराठे कुणबी वगैरेंची जास्त असते. शिवाय ह्यांचा संघ बनविणारांच्या पदरीं उडाणटप्पू टगे लोकांचा संग्रह असल्यामुळें त्यांच्या उपद्यापाची दहशत बसून ब्राह्मणांच्यातर्फे पुरावा देण्यास फारसे कोणी पुढें येऊं शकत नाहीं. जर कोणी तसें करण्याचें मनांत आणील व ब्राह्मणांकडे कल दाखवील तर त्याचा लगेच कडबा जाळून किंवा अन्य तऱ्हेनें नुकसान झालेंच म्हणून समजावें! यामुळें पोलिसलाही पुष्कळ वेळां खरी स्थिति कळली असतांही खटले करतां येत नाहींत व या पुराव्याच्या अडचणीमुळें सरकारचें लक्षही त्याकडे जावें तसें जात नाहीं. अशा स्थितींत असहाय्य व अशरण झालेल्या ब्राह्मणांना आपलें दुःख वेशीवर मांडण्याकरितां साहाजिकच वर्तमानपत्रांकडे धांव घ्यावी लागते. आजपर्यंत सत्यशोधकी अत्याचारासंबंधानें वर्तमानपत्रांतून पुष्कळ गवगवा झालेला आहे व तो जर निरर्थक असता तर सरकार आणि सत्यशोधकांचे जबाबदार पुढारी इतके दिवस मूग गिळून स्वस्थ बसले नसते.

---

## [ लेखांक ४ था. ]

आपल्या चळवळीचें नांव विनाकारण बद्दु होत आहे असें जर ब्राह्मणेतर पुढाऱ्यांस वाटतें, तर त्यांनीं एक निस्पृह ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचें मिश्र कमिशन नेमून खरा प्रकार बाहेर आणला असता व आपली चळवळ धुतल्या तांदुळासारखी स्वच्छ आहे हें जगाच्या निदर्शनास आणलें असतें.

तसेंच ठिकठिकाणीं घडलेल्या अत्याचारांचा त्यांनीं स्पष्ट शब्दांत उघड व जाहीर रीतीनें निषेध व्यक्त केला असता व जे कोणी आपले अनुयायी ह्या अत्याचारास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उत्तेजन देतांना आढळतील त्यांचा संबंध तोडून टाकण्याची शिस्त त्यांनीं घालून दिली असती. यासंबंधानें वावदूकपणा सोडून देऊन आपण आपलें कर्तव्य योग्यरीतीनें व प्रामाणिकपणानें बजावलें आहे असें ते आपल्या आवडत्या देवास अथवा सद्-सद्विवेकबुद्धीस स्मरून सांगू शकतील काय? अत्याचारांचा निषेध करणें तर राहोच, पण उलट ब्राह्मणेतर पत्रांतून जेव्हां उपरोक्त अनिष्ट प्रकाराचें पर्यायानें समर्थन* करण्यांत येतें तेव्हां हा वाद मिटवूं इच्छिणारांची निराशा झाल्यास नवल कसचें? ब्राह्मणेतरांच्या शिवराळ पत्रांतील वात्रटपणाकडे आम्ही मुळींच लक्ष देत नाहीं. परंतु जागरूक, जागृति यासारखीं विवेकी पत्रेंही जेव्हां आंधळीं बनल्यासारखी दिसतात, तेव्हां त्यांचा भ्रमनिरास करणें जरूर वाटतें. कारण हा वाद मिटण्याची जर कांहीं थोडी आशा असेल तर ती अशा लोकांचा दृष्टिकोन सरळ मार्गाकडे वळल्यानेंच सफळ होणार आहे. म्हणून जागृतिकारांच्या कांहीं भ्रामक विधानांचा पुढें विचार करण्यांत येत आहे. त्यायोगानें ब्राह्मणेतरांची बाजूही आमच्या वाचकांच्या लक्षांत येईल. 'चैतन्य' पत्राच्या टीकेस उत्तर देतांना ता. १० जूनच्या अंकांतील अग्रलेखांत 'जागृति'कर्ते पुढील विधानें करतातः—

( १ ) "खेडेगांवांतील ब्राह्मण वगैरे साक्षर वर्ग लोकांच्या धार्मिक व

---

* या समर्थनाचा एक ताजा मासला पुढें देत आहोंः—

"फाटून सडून कुजून गेलेल्या स्मशानमान्य ब्राह्मण्याची जोपासना करणारे हे पढतमूर्ख, सत्यशोधकांचे अत्याचार वर्णन करून धन्यता मानीत आहेत! सावरकर बंधूंच्या अत्याचाराचीं वर्णनें वाचून ब्राह्मणांस जितकें बरेंवाईट वाटत असेल तितकेंच, सत्यशोधकांच्या अत्याचाराचीं ब्राह्मणी रडगाणीं वाचून ब्राह्मणेतरांस बरेंवाईट वाटत आहे!" दीनमित्र, ता. ६।२।२४.

सावरकर बंधूंनीं सत्यशोधकांप्रमाणें चोरटे व भ्याडपणाचे कोणते अत्याचार केले याचा खुलासा लेखकांस करतां आला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. —संपादक.

सामजिक समजुतींचा हवा तसा फायदा घेऊन त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याचेंही हरण करतात." यांत "ब्राह्मण वगैरे साक्षरवर्ग" म्हटलें आहे. म्हणजे ब्राह्मणांशिवाय इतर पांढरपेशे असाही त्याचा अर्थ असेल. तर मग फक्त ब्राह्मणांच्याच मागें सत्यशोधकांचा ससेमिरा कां? शिवाय हे वर्ग धार्मिक व सामाजिक समजुतींचा फायदा घेऊन कोणाचें व कसें आर्थिक स्वातंत्र्य हरण करतात याचा खुलासा कां केला नाहीं? ह्या मोघम शब्दावडंबराची काय किंमत आहे? (२) "सावकार ब्राह्मण, जमिनदार ब्राह्मण, सरकारी अधिकारी ब्राह्मण, उपाध्याय ब्राह्मण, जोशी ब्राह्मण, कुलकर्णी ब्राह्मण" असा प्रकार सर्वत्र ठिकाणीं नाहीं. पुष्कळ ठिकाणीं ब्राह्मणांपेक्षां ब्राह्मणेतर सावकार व जमीनदार यांची संख्या अधिक आहे, सरकारी अधिकाऱ्यांतही दिवसानुदिवस ब्राह्मणेतरांची संख्या वाढतच आहे. शिवाय सावकारांच्या जाळ्यांतून ब्राह्मणेतरांस बाहेर काढण्याकरितां ठिकठिकाणीं पतपेढ्या स्थापन झाल्या आहेत व त्यांत पाटलांचेंच वर्चस्व असतें. कोठें जैन-लिंगाइतांचें व इतर जातींचें असतें. तरीही शेतकऱ्यांची रड व दैन्य कमी होत नाहीं याचें कारण काय? जोशांनीं ब्राह्मणेतरांपुरती तरी आपली वृत्ति सोडून मूग गिळले आहेत. तसेंच सरकारी अधिकारीही ब्राह्मणेतरांस शक्य तितक्या सवलती देत आहेत. मग हा उगाच कोलाहल कां? यापासून कोणती इष्टापत्ति साधणार? उपरोक्त विधानांच्या पुढें वर्णिलेली विषम स्थिति हल्लीं तरी निदान कोठें पाहण्यास मिळावयाची नाहीं. (३) "आतापर्यंत ब्राह्मण सावकारांनीं व जमिनदारांनीं ब्राह्मणेतरांची जी नागवण केली आहे व त्यांच्या जमिनी गिळंकृत केल्या आहेत त्या सरळ मार्गानें काय? जमिनीचा खंड घेणें वगैरे व्यवहारांतही कितीशा ठिकाणीं सरळपणा दिसतो?" यासंबंधांत जर कोठें अन्याय झाले असतील तर त्यांचा दोष ब्राह्मणांकडे नसून **कायदेबाजीची चटक लावणाऱ्या ब्रिटिशांच्या न्यायपद्धतीकडे आहे.** ब्राह्मणांच्या ऐवजीं देवदूत जरी असते तरी असाच प्रकार घडला असता व ब्राह्मणेतर सावकार आणि जमिनदार यांच्या बाबतींतही तो घडला आहे हें आम्हीं सिद्ध करून देऊं. मग ब्राह्मणांच्याच नांवानें तेवढा आक्रोश करण्यांत काय हांशील आहे? (४) "याचा (सदर अन्यायाचा) प्रतिकार शेतकरी कुळांनीं कां करूं नये?"

कायदेशीर व शांततेच्या मार्गांनीं अवश्य करावा. त्याबद्दल कोणी तक्रार करणार नाहीं. ब्राह्मणांनीं झालें तरी याच मार्गानें आपला मतलब साधला व तो मार्ग इतरांसही खुला आहे. तो सोडून ब्राह्मणांच्या अल्पसंख्यत्वाचा फायदा घेऊन धाकदपटशा किंवा जाळपोळ व नुकसान वगैरे अत्याचार करणें हें भ्याडपणाचें व नामर्दपणाचें लक्षण आहे. आपणांस क्षत्रिय म्हणवून घेणाऱ्या मराठ्यांस तरी तें शोभत नाहीं. ( ५ ) "जमिनी करणें किंवा न करणें हा खुषीचा सौदा आहे" अगदीं बरोबर आहे. नाहीं कोण म्हणतो ? व त्या कराच म्हणून ब्राह्मण कधीं जुलूम करतो ? 'त्या अमुकच करानें आम्हांला द्या नाहीं तर त्या आम्ही दुसऱ्या कोणास करूं देणार नाहीं व जो कोणी करील त्याचें नुकसान करूं,' असली धमकी व तदनुसार कृति करूं नका; तसेंच स्वतः ब्राह्मण जमीन करूं लागल्यास त्यांचें वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें भ्याडपणानें नुकसान करूं नका, एवढेंच ब्राह्मणांचें म्हणणें आहे. पण दुर्दैवानें सत्यशोधकांना तें पटत नाहीं. कारण तें पटून त्याप्रमाणें वागल्यास त्यांची चळवळ टिकणें शक्य नाहीं, अशी त्यांस भीति वाटते. ( ६ ) "संघशक्तीच्या जोरावर ब्राह्मणेतर ब्राह्मणांना वठणीस आणूं पहात आहेत त्यांत वावगें तें काय ?" अत्याचार न करतां केवळ सामाजिक बहिष्कार अथवा असहकारिता करून जरूर पड-ल्यास ब्राह्मणांस वठणीवर खुशाल आणावें, त्याबद्दल कोणी तक्रार करणार नाहीं; पण कायदा आपल्या हातांत घेऊन गुन्हे करण्याकडेच ब्राह्मण-विरोधी लोकांचा कल होत असून व त्यांस स्थानिक पुढाऱ्यांकडून उत्तेजन मिळत असल्यामुळेंच बखेडा माजून राहिला आहे व तक्रारी वाढत आहेत. ( ७ ) "ब्राह्मणांच्या घरीं 'यावत्चंद्र दिवाकरौ' हलकींसलकीं कामें ब्राह्मणेतरांनीं करावीं हा न्याय कोठला ?" असलीं कामें जो तो आपल्या पोटासाठीं स्वेच्छेनें करतो. कोणी त्यास जुलमानें कर म्हणून सांगत नाहीं. तेव्हां त्याबद्दल कुरकूर करण्यांत काय अर्थ ? ज्यांना त्यांत कमीपणा वाटेल त्यांनीं तीं करूं नयेत म्हणजे झालें. तीं न केल्यास ब्राह्मणांना त्याबद्दल ओरड करण्याचें कारण नाहीं. व जर कोणी करील तर त्यास मूर्ख समजून तिकडे लक्ष देऊं नये. या बाबतींत कोणावर जुलूम करणें ब्राह्मणांस शक्य नाहीं. इंग्रजी राज्यांत तरी असला प्रकार

खपणार नाहीं, हें ब्राह्मणेतर जाणत नाहींत काय? (८) " सधन ब्राह्मणेतरांच्या घरीं ब्राह्मण स्त्री-पुरुष गडी व मोलकरणी यांचीं कामें करावयास जर तयार नाहींत तर सधन ब्राह्मणांच्या घरीं तरी ब्राह्मणेतरांनीं तसलीं कामें कां करावींत? " हा प्रश्न मोठा सूचक आहे. त्यावरून ब्राह्मणेतरांच्या अंतरंगाची ओळख पटणारी आहे. त्यांच्या मनांत काय डांचत आहे व त्यांना काय हवें आहे, याचा मार्मिक बोध ह्या प्रश्नावरून होण्यासारखा आहे. याला आमचीं दोन उत्तरें आहेत. एकतर हा खुषीचा व जरूरीचा प्रश्न आहे व तो ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणें सोडविण्याचा त्याला हक्क आहे. ब्राह्मण कितीही निर्धन असला तरी तो अथवा त्याची स्त्री सेवावृत्ति न स्वकारतां उपाशी मरण्यास तयार असेल तर त्याबद्दल ब्राह्मणेतरांस तक्रार करण्याचें काय कारण? अशांनीं सधन ब्राह्मणेतरांच्या घरीं नोकरी करावी असा आग्रह धरणारे ब्राह्मणेतर आपल्या जातीच्या निर्धन व गरजू स्त्री-पुरुषांस आपल्याहून कनिष्ठ म्हणजे महार, मांग, चांभार वगैरे जातींच्या सधन लोकांचे घरीं 'गडी व मोलकरणी' यांचीं कामें करूं देण्यास तयार आहेत काय? वरिष्ठ जातीस खालीं ओढण्याचे बाबतींत जितकी यांची जिभली चालते तितकी खालच्या जातीस वर घेण्याचे बाबतींत कां चालत नाहीं? ज्या वेळेस तशा प्रकारची कृति करण्यास त्यांच्यापैकीं बराच मोठा वर्ग तयार होईल तेव्हां ब्राह्मणही त्यांना या बाबतींत हार जाणार नाहींत. किंबहुना ते त्यांच्यापुढेंच असतील ह्याबद्दल त्यांनीं खात्री बाळगावी. दुसरी गोष्ट ब्राह्मण स्त्री-पुरुषांनीं आपल्या घरीं राबण्याइतकें हीन व्हावें यांत आनंद व समाधान मानण्यापेक्षां आपल्या जातीच्या लोकांनीं ब्राह्मणाइतकें आचार-विचारांच्या बाबतींत श्रेष्ठत्व संपादन करण्याची महत्त्वाकांक्षा धरावी अशी भावना ब्राह्मणेतरांनीं बाळगिल्यास त्या योगानें त्यांच्या खऱ्या उन्नतीस अधिक मदत होईल. अशा ब्राह्मणेतरांना बरोबरीच्या नात्यानें वागवून त्यांचा सामाजिक दर्जा वाढविण्यास पुष्कळ विचारी ब्राह्मण आज तयार होतील. आतां ब्राह्मणेतरांच्या घरीं ब्राह्मणांनीं हलकीं कामें केलीं पाहिजेत असा जो त्यांचा कटाक्ष आहे त्या दृष्टीनें पाहिल्यास सध्यां पुष्कळ सधन ब्राह्मणेतरांकडे ब्राह्मण लोक आचारीपाणक्यांचीं कामें करीत असल्याचें आढळून येत नाहीं काय? सारांश, या बाबतींत अमुकच झालें पाहिजे असा

अढी मनांत बाळगणें हें कोतेपणाचें लक्षण असून तें समाजाविध्वंसक आहे. ब्राह्मणांनीं आपण इतर जातीपेक्षां श्रेष्ठ आहोंत असा आविर्भाव दुसऱ्याशीं वागतांना आणूं नये, एवढें फारतर ब्राह्मणेतरांच्या वतीनें या बाबतींत निस्पृहपणें म्हणतां येईल व त्या दृष्टीनें ब्राह्मणांनीं आपल्या वर्तनांत सुधारणा करणें जरूर आहे. ब्राह्मणांनीं आपणाशीं रोटी-बेटीव्यवहार करावा असें म्हणणारेही अनेक ब्राह्मणेतर आहेत; पण ह्या गोष्टी हट्टानें किंवा जुलमानें होत नसतात, व त्या एकदम होत नसतात. तर्कपद्धतीनें हा प्रश्न सोडवूं गेल्यास तो ब्राह्मणेतरांसही जाचक होणार आहे. कारण ब्राह्मणांशीं रोटी-बेटीव्यवहार जर मराठ्याला हवा, तर महार, मांग, तेली, तांबोळी, रामोशी वगैरे जातींनीं मराठ्यांशीं व कुणब्यांशीं रोटीबेटी व्यवहार करण्याची मागणी कां करूं नये ? ही मागणी मान्य करण्यास आज सदर जातीची तयारी आहे काय ? तेव्हां असले नसते भानगडीचे प्रश्न उपस्थित करून त्यावर रणें माजविण्यांत कोणाचेंच हित नाहीं. त्यामुळें स्वसमाजांत निष्कारण दुही व कलह माजून परक्यांचें फावतें व आपल्या सर्वांच्याच गुलामगिरीचें आयुष्य वाढतें, याचा आमच्या सूज्ञ व समंजस ब्राह्मणेतर बांधवांनीं शांतपणें नीट विचार करावा अशी त्यांस आमची प्रेमाची विनंति आहे.

शेतकरी किंवा मजूर यांच्या उन्नतीचा प्रश्नही अशाच व्यापक दृष्टीनें सोडविला पाहिजे. या लोकांनीं केवळ ब्राह्मणांविरुद्ध संप केल्यानें त्यांची उन्नति कशी होणार ? ब्राह्मणांची संख्या अल्प आहे; त्यांचेकडूनच तेवढे जमिनीच्या उत्पन्नापैकीं दोन हिस्से मिळविल्यानें अथवा दुप्पट मजूरी घेतल्यानें किती शेतकरी अथवा किती मजूर सुखी होतील ? अर्थात् फार थोडे. पण बाकीच्यांची वाट काय ? त्यांच्यांत असंतोष माजून ह्या थोड्यांशीं त्यांचा कलह जुंपणार नाहीं काय ? हे थोडे, त्यांना स्वकष्टानें मिळविलेल्या किफायतीपैकीं कांहीं अंश खुषीनें देतील काय ? व तसें देणें वाजवी होईल काय ? असे अनेक गुंतागुंतीचे व कलहोत्पादक प्रश्न सध्यांच्या सत्यशोधकी धोरणानें उपस्थित होतील. यापेक्षां जातीचा विचार न करतां शेतकरी व जमीनदार, मजूर व कारखानदार असे वर्ग पाडून उभयतांनीं एकमेकांचें म्हणणें ऐकून शक्य त्या सुधारणा करणें जास्त इष्ट नाहीं काय ?

ब्राह्मणांनीं तेवढे आपल्या जमिनींतील उत्पन्नाचे दोन हिस्से कुळास द्यावेत व मराठ्यानें किंवा इतर ब्राह्मणेतरानें निम्मा किंवा एकतृतियांश हिस्सा आपल्या कच्चयांस द्यावा हें कोणत्या अर्थशास्त्रास, समाजशास्त्रास अथवा नीतिशास्त्रास धरून आहे? हाच प्रश्न ब्राह्मणांकडून तेवढी दुप्पट मजुरी मागणारांसही करतां येईल. एतद्विषयक प्रस्तुतच्या सत्यशोधकी धोरणामुळें शेतकरी अथवा मजूर यांचें खरें कल्याण होण्याचा प्रश्न बाजूस राहून फक्त परस्परांत द्वेष, मत्सर व सुडाची भावना यांचा मात्र प्रसार होत आहे, हें खेड्यांतील ह्या चळवळीचें सूक्ष्म निरीक्षण करणाराच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. असल्या चळवळीचें समर्थन सुशिक्षित म्हणविले जाणारे ब्राह्मणेतर पुढारी करीत असल्याचा देखावा जेव्हां नजरेस पडतो तेव्हां तो पाहून हंसावें कीं रडावें हेंच समजत नाहीं! आम्हांला नुसता वावदूकपणा नको आहे. खरी सुधारणा व ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यामध्यें निष्कारण वितुष्ट न वाढतां उभयतांना आपापल्या मर्जीप्रमाणें वागण्याची मुभा पाहिजे आहे. सध्यांच्या सत्यशोधकी चळवळी-पासून याच्याविरुद्ध प्रकार घडत आहेत व ती चळवळ याच धोरणावर पुढें चालल्यास ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद अत्यंत विकोपास जाऊन एक-मेकांचीं डोकीं फुटण्यापर्यंत पाळी येईल असा संभव दिसत आहे. ब्राह्मण जात अल्पसंख्याक आहे व खेडयापाडयांत तर त्यांची वस्ती अगदींच अल्प असल्यामुळें त्यांना सांप्रत अत्यंत त्रास व छळ सोसावा लागत आहे व कित्येक ठिकाणीं त्यांच्या भ्याडपणामुळें सत्यशोधकांस आपण अखेर त्यांस नामोहरम करूं शकूं अशी आशाही वाटूं लागली आहे. ब्राह्मण-उच्छेदाची ही आसुरी भावना त्यांनीं सोडून द्यावी, यांत उभयतांचेंही कल्याण आहे, आणि हें जाणूनच सुशिक्षित ब्राह्मण अद्याप या लढ्यांत फारसें लक्ष घालीत नाहींत. परंतु ब्राह्मण-जातीच्या अस्तित्वावरच गदा येणार असें आढळून आल्यास ब्राह्मणेतरां-प्रमाणें ब्राह्मणांसही संघशक्तीनें ब्राह्मणेतरांच्या हल्ल्यास तोंड देणें भाग पडेल व त्यामुळें महाराष्ट्रांत नसती यादवी माजून तिचे परिणाम उभय-पक्षीं फार भयंकर होतील. याचा उभयपक्षांनीं व विशेषतः सत्यशोधकी

पुढाऱ्यांनीं शांतपणें विचार करावा व हा आपसांतील कलह त्यांनीं मिटता घ्यावा अशी त्यास आमची प्रेमाची विनंति आहे.

---

## [ लेखांक ५ वा.]

वास्तविक पाहिलें तर उभयपक्षांनीं थोडासा समंजसपणा दाखविल्यास हा वाद आतां मिटण्यासारखा आहे. पूर्वीं काय झालें असेल तें असो; पण सध्यां तरी इंग्रज सरकारच्या कृपेमुळें ब्राह्मणांचा ब्राह्मणेतरावर जुलूम होणें फारसें शक्य नाहीं असें खुद्द कित्येक ब्राह्मणेतरांचेंच मत आहे. मग मागल्या उखाळ्या पाखाळ्या काढून वृथा आपला व दुसऱ्यांचा क्रोधवन्हि प्रज्ज्वलित करून त्यांत उभयतांच्या व पर्यायानें राष्ट्राच्या हिताची राखरांगोळी करण्यांत काय अर्थ आहे ? ब्राह्मणजात जरी संख्येनें अल्प असली तरी बुद्धीनें व कर्तृत्वशक्तीनें ती कोणासही हार जाणारी नाहीं. तिनें जरी कांहीं सामाजिकदृष्ट्या जुलूम केले असले अथवा राष्ट्रीय पातकें केलीं असलीं तरी त्याबरोबरच तिच्या हातून आर्यसंस्कृतिरक्षणाचें व राष्ट्र जिवंत ठेवण्याचें कार्यही झालेलें आहे, हें ब्राह्मणेतरांनीं विसरतां कामा नये. इतकेंच नव्हे, तर सध्यां जी ब्राह्मणेतरांत जागृति उत्पन्न झाली आहे तिचा प्रारंभ देखील उदारमतवादी सुधारक ब्राह्मणांकडूनच झाला आहे हेंही त्यांनीं लक्षांत घेणें जरूर आहे. शिवाय त्यांच्याकडून उपरीनिर्दिष्ट जुलूम अथवा पातकें जर झालीं असलीं तर त्याची जबाबदारी केवळ त्यांच्यावरच नसून क्षत्रिय, वैश्य, इत्यादि वर्णांच्या लोकांचीही त्यांत भागिदारी आहे, हेंही त्यांनीं लक्षांत ठेवावें. सध्यां अस्पृश्य लोकांखेरीज इतरांना आपली उन्नति करून घेण्याचे मार्ग खुले असून त्यांत त्यांस ब्राह्मणांकडून अडथळा होण्याचा फारसा संभव नाहीं. मात्र त्यांनीं वृथा गैरसमज व अविश्वास बाळगून ब्राह्मणांचा निष्कारण द्वेष अथवा छल करण्याच्या मोहास बळी पडतां कामा नये. म्हणजे उभयपक्षांतील तंटा सलोख्यानें मिटण्यासारखा आहे. हा तंटा मिटण्यास उभयतांनीं कसें वागावें याचें थोडेसें दिग्दर्शन करून ही लेखमाला पुरी करतों.

१ ब्राह्मणांनीं वर्णगुरुत्वाचा अभिमान आत्मोन्नतीपुरता धरावा. पण इतरांशीं वागतांना त्याचें प्रदर्शन त्यांनीं करूं नये.

२ इतर जातींचा स्वयंनिर्णयाचा हक्क ब्राह्मणांनीं मान्य करावा, म्हणजे त्या जातीचें उपाध्येपण अथवा जोसकी करण्याचा ब्राह्मणांनीं आग्रह धरूं नये. जर कोणी स्वखुषीनें तीं कृत्यें करण्यास सांगेल तर तीं त्यांनीं करावींत, नाहीं तर करूं नयेत. ब्राह्मणेतरांना तीं पाहिजे त्यांच्याकडून करून घेण्याची मुभा असावी. तसेंच क्षत्रिय कोण, वैश्य कोण व शूद्र कोण याचा निर्णय त्या त्या वर्गांतल्या लोकांकडून व्हावा व तो ब्राह्मणांनीं मान्य करावा.

३ ब्राह्मणांनीं सरकारी नोकरींतून होईल तितकें आपलें अंग काढून घ्यावें व तींत ब्राह्मणेतरांचा त्यांच्या संख्येच्या मानानें सुखानें प्रवेश होऊं द्यावा. त्यांस विरोध करूं नये. मात्र लायकीसंबंधानें जें प्रमाण सरकार किंवा लोकप्रतिनिधींच्या संस्था ठरवितील तें कमी न होऊं देण्याबद्दल ब्राह्मणांनीं राष्ट्रहितबुद्धीनें विरोध केल्यास त्याविषयीं ब्राह्मणेतरांनीं गैरसमज करून घेऊं नये. व ब्राह्मणांनींही या बाबतींत देखील शक्य तितकें सवलतीचें व सामोपचाराचें धोरण स्वीकारावें.

४ जोसकी अथवा उपाध्येपणा या बाबतींत वृत्तिच्छेदामुळें ब्राह्मणांचे निर्वाहाच्या दृष्टीनें जें नुकसान होईल तें भरून काढण्याची जर आवश्यकता भासेल तर त्यांनीं आपलें शील सुधारावें व ब्रह्मदेशांतील भिक्षूप्रमाणें देवळांतून अथवा झाडाखालीं लोकांस साक्षरतेचें व धर्माचें शिक्षण निस्पृहपणानें देण्यास सुरवात करावी. म्हणजे त्यांचा योगक्षेम चालून प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सहज सुटेल. त्यांनीं प्रचलित राजकारणाशीं संबंध न ठेवल्यास त्यांच्या ह्या उद्योगांत त्यांना सरकारकडूनही उत्तेजन मिळण्याचा संभव आहे. हा धंदा त्यांनीं पतकरल्यास व गांवांतील सर्व पक्ष–उपपक्ष यांशीं समतेनें वागून गांवगुंडींत न पडल्यास गांवांतील लोकांच्या आदरास व विश्वासासही ते पात्र होतील व त्यांचेकडूनही त्यांच्या योगक्षेमास मदत होईल. उपाध्येपण अथवा जोसकी करणाऱ्या ब्राह्मणांची प्रवृत्ति या धंद्याकडे वळविण्याचें काम श्री० शंकराचार्यांनीं करावें व अशा लोकांच्या मुलांस त्या धंद्यांत प्रवीण करण्याची योजनाही त्यांनीं आपल्या शिष्यवर्गाच्या सहाय्यानें करावी.

५ ब्राह्मणेतरांनीं एकट्या ब्राह्मणजातीविरुद्ध शेतकरी अथवा मजूर यांस उठविण्याचें धोरण सोडून द्यावें. ह्या वर्गांतील लोकांचें खरें कल्याण करण्याची जर त्यांस इच्छा असेल तर शेतकरी व जमिनदार, कुळें व सावकार, मजूर व कारखानदार असे संघ होऊं द्यावेत व त्यांत जातीचा विचार न करतां सरहा सर्वांस लागूं पडतील असें नियम अथवा योजना कराव्यात. जो जमीन कसील त्यालाच जमीन असावी, ह्या तत्त्वाचा जरी त्यांनीं अवलंब केला तरी हरकत नाहीं. पण तें तत्त्व **सर्वांना सारखें लागूं केलें जावें. फक्त ब्राह्मणांच्याच मागें त्याचा ससेमिरा लावूं नये.** यासंबंधांत ब्राह्मण व अब्राह्मण शेतकरी यांनीं परस्पर सहकारिता करावी व दोन्ही वर्गांतील जमीनदारांनींही परस्परांशीं सहकारिता करावी. हा नियम इतर संघासही लागूं असावा.

६ सार्वजनिक देवालयें, जलाशयें, सभा, जमाव वगैरे ठिकाणीं समता असावी. उच्चनीच भाव कोणी बाळगूं नये व सोंवळ्या ओंवळ्याच्या कल्पना पुढें आणूं नयेत.

७ सार्वजनिक भोजनप्रसंगीं ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्या पंक्ती समोरासमोर व एकदम वाढाव्या व सर्वांस एकाच प्रकारचें अन्न वाढण्यांत यावें. मात्र पाकसिद्धि करणारे व वाढणारे ब्राह्मण असले पाहिजेत. सध्यांच्या सामाजिक स्थितीचा विचार करतां तूर्त तरी हा नियम अवश्य आहे. कालांतरानें कदाचित् तो बदलूं शकेल.

८ रोटी-बेटी व्यवहाराचे बाबतींत प्रत्येक जातीस स्वयंनिर्णयाचा अधिकार असावा व त्यासंबंधानें कोणी वृथा दुराग्रह धरूं नये. व्यक्तिमात्राच्या इच्छेवर ती गोष्ट सोंपवून द्यावी व ज्या त्या जातीस त्याचें नियमन करण्याचा हक्क असावा.

९ सर्व जातींनीं अस्पृश्यवर्गाचा विटाळ काढून टाकण्याचे बाबतींत सहकार्य करावें व २।३ वर्षांचे आंत ही सुधारणा सर्वत्र घडवून आणावी. ह्या बाबतींत सर्व वर्णांची प्रचंड बहुमतानें एकवाक्यता झाल्यास श्री० शंकराचार्यांनाही त्यास संमति द्यावी लागेल व ते देतीलही. कांहीं दुराग्रही भिक्षुक किंवा शास्त्री यांचा हट्ट न सुटल्यास त्यास बाजूस सारून

हें कार्य करतां येईल; पण ब्राह्मणेतरांचें प्रचंड बहुमत मात्र अनुकूल असावयास पाहिजे.

याप्रमाणें कांहीं थोड्या मुद्यांचा उल्लेख केलेला आहे. या विषयावर आणखी पुष्कळ लिहितां येण्याजोगें आहे. परंतु उभयपक्षांची तडजोड करण्याची खरी इच्छा असेल तरच त्याचा उपयोग असल्यामुळें ती स्पष्ट रीतीनें व्यक्त होईपर्यंत तूर्त इतकेंच पुरें.

## भाग दुसरा समाप्त.

# ब्राह्मण-अब्राह्मण-बोध

उर्फ

## ब्राह्मण-पत्रिकेंतील

## पहिल्या वर्षांतील निवडक लेख

### भाग तिसरा

## कांहीं निवडक कविता

# १ ब्राह्मणस्त्रीचें आत्मतेज.

(कविकल्पनाः—एका खेड्यांतील ब्राह्मणस्त्रीवर दुर्धर प्रसंग आला असतां तिचा नवरा घाबरून पळतो. तेव्हां ती आत्मतेजानें आपल्या अब्रूचें रक्षण करते व पुन्हा नवरा जवळ येतांच त्याच्या भ्याडपणाबद्दल निर्भर्त्सना करते, असा प्रसंग कवीनें खालील कवितेंत गोविला आहे.)

[चालः—महाराजा दीन दासी०]

दुर्दैवें घात केला। हा समय कटू पातला ॥
वांचवा, या, अब्रुला। गाजविणें कीर्तीला ॥
विनवि मी हात जोडोनी, तव करिं कर मी घातला ॥१॥

✠ ✠ ✠

[चालः—उद्धवा शांतवन कर जा०]

मेल्या, चल निघ येथोनी, चालतां होई तूं जलदी ॥
क्रोधाग्नी अंकित माझ्या, तोंवरी जाइरे आधीं ॥
प्राणाशीं मुकशिल नीचा, जरि येशिल करुनी गरदी ॥

ही सुरी पाहते वाट
घेईन नरडिचा घोट
मम मानेचाही छाट

निःसंशय ही घेईल,—नरकांत तुला लोटील. ॥२॥

कठिण समय येतां दुष्टा, विप्रांच्या पत्नी आम्ही ॥
मारुनि स्वतांही मरतों, अब्रूस्तव बघ परिणामीं ॥
विद्युत्सम आमुचे हात, चमकती–अब्रु–संग्रामीं ॥

विप्रस्त्री भ्रष्टविण्याला
तव पितर पाहिजे आला
मूर्खा रे या समयाला
बाहेर आंतडीं काढूं—नीचा तव नरकीं धाडूं ॥३॥

देह जावो अथवा राहो, अब्रुच्या रक्षणासाठीं ॥
ऐहिक सौख्यासी अग्नी, लावितों जरी अम्हि कष्टी ॥
सर्व क्लेश सहन करूनी, घेतसों मृत्युच्या गांठीं ॥
देव एक अब्रू आमुचा
आम्हांसी गमतो साचा
याविणें दुज्या देवाचा
आम्हि विचार नाहीं केला—तीं काय भिते मी तुजला ॥४॥

संतप्त सतीचीं वचनें, परिसतां दुष्ट तो गेला ॥
सतितेज पाहुनी नयनीं, दुष्टपणा सारा गळला ॥
मुखम्लान करोनी खालीं, हळुहळू पाय काढियला ॥
धन्य! धन्य! विप्रस्त्रीची ॥
चाड बाळगुनि अब्रूची
संकटांतुन सुटे साची
कठिण अशाही समयाला—दृष्टांत जगीं ठेवियला ॥५॥

✠ ✠ ✠

आजच्या प्रसंगीं स्वामी, अब्रूवरि घाला पडतां ॥
त्या नीच कुलांगारानें, माझ्याशीं झोंबी घेतां ॥
गेहांतुनि काढुनि पाय, कां? हो! भुइ थोडी पळतां ॥

नामर्दपणानें गेला
कां हो ? तुम्हि त्या समयाला
तद् हातीं देउनि मजला
निर्लज्ज कसे तुम्हि बनलां !—कीर्तीचा ध्वज मळवीला ॥६॥
स्वांगनेवरी परक्यानें, जरि टाकियला निजहात ॥
पाहोनी डोळ्यांनीं हो, मुठि ज्याच्या नच शिवशिवत ॥
हा प्रकार बघुनी नयनीं, ना बंद छातिचे तुटत ॥
धिक्कार असो षंढासी
कां धरिती पुरुषत्वासी
कां धरिती स्वप्राणासी
धिक्कार असो तुम्हांला—कीर्तीचा ध्वज मळवीला ॥७॥
संकटांत टाकुनि पत्नी, वांचविती अपुल्या प्राणा ॥
ना इतिहासीं, ना कोठें, ऐकिलें असे मी जाणा ॥
स्वप्राण देउनि अब्रू, रक्षितो थोर वा साना ॥
ही असे कीर्ति आर्यांची
विप्रांच्या विप्रत्वाची
ती कीर्ती गेली साची
विप्रांच्या पोटीं आलां—कीर्तीचा ध्वज मळवीला ॥८॥
गौतम मुनीची ती भार्या, देवेंद्रानें भोगियली ॥
त्यावेळीं गौतम मुनिनीं, त्याची स्थिति कैसी केली— ॥
तत्क्षणीं शाप देवोनी, छिन्नभिन्न काया सगळी— ॥
टाकिली तेधवां करुनी
नुसत्याच शाप वचनांनीं
तुम्ही नामर्द बनूनी
मोठ्यांच्या पोटीं आलां—कीर्तीचा ध्वज मळवीला ॥९॥

मम रक्षण करतां करतां, स्वर्गासी असतां गेला ॥
मम सौभाग्याचा हार, जरि तेव्हां असता तुटला ॥
तरि स्वामी आपुल्या मागें, मम प्राणहि असतां गेला ॥
कांकणें आम्हांसम हातीं
स्वामी कां ? भरलीं होतीं
पद-दलीत करुनी कीर्ती
कां मुख दावाया आला-कीर्तीचा ध्वज मळवीला ॥१०॥
नच पाणी अंगीं ज्याच्या, स्वांगनाहि राखायाचें ॥
मनगटांत ना सामर्थ्य, अब्रू सांभाळायाचें ॥
छळ स्वांगनेचा बघतां, भरतें नच ये त्वेषाचें ॥
ते ढ्ंग कशाला करिती
गरिबांच्या माना चिरिती
अब्रूची होळी करिती
लाविला डाग वंशाला-कीर्तीचा ध्वज मळवीला ॥११॥

✠ ✠ ✠

भामिनी करि पुरें आतां, बाण लागती वचनाचे ॥
चेतविला केसरि सखये, बाण मारुनी तूं साचे ॥
आतां मी पाहुनि घेतों, त्या नीच कुलांगाराचें ॥
जाऊनी देतों वर्दी
ठाण्यासी करुनी गर्दी
उतरितों तयाची धुंदी
कळवितों मि अधिकाऱ्याला-त्या दुष्टा शासायाला ॥१२
बेअब्रू करण्याकरितां, जरि कोणीही येतील ॥
ते कोणीही जरि असले, तरि तुरुंगामधिं 'जातील ॥
त्याबद्दल अधिकारी गे, त्या शिक्षा बहु करतील ॥

आहे त्याबद्दल कोड
निःसंशय भीती सोड
काढुनी मनांतिल तेढ
काळजी मनांतिल सोड—अम्रुची न कां ? मज चाड ॥१३॥

✠ ✠ ✠

धिक्कार असो तुम्हाला, बोलतां असे तुम्हि बोला ॥
अब्रूवरि घाला पडतां, कायदाहि काय करील ॥
प्रत्यक्ष प्रसंगा वेळीं, कायदा ठरतसे फोल ॥
कोडांत कोड राहातें ॥
प्रत्यक्ष प्रसंगा पुढतें
धारिष्ट उपेगा येतें ॥
भ्रम स्वामी तुम्हि तो सोडा, धारिष्ट कांहिं तरि जोडा ॥१४॥

—बा. वा. खाडिलकर.

---

## २ ब्राह्मण-ब्राह्मणेतर.

[चालः—ब्राह्मण अथवा महार मी०]

ब्राह्मणेतर* कीं ब्राह्मण मी। उभा राहतो प्रश्न तमी।
एकच जननी आम्हांला। भेदभाव कां रक्ताला।
एकच जननी जर पाळी। कुणास करितों शिविगाळी।
बसतों उठतों मांडिवरी। जननी अंकीं महीवरी।

---

* येथें मात्रादोष अपरिहार्य आहे.

मिळुनी आलों ।
बंधु झालों ।
कार्यी झटलों ।
संघशक्ति ही करावया । राष्ट्रासाठीं मरावया ॥१॥

हिंदजननिचीं सर्व मुलें । नंदनवनिची दिव्य फुलें ।
जेथुन आम्ही या गांवीं । बसुनी आलों ज्या नावीं ।
अद्वैताचें साम्राज्य । स्थापायाला अधिराज्य ।
विसरुनि गेलों ।
भांडत बसलों ।
व्यर्थचि मेलों ।
सोडुनि देउनि तत्त्वाला । मुकत चाललों जीवाला ॥२॥

जन्मसिद्ध नसुनी भेद । विसरुनिया जाउनि वेद ।
मणी जाहलों माळेचे । एका सूत्रीं जायाचें ।
सर्वच आम्ही अस्पृश्य । कुणी करावे वा स्पृश्य ।
मालाकारा ।
कर उद्धारा ।
परकी हारा ।
काय बोलतो हें आम्ही । कुणा कळेना या धामीं ॥३॥

कशास मग हा हव्यास । जातीजातींचा पाश ।
वरचढ एकाहुनि एक । गुलाम त्यांतील हे कैक ।
म्हणति मुखानें मी थोर । शाल घेउनी हे चोर ।
दोघांमाजी ।
एकच भाजी ।
परकी पाजी ।
जगावया कीं मरावया । प्रभा आपुली भरावया ॥४॥

आत्मवंचना सर्वांची। होउनि कलहाप्रति जाची।
जिवंत राष्ट्रें कोणाला। विचारती कां आम्हांला।
प्रवेश तैसाही स्पर्श। नसतां लवही ना हर्ष।
गणपति करितां।
माती घेतां।
दोघे रचितां।
ठेउनि नांवें जातीला। पोटास्तवना ह्या लीला ॥५॥

एकी करितां बेकी झाली। तत्त्वाला ती विसरुनि गेली।
तिलांजली द्या द्वेषाला। सांभाळा निज हक्काला।
कर्माकर्मा कां धोका। नांवें आतां ठेवुं नका।
स्वार्थत्यागी।
भारतयोगी।
एकच जोगी।
कितीक मिळती दोघांत। गुणकर्मांच्या एकींत ॥६॥

सर्व सहोदर राष्ट्राचे। धर्माचे वा कार्याचे।
चला मरूं या रणांगणीं। स्वराज्य आणावया मणी।
हातीं घेउनि शिरकमल। कराल शक्ती करवाल।
मारूं किंवा मरूं तरी। नांव ठेउनी परोपरी।
परास हंसवी।
अशा यादवी।
कशा रहावी।
मूळ एक ते असोनिया। हेवा करितां कां वाया ॥७॥

—कापशीकर वैद्य, कोल्हापूर.

## ३ एक नवी तुळशीची आरती.

[ हीं आरती एका जुन्या वाडांत सांपडली. ती अप्रसिद्ध वाटल्यावरून येथें दिली आहे.]

ब्रह्मा केशव मुळीं मध्य तो शवरी। आग्रीं शंकर तीर्थें शाखा परिवारी। सेवा करिती भावें सकळही नरनारी। क्लेशापासुनि काढी भवभय नीवारी॥ जयदेव जयदेव जय माय तुळसी। निजपत्राहुनी हलु त्रिभुवन तूं तुळसी॥ १॥ सीतळ छाया भूतळ व्यापक तूं कैसी। मंजिरियाची आवड कमळारमणासी। तव दळ विरहित विष्णु राहे उपवासी। विशेषमहिमा तूझा शुभ कार्तिकमासी॥ जयदेव०॥ २॥ अच्युत केशव माधव पीतांबरधारी। तूझें पूजन करितां जो हे उच्चारी। त्याला देसी संतति संपति सुखकारी। गोसावी सुत मातें मजला तूं तारी॥ जयदेव०॥ ३॥

---

## ४ अथ प्रकाश-दीपिका.

[ सदर अप्रसिद्ध ग्रंथ राजयोगासंबंधीं असून तो अत्यंत बोधप्रद व प्रत्यक्ष अनुभवानें लिहिलेला आहे. त्याचे शेवटचे ओवीवरून तो श्रीएकनाथ महाराज यांचा दिसतो. ह्याची एक प्रत श्रीदत्तमहाराज ब्रह्मचारी यांजकडून आम्हांस मिळाली आहे. 'ब्राह्मण मासिक पत्रिका' अंक ९।१० मध्यें तो प्रसिद्ध झाला आहे.]

॥ श्रीगणेशायनमः॥ उद्धव म्हणे श्रीकृष्णासी। प्रणवाभ्यास सांगा आम्हासी। जेणे पाविजे आत्मरूपासी। सुलभेसी करूनी॥ १॥ अष्टांगयोग अति कठिण। आचरितां असें दारुण। म्हणूनि प्रणवानु-

संधान। सहज स्थितीचें सांगावें॥ २ ॥ एथें तव माझें चित्त। अखंडित भोगूं पहात। तुम्ही बोलिले निश्चित। अवकाश पडे॥ ३ ॥ तृषा लागलिया वेळ। कूप खणोनि प्राशिजे जळ। क्षुधा लागली प्रबळ। धाविजे पेरु॥ ४ ॥ देवा ऐसे न कीजे आतां। धीर न धरवे माझिया चित्ता। मीन जळेवीण ठेवितां। राहे कैसा॥ ५ ॥ पाहूनि उद्धवाची परम स्थिती। विशेष संतोष जाहला चित्तीं। आलिंगुनि परमप्रीति। बोलतसे॥ ६ ॥ उद्धवा आमुच्या हृदयींचें गुज। केवीं राखूं चोरूनि तुज। सर्व बीजाचे निजगुण। सांगत असों॥ ७ ॥ एथें सर्वांगाचे करोनि कान। आत्मस्वरूप चैतन्यपण। स्थिर करूनि मन। सावध पाहे॥ ८ ॥ आमुचा ऐश्वर्ययोग। जें मत्स्वरूपाचें निजांग। तयाहूनि नसे चांग। सर्वस्व हें॥ ९ ॥ जेथूनि सर्व घडलें असे। परी कवणासीहि न प्रकाशे। विरिंची आदिकरूनि आयासे। वांछितातीं॥ १० ॥ हे गतीची निजगती। येणें परम पुरुषाची प्राप्ती। याहूनि नसे त्रिजगती। आणीक कांहीं॥ ११ ॥ उद्धवा याचें कारण। सहज स्थितीचें आसन। ध्वनी अंतर्गत करून। ध्यान लक्षी॥ १२ ॥ ध्वनीं ठेविजे वृत्ति। नाद लावूनि श्रोत्री। नयनगर्भाप्रती। भ्रूमध्यें लक्षी॥ १३॥ ऐसें लक्ष लक्षितां। निज प्रगटेल तत्त्वतां। अणुरेणु पूर्ण भरितां दिसतील सहजीं॥ १४॥ मुक्त मोतीं कृश मोठीं। तुज पाहतां दिसतीं दृष्टी। रौप्यें ताराशी सृष्टी। भरली दिसे॥ १५॥ अनेक घुंगुरु तळपती। कीं नक्षत्रें डळमळती। असतीं पुष्पें डोलती। मधुर वातें॥ १६॥ इंद्रनीळाची निजज्योती। राघवा नेत्राची दिसे पंक्ति। तेज गुंडाळलें झळकती। अनेकत्त्वें॥ १७ ॥ क्षणक्षणां रूप पालटे। झळकतां विजू हारपे। ज्वाळा भासती आपोआपें। प्रकाश तेजें॥ १८ ॥ चंद्र सूर्य दिसती उगवले। अनेक तेज पाहतां फांकलें। ऐसें तेज पाहिलें। दृष्टीस भासे॥ १९ ॥ तयाचें ऐकीजे कारण। प्रथम अंधःकार निबिडपण। ते अष्टधा प्रकृति जाण। निश्चियेसी॥ २० ॥ जे प्राणिया होय

गति । ते इये अंधःकारे पडती । तया मत्स्वरूपाची प्राप्ती । नव्हे येणें ॥ २१ ॥ सूक्ष्मपणें सुवर्णरज । तया प्रकाशें दिसति तुज । ते मूळ माया हे गुज । ओळखीजे तुवा ॥ २२ ॥ येणेंचि जीव शिव होय । सूक्ष्मपणें कळोन आहे । सर्वेंद्रिया व्यापक होय । मती तेही ॥ २३ ॥ जें का दिसे मुक्ताकार । तोचि ब्रह्मा हा निर्धार । अनेकरूपासि परपार । भरूनि ॥ २४ ॥ तारा दंडाकार दिसती । तोचि विष्णू सुनिश्चितीं । सर्व पालनाची स्थिती । निजगतिकर ॥ २५ ॥ नाना तेजाचे गुंडाळे । लक्षितां तरंगिसी फळे । तोचि शेषशाई विमळे । भ्रांति नाहीं ॥ २६ ॥ तेज दिसे वर्तुळाकारेसी । चक्रचक्रांत प्रवेशी तोचि सदाशिव निश्चयेसी । ओळखी तूं ॥ २७ ॥ आणीक एक अर्ध चंद्राकार । तोचि जाणिजे ईश्वर । जया स्वरूपाचा परपार । न कळे कोणा ॥ २८ ॥ जो इंदु भास्करापरी भासे । दृष्टी लावूनि समरसे । स्थिर करूनि मानसें । निश्चळ पाही ॥ २९ ॥ तयाही देखुनी । मयूरपिच्छे नीलपाणी । ऐसे दिसे निजनयनीं । स्वरूप एक ॥ ३० ॥ तया खोंविजे दृष्टी । तया भ्रूमध्यें होय भेटी । ते येउनि नेत्रसंपुटी । होतसे स्थिर ॥ ३१ ॥ त्यातें निजदृष्टीचा प्रवेश । सहज उन्मनी सौरस । मग निज तेजाचा प्रकाश । ब्रह्मरूप ॥ ३२ ॥ ऐसी ब्रह्म-स्वरूपाची पेटी । पाहतां उघडेल दृष्टी । तटस्थाची वृत्ती । कोण सांगे ॥ ३३ ॥ तेथें ब्रह्मतेज प्रगटलें । साध्य साधन खुंटलें । आपआपण झालें । स्वस्वरूप ॥ ३४ ॥ ऐसा मदैश्वर्ययोग । सांगितला तुज सांग । हें माझें निजांग । निश्चयेसी ॥ ३५ ॥ पाषाण देव देउळा । अंतर्बाह्य एकाचि शिळा । तैसा प्रकाशिला अवलीळा । हृदयस्थ जो ॥ ३६ ॥ ऐसा विष्णु आत्मलिंग । बोध आलिया सांग । तेथें कैचे सांगोपांग । स्वयंज्योति ॥ ३७ ॥ घरीं कामधेनू असतां । तक्र मागो जाय दीनता । ठेवणें वडिलांचें घरीं असतां । मागे भिक्षा ॥ ३८ ॥ मृत्तिका जळ विचित्र प्रतिमा । तेथें

दैवत ऐसी सीमा। सकळ आत्मयारामा। व्यापक विश्व ॥ ३९ ॥ ऐसा हृदयस्थ मनोरम। सर्व सुखाचें निजधाम। भ्रांति येणें समविषम। मानी तूं असे ॥ ४० ॥ भ्रमरी-कीटक न्याय। झाला जरी उपाय। तरी स्वरूपांची सोय। अपसयाची ॥ ४१ ॥ मग प्रत्यक्ष तत्त्व दिसे। चक्षुरग्निमणिमयप्रकाशे। जो पूर्णत्वचि असे। सर्वसाक्षी ॥ ४२ ॥ तया आड अंधार आहे। ते मायास्वरूप सिद्ध आहे। तटस्थ खुंटली प्रवाहे। स्वरूप दिसेना ॥ ४३ ॥ ऐसें चक्षु माजी गुह्य जे। अंगुष्टपर्व मणी हे। तयावरी पर्वार्ध पाहे। कारण जें का ॥ ४४ ॥ तयावरी वर्तुळबिंदु ज्योती। श्रोती अन्यथा न मानावें चित्तीं। मसूर प्रमाण तेजस्थितीं। तया अंतदृष्टी पीत भासे ॥ ४५ ॥ नील सुनील अमल। देव साळीशुक केवळ। तयाहुनि अति निर्मळ। सूक्ष्म ज्योती ॥ ४६ ॥ चक्षुचिया दशांश भागी। तेथें पहाती जे योगी। स्वयंतेज निजांगी। स्वतेजें असे ॥ ४७ ॥ अचळ निर्मळ शांत। निज असे दिसत। विमल विमल दिसत। स्वरूपशून्य ॥ ४८ ॥ ऐसे ते निरंजन। शुद्ध स्फटिक प्रमाण। प्रकाशमान मणि शुभ्रपण। विराजले असें ॥ ४९ ॥ तेजोराशी परब्रह्म असे। धारणेसी समरसे। प्राणलिंग प्रत्यक्ष दिसे। सच्चिदानंद ॥ ५० ॥ ऐसेनि सर्वांगें पाहतां। परमात्मा दिसेल तत्त्वतां। हे निरामय कर्ता। विरुळा जाणे ॥ ५१ ॥ ऐसी वस्तु चर्मचक्षु जो लाहे। ज्ञान दृष्टी करूनि जो पाहे। चिदज्ञानु होऊनि राहे। निजवस्तु पूर्ण ॥ ५२ ॥ एका जनार्दना शरण। झाले उद्धव श्रीकृष्णाचें संभाषण। ते निरूपिलें देशभाषे करून। श्रोतीं अन्यथा न मानावें ॥ ५३ ॥

## ॥ इति श्रीप्रकाश-दीपिका संपूर्णम् ॥

द्वा. क्र. २४५६

# ५ हा हिंददेश माझा.

(कवि :—आनंदराव टेकाडे, नागपूर )

[ गजल ]

आनंदकंद ऐसा । हा हिंददेश माझा ॥धृ०॥
सत्यासि ठाव देई । वृत्तीस ठेवि न्यायी
सत्वास मानि राजा । हा हिंददेश माझा ॥ १ ॥
जगदीश जन्म घेई । पदवीस थोर नेई
चढवी स्वधर्मसाजा । हा हिंददेश माझा ॥ २ ॥
जनकादि राजयोगी । शुक, वामदेव त्यागी
घुमवीति कीर्तिबाजा । हा हिंददेश माझा ॥ ३ ॥
दमयंति, जानकी ती । शीलास भूषवीती
नटली नटेश गिरिजा । हा हिंददेश माझा ॥ ४ ॥
विश्वास मोह घाली । ऐसी मुकुंदमुरली
रमवी जिथें निकुंजा । हा हिंददेश माझा ॥ ५ ॥
गंगा—हिमाचलाची । वसती जिथें सदाची
होऊनि राहि कालिजा । हा हिंददेश माझा ॥ ६ ॥
पृथुराज, सिंह,* शिवजी । स्वातंत्र्यवीर गाजी
करिती रणांत मौजा । हा हिंददेश माझा ॥ ७ ॥
तिलकादि जीव देही । प्रसवूनि धन्य होई
मरती स्वलोककाजा । हा हिंददेश माझा ॥ ८ ॥
जगिं त्याविना कुणीही । स्मरणीय अन्य नाहीं
थोरांत थोर समजा । हा हिंददेश माझा ॥ ९ ॥
पूजोनि त्यास जीवें ॥ वंदोनि प्रेमभावें
जयनाद हाचि गर्जा । हा हिंददेश माझा ॥ १० ॥

*महाराणा प्रतापसिंह.

# 'ब्राह्मण' मासिक-पत्रिका

आत्मनिरीक्षण, आत्मसंरक्षण व आत्मोन्नति या त्रयीवर कटाक्ष ठेऊन अखिल महाराष्ट्रीय ब्राह्मण समाजाचें एकीकरण व संघटना करण्याच्या हेतूनें वरील मासिक-पत्रिका सातारा जिल्ह्यांत चालू करण्यांत आली आहे. इतर जातींशीं शक्य तितका सलोखा ठेवून ब्राह्मण समाजाचें हितसंवर्धन व रक्षण करणें व अंतः-शुद्धिपूर्वक त्याची सुधारणा करणें हें ह्या पत्रिकेचें उद्दिष्ट आहे. सध्यांच्या ब्राह्मण-विरोधी हुल्लडींत ब्राह्मणांची बाजू संभाळणारें अखिल महाराष्ट्रांत हें एकच मासिक आहे. व सर्व प्रकारच्या ब्राह्मणांनीं त्यास आश्रय देऊन तें वाढीस लावल्यास त्या समाजाच्या उत्कर्षास तें उत्तम साधन होण्यासारखें आहे. वार्षिक वर्गणी म. ऑ. आगाऊ २॥ रु.; व्ही. पी.नें ३ रुपये.

व्यवस्थापक, **ब्राह्मण-पत्रिका**

पोष्ट इसलामपूर, ( सातारा ).

REFBK-0002456